ॐ

योगिराज सोहिरोबानाथकृत

पारमार्थिक, ओवीबद्ध किरकोळ ग्रंथ

१ श्रीअद्वयानंद, २ पूर्णाक्षरी, ३ अक्षयबोध.

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

भ० गी० अ० ४

[जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । तुकाराम]

ऐशिया प्रकारें ब्रह्मनिष्ठ । सोहिरोबा आंबे साधु श्रेष्ठ ॥
जगरीतीं वर्तती स्पष्ट । भावनिष्ठ सद्गुरुपदा ॥ ८४ ॥

राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमाला अ० ९४

हा भाग

भगवंत बाळकृष्ण पै रायकर

यांनीं

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन जुनाट
हस्तलिखीत प्रतीच्या वगैरे आधारें तयार केला

तो

मुंबईंत " इंदुप्रकाश स्टीमप्रेसमध्यें " छापून प्रसिद्ध केला.

सन १९०७.

किंमत १॥ रुपये.

हा भाग

श्रीमत्परमहंसेत्यादि यथोक्तविरुदाङ्कित

श्रीमच्छिवानन्दसरस्वतिकरकमलसंजात-

श्रीमदात्मानन्दसरस्वत्यनुगृहीत-

श्रीमत्पूर्णानंदसरस्वति

श्रीपादैः

श्रीमठ कवळें

यांच्या चरणीं नम्रतापूर्वक

अर्पण केला असे

प्रकाशक

भगवन्त बाळकृष्ण पै रायकर

प्रस्तावना.

निर्मानमोहाजितसंगदोषा, अध्यात्मनित्याविनिवृत्तकामाः ।
द्वंद्वैर्विमुक्ताःसुखदुःखसंज्ञै, र्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

[भ० गी० अ० १५]

योगिराज सोहिरोबानाथ.

प्रापंचीक गोष्टींविषयीं निरंतर विचार करणें इतकेंच मनुष्यमात्राचें कर्तव्य नसून पारमार्थिक गोष्टींविषयीं विचार करणें हेंच त्याचें खरें व महत्त्वाचें कर्तव्य होय. अशा पारलौकिक गोष्टींविषयीं विचार करणें म्हणजे मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, सोहिरोबानाथ इत्यादि जे महात्मे आत्मज्ञानाविषयीं, परोपकाराविषयीं व नीतीविषयीं, आजपर्यंत विश्वामध्यें गाजून गेले, अशा सत्पुरुषांनीं केलेल्या ग्रंथांचें श्रद्धापूर्वक अवलोकन करणें व त्यांनीं उपदेशिलेल्या मार्गाचें अवलंबन करणें हें होय. प्रस्तुत प्रस्तावनेंत शिरोभागीं दाखल केलेल्या भगवद्वाक्यानुरूप शाश्वत पदाला जाऊन मिळालेले, असे जे पूर्वोक्त ज्ञाते पुरुष महाराष्ट्रमंडळांत अवतीर्ण होऊन गेले आहेत, तशाच प्रकारचे सोहिरोबानाथ हेही एक अद्वितीय पुरुष असून, त्यांच्या साधुत्वाची व कवित्वाची कीर्ति आज सर्वत्र पसरलेली आहे [असो कांहीं काळानंतर । सांवरूनि प्रेमा स्वरूपाकार । विचरती महीचर योगेश्वर । बोलती उद्गार ब्रह्मींचे ॥ ९७ ॥ परोक्षतः [परापेक्षा ?] स्नान भोजन । आपुला आपण देवतार्चन । सोहिरोबा संत योगी पूर्ण । शिष्य जाण गोरक्षाचा ॥ ९९ ॥ जगदोद्धार तया दर्शनीं । हे जाणोनी गोरक्षक मनीं । आज्ञापिती शिष्यालागुनी । भ्रमण मेदिनी करावया ॥ १०१ ॥ गुप्तरूपें देउनी भेटी ।

सांगितली दुजी गोष्टी । टीका करीं शुद्ध मराठी । आत्मराहटी लावीं जगा ॥ १०२ ॥ "राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमाला" ग्रंथ अ० ९४]

ह्या महात्म्याच्या पारमार्थिक ग्रंथांचा जीर्णोद्धार करण्याचें काम आज दोन वर्षांपासून "योगिराज सोहिरोबानाथ" या नांवाच्या त्रैमासिक पुस्तकद्वारानें चालविलें आहे, व आजपर्यंत "सिद्धांतसंहिता पूर्वार्ध व उत्तरार्ध" अ० १८ हा ग्रंथ, पद्यसंग्रह भाग १ ला, व पद्यसंग्रह भा० २ रा, आणि स्फूटकाव्यें भाग ३ रा; याप्रमाणें पूर्ण करून महाराष्ट्रीय बंधुजनांस सप्रेम सादर केलींच आहेत; आणि आज "अद्वयानंद," "पूर्णाक्षरी," आणि "अक्षयबोध," ह्या लहान ओवीबद्ध ग्रंथांचा या भागांत समावेश करून हा भाग प्रसिद्ध केलेला आहे. या कामास सुरवात केल्यापासून ज्या अनेक अडचणी आल्या, त्यांचें "सत्य संकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ" ह्या सत्पुरुषाच्या उक्त्यनुरूप निरसन होऊन आमचा इष्ट हेतु येथवर सिद्धीस पोंचला, ही दयाघन परमेश्वराची कृपा आहे असें आह्मी समजतों.

सोहिरोबांची कविता साधी, साहाजिक स्फूर्तिजन्य अशी आहे. शब्दालंकारांनीं शोभा आणण्याचा प्रयत्न केलेला तींत क्वचित्च आढळतो. तींत नीति, सद्भाव, भक्तियोग यांचा समावेश विशेष आहे. कर्मठपणाची वृद्धि होऊन धर्माच्या खऱ्या स्वरूपावर त्याचें झांकण पडण्याचा जो काल त्यास अटकावून महाराष्ट्रवासी जनांचीं मनें भक्तियोगादि मार्गाकडे वळविण्याच्या कामांत सोहिरोबानाथांची कविता किती उपयोगीं पडली आहे हें सांगावयास नको. ईश्वरप्राप्तीस प्रेमपुरःसर भक्ति हेंच खरें साधन, योगाभ्यासाच्या योगानें चित्त शुद्ध करून, देवावर पूर्ण भरंवसा ठेवून, विषयांपासून मन सोडवून, त्यास अंतःकरणपूर्वक शरण जाणें हाच मुक्तीचा मार्ग; त्यास सोडून दांभिक मार्गानें जाणाऱ्यांस फलप्राप्ति होणें अशक्य; हें धर्मसंबंधी सत्य लोपत चाललें होतें; त्याचें सोहिरोबानाथांनीं

आपल्या ग्रंथांत फार औत्सुक्यानें प्रतिपादन केलें आहे. आपला हीनपणा, क्षणिक सुखें व क्षणिक विषयोपभोग यांत आनंद पावून चिरसुखप्राप्तीकडे आपलें दुर्लक्ष, व पापाचरणाकडे स्वाभाविक कल, आपलें दौर्बल्य, आपली परतंत्रता व अशाश्वतता या संबंधाचे यांचे उद्गार फारच मार्मीक आहेत असें आम्हास वाटतें.

या भागांत आलेल्या ग्रंथांच्या हस्तलिखित पोथ्या कोणाकडून व कसकशा मिळाल्या, याबद्दल खालीं लिहिलेलें आहे.

१ श्रीअद्वयानंद ग्रंथाची प्रत बांदें येथें मूळ आंबिये याचे घरीं संपूर्ण नाहीं असें त्यांचे हल्लींचे वंशज रा. रा. लखबादादा आंबिये हे सांगतात. फक्त ह्या ग्रंथाचें एकच पहिलें प्रकरण मात्र आपल्यापाशीं आहे असें ते ह्मणतात. तेवढेंच प्रकरण मात्र त्यांनीं आम्हास दिलें होतें. परंतु या ग्रंथाची संपूर्ण प्रत आमचे सन्मान्य मित्र वैकुंठवासी काशीनाथ पांडुरंग परब. वा. मुंबई यांनीं आह्मास दिली होती. ही पोथी पांच इंच लांब व चार इंच रुंद एवढ्या आकाराची असून पोर्तुगीझ नमुन्याच्या खडबडीत कागदावर लिहिलेली आहे. ही परब यांजकडे उत्तरहिंदुस्थानामधून, जयपूरच्या महाराजांच्या पदरचे, पंडित दुर्गाराम प्रसाद यांजकडून आली होती.

२ पूर्णाक्षरी ग्रंथाची प्रत बंदर वेंगुर्लें येथील सत्पुरुष पूर्णदास ऊर्फ बाबा उसापकर यांच्या समाधीगृहांतील हस्तलिखीत ग्रंथसंग्रहालयामधून त्यांचे हल्लींचे वंशज रा. रा. दत्तात्रय यशवंत उसापकर यांनीं दिली. ही आठ इंच लांब, व साहा इंच रुंद एवढ्या आकाराची आहे. बांदें येथें या ग्रंथाची प्रत आहे, परंतु ती आह्मास देण्याचें आंबिये यांनीं नाकबूल केलें.

३ अक्षयबोध ग्रंथ. सदर पूर्णदास बाबा यांच्या वंशजांकडून मिळाला. याची लांबी ८ इंच व रुंदी ६ इंच आहे. व हा ग्रंथ रा. रा.

नारायण पुंडलिक सामंत यांनीं मालवण येथें अश्विनीकुमार नांवाच्या शिला छापखान्यांत सन १८९७ सालीं छापलेलाही आहे.

याबद्दल सदर गृहस्थांचे आह्मीं अत्यंत ऋणी आहोंत.

या ग्रंथप्रकाशनाचे कामीं मुख्यतः डाक्तर अनंत नारायण सांबारे एल. एम. ॲण्ड एस. वास्तव्य मुंबई या सद्गृहस्थांनीं निरपेक्ष बुद्धीनें आह्मास फार मदत केली आहे. प्रकृतिदुर्बलतेमुळें गेल्या सालीं हे महाबळेश्वरीं गेले होते, तथापि तेथें असल्या मुदतींतही, या ग्रंथाच्या टीकालेखाचें संशोधन करण्याच्या कामीं व मुंबई येथें एकंदर ग्रंथाचीं प्रुफें तपासण्याच्या कामीं यांनीं परिश्रम केलेले आहेत. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. अर्थात् या सर्व कृत्याचें श्रेय विशेषतः याच सद्गृहस्थांस आहे, हें निःसंशय होय.

शेवटीं ज्याच्या कृपेनें आज दोन वर्षें हें काम चालू राहून येथवर येऊन पोंचलें, त्या कारुणिक दयाघन परमेश्वराचे आभार मानून हा विनंति—लेख पुरा करितों.

मुंबई ता. १४ दिजंबर १९०७ इसवी.

प्रकाशक,
भगवंत बाळकृष्ण पै रायकर.

योगीराज सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ, अद्वयानंद वगैरे यांची अनुक्रमणिका.

४ किरकोळ ग्रंथ.

१ श्री अद्वयानंद.

प्रथम प्रकरण.

(ओंव्या).

ॐ [२]नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटियुगधारिणे नमः ॥

१ या ग्रंथास "अद्वयानंद" असें नांव देण्याचें कारण असें असावें कीं "तैत्तिरीय श्रुतीमधील" "तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः" या वाक्यानें सिद्ध केल्याप्रमाणें आकाशापासून आमच्या देहापर्यंत सर्व जग आत्मानंदाहून निराळें नाहीं असें ठरतें. त्यावरून तो आत्मानंद अद्वितीय ब्रह्मच आहे असें म्हटलें पाहिजे. सच्चिदानंद ब्रह्म हें स्थावरजंगमीं सर्वत्र समान आहे; भेद कायतो नामरूपाचा. "ब्रह्माभ्यासाच्या योगानें, सच्चिदानंद पूर्णब्रह्म, न्याहाळून पाहिलें असतां नामरूपाशीं अवज्ञा आपोआप हळुहळु होते; जसजशी नामरूपाची अवज्ञा होईल, तसतसें अद्वैतदर्शन अधिकाधिक होत जातें; आणि जसजसें अद्वैतदर्शन अधीकाधिक स्पष्ट होत जातें, तसतशीं नामरूपें भासेनातशीं होतात. या अभ्यासाच्या योगानें ज्ञान दृढ झालें असतां मनुष्य जीवंत असतांच मुक्त होतो; मग देह असला तरी चिंता नाहीं. या प्रकारचें हें सच्चिदानंदरूप जगद्रहीत एकच ब्रह्म आहे आणि मी त्या ब्रह्माहून भिन्न नाहीं, असें जें अपरोक्ष ज्ञान यासच अद्वयानंद म्हणतात. तो जगन्मिथ्यात्व चिंतनानें प्राप्त होतो, असें पंचदशीकार म्हणतात. या प्रकारचें तत्त्वज्ञाननिरूपण ह्या ग्रंथांत केलेलें आहे, म्हणून यास अद्वयानंद (अद्वैतानंद) असें नांव दिलें आहे. दुसरें राजयोग आणि हठयोग यांचें स्वरूप अद्वयच आहे. जेथें राजयोग सिद्ध झाला, तेथें हठयोग सहजींच प्राप्त झाला असें यांत सिद्ध केलें आहे. या ग्रंथाचें प्रकरण पांचवें पहा.

२ सोहिरोबांनीं आपल्या प्रत्येक ग्रंथाच्या प्रारंभीं हाच श्लोक घेतलेला आहे, त्याचें कारण त्यांच्या पित्याचें नांव "अनंत" असें होतें. पक्षीं श्वेताश्वतर श्रुतींतील (अनंतश्चात्मा विश्वरूपोह्यकर्ता) ह्या तत्त्वार्थ रहस्यान्वयें योजिलेला असावा.

हरिः ॐ नमोजी श्रीगुरु । पूर्णानुभवी परात्परु[1] । ज्याचिये कृपेनें संसारू । लय पावे ॥ १ ॥ तयामाजीं अनुग्रहें[2] जाण । पावविली निजखुण[3] । आपेंचि निपुण । झालों मग ॥ २ ॥ निजकृपेचेनि लवलाहें । पूर्णत्व ठेविलेंचि आहे । हें जाणोनि जो सामावे । तत्त्ववेत्ता ॥ ३ ॥ तत्वीं तत्व निवाटिलें । सांडणेंचि सांडों ठेलें । कांडणोंचि कांडिलें । कण राखोनि ॥ ४ ॥ कणें कणांसि जाणिलें । ओळखणेंचि ओळखिलें । तयींच ऐक्य फावलें । मुक्तिपद ॥ ५ ॥ मुक्तांचि मुक्ति देखिली । कल्पनेनें कल्पनी[11] वाळिली । म्हणोनि कीं फावली । मति ऐशी ॥ ६ ॥ पूर्ण समयो झालिया मग । कांहींच नुरे असंग[12] (अ-सींग ?) । एकींच धरी एकलींग[13] । आत्मविषयींचा ॥ ७ ॥ आत्मानुभवाकारणें । कांहीएक साधन आटणें । तिहीं एक शहाणें । सुगम ऐसें देखिलें ॥ ८ ॥ मग सुगमपदीं रमतां । गुरु

---

१ परमात्मा महेश्वर हाच परात्परगुरु. त्यालाच सांप्रदायिक आदिनाथ, महागुरु असें म्हणतात. २ सद्गुरूच्या स्वानुभव देणाऱ्या उपदेशानें. ३ आत्मस्वरूपाची खूण. ४ एकरूप होतो. ५ जीव हा ब्रह्म आहे हें ज्ञान तें तत्वज्ञान तें जाणणारा. ब्रह्मवेत्ता. ६ अहंब्रह्मास्मि या महावाक्याच्या अनुभवानें सत् ब्रह्म कोणतें, असत् माया कोणती हा निवाडा केला. ७ त्यामुळें शेवटीं सर्व खल्विदं ब्रह्म हें सर्व ब्रह्म आहे असा अनुभव प्राप्त झाल्यावर दृश्य जगत् मिथ्या म्हणून त्याग करणें वगैरे सर्व बंद पडलें. ही अन्वयबोधाची खूण. ८ धान्य कांडून भूसा वेगळा करितात त्याप्रमाणें नित्यानित्य विवेकानें सत्य ब्रह्म आणि मिथ्या जगत् याचा निवाडा करितात. त्यामुळें ब्रह्मबोध होतो. परंतु विवेक करणारा हा स्वतः ब्रह्मच आहे. असा त्यास बोध झाल्यामुळें ब्रम्हावांचून कांहींच त्यास दिसत नाहीं. विवेकाचा शेवटचा परिणाम ब्रह्मच शिल्लक रहातें व त्यामुळें त्या ब्रह्माला जाणाराही ब्रह्मच होय म्हणून सोहिरोबा म्हणतात. ९ "कण राखोनि कांडिलें आणि कणेंकणासि जाणिलें" १० अशी जेव्हां आपल्या स्वरूपाची ओळख पटते तेव्हां जीवब्रह्माचें ऐक्य होतें व तीच मुक्ति होय. ११ कल्पना ही मनाची शक्ति; हीच एक ब्रह्माचे ठिकाणीं अनेकत्वाच्या भावना उत्पन्न करिते, पण ऐक्याचा अनुभव प्राप्त झाला म्हणजे कल्पना शिल्लकच रहात नाहीं. १२ उपाधिरहित. (अन्यपाठ)=असींग=जो मुख्य नव्हे असा. १३ अनुसंधान.

शिष्य आपणचि तत्वतां । चैतन्यआनंद स्वयमेवता (१) । बोलते झाले ॥ ९ ॥ पूर्णपण जयीं पाविजे । तयीं आघवेंचि आपणा देखिजे । मग तया सुखाचिया चोजें । बोलणें होय ॥ १० ॥ समसाम्य महिमा जेथ । पावोनि होइजे सनाथ । मग आपसयांचि आदिनाथ देखिजे पैं ॥ ११ ॥ आधीं सगुणाची महिमा । मग निर्गुण निरूपमा । सांगेन जेथ उभय संगमा । एक करोनी ॥ १२ ॥ प्रथम सगुणरूपाची मति । सांगेन पैं निरुती । तहींच देखिजे निजज्योति । विमळत्वें ॥ १३ ॥ सगुणस्वरूपीं यावें । तयीं निर्गुण कीं जाणावें । तेथ अनेक कौतुकाचीं नांवें । देखों येती ॥ १४ ॥ सगुणस्वरूप धरावें । हरिस्मरण करावें । निर्गुणासीं पूजावें । शिवस्वरूपीं ॥ १५ ॥ जीवत्व भावें सगुण । निर्गुण-रूपें शिवत्व जाण । उभयभासांसि एकवटण । करावें जयीं ॥ १६ ॥ सगुण नव्हिजे निर्गुणावीण । निर्गुणींच सगुण अतर्क्य जाण । याहीपरिचें

१ चैतन्य आत्मा गुरू आणि आनंद शिष्य होऊन बोलते झाले २ नवलानें. ३ यांत आत्मनिवेदन भक्तियोग दर्शविला आहे. शिवाय बृहदारण्यक उ० अ० २ ब्रा० २ मं० ३ पहा. [दासबोध द० १२ स० ५ पहा.] ४ आपणांला सर्व भूतमात्राच्या ठायीं पाहणें, आणि सर्व भूतांला आपल्या ठायीं पाहणें ह्याला सम-साम्यावस्था म्हणतात. ५ परमात्म्यानें अंगिकार केलेला. ६ आपण होऊन, सहज भावानें. ७ आदिनाथ हा नाथपरंपरेंतील आदिपुरुष होय. पक्षीं ब्रह्मादि देवांनांही ज्ञानोपदेशेंकरून सनाथ करणारा स्वयंज्योति आद्यपुरुष होय [तीन्हीं देव गुण मूर्ति । तया देवांचिया शक्ति । ज्या पासुनी तो स्वयंज्योति । श्री आदिनाथ ॥ १ ॥ विवेकसिंधु, मुकुंदराज] ८ सृष्टीच्या पूर्वीं अद्वयानंदरूप परिपूर्ण जो आत्मा होता तोच आपल्या मायेच्या योगानें आपणच जग होऊन त्यांतच जीवरूपानें प्रवेश करिता झाला, तोच परमात्मा विष्णु आदिकरून उत्तम देहाचे ठायीं प्रवेश करून देवतारूप बनला, आणि मनुष्यादि देहाचे ठायीं प्रवेश करून त्याचा पूजक झाला. याप्रमाणें पूज्य पूजक हे दोघे एकाच परमात्म्याचीं रूपें असतां विश्वाच्या निर-निराळ्या भावांनुरूप तो एकच अनंतात्मा अनेक नामरूपांनीं व्यक्त झाला (या ग्रंथाच्या प्रारंभीं असलेला "नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये" हा श्लोक पहा.) त्या विष्णूची पृथक् पृथक् वर्णिलेलीं नावें त्या त्या कारणीभूत नवलकृतीसह (देखों येती) अंतर्मुख दृष्टीनें अपरोक्षत: पाहण्यांत येतात. हा भाव.

विंदाण । जाणावें जांहीं ॥ १७ ॥ विंदाणें विंदाणचि देखावें । दृष्टींत चैतन्य अघवें । मग होय सहज स्वभावें । आपुला आपण ॥ १८ ॥ आपणचि कवणेंहि ठायीं । वसतों ऐसें लवलाहीं । जाणावयाचियां डोहीं । पार होआवें ॥ १९ ॥ ऐशिया अनुभवाचिया दिठी [देंठी] । परब्रह्म आहे शेवटीं । तहींच भावूं ये गोठी । ऐक्यं ऐशी ॥ २० ॥ अनुभवाचें कारूण । जंई ओळखिजे निज-खुण । तयींच तें निर्वाण । जाणों येई ॥ २१ ॥ जाणणें नेणणियाचे वाटीं । नवजायचि तो शेवटीं । शुद्ध चैतन्येंशीं गेंटी । पडली ज्याला ॥ २२ ॥ गटी गटी भिन्न मोठी । एक देती देह भासावाटीं । एक निर्गु-णाचिये देंठीं । जाउनी बैसे ॥ २३ ॥ निर्गुण आणि सगुण । दोहीं जाणिलें एक निर्पुण । उभय सौख्यीं निज खुण । ओळखणें घडे ॥२४॥ ओळखणेंचा परिकर । तो अनारिसा जाण निरंतर । तयीं विविधाचें उ-त्तर । नसेचि मग ॥ २५ ॥ विविधीं विविधचि दिसे । एकीं एकचि असे आपैसें । धरिलें ज्याणें विश्वासें । तोचि जाणे ॥ २६ ॥ येथ ज्योतिमयचि

---

१ विज्ञान, कौशल्य. २ जागृतस्वप्न सुषुप्तीचे ठायीं असणारा प्रपंच, ज्या ब्रह्माच्या योगानें प्रकाशित होतो, तें ब्रह्म मी असें ज्ञान झालें असतां [दृष्टींत चतन्य आघवें] दिव्यदृष्टी होत्साता सर्वत्र चैतन्य पाहून प्राणि सर्व बंधनापासून तत्काल मुक्त होतो. ३ आनंदमय कोशाच्या डोहांत (पक्षीं हृदयाकाशांत) +पार व्हावें, प्रविष्ट व्हावें. ब्रह्म आनंदरूप आहे अशाविषयीं तैत्तिरीय श्रतीचें प्रमाण आहे. ४ प्रत्यगात्मा व परमात्मा एकच अशी. ५ ऐक्य, पूर्वोक्त समसाम्यावस्था. ६ मोक्षाचे उपाय दोन प्रकारचे आहेत प्रथमतः मुमुक्षुला जीवन्मुक्ति आणि नंतर निरतिशयमुक्ति प्राप्त होते. व त्या दोन मुक्ति गुरुचरणकृपाकटाक्षाच्या योगानें प्राप्त होतात (एक देहभासावाटीं) आधाराच्या क्षेत्राच्या योगानें दैहिक व मानसिक असा दोन प्रकारचा अभ्यास. यम, नियम, आसन इत्यादि शरिराचा, व शांति हा मनाचा अभ्यास होय. ज्ञानयोग हा सर्वांत श्रेष्ठ सांगितला आहे. ७ निष्काम भक्ति ह्या श्रेष्ठ साधनाच्या द्वारें हा निष्काम भक्तियोग, निर्गुण स्वरूप ज्ञानफळाचा देंठ आहे. तुकोबांनीं म्हटलें आहे कीं:—भक्ति ज्ञानाची माउली । भक्तिपासुनी मुक्ति झाली. ८ या प्रमाणें ह्या दोन्ही मार्गांमध्यें ज्यानें एकच तत्त्व जाणलें तोच निपुण=निष्णात संन्यासी व तोच योगरूढ योगी. ९ खोटा, वेगळा.

आघवें । जेथ देखणियांत देखावें । ऐकणियांत ऐकावें । परब्रह्म तें ॥२७॥ जेथ भक्षिणेंत भक्षावें । प्रक्षालनांत प्रक्षाळावें । स्पर्शण्यांत स्पर्शावें । जहींच्या तहीं ॥ २८ ॥ मग निजण्यांत निजावें । जागण्यांत जागावें । बैसण्यांत बैसावें । जाणोनियां ॥ २९ ॥ मग करणें तें करावें । धा(ध?)रणें तें धरावें । घेणियांत घ्यावें । समाधिसुख ॥ ३० ॥ समाधिसुखासीं स्थान । जेथ दृश्य द्रष्टा दर्शन लीन । म्हणोनि समाधि हें अभिधान । जेथ आलें ॥ ३१ ॥ समाधी ते कैसी । सूर्य अस्तु होय ऐशी । समदृष्टि अंतीं तूं होसी । तूंचि एक ॥ ३२ ॥ एकीं एकचि होइजे । तयींच तो निजीं[1] निजीजे । तेथ मूलप्रकृतीचीं[2] काजें । लागों न येती ॥ ३३ ॥ मूलप्रकृतीची अवस्था[3] । ते तूर्याजाणावी अश्वत्था[4] । जाणिवेचेनि संस्था[5] । सदां हो ॥ ३४ ॥ प्रवृत्तिनिवृत्तिचें तुळण । करितां नाहीं विसवण । म्हणोनि न चलती द्विविध गुण । केवळब्रह्मीं[7] ॥ ३५ ॥ एक एक निज निवाडा[8] । आहे तो करी विकडा[9] । ऐसा तूर्येचा पवाडा । स्वरूपा पुढें बद्ध तो ॥३६॥ तूर्यदशेचिया निधडें । स्वरूपीं विविध मेहुडे[10] । दिसती अनेक दळवाडें[11] । एकीकडे ॥ ३७ ॥ तूर्येवरी हा आघवा । खेळ दिसे बरवा । चर्म चक्षूंसि थोरावा । दाविला ज्याहीं ॥ ३८ ॥ तूर्येचिये आवडी । अविद्या सुविद्या निवडी । त्रिपुटीची उगीच बेडी । घातली जिहीं ॥ ३९ ॥ तूर्येचिया

---

१ निजीं=आत्मस्वरूपामध्यें निजिजे=समाधिस्त होईल. २ मूलप्रकृति ह्मणजे (अव्यक्त.) महत्तत्व, अहंकार आणि पंचतन्मात्रें यांचीं कार्यें ह्मणजे संसार जगत्. ३ स्वरूप. ४ प्रपंचरूपा (शुद्धसत्त्व माया). ५ ज्ञानस्वरूप स्फूर्ति (अहंब्रह्मास्मि=मी ब्रह्म आहे असें जाणणें). ६ स्थिति, आधार, (मी ब्रह्म येणें आकारें । ज्ञानरूप स्फूर्ति स्फुरे । ती ओळखावी चतुरें । महामाया ॥ १ ॥ ब्रह्म जैसें परिपूर्ण । तदाकारें स्फुरण । तये मायेसी मर्यादा कवण । करील बा रे ॥ २ ॥ मायेची दुर्घटता । तेचि हे जाणावी जाणीवता । जे केवळ भासे तत्वता । नाथिलीचि ॥ ३ ॥ विवेकसिंधु, मुकुंदराज.] ७ शुद्ध ब्रह्मीं. ८ चातुर्यानें. ९ धैर्यानें, पराक्रमानें. १० आभाळें (अभ्राकाशें,) ११ प्राणवायुरूप इंद्र परमात्म्याची सेना.

तारुण्यभरीं । अबळ वृद्धेसि वारी । स्वकांतेसि करभारीं । विश्वग्रामीं योजिलें ॥ ४० ॥ सृष्टि बीज प्रेरुनि । चैतन्य आकारीं निवटुनी । साधन-चतुष्टयें निदानीं कारावेली भूमी ॥४१॥ मग सोहंपणाचें बीज । पेरी सुंदर स्वयें । सहज । तेथ पोल प्रकाराचें तोजें । न दिसेचि कदां ॥४२॥ अवघेंचि पिकलें कणमय । जयीं मेघावीण अप्रमेय । म्हणोनी तेथिली सोय । धरिती योगी ॥ ४३ ॥ योगियांसीच ते योग्य । जहीं हें सर्वेचि भोग्य । तेथ पाहिजे सभाग्य । देखणा चोख ॥ ४४ ॥ चोख देखणा जरि असेल । तरि हें पूर्ण देखे नवल । तेथ निर्जलोपाचा बोल । नयेचि मग ॥ ४५ ॥ एरवीं येथ कायसें झालें । निजस्वरुप कवणासंगें लोपलें । हें लाघवची देखिलें । पाहिजे मात्र ॥ ४६ ॥ येथ असलेंचि असे । परि वेगळावलेंसें दिसे । हें निजात्मदिठीं पाहतां नासे । द्विविधपण ॥ ४७ ॥ ब्रह्मीं प्रतिभास दिसे । ते मायाकल्पनेचे झळाळिसे । होती तेथ दिसे । पिसेपणें ॥ ४८ ॥ भ्रम पिसें हें आघवें । जेथ दिसे तेथ जाणावें । ययातीत तें म्हणावें । परब्रह्म ॥ ४९ ॥ जेथ जेथ इच्छा उठी । ते देखिजे वेगळाल्या दिठीं । मग कल्पना हे हिंपुटी । होउनी पडे ॥ ५० ॥ जो जो संकल्प कल्पिजे । तो माघारींच वळिजे । मग पडिजे नुसतें जें । होऊनियां ॥ ५१ ॥ संकल्पाचें स्थळ । पाहिजे निराळें केवळ । तयींच कल्पनेंचा आळ । मोडोनि जाय ॥ ५२ ॥ ऐसें हें कल्पनेचें आभाळ । पहिलेंचि असावें

---

१ प्रकृतिरूप ह्मातारीला (अजेला) एका बाजूला ठेऊन. २ आपला नवरा चेतन आत्मा जो त्यास. ३ अधिकाऱ्याच्या आंगीं हे चार गुण अवश्य असले पाहिजेत. ते असे. [१ नित्यानित्यवस्तुविवेक, २ इहामुत्रार्थ फल भोग विरागः, ३ शमदमादिसाधनसंपत्, ४ मुमुक्षुत्वंच [शारीर भाष्य] ह्यालाच साधनचतुष्टय अशी संज्ञा आहे.] ४ जमिनीस खत घालून तयार केली. कार=खत. (सावंतवाडी-प्रांतीं कार घालणें हा शब्द फार वापरतात. ५ चोज, नवल. ६ स्वरूपविस्मरण. ७ ज्ञानदृष्टीनें (अंतर्मुखवृत्तिनें). ८ मृगजळावर भासणारे तरंग झळाळ. ९ वेड. पिसेपणा हा शब्द गोमांतकांत फार चालतो. १० शून्य. हिरमुसली होते.

अळुमाळें[1] । मग दिसे तें केवळ । ज्योतितत्त्व ॥ ५३ ॥ जोंवरी कल्पना मिळे । तोंवरीच चित्त हें मैळे । उगम जाणितल्या केवळें । ब्रह्माचि उरे ॥ ५४ ॥ म्हणोनी हें आघवें । परब्रह्म पैं जाणावें । मग तयाचिया संभवें । तेंचि होइजे ॥ ५५ ॥ ब्रह्म स्फुरे जिये वाटीं । तेचि उत्तम ज्ञानदिठी । तयेसि नसिजे खोटी । बुद्धी मग ॥ ५६ ॥ बुद्धीनें बुद्धी ओळखिजे । चित्तें चित्त आठविजे । अहंकारें अहंकार होइजे । मनीं रत ॥ ५७ ॥ मनें मन भाविलें । तेंचि अंतःकरण होउनी ठेलें । तयीं निर्गुण देखिलें । जहींच्या तहीं ॥ ५८ ॥ जहीं[3] जहीं ब्रह्म देखे । तहीं तहीं त्याचि हरिखें । मग आपुलियाचि सुखें । असिजे तृप्त ॥ ५९ ॥ तृप्तीं तृप्तपणासी । जाणियलें आपैसी । तेथ इंद्रियां उल्हासी । येइजे सहज ॥ ६० ॥ जेथजेथ सोऽहं जप । तेथ तेथ तोचि साक्षेप । परब्रह्मस्वरूप । तहींच असिजे ॥ ६१ ॥ असोनी जयासी न ठावें । तें अज्ञान ऐसें जाणावें । म्हणोनी त्याहीं धरावें गुरुपद ॥ ६२ ॥ श्रीगुरुची खुण । ते अनारिसी पैं जाण । जया निजसंविदि[4] आपण । सेविलीचि व्हावी ॥ ६३ ॥ ब्रह्मसंविद[5] जहीं स्फुरे । तहींच गुरुत्व बोलिलें निर्धारें । म्हणूनि हें सोपारें । अनुभविया ॥ ६४ ॥ अनुभवचि कारण । तेचि समाधीची खूण । जाणियली आपण । तत्त्ववेत्तीं ॥ ६५ ॥ तत्त्ववेत्त्याचें लक्षण । तें सर्वदां जाण विलक्षण । पूर्ण खुणेचें परिक्षण । जाणोनियां विसरिजे ॥ ६६ ॥ विसरें विसरचि होइजे । आठवें आठवचि असिजे । सगुण निर्गुणाचिये वोजें । देखणें घडे ॥ ६७ ॥ ययातीत जें अनारिसें । तेंचि ज्योतितत्त्व आपैसें । शून्यामाजी समरसे ।

---

१ खोटें मिथ्या असें जाणावें. २ आपल्या देहाच्या मध्यभागीं (हृदयांत) अंगुष्ठमात्र पुरुष असतो तो. ३ ज्या ठिकाणीं जहीं असा शब्द असेल त्याचा अर्थ त्याठायीं असा समजावयाचा व जेथें जयीं असेल तेथें ज्या कालीं किंवा ज्या समयीं असा समजावयाचा. ४ सद्गुरुची खूण जाणायाला अगोदर आपण अधिकारी झालें असलें पाहिजे. म्हणजे "निज संविद्=स्वतःची बुद्धि (प्रज्ञा) स्थीर झालेली असली पाहिजे. ५ याप्रमाणेंच ब्रह्मज्ञान ज्या पुरुषाच्या ठिकाणीं स्फुरण पावतें त्यालाच सद्गुरू असें म्हणतां येईल.

सहजगती ॥ ६८ ॥ सहजें सहजचि अशिजे । अभिमानें अभिमान वाढिजे । म्हणोनी निजींच जाणिजे । कैवल्यपद ॥ ६९ ॥ कैवल्याचें परिमाण । तें अलग असे जाण । म्हणोनि तेथिंची खूण । ओळखिजे ॥ ७० ॥ ओळखी म्हणतां अदेखतें । नाहींच म्हणतां ओळखतें । ययापरि असे चोख तें । सहजगति ॥ ७१ ॥ सहजगती ते कायसी । गत गतीच नाहीं आपैसी । तेथ लय लक्ष्याची उल्हासी । बोलोंचि नये ॥ ७२ ॥ नयेचि तें येत असे । येताचि असतां जातसे । मग द्वयातीत सम बैसे । आनंदपदीं ॥ ७३ ॥ आनंदीं आनंद म्हणणें । हें कायसें वाखाणणें । बोलणें हें उखाणें । कासयासाठीं ॥ ७४ ॥ जो देव भक्त आपणचि । सत्‌असत्‌सर्वोचि । कर्मधर्मगुणांसी । आपणचि व्याला ॥७५॥ स्त्री नसतां लेंकरूं । विस्तार नसतां विस्तारू । मनेच्छा द्वैताचारू । विरूढला जो ॥ ७६ ॥ आपणचि होइजे पिंड । आपणाचि होइजे ब्रह्मांड । मिथ्याकर्माची चाड । धरिली ज्याहीं ॥ ७७ ॥ मीनलीचि जो इच्छा-चाडी । उपरि उपदेश अच्छेद्य गाढी । अध्यात्मरीत प्रौढी । कल्पिता झाला ॥ ७८ ॥ कर्म करी आपण । आणि आपुलीच करितो हेळण ।

---

१ दृश्य द्रष्टा वगैरे त्रिपुटीचा जेथें लय होतो म्हणून जें कांहीं पहात नाहीं (अदेखतें) "मी ब्रह्म आहे" अशा ज्ञानाचाही लय होतो हा भाव. २ आत्मवस्तूची. ३ जें मन बुद्ध्यादिकांस अगोचर तें अपरोक्षज्ञानानें प्रत्यक्ष अनुभवास येतें. ४ कुवाडें कूट (संसारकाहाणी) ५ सत्=आत्मा. असत्=माया. ६ सर्वव्यापी आत्म्यापासून सृष्टीपूर्वी जी सृष्टि उत्पन्न करण्याची इच्छा झाली त्यास महत्तत्त्व संज्ञक मन असें म्हणतात. त्या मनाच्या इच्छेनें जगाची कल्पना झाली. ७ जगद्रूप द्वैताचा आचार. (प्रचार) योगवासिष्ठांत वसिष्ठांनीं रामास सांगितलें आहे, कीं:— आधीं मन झालें. त्यानंतर बंधमोक्षाची कल्पना, त्यानंतर त्रिभुवनात्मक प्रपंच रचना अशी ही जगस्थिती लहान मुलांस सांगितलेल्या काहाणीप्रमाणें खोटी असून खऱ्यामध्यें भोडूं लागली. ८ मनाच्या इच्छेला (आवडीला जो आत्मा) अनुकूल झाला असा भाव. ९ परम अक्षर जें ब्रह्म त्यापासून जीवाच्या रूपानें प्रकट होणारा असा जो त्याचाच भाव तें अध्यात्म होय. आणि चराचराची उत्पत्ति आणि वृद्धि करणारें जें आचरण तें कर्म होय.

ऐसें अवटित विंदाण । मांडिलें देवें ॥ ७९ ॥ देव म्हणतां भक्ताचि तो । आणि भक्त म्हणतां देवचि होतो । ययापरी जहींच्यातहीं तो । विविधरूपें विरूढला ॥ ८० ॥ विविध म्हणतां तेंही नये । पूर्णदृष्टिं एकचि आहे । तयालागीं बहु सोये । आपणापें धरावी ॥ ८१ ॥ आपणचि जीव शिव । आपणचि नांव अनांव । आपणचि पूर्णवैभव । भाविलें ज्याहीं ॥ ८२ ॥ जीवपणाचें घेतलें नांव । ऐसें कर्माचें अभिनव । कर्माचा बांधाव । बांधिला ज्याणें ॥ ८३ ॥ कर्म उभारलें अवचट । जेथ बोधाची न चले वाट । ऐसा परम संवाट । भाविला ज्याहीं ॥ ८४ ॥ आपआपणेंचि वेष्टिला । आपआपणा विसरला । सर्वेचि तो चुकला । पूर्वमहिमा ॥ ८५ ॥ ऐसें हें पूर्वमहिमेचें । अभिधान जाणोनि साचें । मग मिथ्या भवभ्रमाचें । घेतलें पिसें ॥ ८६ ॥ महामायेचेनि अवसरें । आंगीं पराक्रम संचरे । तो निस्तेज झाला विकारें । अविद्यायोगें ॥ ८७ ॥ अविद्येचा धरिला पदर । मग अनेक दुःखभोगीं जर्जर । तेथ कल्पनेचा अवसर । वाढिन्नला ॥ ८८ ॥ हें आपुलें मूळ । चुकला तो केवळ । म्हणोनि सुखदुःखाची कळवळ । बाधली तया ॥ ८९ ॥ ऐसें हें वोखटेंपण । निर्गुण विसरूनी सगुण । दृढ धरी म्हणोनि हे गुण । झाले प्राप्त तयासी ॥ ९० ॥ मग पराधीन होइजे । साधनक्रम योजिजे । ऐसें हें निजचोजें । कल्पिलें ज्याहीं ॥ ९१ ॥ पिंडाचिये आद्यंतीं[१] । दृष्टि न चलेचि निरुती । म्हणोनि ऐशी हे मति । घडली पैं तया ॥ ९२ ॥ हें कायायंत्र[२] परिक्षिजे । मग आपणचि होइजे । तेथ कल्पनेची काजें । काजा न येती ॥ ९३ ॥ हें क्षेत्र पैं सुंदर । जयीं न्याहाळिजे निरंतर । मग विषयविलासीं तत्पर । न होईच पैं तो ॥ ९४ ॥ यया कायाकमळांतुनी । मकरंद घेइजे परिक्षुनी । तेथ आपुलाचि आपण दिसोनी । घेइजे मग ॥ ९५ ॥ सर्वे

---

१ देहाच्या आद्यंतीं=देह उत्पन्न होण्यापूर्वींची त्याची स्थिती काय होती व त्याचा अंत झाल्यावर त्याचें काय होतें इकडे दृष्टि चालत नाहीं असा भाव.)
२ देहयंत्र, तीन देह किंवा पाच कोश यांचें यंत्र.

मकरंदाला परिक्षिला । तोचि अनंत होउनी ठेला । मग आकारीं निराकाराला । देखणें घडे ॥ ९६ ॥ ऐसें हें अगोचर नवल । जाणत्याप्रति सखोल । नेणत्या पाडी भूल । चराचरीं ॥ ९७ ॥ हें आकारअवलोकन । तेंचि स्वरूपानुसंधान । इयेविषयींचें परिज्ञान । सांगतों ऐक ॥ ९८ ॥ श्रीगुरूचिये पूर्णकृपें । हें निजज्ञान पैं सोहपें । होइजेल तें साक्षपें । अनुवादिजेल ॥ ९९ ॥ अनुवादीं आनंद अवतरे । तया निर्गुण सोपारें । तें पूर्णवैभव निरंतरें । परात्पर वदे ॥ १०० ॥ तें निर्गुणपरीक्षण । आत्मत्त्वाची खूण । सोहिरा म्हणे श्रवण । करावी श्रोतीं ॥ १०१ ॥

॥ इति श्री अद्वयानंदे उत्पन्नज्ञाने विश्वरूपनिजतत्त्वयोगो नाम प्रथमं प्रकरणम् संपूर्ण ॥

द्वितीय प्रकरण प्रारंभ ।

ॐ नमः सच्चिदानन्द ब्रह्मणे ॥ आतां निर्गुणाची गोष्टी । जयीं उपजे विजे[1] दृष्टी । मग सहजेंचि सर्व सृष्टि । लटिकीच दिसे ॥ १ ॥ तरि उपरमें[2] दृष्टीचा । अनुभव सांगतों साचा । तयीं अंतरज्योतीचा । ओळखिजे परिकरें[3] ॥ २ ॥ आधीं धरावें सगुण । आकारींच अवघे गुण । जाणावेचि निपुण । सहजेंचि ते ॥३॥ स्थूलचि मानिजे सत्य । तेथ धरावें निमित्त । कारण कार्य अनित्य । करावें तहीं ॥ ४ ॥ स्थूला एवढें थोर । सृष्टि नाहीं निरंतर । आत्मतत्त्वाचा परिकर । ओळखणें घडे ॥ ५ ॥ स्थूलें जाडे कारण कार्य । स्थूलें जोडे वीर्य शौर्य । स्थूलें जोडे महदैश्वर्य ।

---

१ विस्तार पावणें (दिव्यदृष्टि). २ दृष्टाचा (ज्ञानदृष्टीचा) लय=शेवट विश्रांति. ३ प्रकार स्वरूप. सर्व भोग मिथ्या ह्मणजे ज्यांचा संभव भासत असून वास्तविक ते सत्य नाहींत असें मानून ते भोग भोगावे हा भावार्थ.

आत्मविषयींचें ॥ ६ ॥ स्थूलें जोडे महाभक्ति । स्थूलेंचि जोडे विरक्ति । स्थूलेंचि पावे निजमुक्ति । अनुभवाचिये ॥ ७ ॥ ऐसें स्थूल देह बरवें । सूक्ष्माशीं जहीं संभवे । म्हणोनि तेथ जाणावें । साधना योग्य ॥ ८ ॥ स्थूल तनूलागीं आघवें । चैतन्य दिसे बरवें । म्हणोनी अविसंभवें । स्थूल भोग मानिजे ॥ ९ ॥ स्थूलीं होय ओळखणें । स्थूलीं परब्रह्म उगाणे[1] । म्हणोनियां शहाणें । स्थूल देह मानिजे ॥ १० ॥ स्थूलीं विलास आघवा । स्थूलीं सौख्य विसावा । म्हणोनि तेथ स्वयमेवा[2] । जाणिजे ठावो ॥ ११ ॥ स्थूलीं वेदशास्त्रपठण । स्थूलीं होइजे हरिस्मरण । स्थूलीं जाणावे उत्तम गुण । परब्रह्मींचे ॥ १२ ॥ स्थूलीं होय विचित्र करणी[3] । स्थूलें देवो वाखाणी । म्हणोनि स्थूलाचे तुळणीं । नसे आन ॥ १३ ॥ ऐशिया स्थूलदेहीं । भक्ति आचरावी लवलाहीं । तेथ निजस्वरुपाची सोयी । उगवे पैं आपसयां ॥ १४ ॥ स्थूलें करिजे हरिकीर्तन । कीर्तनें आत्मसमाधान । समाधानें परमनिदान । गोड करी ॥ १५ ॥ कीर्तनाचेनि आथिलेपणें । हरीसी सर्वदा तोषणें । म्हणोनि गा शहाणें । स्थूल मानिजे उत्तम ॥ १६ ॥ स्थूलाहूनि लडिवाळें । गोजरें नसे दुजें कुवाडें । म्हणोनि निजसुखचाडे । तेथ कल्पिजे ॥ १७ ॥ आत्मसुखासी पाहतां । स्थूलावीण कोण सांगे तत्वता । स्थूलावीण निरुता । ठावाचि नाहीं ॥ १८ ॥ ऐसें हें स्थूल लाघव । जेथ गमे पूर्ण वैभव । पाहतां असे निराभावें[4] । जहींच्या तहीं ॥ १९ ॥ स्थूल म्हणावें जरि कुडें[5] । तरि निराकार निर्जनिवाडें[6] । तेथ आकाराचे चौडे[7] । धरूं नये ॥ २० ॥ स्थूल दिसतां नाहींत[8] तें । नाहीं म्हणतां होय रे तें[9] । म्हणोनि स्थूलींचें

---

१ प्रकट होतें. अनुभवास येतें. २ स्वयं ह्मणजे स्वयभू परमात्मा. ३ अनेक प्रकारचीं पुण्य कर्में. ४ अभाव नाहीं अशी सत्य वस्तु ह्मणजे परमात्मा. ५ वाईट, अमंगळ. ६ आत्मतत्त्वाची निवडणक झाली असतां, ७ आस्थेला. ८ नाहीं अशी जी मिथ्या माया, तींत. रंगनाथांनीं एका पदांत म्हटलें आहे कीं:— [माया स्वरूप कोणतें ? नाहींपण । देवस्वरूप कोणतें आहेपण] ९ माया नाहींच म्हटली तर तिच्याच ठिकाणीं रेतापासून देहेंद्रियांनीं युक्त असा स्थूलदेह निर्माण झालेला प्रत्यक्ष आहे किंवा "रे तें." असें संबोधनार्थीही वाक्य घेतलें असतां व 'नाहींत' याच्या ऐवजीं "नाहींच तें" असें घेतलें असतां अर्थ सरळ लागतो; जसें स्थूल दिसतें म्हणून खरें म्हणावें तर तें नाहींच व नाहींच म्हणावें तर तें खरें आहे असें भासतें.

महिमान निरुतें। गमेचि ना! ॥ २१ ॥ स्थूलाचें महा लाघव। न गमे कोणासि वैभव. तेथ हेळणेचें अभिनव। कांसया बोलावें ॥ २२ ॥ स्थूलाचा ठाव पुरिजे। तेथ आपणाचि देखिजे। मग स्थूलपणाचिये [2]वोजे। कोण सांगे? ॥ २३ ॥ स्थूलाचाचि नकळे अंत। तेथ स्थूलासि कांसया गांजित। स्थूलयोगें त्वरित। परब्रह्मचि असे ॥ २४ ॥ नीरावरी बाबुळ। तैसें चैतन्याआंगीं हें स्थूल। तेंचि जाणावें केवळ। ब्रह्मसंवित ॥ २५ ॥ कमळीं बैसे मधुकर। तैसा स्थुलीं आत्मा निरंतर। म्हणोनि हा परिकर। ओळखिजे ॥ २६ ॥ स्थूलाचियेवरिलें [5]देंठीं। आहेचि निजतत्त्वपेटी। ते पाहावी गोमटी। तेचि होउनी ॥ २७ ॥ स्थूलाचिये निदानीं। चैतन्य जाय निर्वटुनी। हें असतांचि धरिजे अनुसंधानीं। गंवसुनियां ॥ २८ ॥ स्थूलींच धरावा पूर्ण प्रेमा। स्थूलींच जपणें अजपानामा। भावोनियां निज उगमा। दृढ धरिजे ॥ २९ ॥ स्थूलीं घ्यावी परिक्षा। स्थूलीं धरावी ज्ञानदीक्षा। स्थूलींच होइजे मुमुक्षा। पूर्ण बोधीं ॥ ३० ॥ पूर्णपण जयीं संचरे। तेथ स्थूलभाव विरे। म्हणोनि हें निर्धारें। भाविलें ज्याहीं ॥ ३१ ॥ स्थूल म्हणतां स्थूल नोहे। जें सर्वदां अतर्क्य आहे। तेंचि जाणावें लवलाहें। साधुजनीं ॥ ३२ ॥ आतां स्थूलतनूचें विवरण। सांगतां पैं निपजली खूण। ती करावी श्रवण। साधुजनीं ॥ ३३ ॥ जगदीश्वरें इच्छिलें। मूलप्रकृतीतें वाहिलें। तिये तें रचोनि ठेविलें।

१ पुरुषार्थ पराक्रम, अहंता. २ चांगुलपणा. ३ पाण्यावर येणारें शेवाळ. ४ ब्रह्मज्ञान. ५ हिरण्यगर्भयुक्त महत्तत्वरूप देंठ, आधार. ६ शान्त आत्म्याची तुरीयपदरूप पेटी (कपाट, ब्रह्मकपाट). ७ सुंदर [ज्या रितीनें मनुष्य किल्लीनें कुलूप काढून दार उघडतो त्याप्रमाणें योगी अभ्यासानें कुंडलीच्या योगानें मोक्षाचें कपाट (सुषुम्नेचा मार्ग) खुलें करूं शकतो. ८ आपण तूर्यारूप होऊन (तूर्यावस्थेला पोंचून). ९ शुद्ध होऊन. १० स्थूलदेह हा वर्धापर्यंतच आत्मानुसंधान धरून ती तूर्या (गवसुनियां=) आच्छादन करून आटोक्यांत आणावी; शोधून घ्यावी हा भाव.

स्थूलदेह ॥ ३४ ॥ प्रकृतिपुरुषें युगें[1] [योगें;] । स्थूलदेह रचिलें उगें[2] । आवांकुनी[3] सप्तरंगें (सप्ततुरंगें;) । ठविलें एक ॥ ३५ ॥ प्रकृतियोगें ॐकार । प्रसवला पंचप्रकार[5] । तेथ ऐक्यत्वाचा विस्तार । सांगतों ऐक ॥ ३६ ॥ बिंदुभावें[6] निर्गुण । प्रकृति अर्ध मात्रा जाण । तज्जनित मकार हे खुण । बोलिजती ॥ ३७ ॥ मकार उकार प्रसवला । उकार अकार झाला । एवं पंचविकारें वहिला । सगुण ॥ ३८ ॥ पंचप्रकारांसवें । पंच-

---

१ युगें=युग्मे=प्रकृतिपुरुषाच्या संयोगानें (योगें=ज्ञानविज्ञानयोगानें). ज्ञानेश्वर, अमृतानुभव प्र० १ ओं ११ ती ३० पहा. २ प्रारंभीं वैखरी वाचाविरहीत स्तब्ध (अर्थात प्रारंभीं उत्पन्न झालेल्या नादसंज्ञक परावाचेनें युक्त असें). किंवा प्रारंभीं वागादिक कर्मेंद्रियांनीं रहीत असलेलें. अथवा उगें=उगीच, विनोदार्थ लीलेनें, सहजींसहज. ३ आवांकुनी ह्मणजे पृथिव्यादि सर्व वस्तूंचें नियमन करणाऱ्या अनिवर्चनीय शक्तीच्या योगानें आटोक्यांत आणून किंवा (बृहदारण्यक अ० ३ ब्रा० ३ मं० २ अवश्य पहा). याप्रमाणें आंखून व्यक्त केलेलें. ४ ह्या सप्तरंग (किंवा सप्त तुरंग) शब्दामध्यें अनेक रहस्यें आहेत पण मुख्यत: जो हृदयाच्या ठिकाणीं दीपवत् स्थित असणारा ॐकाररूप आत्मा त्याचे, पांढरे, काळे, लाल, उदी, पिंवळे, निळे आणि पिंगट; इत्यादि रंगाचे अनंतकिरण (नाड्या) आहेत; (मैत्रायणीब्राह्मणोपनिषत् प्र० ६ मं० ३० पहा). त्यासंबंधानें किंवा संवत्सररूप प्रजापति किंवा आदित्य याची सातचक्रें ह्मणजे सूर्याचे सात किरण किंवा सात घोडे (तुरंग) किंवा, वर्षार्ध, ऋतु, मास, पक्ष, दिवस, रात्री आणि मुहूर्त हीं होत. अथवा सप्तलोक किंवा अग्नीच्या सात ज्वाळा; यांनीं एक करून ठेवलें, ह्मणजे ' अ, उ, म, या तीन मात्रांनीं युक्त एक सगुण ॐकार रूप (औटप्रमाण त्रिकुट) स्थूलदेह एक करून ठेवलें हा भाव ५ ॐकाररूप अद्वितीय स्वरूपांत अ + उ + म + ँ अर्धमात्रा + ० बिंदु मिळून पांच प्रकार किंवा जाग्रति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या आणि भूमा ह्या पांच अवस्था आणि त्यांचे सर्व देखावे स्वप्नाप्रमाणेंच गुप्त राहिलेले आहेत. या ओंकाराला यथार्थ जाणणारा मात्र परम उत्तम योगेश्वर अथवा मुनि आहे असें मांडूक्योपनिषदांत सांगितलें आहे. (सिद्धांत संहिता पूर्वार्ध पृ० १५८।१५९।१६० पहा) ६ बिंदु=अर्धमात्रा (वेलांटी)ँ इजवरील बिंदु हा. (चैतन्य=पुरुष आत्मा, याचा) चैतन्याचा भाव आहे. तो निर्गुण आहे केवळ अर्धमात्रा ँ वेलांटी ही प्रकृति होय

शक्तिअंश संभवें । पंचमहाभूतांचीं नावें । उद्भवलीं ॥ ३९ ॥ तया पंचमहाभूतांचे । स्थूल लिंग देह सर्वेश्वराचें । निपजतें साभासाचें । भान तया ॥४०॥ पंचभूतांचे अंश । स्थूलाशीं आले अशेष । तयाचें सांगतों विशेष । विवरण पैं ॥ ४१ ॥ आकाशें अस्थिउद्भव । पवनें शिरांचें नांव । नाडी अग्नीचा अभिनव । एवं निपजती पैं ॥ ४२ ॥ त्वचेसी आपीं निपजणें । रोमां पृथ्वीतें वाखाणणें । हेंचि जाणावें अनुभवखुणें । पूर्ण पैं गा ॥ ४३ ॥ अस्थी जयीं निपजत । मग शिरा तयांतें वेष्टित । शिरांसी नाडी सतत । व्यापुनी राहती ॥ ४४ ॥ शिरांचिया समभागें । रोम निपजती उगे । म्हणोनि हें लागवेगें । जाणावें पैं ॥ ४५ ॥ आकाशाचे दशगुण । तेथ अस्थींस निपजण । तयाचे पैं दश जाण । शिरांसी उद्भव ॥ ४६ ॥ शिरांचे दश म्हणणें । तें नाडीतें निपजणें । तयांच्या दशगुणें । त्वचेसि जन्म ॥ ४७ ॥ तयांचे जे दश । रोमां येती अशेष । यापरि निःशेष । पृथ्वीभास जाणणें ॥ ४८ ॥ आतां आपाचे गुण । सांगतों तुज निपुण । जेणें ओळखसी खुण । आत्मविषयींची ॥ ४९ ॥ लाळीं नेमिजे आप । मूत्रीं मेदिनीचा साक्षेप । शुक्रीं (क्रीं?) तेजाचा सोप । बोलणें योग्य ॥ ५० ॥ शोणितीं पवन आधिष्ठित । मज्जे नभाचें सूत्र बोलिजत । यापरी असे सतत । उदकीं साहित्य ॥ ५१ ॥ आतां तेजाचे गुण । तुज सांगतों साक्षेपें खुण । ह्मद्रत तत्त्वता जाण । अंतरींचें ॥५२॥ क्षुधां ठेविजे तेज । तृषे आप बोलिजे सतेज । आलस्य पृथ्वीची वोज । सांगतों ऐक ॥ ५३ ॥ निद्रेंत नभाचें प्रीय । मैथुनीं वायूची सोय । यापरि अप्रमेय । जाणावें गा ॥ ५४ ॥ आतां वायूचिया साह्यकारा । सारीं तत्त्वें मिळती आकारा । तरी तयांचा उबारा । ऐक पां तूं ॥ ५५ ॥

---

१ अर्धमात्रा, (आद्यशक्ति) ज्ञानशक्ति, द्रव्यशक्ति, इच्छाशक्ति, आणि क्रियाशक्ति ह्या पांच शक्तींच्या अंशामुळें किंवा श्वेताश्वतरोपनिषत् अ० १ मंत्र. ५ यांत सांगितल्या प्रमाणें पंच पंचात्मक शक्तींच्या संभवेंकरून. २ याबद्दल खुलासा “ सिद्धांतसंहिता पूर्वार्ध पृष्ठ १६० टी. १ येथें कोष्टकांत दाखल केली आहे ती पहावी. ३ दसपट.

धावनीं बैसिजे वायु । चलन तेजाचा प्रीयु । आकुंचन जळाचा गौरवु । जाण पैं गा ॥ ५६ ॥ प्रसरणीं बोलिजे मेदिनी । निरोधीं नभ घे वळखुनी । द्रष्टत्व अवलोकनीं । ऐशियापरी ॥ ५७ ॥ ऐशियापरि नभाचे विकार बोलिजति साचे । तरि ऐक पां त्यांचें । विवरण पैं ॥ ५८ ॥ कामीं बोलिजे व्योम । क्रोधीं पवन करी उपक्रम । लोभीं तेजाचा संभ्रम । ऐक पैं तूं ॥ ५९ ॥ मोहीं उदक झळके । शोकीं महिभास निकें । ययापरि कौतुकें पहावें तें ॥ ६० ॥ ऐशियापरि स्थूल तनु । पंचमहाभूतांचें अनुसंधानु । अकार मात्रा प्रथम चरणु । प्रणवाचा पैं ॥ ६१ ॥ विश्व अभिमानी सदोदीत । क्रियाशक्तीचिये समवेत । रजोगुण मिरवत । ययांच पैं ॥ ६२ ॥ ऐसें हें स्थूल देह पवित्र । ईश्वराचें क्षेत्र[१] पैं विचित्र । येणेंचि एक गमे निजसूत्र[२] । आत्मविषयींचें ॥ ६३ ॥ स्थूल तनूचेनि सामावें । ब्रह्मज्ञान गमे आघवें । म्हणोनि गा जाणावें । उत्तम हेंचि ॥ ६४ ॥ ऐशिये तनूचे कसवटीं[३] । उघडे निजसुखें पेटी[४] । म्हणोनि गा शेवटीं । हेंचि गोड ॥ ६५ ॥ परि गोडपणाची परीक्षा । जेथीलें तेथचि धरावी दीक्षा[५] । हें पूर्णज्ञान मुमुक्षु अपेक्षा । पुरवीत पैं गा ॥ ६६ ॥ स्थूल तनूचें गोडपण । जोंवरि नातुडे[६] अनुभव खुण । तोंवरीच हें जाण । दुर्लभ असे कीं ॥ ६७ ॥ स्थूल स्थूल बहुतां रितीं । अनेक श्वान सूकरादि असती ।

---

१ शेत. कर्मक्षेत्र. २ निज=आपलें (क्षेत्रज्ञसंबंधीं) + सत्र=कळसूत्र, कळदोरा (विज्ञानमयादि कोशांमध्यें राहून नियमन करण्यासंबंधीं अंतर्यामीचें कर्म कौशल्य). ३ शेतांत उत्तम पीक व्हावें ह्मणून शेतांची उत्तम लागवड (मेहनत) करणें या ऐवजी कसवट हा शब्द वाडीप्रांतीं वापरतात. ४ आपलें मूळचें तूर्य स्वरूप सुख शांतिसुख ज्या पेटीमध्यें गुप्तपणें राहिलें आहे अशी ह्मणजे स्थूलदेहरूप पेटी, अन्नमय कोश. अमलानंद योगी शतश्लोकीमध्यें ह्मणतात (देहो संदुक हे किली वचन कीं शब्दार्थ ती संपदा । आहे चारि खणीं चतुर्विध गुणीं न्यूनत्त्व नाहीं कदां । स्वामी जीव स्वहेतु तो कर असे त्याच्याच योगें कि रे । पेटी हें स्वशरीर आदि करूनि पाहें विचारें बरें ॥ ३७ ॥) ५ द्रष्टा जो साक्षि त्याच्याच ठायीं (सिद्धांत संहिता पूर्वार्ध अ० ७ पृ० १५५ वरील टीप पहा). ६ धारणा. ७ सांपडली नाहीं.

परि नरतनूवीण निरुती । न पवेचि शांति[१] ॥ ६८ ॥ आपआपणा विसरला । निजसुखासी चुकला । तो या नरदेहीं सावेज[२] झाला । आपसयांचि ॥ ६९ ॥ नरतनूसि जो पैं आला । तयानें स्वभावें देह जाणीतला आणि अनुभवा जरि आतळलें[३] । तरि तद्रूप होय ॥ ७० ॥ ऐसें सगुण स्वरूप उत्तम । निर्गुणाचा पावे परिणामें[४] । जये दृष्टीसी कर्म धर्म । लया जाती ॥ ७१ ॥ म्हणोनि हे अंतर दृष्टि । स्थूलींच पहावी मायासमेष्टि[५] । मग अनुभवामृतवृष्टि । सेवणें घडे ॥ ७२ ॥ म्हणोनि गा शाहाणें । सगुणींच घ्यावें निर्गुणखुणें । आकारासि हेळणें[६] । बोलोंचि नये ॥ ७३ ॥ आकार तोचि निराकार । तेंचि पहावें निरंतर । मग भवदुःख जर्जर । न बाधे तया ॥ ७४ ॥ जो अनादी सदाशीव[७] । मिथ्याचि झाला जीव । म्हणोनि आपुला आपण उगव । बोलता जाहला ॥ ७५ ॥ पहिला चाले

---

१ या शब्दावर " सिद्धांतसंहिता पूर्वार्ध अ० ८ पृ० १६७ ठीप " येथें विस्तृत टीप आहे ती पहा. २ सावज=वन्यपशु (रानटी जनांवरांस वाडीप्रांतीं सावज ह्मणतात). [याबद्दल वर दाखल केलेल्या सि. सं. पू. ची टीप अवश्य पहा.] ३ सांपडला, प्राप्त झाला. ४ पूर्णावस्था, ब्रह्मरूपता, शेवट, चरममुक्ति. परिभ्रमण असा अन्यपाठ आहे. त्याचा भावार्थ हा कीं:—आत्मानुभव प्राप्त झालेला जीव रथांतून खालीं उतरलेला मनुष्य जसा त्या रथाचें फिरत असलेलें (परिभ्रमण होत असलेलें) चक्र पाहतो त्याप्रमाणें तो संसारचक्र पाहतो. ५ ब्रह्मांड, अनेक व्यष्टि (व्यक्तिवाचक जीव) मिळून झालेला जो विराट देह हा मायेच्या लीलेचा परिणाम. ६ त्याग करणें, तिरस्कार करणें. ७ याविषयीं श्रीरंगनाथांनीं एका अभंगांत प्रश्नोत्तर रूपानें म्हटलें आहे. [एक कोणी, असोनि आहे । दुजें नसोनि जें आहे ॥ १ ॥ पहिलें कोणतें ? कारण ! । दुजें ? कार्याचें लक्षण ॥ २ ॥ कोणी केलें ? कल्पनेनें । नाश कसा ? अभ्यासानें ॥ ३ ॥ कसा घडेल अभ्यास ? । घरीं संताच्या संगास ॥ ४ ॥ कैसा संत ओळखावा ? । जेथें शांतिचा तो ठेवा ॥ ५ ॥ त्यासि हुडकावा कोठें ? । मिळे विवेकाच्या भेटे ॥ ६ ॥ कैसा होईल विवेक ? । हठ धरावा सात्विक ॥ ७ ॥ हठ तरि सोपा काय ? । धरीं राघवाचे पाय ॥ ८ ॥ मग तो काय करील ? दया । ब्रह्मरूप करील काया ॥ ९ ॥ तेव्हां सर्वहि होइल सोपें । पापपुण्यें जळतील मोपें ॥ १० ॥ कैसा राघव उमगे । सगुण भक्तिच्यानियोगें ॥ ११ ॥ निजानंद झाला भला । निजरंगीं रंगुनी ठेला ॥ १२ ॥]

अंधगति । मागें स्वयंप्रकाश दिवटी निरुति । प्रज्ज्ळणें ऐशी मति । कवण एक तयाची ॥ ७६ ॥ जो अनादि देवो लाघवी । नाथिलाचि ब्रह्मगोल दावी । संकल्प माया अवयवीं । रचिता झाला ॥ ७७ ॥ येथूनि संपलें कथन । निर्गुणीं सगुणाचें मंथन । स्वस्वरूप अनुसंधान । रोकडेंचि ॥ ७८ ॥ स्थूलीं सूक्ष्मासी । जाणितलें आपैसी । स्वयंप्रकाश झळाळेंशी । मन निवे ॥ ७९ ॥ पुढें सूक्ष्मदेहाचें विवरण । सूक्ष्मीं सूक्ष्माची खुण । सोहिरादास म्हणे श्रवण । करावें श्रोतीं ॥ ८० ॥

इति श्रीअद्वयानंदे स्थूलदेहनिरूपणनाम द्वितीय-
प्रकरणम् समाप्तम् ॥

तृतीय प्रकरण प्रारंभ

हरि ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ आतां सूक्ष्मदेहाचें विवरण । सांगतील पैं आपण । तें करावें श्रवण । ऐक्यभावें ॥ १ ॥ सूक्ष्मदेहाचेनि योगें । तत्त्वज्ञान निपजे वेगें । म्हणोनि प्रकृतिपुरुषयुग्में । आनंदती ॥ २ ॥ सूक्ष्माचें एवढें महिमान । लागे जियें स्वरुपानुसंधान । म्हणोनियां परम निदान[1] । जाणावें तें ॥ ३ ॥ तरि ऐक पां आतां । सूक्ष्मीं[2] सूक्ष्म तत्त्वता । देखणेचा[3] सतता । परिकरें[4] जहीं ॥ ४ ॥ एकेक सूक्ष्मभूतीं । पंच पंच तत्त्वें विरुढती । एतद्विषयींची संविती । तरि पा ऐक ॥ ५ ॥ पृथम शब्दीं निपजणें । तें वायूसि लागे आतळणें । तेथ अग्निचिये खुणे । तीव्र प्रकारें ओळखावा ॥ ६ ॥ मंजूळ निर्मळैक गुणें । तेथ जळमेळ जाणें । यांतील

---

१ कारण, आदिकारण. २ सूक्ष्माहूनही जें अतिसूक्ष्म तत्त्व. ३ पाहण्याचा द्रष्टत्वाचा (साक्षित्वाचा). ४ परिज्ञान (कांहीं गोष्टींचें किंवा पदार्थांचें पुरतेपणीं जें ज्ञान तें.).

जें परीक्षणें । गंधरूपें पृथ्वीचें ॥ ७ ॥ उदात्त[१] अनुदात्ताचें वाजणें । तें शब्दगुणाचें करणें । स्पर्शगुणें जाणणें । अनुभवेंचि कीं ॥ ८ ॥ स्पर्शीं उठे लगबगी । तोचि गुण तेजाच्या आंगीं । स्थीरपणाची सिंगी[२] । स्पर्शीं मिळे उदकाची ॥ ९ ॥ स्पर्शीं उठे परीक्षणें । तेथ पृथ्वीस मिळणें । म्हणोनि जाणावें । शाहाणें । पांचही ते ॥ १० ॥ रूपीं राहे स्थीरपण । तेथ आकाश[३] मिळे आपण । चांचल्यपण तें जाण । वायुतत्त्व ॥ ११ ॥ उदक नेहाळणेचा प्रसंग । तेंचि जळाचें आंग । ओळखणेंचा लाग । पृथ्वीचा पैं ॥ १२ ॥ रसीं उठे अधिक स्फुरण । तें नभ आधिष्ठी जाण । उतावीळपणाचा गुण । वायुचा तेथ ॥ १३ ॥ स्वादीं होआवी[४] निपुणता । हे तेजाची महिमा सतता । रसनेतळीं राहे तत्त्वता । सदोदीत ॥ १४ ॥ स्वादभेदीं मेळ वसवणें । तेथ पृथ्वीस मिळणें । एकाएकीं एकवटणें । रसगुणें ऐशियापरी ॥ १५ ॥ गंधगुणीं व्यापकपण । तेथ नभ मिळे आपण । उंच नीच तें निवटन[५] । वायूचें पैं ॥ १६ ॥ परीक्षेचें देखणें । तें तेजाचियें खुणें । बुजे ऐसें जाणणें । अनुभव योगें ॥ १७ ॥ ज्ञातिस्वभाव ओळखणें । हें जळाचें बोलणें । गंधीं जाणावें शहाणें । ऐसेंचि हें ॥ १८ ॥ आतां अंतःकरणपंचकाचा । व्यापकांश सांगतों साचा । मन बुद्धि चित्त अहंकाराचा । परिकर तो पैं ॥ १९ ॥ अंतःकरण निराभासीं । व्यापक आकाश शून्य समरसीं । अभिमान विकारेंशीं । जाणावा वायु ॥ २० ॥ अंतःकरणीं तीव्र भाव । तेथ अग्नीच स्वयमेव । शांतोपकारक[६] (शीतोपकारक?) नाव । जळचि तेथ जाणावें ॥ २१ ॥

---

१ वेदमंत्र म्हणतांना स्वर उच्चनीच म्हणावे लागतात त्यास उदात्त, अनुदात्त म्हणतात; या विषयींचें विवरण ज्यांत केलेलें असतें त्यास "शिक्षा" म्हणतात. २ पुढारीपणा, अग्रेसरपणा. ३ ह्या बद्दल सिद्धांतसंहितेंत कोष्टक दिलेलें आहे तें पहावें. ४ व्हावी, यावी, प्राप्त व्हावी. ५ निवडणें. ६ तृषा शांत करण्याच्या उपयोगीं पडणारे, उपकार करणारें व शीतोपचारक=शीतस्पर्श, शुक्लरूप आणि माधुर्यरसगुणांनें युक्त याप्रमाणें उपयोगीं पडणारें.

अंतःकरणयोगें अंगवृत्ति । तेथ पृथ्वी मिरवती । तेथ पंचभूतें शोभती । अंतःकरणधर्मी ॥ २२ ॥ आतां मनाचिया भीतरी । पंचतत्वें निरंतरी । खेळती इयेपरी । जाण पां तूं ॥ २३ ॥ मनाची चपळ उठे धांव । तेथ नभाचें बोलिजे नांव । यदर्थी दुजा भाव । नाहींच कांहीं ॥ २४ ॥ मनासि उठे संकल्पविकल्प । तो वायूच मुख्य साक्षेप । निश्चयात्मक रूप । तेजाचें तें ॥ २५ ॥ मनासिं कार्यी उठवणें । हें उदकाचें करणें । गेले वाटे उभवणें । अहंकारें पृथ्वीनें ॥ २६ ॥ तैसाच बुद्धीचा विस्तार । तेथ व्योम व्यापी निरंतर । कार्यी पावणें हा व्यापार । वायूचा तेथ जाणावा ॥ २७ ॥ स्थलीं पावलीया बुद्धि । लगबगें तेज त्रिशुद्धि । स्थीररूपें सिद्धी । उदक पावे तेथ ॥ २८ ॥ बुद्धि सिद्ध होउनी आलिया । पृथ्वी अहंकारें ये आया । हे जाण मूळमाया । आधिष्टिता तूं ॥ २९ ॥ चित्तीं चैतन्य स्फुरण । तें नभ मायिक जाण । इंद्रियवृत्तीचें परिमाण । वायुचें तेथ ॥ ३० ॥ इंद्रियीं निजभक्ष्य परीक्षण । तेथ तेज उठे जाण । भोग भोगोनि समाधान । उदक होय ॥ ३१ ॥ चिंतीत उठे गुण । पदार्थ मात्रपरीक्षण । ते पृथ्वी आपण जाण । चित्तीं उठे ॥ ३२ ॥ अहंकारीं चालकपण । तोचि नभाचा उठे गुण । हें तेथील परिमाण । जाणावें गा ॥ ३३ ॥ अहंकारीं विपांड [अपाड;] । तेथ जाणावा वायूचा निर्वाड । त्याचेवीण आडपांड । चालेचिना ॥ ३४ ॥ अहंकारें देखणेपण । तेथ

---

१ देहाच्या वृत्तीनें युक्त असे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध इत्यादि व्यापारांनीं युक्त. २ उभारणें, तयार करणें. ३ पहिल्यानें कोणच्याही वस्तूची कल्पना करणें ह्मणजे ती वस्तु मनांत आणणें, नंतर ती ग्रहण करण्याच्या हेतूनें लगबगीनें तेथें जाणें, नंतर निश्चयात्मक बुद्धीनें तिचें ग्रहण करून त्या पदार्थाच्या ठायीं स्थिर होणें याप्रमाणें तीन प्रकारचा शोध. ४ अस्तित्वाला. ५ चेतनारूप स्फुरण. ६ आपापला आवडता विषय पारखून स्वीकृत करणें. ७ अपाय, विलक्षणपणा, भिन्नपणा. ८ वेगळेपण, पृथक्करण. ९ आड=जवळ करणें, स्वीकारणें+पाड=त्याग करणें. ("आड केलें" व "पाड घातलें" असे शब्द वाडीप्रांतीं चालतात.

तेज बुजे आपण । अर्थभेद परीक्षण । जल करी तेथ ॥ ३५ ॥ ऐशिया-परी अहंकार । पंचभूतीं व्यापक निरंतर । एतद्विषयीं अंतर । निर्वाळीजे ॥ ३६ ॥ तैसाचि ज्ञानेंद्रियांचा । अभिप्राय सांगतों साचा । जियें तीं ओळखिजे ज्योतीचा । परिकर पैं ॥ ३७ ॥ श्रोत्रीं उठे श्रोत्रत्व स्फुरण । तें नभ व्यापी आपण । सर्गविसर्ग[1] करणें हें जाण । वायूचें तेथ ॥ ३८ ॥ श्रोत्रत्वीं देखणी[2] दिठी । हे तेजाचीच पडे मिठी । परिसणें परीक्षणें[3] गोठीं । जळ मिळे ॥ ३९ ॥ ऐकोनिया हेळणें[4] । हें अहंकाराचें करणें । ऐसें हें अनुभवखुणें । जाणावें पैं ॥ ४० ॥ त्वचेशीं सर्व देखणें । आपादतळासि व्यापणें । हें नभाचिये खुणें । ओळखावें ॥ ४१ ॥ त्वचेशीं चलनवळण । तेथ वायूसीं निपजण । तेथ गरिमेचा गुण । अग्नि दावी ॥ ४२ ॥ त्वचेसीं स्थीर असणें । तें जळाआंगीं देखणें । मृदु काठिण्य जाणणें । पृथ्वीइयेनें ॥ ४३ ॥ तैसेंच चक्षूसी । व्यापकत्वें नभ आपैसी । देखणियेचे उल्हासी । देखतें गा ॥ ४४ ॥ चांचल्यधर्म उठे तेथ । तो वायूचा यथार्थ । उग्र दृष्टीचा अर्थ । तेज दावी ॥४५॥ दृष्टीं दिजे स्थीरपण । तें जळाचें व्यापकपण । देखणेचें परीक्षण । पृथ्वीचें तेथ जाणावें ॥ ४६ ॥ तैसेंचि जिव्हेचें कारण । इच्छामात्र स्फुरण । पदार्थरूपें आपण । नभ व्यापी ॥ ४७ ॥ सोडणें कुटणें धरणें । हें वायूचिया गुणें । स्वादभेद जाणणें । अग्नियोगें ॥ ४८ ॥ रसीं रस मिळवणें । हें उदकाचें करणें । पदार्थासि परीक्षणें । गंधरूपें पृथ्वीसी ॥ ४९ ॥ गंधरूपें घ्राणीं । रंध्रांशें[5] नभ आपणीं । व्यापक भरोवरिचिये[6] खुणीं । घेतलें तयें ॥ ५० ॥ रेचक

---

१ मलमूत्रादि विसर्जन करणें. २ कर्णेंद्रियद्वारानें श्रवण करणें, आणि नेत्रेंद्रिय-द्वारें देखणी=पाहणारी+दिटी=दृष्टि. ३ पूर्वोक्त दोन इंद्रियांपैकीं, श्रोत्रेंद्रियानें शब्दाचा भाव ऐकणें व नेत्रेंद्रियानें पाहिलेल्या पदार्थाची परिक्षा करून गुणदोष जाणणें या गोठीं (गोष्टींत) ४ शब्दाचें श्रवण करून नावडत्याची उपेक्षा करणें. ५ विस्तीर्ण होणें, वाढणें. ६ सामग्रीच्या (व्यान वायूच्या सामग्रीनें) खुणेनें.

पूरकांचिये सामावें । वायु मीनला तेथ स्वभावें । गंधपरीक्षेचे नावें । तेज झळके ॥ ५१ ॥ गंधज्ञाति परोक्षा (परीक्षा ?) । हे जळाचीच दीक्षा । आधाररूपें मुमुक्षा ! । पृथ्वी मिळे इतरांसीं ॥ ५२ ॥ तैसाच प्राणपंचकाचा । विवर्त्त सांगतों साचा । कळलिया आत्मत्वाचा । लोभ पैं परिकर ॥ ५३ ॥ प्रथम व्यानाचिये गति । नभ व्यापी त्रिकुटावरौती । वायु व्यापी सततीं । इडापिंगळेचिये वाटे ॥ ५४ ॥ तेज गिंवसी चक्षुद्वारीं । उदक निवटी रसनेअंतरीं । पृथ्वी पोटाळी निरंतरीं । सर्व संधि प्राणेंशीं ॥ ५५ ॥ आतां समानाचिया सर्वांगीं । नभ व्यापी ऊर्ध्वमार्गीं । वायु करी रिघीनिघी । मुख्यपणें ॥ ५६ ॥ समानीं दिठी निरोधन । तेंचि तेज होय समाधान । रसनें हँटीं ओळखण । उदक करी तेथ पैं ॥ ५७ ॥ चंद्र सूर्य एकवटण । तेथ मही मिळे आपण । समानासीं जाण । ऐशियापरी ॥ ५८ ॥ तैसेंचि उदानीं नभ । आपें क्षेर्म मेळें स्वयंभ । चलनधर्माचा कोंभ । वायूचा तेथ ॥ ५९ ॥ मुख्यपणीं तेज मिरवी । क्षुधे तृषेची गोंवी । रसीं रस चोखवी । जळ तेथें ॥ ६० ॥ यया विकारां वर । तेथ पृथ्वी मिळे निरंतर । ऐशियां पारि तत्पर । एकमेकीं होताती ॥ ६१ ॥ तैसेंच यया प्राणीं । पूरकीं नभ मेळिजे आपणीं । रेचकीं वायूचिया गुणीं । वर्ते सदां ॥ ६२ ॥ उदात्त अनुदात्त देखणें । तें तेजाचें करणें । रसभक्षीं समाधान होणें । हें जळाचें काज ॥ ६३ ॥

---

१ वायु पिंगला नाडीच्या द्वारें बाहेर सोडण्याचा प्रकार. दुसरें, पूरकानें ओढलेला वायु कुंभकांत स्थिर झाल्यावर तेथून बाहेर सोडण्याच्या क्रियेचें नांव पूरक= प्राणायामांत उजवी नाकपुडी बंद करून डाव्या नाकपुडीनें आकर्षण करून आंत घेतलेला जो श्वास तो, म्हणजे नाडीच्या द्वारें आकर्षण केला जाणारा श्वास [सामावें=] या दोहोंच्या समावेशामुळें. २ मुमुक्षूला उद्देशून म्हणतात, हे मुमुक्षा आधाररूपें= मूलाधाररूपानें (योगशास्त्रोक्त मूलाधार चक्र पहा.) ३ इतर भूतांत. ४ खोट्या वस्तूवर खऱ्या वस्तूचा भास होणें. जसें दोरीवर सर्प आहे असें भासणें. ५ ब्रह्मद्वारीं (सुषुम्ना मार्गांत) ६ जाणें येणें. ७ जोरानें हटकून, निश्चयानें ८ जलप्राशनानें होणारें सुख (क्षेम=समाधान) जलाच्या शीत माधुर्य धर्मामुळें होणारें समाधान; यांच्या मेळानें म्हणजे मिळून असण्याच्या स्वयंभु धर्मानें. ९ गुंतागुंती.

पृथ्वी मिळे घ्राणेंद्रियें । हे सर्गविसर्गासीं निलये[1] । पूर्ण जाणावें अनुभवन्यायें । करोनियां पैं ॥ ६४ ॥ आतां अपानाचिये आंगीं । नभ मिळे मूलबंधालागीं[2] । वायु करी लागवेगीं[3] । स्वधर्माआंगीं ॥ ६५ ॥ तेजें सच्छिद्र देखणें । जळें महिमार्ग निवडणें । महीअंश मलोत्सर्ग करणें । पृथ्वीचें काज ॥ ६६ ॥ आतां कर्मेंद्रियांसमवेत । पंचतत्त्वें व्यापिजे सतत । ऐशियाची रीत । बोलणें असे ॥ ६७ ॥ प्रथम वाचेसि वाचाळपण । हा नभाचा व्यापकगुण । वैखरीस लगबगीपण । वायुचें तेथ जाणावें ॥ ६८ ॥ वाच्यांश परीक्षणें । हें तेजाचें करणें । श्रवणें समाधान होणें । जळमेळें ॥ ६९ ॥ वैखरीयंत्रें[4] पृथ्वी मिळे । ऐसे या वाचेचे सोहळे । जाणावे निराळे । स्वानुभवयोगें ॥ ७० ॥ पाणीसीं[5] इच्छा उठणें । तेथ नभासि मिळणें । चलनस्पर्शन करणें । वायूनें पैं ॥ ७१ ॥ पाणी लागें पदार्थ । देखणें हा तेजाचा अर्थ । शब्दरूपें यथार्थ । जळ मिळे तेथ ॥ ७२ ॥ स्थीरपणाचें सुख । तो पृथ्वीचा हारिख । पाणींद्रियें मिळे देख । निश्चयेंशीं ॥ ७३ ॥ पादेंद्रिया गंतव्य[6] विकार । तेथ नभ मिळे तत्पर । गंतव्यांगीं निरंतर । चलन करी अनीळ[7] तो ॥ ७४ ॥ कार्योन्मुख स्फुरण[8] । हा तेजाचा देखणा गुण । निश्चयाचें अधिष्ठान । जळ घाली ॥ ७५ ॥ प्रयोजनीं[9] हारिख न हरिखें[10] । हा पृथ्वीचा गुण देख । अनुभवें निज चोख । करूनियां ॥ ७६ ॥ शिस्नीं इच्छा भोक्तृत्व । तेंचि नभ शुद्धसत्त्व । नेटें[11] मिठीचें महत्त्व । वायुचें तेथ जाणावें ॥ ७७ ॥

---

१ स्थान. २ योगशास्त्रोक्त गुदस्थानाच्या मूलाधारचक्राच्या खालीं असणारा कुंडलीबंध अथवा मूलाधार त्राटक त्रिबंध (सिद्धांतसं० ग्रंथासोबतची चक्रकारिका पहा). ३ लगबगी, जलदी. ४ यंत्रें असें ह्मणण्याचा हेतु स्थूलदेह आदिकरून जें पंजर तेंच यंत्र त्याच्या योगानें. (वैखरी वाचा ही कंठ आणि ओंठ यांच्या गतींमुळें विकसित होऊन स्वरवर्णादिक प्रसवते). ५ हस्तेंद्रियांस, हातांस. ६ चालून जाणें. ७ वायु. ८ अमुक कार्य करण्याकारितां चालणें, गमन करणें वगैरे निश्चयात्मक गमनक्रिया करण्याचें स्फुरण. ९ हेतु, कारण. १० सुखदुःख. ११ जोर करणें.

सुरूपा[1] [स्वरूपा ?] लागीं लोभ उठी । शिस्नादेठीं मदन निवटी । हे तेजाची दिठी । शिस्नद्वारीं ॥ ७८ ॥ बिंदूंतें[2] बिंदु मिळवणें । हें होय जळाचिया गुणें । ययाचें सौख्य भोगणें पृथ्वीनें[3] पैं ॥ ७९ ॥ आतां गुदीं व्यापक स्वधर्म । हें नभाचें जाण वर्म । मलोत्सर्ग सारणें हा धर्म । वायूचा पैं ॥ ८० ॥ मलोत्सर्गीं दृष्टि दाटणें । हें तेजाचें करणें । मलोत्सर्गासि चेतविणें । जळानें तेथ जाणावें ॥ ८१ ॥ मलोत्सर्गासि विसर्ग करणें । हें पृथ्वीचिये खुणें । ओळखावें शहाणें । अनुभवयोगें ॥ ८२ ॥ ऐसें हें सूक्ष्मदेह । सांगितलें निःसंदेह । एकमेकांत गेह । एकमेकांचें ॥ ८३ ॥ सूक्ष्मभूतेंवीण । अनुभवाची न पविजे खुण । म्हणोनि हें बुजवण । आपआपणियां दाविलें ॥ ८४ ॥ यया सूक्ष्मदेहाचें । महिमान एवढें साचें । तहीं निज ज्योतींचें । पाविजे गृह[4] ॥ ८५ ॥ जहीं सूक्ष्म निवटिलें । तहीं आतमत्त्व पावलें । पुढें असे बोलिलें । कारणशरीर ॥ ८६ ॥ जें अनुसंधान ऐक्यपणीं । श्रोतीं परिसिजे श्रवणीं । सोहिरादास म्हणे पूर्व लहाणी[5] । पाविजे पैं आपसयां ॥ ८७ ॥

इति श्रीअद्वयानंदे सूक्ष्मदेहनिरूपणन्नाम तृतीयप्रकरणम् समाप्तम् ॥

---

१ उत्तम रूपाविषयीं (रूपसंपन्न स्त्रियादिकांविषयीं) लोभ उत्पन्न होणें. २ स्त्रियेच्या अंडबिंदूंत पुरुषाचा रेतबिंदु मिळवून त्यापासून पिंड बनविणें, ३ मैथुनापासून होणारें सुख भोगणें हा पृथ्वीचा अंशभूत धर्म होय. ४ हृदय (आनंदमय कोश); ह्मणजे जें आतां पुढें (चतुर्थ प्रकरणांत) सांगावयाचें आहे तें गृह (कारणदेह). ज्योतिरूप विज्ञानमय पुरुष त्याची ज्योति ह्मणजे आत्मा होय. ५ लहाण किंवा लाण हा शब्द वाडीप्रांतांत " हंगामीं शेत पेरण्याच्या घाईच्या प्रसंगीं वापरतात. लाहाणी=प्राप्त होणें या अर्थी; (मूळ स्थिति प्राप्त होणें).

चतुर्थ प्रकरण प्रारंभ

हरिः ॐ नमः शिवाय ॥ आतां कारणदेहाचा[1] प्रीय । तो कार्यी[2] जाणावा अप्रमेय[3] । तयालागीं सोय । धरावी कैसी ॥ १ ॥ हा परिकर सोज्वळ । तुज सांगतों अनुभवकल्लोळ[4] । एकीं एक झळाळे । तेजदिठी[5] दिसे जेथ ॥ २ ॥ जिये कारणयोगें । कार्य आठवे लगबगें । मायापटळ सोंगें । भासती जहीं ॥ ३ ॥ कारणीं कार्यासि विसरिजे । तहीं चैतन्य देखे[6] समतेजें । हें आपुलेनि काजें । देखणें चोख ॥ ४ ॥ कारणीं नेणिजे अनुभवसुख । म्हणोनि कारण अज्ञान दुःख । शुद्धचैतन्याचा हरिख । मोडला जिहीं ॥ ५ ॥ कारणदेह अविद्या । तेथ विषयसुख सद्या[7] । होउनि उगम आद्या[8] । लपविलें ज्याहीं ॥ ६ ॥ कारणीं न पावतां खुण[9] । जीव पावे पैं भ्रमण । निजसुख न पाविजे आपण । कदापीही ॥ ७ ॥ म्हणोनि

---

१ कारणदेहाचा=कारणदेह, आनंदमय कोश. २ कार्य=स्थूल व सूक्ष्म अशा दोन शरीरांनीं संयुक्त असणाऱ्या पिंडरूप कार्यामध्यें. ३ अप्रमेय=प्रमाणांनीं जाणला जाण्यास अशक्य; प्रमाणानें साध्यजो अर्थ तें प्रमेय होय; पण त्या विरहीत म्हणून अप्रमेय म्हटलें आहे. कारण घटादि इंद्रियांना प्रत्यक्ष दिसणारे पदार्थ त्यांस आम्ही "अशा प्रकारचे" म्हणतों, व जे इंद्रियांच्या आड असणारे पदार्थ त्यास "तशाप्रकारचे" म्हणतों; परंतु आत्मा हा इंद्रियांस विषयच नाहीं म्हणून तो असा (ईदृश) असें म्हणतां येत नाहीं. व तो स्वप्रकाश व स्वसंवेद्य असल्यामुळें तसा (तादृश) असेंही म्हणतां येत नाहीं. अर्थात् तो असाही नव्हे आणि तसाही नव्हे. म्हणून कार्यांत तो अप्रमेय असें म्हटलें. ४ अनुभव तरंग (लहरीवर लहरि येणें) ५ केवळ एकट्याच आत्मज्योतीचा लखलखाट ('तेजोमय दिव्यरूप) ६ जें=ॐकाररूप आत्म्याच्या प्रकाशित दिव्य तेजांत ऐक्यानें लीन होऊन गेलें असतां [सम] देह आणि जगत् यांचा भेदभावच नाहींसा होऊन त्या दोहींत एक चैतन्य(देखिजे=) दिसतें. द्वैत बुद्धीचा लोप होतो. ७ तूर्तातूर्त भासणाऱ्या विषयसुखाला. ८ मूळचें जें अनंतरूप त्याचा उगम होऊन त्यानें इंद्रियजन्य क्षणिक विषयसुखाला लपविलें हा भाव. ९ जीवात्म्याची खुण. प्रज्ञा.

कारणीं आठव धरिजे । तयीं समदृष्टीं चैतन्य देखिजे । मग निजप्राप्ति तो[चो ?]जें । इंद्रियें गुंतती ॥ ८ ॥ कारणीं असावें जागृत । न जावें स्वप्नसुषुप्तींत । मग तया तूर्या म्हणत । आपसयां ॥ ९ ॥ तेथ महाकारणतनु बोलिजे । चंद्राचेनि तोजें । ययांती परमपुरुष देखिजे । पूर्णसमयीं ॥ १० ॥ चंद्र तो काय बापुडा । कोण पुसे निजतेजा पुढां । एकीं एक निजनिवाडा । जाणीतलिया मग ॥ ११ ॥ जाणीवनेणिवेचिये वरीं । नव जायचि तो निरंतरीं । म्हणोनि आत्मस्वरूपनिर्धारीं । बैसलिया तो ॥ १२ ॥ आत्मत्वाचिया भरोवरी । महाकारणाचिये परी । निरसुनियां अंतरीं । जाय ते गा ॥ १३ ॥ महाकारणीं उरे एक पटळ । चैतन्य न गमेचि केवळ । कल्पें अकल्प अळुमाळ । तळमळ ते न चुके ॥ १४ ॥ महाकारणीं अपूर्णता । न जाय ते तत्त्वता । परब्रह्मीं निरुता । ठावाचि न गमे ॥ १५ ॥ महाकारणाचेनि चोज । सूर्यबिंबाचें मूळ देखिजे । चंद्राचिये वोजे (तेजें) ओळखणें घडे ॥ १६ ॥ चंद्रसूर्याचिये ओळखी । मन बैसे नित्य हारिखीं अविद्येची उखींविखी । न दिसेचि ते ॥ १७ ॥ जीवसंगाचा अंत । जयासी गमिजे त्वरित । तेथ अनुभवसिद्धांत । काजासि ये ॥ १८ ॥ साध्यसाधनाची सिद्धता । ते महाकारणीं ये निजहिता । ययावीण तत्त्वता । यंत्र तंत्र व्यर्थचि ॥ १९ ॥ महाकारणपर्यंत । हा साध्यसाधक सिद्धांत ।

---

१ परमाश्चर्ययुक्त, नवल. २ त्या स्वयंप्रकाश परमात्म्याच्या तेजापुढें चंद्राची ती कथा काय ? ३ कल्पनेलाही अकल्प ह्मणजे समजण्यास अशक्य अशी जी निर्विकल्प परमात्मवस्तु तिचा अनुभव महाकारणदेहांतही मायेचा पडदा असल्यामुळें येत नाहीं, आणि तळमळ चुकत नाहीं. ४ यत्किंचित् सुद्धां. सि. संहिता. अ० ७ पृ० १६० टीप १ पहा. ५ स्वयंज्योति परमात्मा. ६ वोजे=चांगुलपणा. (पूर्णचंद्राच्या योगानें) किंवा चंद्रामध्यें ज्याचें तेज आहे त्या तेजाच्या योगानें म्हणजे विष्णूच्याच योगानें. ७ घडामोड. ८ शरिरस्थ यांत्रिक देवता (विज्ञानमयादि कोशांतर्गत यांत्रिक शक्ति.) ९ तंत्रवेत्त्यांनीं सांगितल्या धारणा ' स्तंभिनी, द्राविणी, वैश्वानरी, भ्रामरी, आणि शोषणी. इत्यादि तेथें व्यर्थ होत हा भाव.

हें जाणावें प्रकाशवंत । नित्यत्वें गा ॥ २० ॥ महाकारणाचा अंत । तेथ होइजे वेदां अंत । एकींच एक एकांत । जेंथ पैं गा ॥ २१ ॥ जो अनादि देव नटे[1] । नाथिलींच[2] सोंगें अचाट । दावी जेथ आटघाट[3] । महाघोर ॥ २२ ॥ निजस्वरूपीं मायापाश । वेढुनी नाशिलें निज उल्हास । विषय-सुखाची आस । बाधली जया ॥ २३ ॥ गुंतला इंद्रियचाडे । वसविजे यमकुंडे । आपुलिया तोंडें । गुंतला आपण ॥ २४ ॥ आपुलिया रंकाकडे । आपणाचि होइजे वेडें । ऐसे हे राजयाचे पवाडे । अभिनवल कीं ॥ २५ ॥ एरव्हीं यमें[6] जयाचिया दाढा । हा जग प्रसिद्ध पवाडा । वासनात्मकाचा होडा[7] (हुडा ?) । फोडिलिया मग ॥ २६ ॥ आपणा खावयाचा नसे दवंडा । तेथ व्यर्थचि पडती जैशा दाढा । तैसा यमाचा पवाडा । निरपेक्षीं व्यर्थचि ॥ २७ ॥ येथ परब्रह्माविण । भूतमात्रीं नव्हे दुजेपण । मग एकीं एक जालिया निर्गुण । यमासि निलयें[9] कोण तें ? ॥ २८ ॥ येथ यम तोचि आपण । धर्मही होइजे निपुण । एकीं एक जालिया निर्गुण । यम तो दुजा कोण उरे ॥ २९ ॥ आपुलिये इंद्रियचाडी । गुंततां पडे आपणचि बेडी । विषयसुखाची गोडी । धरिलिया मग ॥ ३० ॥ अगा भोगुनियां अभोगी । तोचि बोलिजे राजयोगी । तया कल्पनेची धेंगी[10] । बाधोचिना ॥ ३१ ॥ कल्पना तरी बहुतांपरी । एक आत्मस्वरूप निर्धारी । एक संशय-व्यापारीं । लुब्ध होती ॥ ३२ ॥ तैशी ते विकल्पकल्पना । जयें दुःखें भोगवी नाना । ह्मणोनि हे भावना । न धरावी पैं ॥३३॥ सकळ सोंगाचा अधिष्ठितो[11] । तो गोसावीं[12] वेगळाचि तत्त्वता । जे जे घटीं प्रवर्ततां ।

---

१ सोंगाड्या. २ मिथ्याच. ३ उत्पत्ति विनाश. ४ मायापाशानें वेष्टिल्यामुळें केवळ ब्रह्मानंदास मुकतो. ५ ज्याप्रमाणें राजास स्वप्नांत आपण भिकारी झालों असें वाटून तो दुःखी होतो. ६ यम (मृत्यु, काल.) हा ज्या महेश्वराच्या दाढा आहेत. ७ मोठेपण, (अहंकार—होड हा शब्द गोवेंप्रांतीं चालतो.) हुडा=देहाहंकारादिकांचा दुर्ग (लिंगदेह). ८ जसें आपल्यास कांहींच चर्वण करावयाचें नसलें म्हणजे आपल्या दाढा व्यापाररहीत होऊन जातात. ९ स्थान कोठें? जागाच नाहीं हा भाव. १० ताप, ज्वराची उष्णता. ११ मूलाधार. १२ गोस्वामी, इंद्रियांचा धनी, आत्मा (सर्व प्रपंचाविरहीत).

तैसा तैसा ॥३४॥ जें जें घटीं[1] क्रियमाण । जें असे अप्रमाण[2] । तेथ करी प्रेरण । निजसूत्र[3] तें ॥ ३५ ॥ सोंग खेळवी विचित्र करणी । म्हणोनि खेळियां[4] तैशींच हीं बोलणीं । साच मानावीं शहाणीं । काय म्हणवुनी ? ॥ ३६ ॥ आपुलिया विनोदासाठीं । केतेंच्यिं[5] खेळवी निवटी । म्हणुनि तया स्वरुपावाटीं । तोचि झाला काय ? ॥ ३७ ॥ तैसे जीवदशेचें केतेंपणं[6] । वासनात्मकीं[7] होय निपुण । परि चैतन्याचे गुण । तेथ न धरिजे ॥ ३८ ॥ चैतन्य असे वेगळें । हें अविद्यासोंग खेळे । शुद्ध चैतन्याचे डोहळे । नसतीच पैं ॥ ३९ ॥ हे अनादि सृष्टिरचना । पहिलीच भूतभावना । म्हणोनि पृथक पृथक इच्छा उद्भव नाना । नसतीच पैं ॥ ४० ॥ अनादि इच्छेचेनि ओघें । हीं दिसती अनेक सोंगे । हें पूर्णज्ञान निजमार्गें । देहभासीं न गणिजे ॥ ४१ ॥ देहभास असे वेगळा । तेथ अलिप्त चैतन्यजिव्हाळा । स्वानुभव निराळा । पाहिलिया मग ॥४२॥ देह न गणिजे आत्मा । हा जाणावा पूर्ण महात्मा । मग स्वयंप्रकाश परमात्मा । प्रकटेल पैं ॥ ४३ ॥ हे स्वयमेव चैतन्यज्वाळा । अवलीळेंच[8] देखिजे लीळा । तेथ उपरमोनी[9] डोळां । पाहणें घडे ॥ ४४ ॥ डोळां

---

१ घटीं=देहीं प्रत्यक्ष देहाच्या आधारें म्हणजे काया, मन आणि इंद्रियें यांनीं यावज्जीव घडणारें जें बरें वाईट कर्म तें क्रियमाण होय. २ असिद्ध. कर्म सिद्ध होण्यास महेश्वराची शक्ति लागते, तिच्याशिवाय केवळ जड घटाच्या अंगीं कर्म करण्याची शक्ति नाहीं. ३ विश्वनाटकाचा सूत्रधार हृदयस्थ परमेश्वर हा आपलें सूत्र. म्ह. इच्छाशक्ति यांची प्रेरणा करितो. ४ सोंगाड्या सोंगाप्रमाणें बतावणी करितो, ती शहाण्यानें काय म्हणून खरी मानावी ? ५ चंगकांचनी गंजिफाच्या खेळांत चारी हुकूम एकास आल्यानें त्याची खेळांत जी जीत होते. त्याला केतें म्हणतात. हे गंजिफे वाडीप्रांतांतच तयार होतात. हें सर्व विश्वतच आहे. ६ जीवपणाचें केतेंपण म्हणजे पूर्वोक्त चारी देहांमध्यें सत्तेच्या योगानें चालणारी क्रिया. ७ लिंगशरिरांत. ८ सहजींच. ९ योगाभ्यासानें अहंकाराचें जसजसें विस्मरण होत जाईल, तसतसें सूक्ष्म दृष्टीस निजानंदाचें अनुमान स्पष्टपणें होत जाईल. असें विस्मरण होतां होतां अहंकार अगदींच सूक्ष्म होतो तेव्हां साक्षात् ब्रह्मानंदाचा अनुभव येतो. हेंच " उपरमोनि डोळां पाहणें घडे" असें म्हणण्याचें रहस्य.

दृष्टि[1] उपरमिजे । तेथ तूर्यादशा[2] ठाकिजे । पूर्ण चैतन्याचेनि चोजें । स्फुंजत[3] असे ॥४५॥ जये तूर्येचेनि महिमानें । स्वरूप गामिजे अनुसंधानें । निजप्रातिचिंतनें[4] । समाधान[5] होइजे ॥ ४६ ॥ मेरूसि[6] जयें टांकिजे वायुमंडल[7] जाणिजे [गणिजे ?] । तेथ आत्मप्राप्ति म्हणिजे । निश्चयेंशीं ॥ ४७ ॥ निजसुख देखिजे समदिठीं । तेथ चैतन्याशीं पडे मिठी । देहभासाचिये शेवटीं । गोड करी ॥ ४८ ॥ जयें समदिठी आघवें । स्वरूप गमिजे[8] अनुभवें । निजतत्त्व सामावे । समरस होइजे ॥ ४९ ॥ ऐशिया अनुभवांची[9] पेठ । वसविजे पैं नीट । जेथ उल्लंघिजे श्रीहाट[10] । सूक्ष्मासहीत[11] ॥ ५० ॥ श्रीहाटावरील द्वितीयभूमि[12] । जेथें[13] जिणाव्या पूर्व-

---

१ याप्रमाणें दृष्टी आत्म्याकडे परतविणें. २ तुरीया दशा ह्मणजे चौथी अवस्था. ह्या योगाचा परमावधि. ३ स्फुरण पावणें, प्रकाशणें. ४ आत्मप्रातीच्या चिंतनानें. ५ निरंकुश तृप्ति. आत्मज्ञानानें मनुष्यास असें वाटतें कीं, मी करावयाचें तें केलें, आणि मिळवावें तें मिळविलें म्हणून तो समाधान असतो. केशवस्वामि एका अभंगांत ह्मणतात. [या नांव ज्ञान या नांव ज्ञान । पूर्ण समाधान यासीच ह्मणिजे ॥ १ ॥ आहे तें सोडुनि नाहीं तें पाहणें । पाहणें हारपे जेथ राहिजे ॥ २ ॥ ज्या ज्या ठायीं राहिजे तें स्वयें होईजे । होणें ना जाणिजे विसरिजे ॥ ३ ॥ स्वरूप जाणुनि कांहींच नेणिजे । कांहीं नाहीं तेथें सर्वदां राहिजे ॥ ४ ॥ विसराचें स्मरण स्मरणाचा विसर । होय तो ईश्वर केशव म्हणे ॥ ५ ॥] ६ त्रिकूट. ७ वायु=सर्व प्राण क्रिया चालविणारा हिरण्यगर्भ [मंडल=ब्रह्मगोल, सत्यलोक] त्याला जाणावें. [गणावें=आत्मत्वाची गणना करावी. त्याच्या ठायीं हा लोक, परलोक, सर्व भूतें यांचा समावेश करावा. ८ दृष्टीस पडतें, पाहण्यांत येतें. [गमणें=दृष्टीस पडणें या अर्थी हा शब्द वाडीप्रांतीं कुणबी लोकांत फार वापरतात]. ९ सर्वप्रकारचा अनुभव मिळण्याची पेठ (व्यक्त अव्यक्त सर्व पदार्थांचा सांठा असणारें स्थान). ह्मणजे प्रणव. (ॐकार) त्या ॐकाराचें ज्ञान. १० श्री=लक्ष्मी=(शक्ति.) + हाट=बाजार=(विश्व बाजार जुनें टांकावें नवें घ्यावें). ब्रह्मांडांतील (तालुस्थानीं) जी ज्ञानशक्ति राहाण्याची जागा त्या जागेस श्रीहाट ह्मणतात. ११ पिंडांतील सूक्ष्मदेहासहीत. १२ अनुभवाच्या भूमिका चार आहेत पैकीं द्वितीय भूमिका "गतायाता" ही होय. ही सूक्ष्मदेहांतील भूमिका आहे. या भूमिकेवर स्थिर होऊन नित्यानित्य विचार करावयाचा. १३ जेथ=ज्या पूर्व उगमीं. प्रज्ञेचा मूळझरा (उगम) तेथें=त्या ठिकाणीं स्थिर होऊन इतर तीन भूमिका पुढें जिणाव्या=जिंकाव्या. हें अनेक वचन आहे; त्याचें रहस्य हेंच कीं इतर

उगमी । त्रिवेणिचिया[1] संगमीं । पार होआवें ॥ ५१ ॥ स्थूलाचें प्रथम पडे ठाण[2] । तेथ निजसुखासी उगाण[3] । निजज्योतीची खुण । आकळे जेथें ॥ ५२ ॥ सूक्ष्म भूतांचा एक देंठ[4] । तेथ जीवरूपाचा शेवट । निरंजनाचा निवेंट[5] । निवटे जेथ ॥ ५३ ॥ ऐशी हे जीव माया सरली । तेथ अंतरज्योति उगवली । हे जया आंतुडली । तेचि जाणती ॥ ५४ ॥ म्हणोनि तत्त्वज्ञान । जहीं गमिजे निदान । तेथाचि चैतन्यघन । वरुषलाचि तो ॥ ५५ ॥ ययापरी चैतन्यजळीं । तो आनंदीं दे चुबकळी[6] । तयालागीं हे नवाळी । महदैश्वर्ये देखिली ॥ ५६ ॥ तेथ देखिलें ऐसोंचि काय । जहीं भोग्य झालें अप्रमेय । निर्गुणदृष्टि सोय । धरिली ज्यांहीं ॥ ५७ ॥ ऐसें महाकारण देह । गमे पूर्वउगम निःसंदेह । पुढें पावतो विश्रांतिगेह । जन्ममरण न शिवे तें ॥५८॥ कारणीं महाकारण । निवटिलें संपूर्ण । पावविली सहज खुण । निजमुळींची ॥ ५९ ॥ पुढें पूर्णानंदमहिमा । परात्पर वदे निरुपमा । सोहिरादास म्हणे निजउगमा । श्रोते पावती निजश्रवणीं ॥६०॥

इति श्रीअद्वयानंदे कारणमहाकारणशरीरनिरूपणं नाम चतुर्थप्रकरणं समाप्तं ॥

तीन भूमिका 'विक्षेपता, संश्लिष्टता, सुलीनता' ह्या त्या पूर्वउगमीं (गतायाता भूमिकेच्या ठायीं स्थिर होऊन) जिंकाव्या. स्थूल देहांतील पहिली भूमिका 'विक्षेपता;' सूक्ष्म देहांतील दुसरी भूमिका 'गतायाता.' तिसरी 'संश्लिष्टता' (अनित्य त्यागें सत्याश्रय करणें). ही कारणदेहांतील भूमिका होय, आणि 'सुलीनता' (सुखेन ब्रह्मसंस्पर्श) ही महाकारण देहांतील चौथी भूमिका होय. याबद्दल सिद्धांत संहिता पूर्वार्ध पृ० ७६ अ० ४ येथें विस्तृत टीप आहे ती पहा].

१ इडा (गंगा), सुषुम्ना (सरस्वति) पिंगला (यमुना) या तिहींचा जेथें एकत्र संगम होतो असें स्थान. सि. स. उ. अ० १० पृष्ठ २० सोबतची चक्रकारिका येथील द्विदल चक्र पहा. २ जागा, आश्रय; स्वरूपस्थितीनें स्थिर राहणें. ३ अनुभव, स्पष्टीकरण. ४ सूक्ष्म भूतांचा एक जिव्हाळा; भूतात्मा अंगुष्टमात्र पुरुष. ५ मायारहीत एकांत; निर्लेप ब्रह्माचा (निवट=) निवाडा, उलगडा. ६ बुचकळी. बुडी. बुडी मारणें यास चुबकणें असें सावंतवाडीप्रांतीं म्हणतात.

पंचम प्रकरण प्रारंभ

हरिः ॐ नमः सर्वात्मने । आतां आनंदाचा महिमा । सांगतों तो अनुपमा । निजप्राप्तिउगमा । पावला तो ॥ १ ॥ आनंद भोगियांचें । महत् महिमान साचें । जया निजतत्त्वाचें । पांघुरण पडे ॥ २ ॥ तयालागीं शय्या हे महीवरि । गगन बुर्खा डोईवरी । घेऊनियां निर्धारी । पहुडलाचि तो ॥ ३ ॥ तयालागीं हें सकळां । आपणावीण न दिसे डोळां । ऐसा निजजीवन जिव्हाळा । लाधला तया ॥ ४ ॥ सर्व [१]घटीं ज्योतिर्मय । [२]चैतन्याचि खेळे अप्रमेय । ऐशी हे निजसंविती सोय । धरिली ज्यांहीं ॥ ५ ॥ समदिठीचेनि आघवें । तत्त्वज्ञान हें [३]अनुभवे । येई; येथ संशयनावें । न शिवतीच गा ॥ ६ ॥ समदिठीसि जो घ्याला । तो ऐक्यीं एकचि झाला । ऐसा हा ठाव वहिला । काढिला ज्याणें ॥ ७ ॥ [५]अपरप्रेमेशीं न्हाला । सर्वांचि [६]भवमळ सांडिला । तत्त्वज्योति वि[७]मळाला ।

---

१ सर्व देहांमध्यें. २ धूमरहीत ज्योतिसारखा अंगुष्ठमात्र चैतन्यपुरुष. ३ अनुभवलें जातें, आणि जेथें अनुभवाला (येई) येतें. तेथें संशयाचीं नावें=नामरूपात्मक संशयीत नावें, किंवा नावांला सुद्धां तेथें संशय प्राप्त होत नाहीं. ४ अद्वैत चैतन्य (कूटस्थ) ५ अपर=ज्याहून दुसरें पर म्हणजे श्रेष्ठ नाहीं असें जें परम प्रेम ब्रह्मरसाचें प्रेम तें. न्हाला=अपरा (अविद्या)+परा=विद्या या उभयास्मैक्यरूप जलानें मज्जन (स्नान) केलें हा भाव. स्नान करणें या अर्थीं "न्हाणें" हा शब्द वाडीप्रांतीं वापरतात. अन्य ठिकाणींही सोहिरोबांनीं हाच शब्द वापरलेला आहे ['ज्ञानगंगे स्नानतप्त वैराग्यें' 'ऊर्ध्वपंथें आला, प्रेमपुरीं न्हाला' इत्यादि.] [विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभय ं सह । अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृत मश्नुते इश.उ.॥ ११॥] या श्रुतींतही कर्मानुष्ठानास अविद्या व ब्रह्मज्ञानास विद्या असें म्हटलें आहे, व त्या विद्येचें फळ म्हणजे अमृतत्व प्राप्त होतें, अर्थात् त्यास कैवल्यपद प्राप्ति होते. ६ जन्ममरणरूप संसारमळ. ७ पूर्वोक्त ज्योतितत्त्वयुक्त असा मलरहीत [वसविजे=आपल्या चित्ताच्या ठायीं वसवितो. तुकोबांनीं म्हटलें आहे:—देव वसे ज्यांचे चित्तीं । त्याची धरावी संगतीं ॥ १ ॥ तसेंच—सांठविला हरि । जिहीं हृदयमंदिरीं । त्यांची चुकली येरजार । झाला सफल व्यापार ॥ १ ॥]

वसविजे जो ॥ ८ ॥ निजतत्त्व निर्मळीं । जयाची दृष्टि न्याहाळी[1] । तेथ देखिजे नवाळी[2] । निजसुखाची ॥ ९ ॥ जये दिठीलागीं । परब्रह्म असे पूर्णांगीं[3] । तेथ इंद्रियवृत्तीची धगी[4] । हारपोनि जाय ॥ १० ॥ जो पंचम-अवस्थे[5] पातला । तो देहातीत झाला । कल्पनेसी वेगळावला । समूळेंशीं ॥ ११ ॥ इंद्रियांसीं चुकला । तो जितेंद्रिय म्हणितला । स्वस्वरुपासी पात्रला । कैवल्यपदीं ॥ १२ ॥ कैवल्यपदींचा[6] रहिवासी । जया न बाधिजे माया विवसी[7] । आत्मप्राप्तिउल्हासीं । क्रीडत असे जो ॥ १३ ॥ आनंद-जळीं खेळावें । पूर्वअवस्थे मेळावें । भवभ्रमासी छळावें । अनुभवेंचि कीं ॥ १४ ॥ ऐसें हें महासुख निःसंदेह । जें सर्वदां विश्रांतिगेह । असंता[8] कल्पनेचा डोह । मिथ्या बुचकळीं[9] जयातें ॥ १५ ॥ वायांचि भवभ्रमीं बुडती । स्वात्मसुख नकळती । कल्पनेसी आवंतिती[10] । काय म्हणवुनी ? ॥ १६ ॥ संसार सुखें करावा । परि निजउगम धरावा । संशयासीं विसावा । न होऊं द्यावा ॥ १७ ॥ स्त्री पुत्र कलत्र आघवें । देहस्वभावें मानावें । देहचि मिथ्या गणावें । तेथ कोण शोके कोणासी ॥ १८ ॥ देहभासाचिया माथां । ठेविजे अविद्येचा उलथा । आपआपणियें सनाथा । होउनियां असावें ॥१९॥ मायेचा मोठा नेट । देहीं मोह घालिते अचाट । म्हणोनि मायेचा शेवट । ओळखावा ॥ २० ॥ मायास्वरूप देखिजे । तत्त्वज्ञानें निवटिजे । नित्य अनित्य ओळखिजे । कोणतें गा ॥ २१ ॥ अविद्येचा आडपांड[11] । कीं हे कुडें[12] दावी संसारजोड । विषयसुखाची चाड ।

---

१ निरेखून पाहतो. २ अपूर्वता. ३ ॐ ह्या परिपूर्ण अंगामध्यें [ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवा वशिष्यते ॥ ईशावा० उ० ॥ भावार्थः—ॐ ब्रह्म पूर्ण; हें विश्व पूर्ण; पूर्णाच्या (ब्रह्माच्या) आश्रयास्तव पूर्ण (विश्व) प्रकट होतें; आणि पूर्णाचें पूर्ण लीन करून पूर्णच अविशिष्ट राहतें. ४ ताप. ५ उन्मनि अवस्थेला. ६ केवळ आत्मस्वरूपानेंच राहणें. [निरतिशय मुक्ति.] ७ विघ्नदेवता, राक्षसी, हेडळी. ८ अविद्या, अज्ञानरूप मृगजळाच्या डोहांत. ९ मिथ्याच बुडविते. १० आमंत्रण देतात, बोलावतात. ११ आड रस्ता १२ खोटें, मिथ्या.

लाविते जहीं ॥ २२ ॥ म्हणोनि अविद्या निवटावी । आत्मस्वरूपअनुभवीं । इंद्रियसुखाची हेळावी । करावी पैं ॥ २३ ॥ अविद्येची कैसी गति । तुज सांगतों प निरुती । श्रवण कीजे एक चित्तीं । करोनियां ॥ २४ ॥ लक्षूनि दमांचें फळ । नावेंत बैसे केवळ । स्वभावें जातां तळमळ । करी जसा ॥ २५ ॥ नाव स्वभावें चाले । परि तडां ज्याचे हेत उरले । मग तयाचें व्याकुळलें । मानस जैसें ॥ २६ ॥ तो जरि फळाचा हेतु । नावत आणी त्वरितु । मग आपसयांचि सावचित्त । असलाचि असे ॥ २७ ॥ मग नावेचा अंत पुरे । तेथ तो बैसला स्थीरें । चंचलपणाचें वारें । न शिवेचि तया ॥ २८ ॥ तैसा देहीं जो बैसे । आणि दुजेकडा हेतु वसे । तयासि हें भवभ्रमपिसें । व्याकुळ करी ॥ २९ ॥ म्हणोनि दुजेकडील हेतु । आपणाकडे आणी त्वरितु । तरी त्याची वृत्ति सावचितु । असलीच असे ॥ ३० ॥ देहींच असे जो समाधान । त्याचे देहांतीं तेंचि निदान । हें जाणावें अनुमान । अनुभवयोगें ॥ ३१ ॥ जया अनुभवापुढें । दुजियाचें न चले कुवाडें । हें ज्याचें त्याहीं निजनिवाडें । जाणों

१ अविद्या निवटावी=अविद्या विवेकानें निवडली पाहिजे. वेगळी केली पाहिजे. २ हेळसांड, त्याग, उपेक्षा. ३ चाल=अविद्यारूप नौकेची गति (जी नौका बळकट नसल्यामुळें त्या नौकेचा आश्रय करणारांस पुनः पुनः जन्ममरणादि भाव प्राप्त होतात.) [प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषुकर्म । एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ॥ ७ ॥ मुं० उ० मुं० १ ख० २ रें नुसता निवृत्तीच्या नावेंत बसला. ४ याचा भावार्थ हाच कीं, कोणी एक मनुष्य कांहीं व्यापाराच्या हेतूनें एका गलबतांत बसून परद्वीपास गमन करितो. परंतु तीरावर आपल्या घरच्या माणसांकडे त्याचे सर्व लक्ष लागून गेलेलें असतें. अशा स्थितींत नौका आपल्या शक्त्यनुसार चालत असते. याचें मन विरहदुःखानें व्याकूळ झालेलें असतें. पण जर तो इष्ट हेतुकडे लक्ष देईल, तर तो नौकेंत सहज स्वस्थ चित्त असेल. तद्वत त्याला दुःख होणार नाहीं. या देहरूप नावेमध्यें बसला आहे परंतु त्याची आसक्ति विषयांकडे राहिली असल्यामुळें. संसाररूप भ्रपाचें वेड त्याला व्याकूळ करितें. व त्या भ्रमानें तो ती नावही भलत्याच दिसेनें नेऊं लागतो. त्याला संसार सागराचा अंत लागत नाहीं. पण जर तो या देहांतच असेपर्यंत विवेक वैराग्यादि साधन चतुष्टय संपन्न होऊन निवृत्तिरूप नौकेंत बसेल, तर नौकेंत (देहांत) असेपर्यंत स्वस्थ चित्त असेल व तीरास पोंहचल्यावरही सहज अद्वैत चैतन्यमय होऊन स्थिर राहील हा भाव. ५ लटपट.

येई ॥ ३२ ॥ अनुभवावीण जे बोल । ते समूळ जाणावे पोल । निजतत्त्वाचे बोल । नाहींच तेथ ॥ ३३ ॥ अनुभवें आपसयां । साभासाचि दिसे वाया । निजमुळीं विसाविया । गेलाच तो ॥ ३४ ॥ संसारदेहासमवेत । खेळ अचाट मिरवत । हें जाणावें त्वरित । वेगळेपणीं ॥ ३५ ॥ असोनि संसारीं अलिप्त । तेथें चित्स्वरूप प्राप्त । त्यावीण दुजी व्याप्ति । असेचि ना ॥ ३६ ॥ जो निजसुखें व्यापिला । तो सिद्धांतातें पावला । परमामृतातें प्याला । आपसयांचि ॥ ३७ ॥ जो क्षराक्षरा विरहित । कला ज्योति अतीत । अनुभवें देहातीत । सर्वदां जो ॥ ३८ ॥ देहीं

---

१ नामरूपात्मक जग; किंवा चिदाभास. अविद्येनें वेढलेल्या कूटस्थावर स्थूल आणि सूक्ष्म या दोन देहांनीं युक्त असा 'शिंपीवरील रुप्याप्रमाणें केवळ भ्रमानें दिसणारा,' जो आभास, त्यास चिदाभास असें म्हणतात. २ भववृक्षाचें मूळ जो पुराणपुरुष त्याच्या ठायीं. ३ व्यापार, उद्योग. ४ देह आणि जगत् अनित्य व क्षणभंगूर आहेत, आणि परमात्मा नित्य व अविनाशी आहे, या अभंग सिद्धांताचा अपरोक्ष बोध. ५ क्षर म्हणजे नाशवंत, व अक्षर म्हणजे अविनाशी या दोन पुरुषां विरहीत (उत्तम पुरुष परमात्मा). [भगवद्गीता अ० १५ श्लोक १६,१७,१८ पहा.] ६ सोळा कळा (योगशास्त्रोक्त कंठस्थानचें विशुद्ध चक्र पहा). ह्या सोळा कळा ह्मणजे " पंचमहाभूतें मनासह एकादश इंद्रियें ह्या किंवा समष्टिभूत दोन कार्यें एक विराट आणि दुसरा सूत्रात्मा आणि बाकी चवदा ह्मटलीं ह्मणजे भूः आदिकरून चवदा भुवन होत. ७ कला आणि ज्योति विरहीत (वेगळा) अमरपुरुष [स यथेमा नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्यास्तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरूपे समुद्र इत्येवं प्रोच्यते ॥ एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडषकलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्तं गच्छान्ति भिद्येते तासां नामरूपेपुरुष इत्येवं प्रोच्यते स एषोऽकलोऽमृतो भवति × ×॥ प्रश्नोप नि० प्र० ६ मं. ५ वा. भावार्थः—ज्याप्रमाणें नद्या वाहत जाऊन समुद्रांत जाऊन मिळतात, आणि त्यांत तन्मय होऊन त्यांचें नामरूप नष्ट होतें व मग लोक त्यांस केवळ समुद्रच ह्मणतात. त्याचप्रमाणें द्रष्टयाच्या ह्या सोळा कळा पुरुषाप्रत जाऊन मिळतात, आणि त्यास मिळाल्या ह्मणजे त्या अस्तंगत होतात. त्यांचें नामरूप नष्ट होऊन त्यांस केवळ पुरुष असें म्हणतात. तो पुरुष कलाविरहीत आणि अमर होतो].

देहातीत असणें । हें जाणावें पूर्णखुणें[1] । मग तया सुखाचे तुळणें । नसे आन ॥ ३९ ॥ ऐसें हें अव्याकृत[2] आख्यान । जहीं ओळखिजे निदान । आत्मप्राप्ति अनुसंधान । रोकडेंची ॥ ४० ॥ जो प्रेमभूत अक्रिय । जो आनंदघन अप्रमेय । तयालागीं हे सोय । ऐक्यपणें धरियली ॥ ४१ ॥ म्हणोनि मायेचा गोसावीं । मायेसि तुकिजे अवयवीं । निजसुखगोवीं । न विसंबेचि जो ॥ ४२ ॥ मायेचा संकल्प वाउगा । हें समजलें जया समभागा । निजज्ञानराजयोगा । अभ्यासिलें ज्याहीं ॥ ४३ ॥ राजयोगाचें लक्षण । भोगुनी अभोगी आपण । इंद्रियसुखासी तुळण । बाधूं न शकति जया ॥ ४४ ॥ देहीं असोनि देहासि न कळे । ऐसे हे आनंदाचे सोहळे । जयाचें चित्त मैळें । न होय कदां ॥ ४५ ॥ इंद्रियीं वर्तोनि इंद्रियांसी । जो न कळेचि आपैसी । ऐशिया सुखाची उल्हासी । येइजे मग ॥ ४६ ॥ जो देखत असतां न देखे । ऐकत असतां न ऐके । जो चाखित असतां न तोखे । काया हे गा ॥ ४७ ॥ जो सेवित असतां न सेवी । गंधीं नसतां गंध घेई । हे जयाची अपूर्व गोवी । तोचि जाणें ॥ ४८ ॥ जो वाचा नसतां बोले । हात नसतां हाले । पाय नसतां चाले । सर्वत्र गा ॥ ४९ ॥ शिश्न नसतां मैथुनालागीं । प्रवर्तला मदनाआंगीं । उत्पत्ति नसतां हे वावुगी । वृद्धि जाहली ॥ ५० ॥ जो पायु नसतां मलोत्सर्ग करी । सर्वे मूलबंधोंसि आवरी । ऐशी हे अभिनव परी । परम पुरुषाची

---

१ याबद्दल प्रश्नोपनिषत् प्र०४ था मं० ८ ते ११ हे जिज्ञासूंनीं अवश्य पहावें. यांत सांगितल्याप्रमाणें पूर्ण खुण जाणल्यावर मनुष्य ओंकाराच्या योगानें परमपदाला पावतो. २ नामरूप प्राप्त होण्याच्य पूर्वींची विश्वाची जी अवस्था ह्मणजे अर्थात् ब्रह्माची अविकृत अवस्था; ह्या अवस्थेस अव्याकृत ह्मणतात. या प्रकरणांत मुख्यत्वें आनंदब्रह्माचें दिग्दर्शन केलें आहे. याबद्दल जिज्ञासूंनीं “ तैत्तिरीय उपनिषत् व० २ अनुवाक ६ व ७ हे अवश्य पहावे. ३ गोवण्यांत, प्राप्त करून घेण्यांत. ४ गोम, खूण. ५ एका टांचेनें योनिस्थान ह्मणजे शिवण दाबून आणि गुद द्वाराला संकुचित करून अपान वायूची जी खालीं गति आहे तिला वर आकर्षण करून वर चालू करावी; याला मूलबंध ह्मणतात. तात्पर्य प्राण व अपान यांचा संयोग करवून त्यांची सुषुम्नेंत गति करवावयाची याला मूलबंध ह्मणतात. या

॥ ५१ ॥ मूळबंध जयासि ठावा । तेथ पिंडी अनुभव आघवा । गमे तया स्वयमेवा । आत्मज्योति ॥ ५२ ॥ आत्मज्योतीचेनि प्रभावें । कुंड-[1]लिनीघर ज्यासि ठावें । ओढियाणें[2] तो सामावे । तयामध्यें ॥ ५३ ॥ सवें जालंधराचा[3] पाश । कवळी लिंगदेहाचा कोश[4] । ऐसा हा साधन कर्स[5] ! आतुडे[6] पैं राजयोगें ॥ ५४ ॥ राजयोग आणि हटयोग । ययांसी नसे वेगळा प्रसंग । उभयपक्षीं समभाग । असेच जेथ जयाचा ॥ ५५ ॥ राजयोग जहीं पाविजे । तेथ हटयोग बोलिजे सहजें । उभयां एकींच निजतेजें । वर्तणें घडे ॥ ५६ ॥ वैराग्यें प्रयोजिजे हठयोग । विवेकें स्वीकारिजे राजयोग । याहीप्रकारें चोज चांग । देखावें जेथ ॥ ५७ ॥ राजयोग जो पावला । तो जाणें हठयोगसाधनाला । हठयोगचि मात्र झाला । तरि राजयोग न कळे तयासी ॥ ५८ ॥ मूळबंध, कुंडलिनी, ओढियाणा, । आणि जालंधर याही खुणा । हठयोगें बोलिजे निर्वाणा । ऐशियापरी ॥ ५९ ॥ पिंडींचिया अवस्था । ब्रह्मांडीं करणें संस्था ।

क्रियेनें मूलस्थानाचें (गुदाचें) बंधन होत ह्मणून याचें नांव मूलबंध पडलें आहे. विशेष विवरण पातञ्जल योगशा० अ० पु० साधन पाद: २ पृ० ८५ येथें पहा.]

१ कंदाच्या वरच्या जागेंत व नाभीच्या खालीं सुषुम्नेला आपल्या आंगाचे साडेतीन वेढे देऊन, व शेंपूट तोंडांत वळकट धरून, कुंडली नावांची सर्पाकार शक्ति राहिली आहे [पा० यो० शा० विभूति पाद: २ पृ० ११७।११८ पहा.] २ ओढियाण अथवा उड्डीयान बंधाचें लक्षण:—नाभीच्या खालच्या व व वरच्या भागाला (पाठीला पोट चिकटेल तेथपर्यंत) ओढून धरून, व ज्या रितीनें बरगड्यांला आढ्या पडतील असें करावें. महापक्षी जो प्राण (जीवहंस) तो या मुद्रेनें अनायासानें सुषुम्नेंतून ब्रह्मरंध्रांत उडून जाऊं शकतो, ह्मणून या मुद्रेला ' उड्डीयान बंध ' ह्मणतात [सि० स० उ० या सोवतची चक्रकारिका पहा]. ३ योगशास्त्रोक्त कंठस्थानच्या विशुद्ध चक्रांतील (बंधत्रयांतील) एक बंध. [कंठाचें भोंक आकुंचित करून, मान खालीं वांकवून हनुवटी हृदयापासून चार बोटांच्या अंतरावर असूं देणें याला 'जालंधर बंध' म्हणतात. ४ लिंगदेहाचा कोश म्हणजे प्राणमय, मनोमय, आणि विज्ञानमय हे तीन कोश. ५ तेजस्वीपणा, अधिकार. ६ प्राप्त होतो.

हे हठयोग व्यवस्था । बोलिली असे ॥ ६० ॥ ब्रह्मांडीं दृष्टि बैसणें । इंद्रियें इंद्रियांत लक्षिणें । स्थूलींच सूक्ष्म जाणणें । अनुभवेंचि कीं ॥६१॥ मुळींच प्रकाशिजे पूर्व उगम । उर्ध्वी निवटिज चैतन्यहेम । पिंडींचें कर्मअकर्म । येथूनियां देखणें ॥ ६२ ॥ पिंडींची पैं सत्ता । जयाचिया येइजे हाता । इंद्रियवृत्ति प्रवर्त्तता । नवल हें कीं ॥ ६३ ॥ विषयभोगीं असोन । वृत्ति जयाचिया आधीन । तेथ राजयोग हें अभिधान । शोभलें गा तयात ॥ ६४ ॥ म्हणोनि राजयोगींच हठयोग । आहे जेथ ऐक्य मार्ग । ऐशिया अनुभवाचा लाग[२] । धरावा लागे ॥ ६५ ॥ जो उन्मनितें पावला । सहजसमाधीं निजेला । तो सर्वेचि विसरला देहभाव ॥ ६६ ॥ अनुभवाचिये शेजे । जो अनुभवांतीं निजे । तोचि एक निजतेजें । नामाथिला ॥ ६७ ॥ अनुभवाचें अवतरण । तंववरि हें जीवपण । निर्वाळिलिया तत्त्वखुण । हाता चढे ॥ ६८ ॥ म्हणोनि शेषाचिये बुडीं । जो अंतरींचे निबीडीं । जयानें निजसुखाची जोडी । हारविली नाहीं. ॥ ६९ ॥ निजधनाची धरिली आस । संसार भ्रमाचा केला निरास । ऐसा एक परमोल्हास । जडला जया ॥ ७० ॥ म्हणोनि हें तत्त्वावीण । नसे जल-स्थल पाषाण । ऐशिये देठीं देखणेंपण । असावें गा ॥ ७१ ॥

---

१ कुंडलिनी [शक्तिचालनः—कुटिलांगी, कुंडलिनी, भुजंगी, शक्ति, ईश्वरी, कुंडली, आणि अरुंधति हे सात एकमेकांचे पर्याय शब्द आहेत. ज्या रितीनें मनुष्य किल्लीनें कुलूप काढून दार उघडितो त्याप्रमाणें योगी हठाभ्यासानें कुंडलिच्या योगानें मोक्षाचें कपाट (सुषुम्नेचा मार्ग खुला करूं शकता. [विशेष खुलासा पातञ्जल यो० शा० अ० साधन पादः पृ० ८६ पहा.] २ पाठलाग, शोध, निदिध्यास. ३ शेषपंथाबद्दल सिद्धांतसंहिता उत्तरार्ध अ० १० पृ० २३ येथें विवरण आहे तें अवश्य पहावें] विवेकी स्थितप्रज्ञ त्यानें अंतरींचे निबिडीं=हृदयांतर्गत बुद्धिरूप गुहेच्या+निबिडी=अप्रवेशनीय, गहन, दाट, अविरल तमामध्यें आत्मसुखाची जोडी (जोड, प्राप्ति) फेंकून दिली नाहीं. म्हणजे त्याला ह्या नरदेहामध्येंच मात्र प्राप्त झालेली निजसुखाची जोडी ती पूर्वोक्त प्रकारें आपली बुद्धि मोहरूप अरण्यांतून (निबिडांतून) ज्यानें पार करून घेतली असा जो आत्मविवेकी म्हणजे राजयोगी त्यान फुकट जाऊं दिली नाहीं हा भाव.

तत्त्वा तत्त्व निवटावें । अविद्या असार सांडावें । आनंदपद मांडावें । स्थीर तें पैं ॥ ७२ ॥ ऐसा हा पूर्णानंद । जहीं तुटले भेदाभेद । प्रकृति-पुरुषाचें द्वंद्व[1] । तुटोनि गेलें ॥ ७३ ॥ प्रकृतिपुरुष ऐक्यपणीं । वर्त्तती तेथ आनंदधणी । ध्यावी जेथ अनुभवखुणीं । पावोनि ययां ॥ ७४ ॥ यथोनि संपलें निरूपण । आनंदाचें कारण । सोहिरादास म्हणे पुढें श्रवण । सहजसमाधि अवधारिजे ॥ ७५ ॥

इति श्रीअद्वयानंदे हठराजयोग भेदाभेदविवरणं नाम पंचमं प्रकरणं समाप्तं ॥

षष्ठ प्रकरण प्रारंभः

हरिः ॐ नमो ज्ञानरूपाय ॥ आतां सहजसमाधीची खुण । निरूपिजेल पैं आपण । ते ऐकतांचि श्रवणें[2] । तृप्त होती ॥ १ ॥ सहजसमाधि तो काय । ऐशी बोलण्याची सोय । तरि ऐकावें अप्रमेय[3] । सुख तें गा ॥ २ ॥ सहजमुद्रा जेथ लागे । तेथ निद्रेमाजी होइजे जोगें । निर्गुण-वृत्तीचिये मार्गें । लागलाचि तो ॥ ३ ॥ तहीं निर्गुणाचिये पाठारीं । जो निजे निर्धारीं । तया सगुणाची परी । नातुडेचि[5] पैं ॥ ४ ॥ तया-

---

१ भेदभाव, वेगळेपणा. २ श्रवणेंद्रिय. कर्ण. ३ अगण्य, अनुपमेय. ४ यच्च यावत् सर्व भूतांची जी जाग्रति ती हिरण्मय पुरुष जो आतमा त्याची निद्रा (उन्मन्यवस्था) होय. [या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥ भ० गी० अ० २ भावार्थः—सर्व प्राणी जेव्हां अज्ञानरूपी रात्र अनुभवितात, तेव्हां इंद्रियनिग्रही मनुष्य ज्ञानरूपी जाग्रति अनुभवितो. आणि सर्व प्राण्यांना जो जागृतीचा अनुभव म्हणन वाटतो, ती अज्ञानरूपी रात्र आहे, असें तो विवेकी जाणतो.] ५ आकलन करूं शकत नाहीं.

लागीं हा संसार । न ठावाचि निरंतर । निजसुखाची शेहार । लागली तया ॥ ५ ॥ तहीं संसार होय बापुडा । कोण पुसे निजतेजापुढां । ऐसा तेथील निवाडा । जाणावा पैं ॥ ६ ॥ निर्गुणीं दृष्टि चढे । तहींच समाधिसुख वाढे । जीवाशिवाचे निवाडे । न कळतीच पैं ॥ ७ ॥ सहजसमाधीचें लक्षण । सांगतों साक्षेप खुण । हे निजसंविति बुजैवण । बुझावे गा ॥ ८ ॥ सहजसमाधीचिया वेळे । स्वस्वरूपीं झांकती डोळे । बाह्यवृत्तीसि आरंबळें । अंतरीं प्रकाशति ॥ ९ ॥ बाहेर दिसती झांकले-पणें । परि अंतरीं जयांसी प्रकाशणें । ब्रह्मांडांतील ठाणें । तुकांसि ये ॥ १० ॥ समाधि जहीं लागती । तहीं चंद्रसूर्य एक होती । निजप्रकाशें स्तब्धति । जेथील तेथ ॥ ११ ॥ सूर्य पावे चंद्रस्थानीं । चंद्र बैसे समाधानीं । अठ्ठाविसांसि एकवटुनी । असती दोघे ॥ १२ ॥ चंद्रसूर्याचें एकवठण । तहीं नेत्रां होय उपलवण । एकीं एक पूर्ण खुण । ओळखणें घडे ॥ १३ ॥ तेव्हां मेरूचिये शिखरीं । मन बैसे निर्धारीं । दृष्टी चढे निराकारीं । एका-एकीं ॥ १४ ॥ जहीं शब्दब्रह्म कुंठे । वींचा मीनंती एक वाटे । जीवन-कळा अलोटें । वर्षती पैं ॥ १५ ॥ तें जीवन घोंटिजे निरंतर । तहीं देहा-सहित होइजे अमर । म्हणोनि तेथील सार । जाणती योगी ॥ १६ ॥

---

१ शह (बुद्धिबळाच्या खेळांत राजास मोहऱ्यांनीं अडवितात त्यास शह असें ह्मणतात. येथें ' सर्व इंद्रियांचा राजा जें मन त्याला आत्मसुखाचा शह (वेध= चित्ताच्या वृत्ति रोंकून धरणें). लागला हा भाव. २ स्वकीय ज्ञानकळा. ३ सम-जणें, जाणणें. ४ पोळणें, झांकळणें, दिपून जाणें. ५ तुलनेस, अनुभवास, सम-तुल्यतेस ६ योगशास्त्रोक्त कंठस्थानच्या विशुद्ध चक्रामधील मातृका सोळा (कळा) आणि हृदयस्थानच्या अनुहात चक्रामधील मातृका बारा (आदित्याच्या बारा आकृति). एकूण अठ्ठावीस; किंवा अठ्ठावीस प्रकारच्या अशक्ति (भ्रमाचीं कारणें सांख्यसूत्रें ३, ३८ पहा). अकरा इंद्रियांचे व्यापार कोणच्या तरि व्यंगामुळें चालूं न शकणें, ही अकराप्रकारची अशक्ति. नउ प्रकारची तुष्टि, चालूं न शकणें, ही नऊ प्रकारची अशक्ति (असत्ता) होते. ७ विस्तार पावणें (दिव्यदृष्टि प्राप्त होणें). ८ ॐकाराच्या माथ्यावर. ९ चारी वेद. १० परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी, ह्या चारी वाचा. ११ एका ठिकाणीं मिळतात, एकत्र होतात.

पिंड चढे ब्रह्मांडीं । तेथ गुंते निजसुखचाडी । परतोनि न घालिजे उडी । मार्वेलीकडे ॥ १७ ॥ मागील स्थान कडुवट । होय जयासी नीट । आपुला आपण शेवट । पाहिलियावरी ॥ १८ ॥ तेथ अनाहत[३]ध्वनी-श्रवण । करितां होतसे निपुर्ण । तेथोनियां नादांतीं विसवण । करी सहस्त्र-दळीं ॥ १९ ॥ सहस्त्रदळीं पाविजे । तेथ सतत जो निजीजे । तेथ पिंड निस्तेज होइजे । शुष्कपर्णप्रकारें ॥ २० ॥ म्हणोनियां तेथील खुणें । जो जाणोनियां नेणें । तहींच हें बोलणें । समाधीचें योग्य पैं ॥ २१ ॥ जहीं अंतरज्योति निर्वाळिजे । चैतन्य देखिजे सम चोजें । तेथ इंद्रियांची काजें । हारपलीं पैं ॥ २२ ॥ म्हणोनि इंद्रियांचे खुणें । सर्वदां जयासि ओळखणें । तयीं त्या सुखाचें तुळणें । कोण करी ॥ २३ ॥ जहीं इंद्रियांची येइजे साक्षी । तरीच पाविजे अलक्ष्यीं । मग तयाचिये दीक्षीं । कोण वर्ते ॥२४ ॥ वर्तत असतां ज्या स्थळीं । न बाधी कल्पनाकाजळी ऐशी हे अपूर्व नवाळी । जाणावी पैं तयाची ॥ २५ ॥ म्हणोनि ब्रह्मानंद । जहीं पावला परम सिद्ध । मग तयालागीं हा बोध । हारपोनि जाय ॥ २६ ॥ मग बोधाचें काय काज । एकांतीं निजलिया निज । लयलक्षाची ओज । हारपोनि जाय ॥ २७ ॥ मग भक्ति वैराग्य ज्ञान । विवेकादिक चिंतन । सर्वे जाय निरसोन । जया सु[६]खीं ॥ २८ ॥ जैसीं शस्त्रें शूरांहातीं । जंववरि स्पर्धी लोक असती । निर्वैर जालिया जैशी होतीं । व्यर्थचि तीं ॥२९॥ तैशी जीवदशा जंववरि असे । तहीं विवेकादिक झळाळितसे । जीव जालिया समरसें । उपायें[७]नें काज काय ॥ ३० ॥ म्हणोनि येथ जीवदशा खंडली । अनुभवांतीं खुण लाधली । म्हणोनि हे बोली वहिली । न येइजे जेथ ॥ ३१ ॥ ऐसें हें समाधिसुख सहज । तयीं ओळखिजे निज । तेथ कल्पनेचें काज । मावळोनि जाय ॥ ३२ ॥ कल्पना हेचि निमाली । मग कोण सांगे कोणा बोली । एकेंचि एक फावली । ऐक्यसिद्धि ॥ ३३ ॥

---

१ जीवशिवाचें ऐक्य होतें. २ प्रवृत्तींत. अज्ञानांत. ३. सि, सं. पहा. ४ जीवन्मुक्त. ५ निर्मळ, शुद्ध करावी. ६ ज्या ब्रह्मानंदाच्या परमसुखांत. ७ साधनें.

जें सौख्य सिद्धयतीत[1] । यंत्रतंत्रेविरहित । तें परब्रह्म त्वरित । सांपडलें ॥ ३४ ॥ येथ सांपडेलेचा मोजा कायी । जहीं इंद्रियें नसती आपुल्या ठायीं । म्हणोनि हे सोयी । धरावी जेथ ॥ ३५ ॥ ब्रह्म जाणावें भोगीं । येथ यंत्र तंत्र नसती वावुगीं । एकीं एक चैतन्याआंगीं । मिळाला जो ॥ ३६ ॥ निजसुख जाणावें भोग्य । तहींच हें आवर्वे योग्य । भवरोगें आरोग्य । पावला जो ॥ ३७ ॥ ऐशिया समाधि नेहटीं[2] । निरसुनि जाय माया- मिठी । ऐशिया सुखाचे शेवटीं । बैसावें गा ॥ ३८ ॥ सुखीं सुखची असे आघवें । दुःखीं दुःखचि पैं जाणावें । म्हणोनि हें सहज स्वभावें । ओळखावें गा ॥ ३९ ॥ ओळखीचा परिकर । जाणोनियां विसर । ऐसें हें अंतर । हृदय वसवावें ॥ ४० ॥ येथ थोडकासा शबलांश[3] । बोलिला पैं अशेष । यदर्थीचा उल्हास । ऐक पां तूं ॥ ४१ ॥ बुद्धि बोलिजे वेडेपण । परिक्षावें वाचाळपण । तेथ बुद्धि ऐसा गुण । तुकासि ये ॥ ४२ ॥ जेथ कडूपण ओळखिजे । तहींच गोड अशिजे । ऐसें हें पूर्ण समजें । समजावें गा ॥ ४३ ॥ म्हणोनि शबलांश बोलिजे । तहीं शुद्धांश निवटिजे । मग दोहींअंतीं बुझे । प्राप्तिसुख ॥ ४४ ॥ शबलांश निरसे । तहीं निज- तेज प्रकाशे । समाधिसेजे आपैसें । पहुडणें घडे ॥ ४५ ॥ ऐशियाचा अभिप्राव । तुज सांगतों उपदेश ठेव । जेणें संशयाचें नांव । हारोनि जाय ॥ ४६ ॥ तरि ऐक पां आतां । शबलांश अविद्या सतता । शुद्धांश ते तत्वता । शुद्ध माया ॥ ४७ ॥ अविद्या ते विपरीत वासना । माया ते स्वस्वरूप भावना । द्वयांतीत[4] त्या गहना । महत्सुखा भोगावें ॥ ४८ ॥ ऐशिया परी द्विविध पदें[5] । हारपला भेदाभेद । सहजसमाधि सिद्ध । जाहलाचि तो ॥ ४९ ॥ येथोनि संपलें समाधिसुख । जहीं लाधला नित्य हरिख । सोहिरादास म्हणे सुखदुःख । हारोनि जाय ॥ ५० ॥

इति श्रीअद्वयानंदे सहजसमाधियोगोनाम षष्ठप्रकरणं समाप्तम् ॥

---

१ अठरा प्रकारच्या सिद्धींहून वेगळें. भागवत एकादश स्कंधाच्या पंधराव्या अध्यायांत ह्या सिद्धी दहा आणि आठ मिळून अठरा सांगितल्या आहेत; ह्या सिद्धींचें वर्णन श्रीमद्भागवत स्कं० ११ अ० १५ यांत सविस्तर केलेलें आहे. तें पहावें. २ जोरानें, नेटानें. ३ माया अंश. ४ अविद्या आणि माया या दोहोंच्या पलीकडचें किंवा वेगळें. ५ शबल=सगुण ब्रह्म व निर्गुण परब्रह्म.

सप्तम प्रकरण प्रारंभ

हरिः ॐ नमो नित्यानंदाय ॥ जये तत्त्वज्योतीलागीं । व्यापक असिजे सर्वांगीं । ऐसें अनुसंधान लागवेगीं । जाणावें तें ॥ १ ॥ तया परमतत्वा-सवें । कांहींच एक न संभवे । म्हणोनि हें आघवें । परब्रह्म ॥ २ ॥ जें परब्रह्म तत्त्वतीत[१] । निजतेज झळंबत । येणें भावें सिद्धांत । लाधला जेथ ॥ ३ ॥ खेळत असतां जेथ । अंतरींच होइजे सनाथ । अर्थीच पाविजे अर्थ । कल्पनेतीत ॥ ४ ॥ काया भाविजे दुजी । तत्त्वज्योति एकचि सहजीं । ऐसें हें सुख चोजीं । असावें नित्य ॥ ५ ॥ जो देव सुरवरांचा स्वामी । मिथ्या गुंतला इंद्रियधर्मीं । शिवपणाचिये नामीं । नामाथिला ॥ ६ ॥ एरवीं जीवपणाचा धर्म । जया न बाधी वर्म । हें आघवें कर्म-अकर्म । कल्पनेचें ॥ ७ ॥ म्हणोनि कल्पनेचे कसवटीं । जो पूर्णज्ञानचि निवटीं । तेथ हे निजधन[२]पेटी । उघडेल गा ॥ ८ ॥ निजधनाची दीक्षा । तेंचि साध्य अलक्ष्या । म्हणोनि जाणणें मुमुक्षा । हेचि गोडी ॥ ९ ॥ अलक्ष्यभूमि[३]चें अनुसंधान । तेंचि मनाचें समाधान । जयालागीं निज निधान । सांपडेल पैंगा ॥ १० ॥ जो निराकार निर्गुण । मिथ्या धरी सगुणपण । हें निजज्ञान उगाण[४] । दावावें जेथ ॥ ११ ॥ जो अनादिसिद्ध गोसांवी[५] । नांथिल्या[६]चि मायाभाशीं गोवी । म्हणोनि हें स्वानुभवीं । बोलणें घडे ॥ १२ ॥ ऐसा हा सार उपावो । जहीं गांमिजे[७] भवाचा ठावो[८] । म्हणोनि हा परम गौरवो । सांगितला मग ॥ १३ ॥ परमतत्त्वभावनें । हेंचि निवडावें निजखुणें । आत्मप्राप्ति निर्वाणें । पहावें गा ॥१४॥ जी वस्तु त्रि-

---

१ देहातीत (स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण, स्फूर्ति आदिमाया ह्मणजे अतिकारण देह). [देहोपंचम कीं समाधि परमानंदैक्य निस्पंदते । अमलानंद योगी, शतश्लोकी]. या पांचही देहांहून वेगळें. २ आत्मस्वरूप धन जींत परीपूर्ण भरलेलें आहे अशी नरदेहरूप पेटी. ३ निर्विकल्पब्रह्माचें. ४ उलगडा, स्पष्टीकरण अनुभव. ५ सर्वेश्वर, परेश (मायेचे गुणत्रय) ते ब्रह्मादि देवत्रय । करिती सृष्ट्यादि कार्य । आज्ञें श्रीपतीचिया ॥ १ ॥ आणिक यांचा व्यापार । करावया समर्थ नव्हे इतर । ह्मणूनि गोसावी सर्वेश्वर । ब्रह्मादिकांसी ॥ २ ॥ विवेकसिंधु, मुकुंदराज). ६ लटक्याच. ७ कळून येईल. ८ शेवट, परममुक्ति.

गुणातीत । गुणसाम्याविरहित । निजउगाणें त्वरित । सिद्ध होइजे ॥१५॥ जें वेदांसि अमुप । बुद्धीसि निक्षेप । स्वानुभूतीचो सौक्षेप । जाणणें पैं जयानें ॥ १६ ॥ जयीं स्वानुभूतीचा अंत पुरे । तहीं आत्मस्वरूप निर्धारें । म्हणोनि हें तत्व विचारें । एकींएक ॥ १७ ॥ जें महद्रूप ज्योतिमय । साक्षेप खुणें अप्रमेय । तयालागीं गणों ये । कोण तो गा ? ॥१८॥ म्हणोनि हें सहज स्वभावें । पूर्ण ज्ञान अनुभवे । तेथ प्रकृतिपुरुषाचीं नांवें । ऐक्य होती ॥ १९ ॥ हेंचि स्वयमेव जाणिजे । तयीं तेंचि होइजे सहजें । तेथ ऐशीं ही चोजें । पाहूं येती ॥ २० ॥ पाहतां पाहणेचि वीँची । जहीं नुरिजे सर्वेची । आपआपणेंनि वेंचीं । पडलियावरि ॥२१॥ या महन्महिमेच्या गोष्टी । बोलों न येती शब्दवृष्टीं । परी दुरूनि मायासमँष्टि । बोलते गा ॥ २२ ॥ ऐसें हें शुद्धमायेचें लक्षण । जहीं करिजे स्वरूपवाखाणग । मग अवँसरें आपण । ऐक्यत्वाये ॥ २३ ॥ पहिलींच असती एकरूप । परि घेतली अविद्येचि ओप । मग आपणाचि लावण्यदीप । उजळिती पैं ॥ २४ ॥ माया ब्रह्म असतीं वेगळीं । तरी कोण भुलवी ब्रह्मघोळीं । चैतन्यानें नवाळी । मायारूप दाविली ॥ २५ ॥ मायेनेंचि देखिजे परब्रह्म । ब्रह्मीं मायेचा संभ्रम । तेथ कल्पनेचें काम । वेगळावें तें ॥ २६ ॥ येथ स्त्रीरूपें पुरुष । पुरुषींच मायेचा हर्ष ।

१ ठेव ठेवण्याची जागा. २ आत्मानुभवाचा, ३ खूण, मार्ग. ४ लहरी. ५ आपण लहरी आहों हा अभिमान सुटून मी जलच आहें अशाप्रकारें वेंचीं ह्मणजे खर्चीं (उत्पत्तिविनाशरूपानें). पडल्यावर. ६ मायेच्या कार्यांचा समुदाय. (मनइंद्रियादिक). ७ निमित्तानें, प्रसंगानें, ओघानें. ८ मुलामा. ९ मोह, विस्मय, महत्त्व. १० प्रकृतिपुरुष हें जोडपें मूळचें म्हणजे परब्रह्माचे ठाईं एक असूनही दोनपणा किंवा अनेक नामरूपात्मक पदार्थमय जें विश्व हें मिळून अनेकपणा नांदवितें. परंतु विश्व हें प्रकृतीचें कार्य; परंतु त्याला अधिष्ठान ब्रह्माचें म्हणजे पुरुषाचें आहे. आणि चित् म्हणजे भासणेंपणा हा गुण पुरुषाचा आहे म्हणून वास्तविक जगत् भासत नसून पुरुषच भासतो, म्हणून "स्त्रीरूपें पुरुष" असें म्हटलें, आणि मायेला तो पुरुष अधिष्ठान आहे, व मायेपासून तो वेगळा करितां येत नाहीं, म्हणून त्याचें

एकमेकीं संतोष । पावती जेथ ॥ २७ ॥ मायारूपाचें सुख । तेंचि परमपुरुषासि हरिख । हें समजल्या सुखदुःख । हारपोनि जाय ॥ २८ ॥ स्त्रियेचेनि आधिलेपणें । परमपुरुषासि जाणणें । तियेवीण निजखुणें । न पवेचि मग ॥ २९ ॥ माया ते परम औषधी । भवरोगियांचि निरसे व्याधि । म्हणोनि माया निरुपाधि । जाणावी गा ॥ ३० ॥ माया ब्रह्मीं असे वेगळिक । तरि हें कोण सांगेल अनुभव कौतुक । म्हणोनि ते अनिष्टंक म्हणो नये ॥ ३१ ॥ मायेंत असती विकार । तरि तैं तत्वज्ञान निरंतर । कोण शोधी अंतर । कोणाचें गा ? ॥ ३२ ॥ जंववरी माया असे । तंव साचचि हें अध्यात्म दिसे । मायातीत तैं अनोरिसें । कोण कोणासि बोले गा ॥ ३३ ॥ ऐसा मायेचा बडिवार पुरा पाहिजे परिकर । तयीं तो ऐक्यनिर्धार । होऊं शके ॥ ३४ ॥ मायेचीं विविध रूपें । जई अधिष्ठिलीं चैतन्यदीपें । तई दिसे तेथ सोहपें । ब्रह्मज्ञान हें ॥ ३५ ॥ ऐसा अव्याकृत आनंद । जयीं देखिजे स्वतःसिद्ध । तयीं अष्टांगबोध ।

सांनिध्य इतकें निकट आहे कीं " पुरुषींच मायेचा हर्ष " असें म्हटलें. या संबधाचें अति सुंदर व मार्मिक विवरण ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवांत " शिवशक्ति समावेश " नामक पहिल्या प्रकरणांत केलें आहे तें अवश्य वाचावें.

१ प्रकृतिपुरुषाचें परम ऐक्य असल्यामुळें, कोणी कोणाची उपाधि होऊं शकत नाहीं, कारण उपाधि ही गुणरूपानें अगदीं वेगळ्या प्रकारची असावी लागते, तशी माया ही नाहीं. म्हणून दोघेंही एकमेकांच्या उपाधि होत नाहींत म्हणूनच श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात " ऐशीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें । तीं मिया वंदिलीं मूळिकें । देवोदेवी=(अमृतानुभव. प्र० १ लें. ओं. १) देवोदेवी=पुरुष आणि प्रकृति. २ निश्चयात्मक अमुकच असें म्हणूं नये, कारण मायाही अनिर्वचनीय आहे, ती अमुक प्रकारची असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. ३ त्रिगुणात्मक विकार. ४ शरीरस्थ त्वंपदवाच्य आत्मा (प्रत्यगात्मा). ५ खोटें, मिथ्या. ६ विवेक यत्न. ७ विकार न पावणारा. ८ यमनियमादि योगाचीं आठ अंगें आहेत त्यापासून उत्पन्न होणारा ब्रह्मसाक्षात्कार. किंवा शरीराचीं अंगें आठ म्हणून नमस्कार "साष्टांग" करितात. या अर्थानें पाहिलें असतां संपूर्ण बोध असें समजावें. दुसरें रहस्य असें कीं, हें जें देहरूप कुरुक्षेत्र याच्याठायीं असेपर्यंत जर नराला हा अष्टांगबोध साध्य झाला नाहीं, तर अर्थात् समानावायूच्या पलीकडे तो गेला नसल्यामुळें कुरुक्षेत्रामध्यें (धर्म-

प्राप्त होय ॥ ४९ ॥ म्हणोनि मूळप्रकृतीचें बरवेपण । जयीं जाणावें पूर्ण । एकीं एक निर्गुण । वसतें जिहीं ॥ ५० ॥ निर्गुणाचा परिकर । शुद्ध वासने निरंतर । परमामृतसार । सेवणें घडे ॥ ५१ ॥ ह्मणोनि सेविलियावीण । कांसया व्हावें प्रवीण । सहजखुणेचें प्रमाण । करील काय ॥ ५२ ॥ येथ आपुलाचि आपण । विनोदें धरिलें विविधपण । निजरूपाचा उगाण । हाट बाळ विसरला ॥ ५३ ॥ ह्मणोनि उगेंचि राहाल । ज्याचा तोचि करितो नवल । यापरि अनुभव ढीलें । कराल क्षणीं ॥ ५४ ॥ आपणा विसरोनि जाणिजे । तें स्वरूप असे समाधिसेजे । शुद्धांश जाणोनि सहजें । वर्तत असे ॥ ५५ ॥ चैतन्य उगेंचि राहे । पाहतां परेपर आहे । परि जीवसंग लाहे । देहभासयोगें ॥ ५६ ॥ परेवरी अशिजे आपणचि एक । आलीकडे देखे अनेक । पश्यंतीचें कौतुक । धरोनियां ॥ ५७ ॥ पश्यंतीवाचे समवेत । हा जीवसंग असे बाधत । कल्पनायोगें व्याकूळ होत । अविद्यायोगें ॥ ५८ ॥ पश्यंतीजवळी चैतन्यासी । बांधी अविद्या मायाविवशी । ह्मणोनियां उपदेशीं । निरसावी ते गा ॥ ५९ ॥ परे आलिकडे रंक । तोचि परेवरी निज ऐश्वर्य मयंक [मयुख ?] उगवें हें कौतुक । योगियांलागीं ॥ ६० ॥ परेखालीं उठे अपेक्षा । परेपर देखिजे निरपेक्षा । म्हणोनि तेथील गा मुमुक्षा ।

---

१ हें परमामृत सेवन केल्यावांचून (कांसया) काय म्हणून [प्रवीण (तत्त्वज्ञानी) म्हणवून घ्यावें मै॰ ब्रा॰ प्र० ६ मं० २५ पहा]. २ मोठ्या शहराच्या बाजारांत लहान बालक प्रसंगानुसार चुकून गेला असतां, तो भांबावून जातो, व त्याला आपल्या घरच्या मार्गाची विस्मृति झाल्यामुळें तो ओक्साबोकशीं रडत असतो. पण प्रौढ मनुष्य त्याच बाजारांत सर्व व्यवहार करून आनंदानें परत घरीं येतो. [हाटीं बाळ भुले स्वगेह विसरे अज्ञान प्राणी तसा । तो हा विस्मृतिनें प्रपंचस्मरणीं शाश्वत् मनाचा ठसा । त्या हाटीं धन मेळवी गृह स्मृतीनें कीं जसा प्रौढ तो । प्रापंचीं विचरे परी मनिं तसा आत्मा स्फुरे सूज्ञ तो ॥ शतश्लोकी, अमलानंद]. ३ अनुभव ढील (आंत बाहेर मोकळा) कराल, म्हणजे अहंकार आणि चिदात्मा या दोहोंचें एकीकरण होईल. हृदयग्रंथीं ढील पडेल अज्ञानाची गांठ सुटेल. ४ चित्सूर्य (चिद्रूप आत्मा).

ध्यावा पैं अनुभव[1] ॥ ६१ ॥ परेखालीं झोंबती त्रिगुण । आणि परेपर सदैव निर्गुण । आहे ऐशी खूण । पाहोनियां पाविजे ॥ ६२ ॥ ऐशिया द्विविधपणा । दृष्टांत सांगतों उगोणा । जैसें वायूचिया गुणा । सारिखें पैं तें ॥ ६३ ॥ सुगंध दुर्गंधालागीं । वायु मिळे त्यांचे अंगीं । उपाधीचिये लागवेगीं[2] । तो तो गुण उठे पैं ॥ ६४ ॥ जे जे विकारीं मिळे वायु । तो तो विकार अधीक समयु । म्हणोनि उभय गुण प्रयु । वायूसि न होती ॥ ६५ ॥ जळाचाही देती दृष्टांत. । अनेक रंगी असे मिळत । परि तो अर्थ त्वरित . तुकासि[3] ये ॥ ६६ ॥ जळ ज्या रंगी मिटे । त्या रंगीं मागुती न निवटे । ऐसें हें या दृष्टांतपेठे[4] । कें येऊं सके ? ॥ ६७ ॥ यदर्थीं कोणीएक । घेईल आशंका निःशंक । प्रतिजळाचा तवंक ॥ रंग हरी ॥ ६८ ॥ ऐशिया[5] दृष्टांतासी । शेषविशेषाची नसे उल्हासी । शेष तोचि विशेषासी । योग्य होय ॥ ६९ ॥ जहीं सुवर्ण

---

१ अनुभव.. २ संबंधपरत्वें. ३ तुलनेस. ४ असें जे हें जल त्याचा दृष्टांत ह्या वायूच्या दृष्टांताच्या पेठेला कसा येऊं शकेल. [एकादा पदार्थ एकाद्या पेठेस मुळींच खपण्याजोगा नसल्यास त्या पेठेस तो माल विकायाला कोणी नेत नाहीं. ह्याच रहस्यानें, वाडीप्रांतीं नेहमीं बोलतांना म्हणतात कीं 'हें बोलणें या पेठेला खपणारनाहीं ' ५ कोणी अशी शंका घेईल कीं जल रंगांत मिश्र होऊन असेपर्यंत (पानी तेरा रंग कैसा, जिसमें मिला वैसा. ह्या हिंदुस्थानी म्हणीप्रमाणें) त्या रंगाचें जें रूप तें त्याला येतें; पण जेव्हां तें प्रतिजलाचा (तवंक=आवेश, ओघ; उर्ध्वगमन करण्याचा ओघ) ओघ ह्मणजे कृत्रिम उष्णतेच्या योगानें वाफरूपानें जेव्हां त्याचें (प्रतिजल) रूपांतर होतें, तेव्हां तरी तें आपल्या मूळधर्मानुरूप (रंग हरी= रंगविकार हरण करतें) रंगविकार रहीत असतें. त्याअर्थीं हा जलाचा दृष्टांतही संभवतो. पण रंगामधून जल निघून गेलें तरी, तन्मीलित रंगानें चित्रित केलेला पट, कार्यरूपानें मागें प्रत्यक्ष उरतोच, आणि त्याअर्थीं त्याचें उपादान कारण जें जल तेंही अव्यक्तरूपानें असतेंच. ६ पण असें ह्मणतात कीं येथें दृष्टांत अधीक सोपपत्तीक किंवा उणा असें पहाण्यामध्यें कांहीं उल्हास नाहीं, ह्मणजे त्या मिथ्या उहापोहामध्यें कांहीं राम नाहीं, कारण जो शेष म्हणजे अग्नि अल्प असतो, तोच विशेष होतो, पक्षीं जो शेष (अव्यक्त बीजरूपानें) असतो तोच विशेष (अनंतत्वाला) शेषत्वाला योग्य होतो हा भाव.

म्हणणें । तहीं काय तें अधीक उणें । कोठेंही स्वधर्मगुणें । ताळ्यासि ये ॥ ७० म्हणोनि हा वायु । कांहींसा दृष्टांत प्रीयु । म्हणोनि हा समयु । बोलणें योग्य ॥ ७१ ॥ तैसें तें परमतत्त्व । उपाधिगुणें ज्याचें महत्त्व । [महत्तत्त्व ?] अविद्ये सुवेद्येंत सत्त्व [स्वत्त्र ?] । दाविते गा ॥ ७२ ॥ अविद्या दावी जीवपण । सुविद्या बोलिजे अध्यातमखूण । ऐसें हें द्विविध विंदाणें । खेळोनिया वेगळें ॥ ७३ ॥ ययावेगळेपणें जो रुतला । तो तत्समान झाला । येर तो नामाथिला । मिथ्याभ्रमें ॥ ७४ ॥ अनुभवावीण दावी वोप । तो अवघाचि जळ्प । म्हणोनी स्वयंप्रकाश दीप । उजळावा ॥ ७५ ॥ जयीं पूर्ण खुणें पावणें । तयीं आपणावीण न दिसे देखणें । ऐसें हें निजसुख शहाणें । जाणावें म्हणे सोहिरादास ॥ ७६ ॥

॥ इति श्रीअद्वयानंदे अनादिस्वरूपयोगो नाम सप्तमप्रकरणं समाप्तं ॥

अष्टम प्रकरण प्रारंभ.

हरिः ॐ नमो अनंतरूपाय । एशियापरी परेपर । असे आत्मस्वरूप निरंतर । म्हणोनि तेथील सार । जाणती साधु ॥ १ ॥ परेपर न गमतां अनुभव । आघवाचि अविद्यासंभव । अभिधान न चुके जीव । कल्पांतींही गा ॥ २ ॥ म्हणोनि देहाचिया अवसराआधीं । जो निरसी विकल्पबुद्धि ।

---

१ याविषयीं प्रारंभींच (प्र० १ लें येथें) ओवी २ वर टीप आहे. २ मायेच्या शुद्धसत्त्वगुणाच्यां उपाधीमुळें ज्याला महत्त्व व (ईश्वरत्त्व) किंवा महत्तत्त्वरूप प्राप्त होतें. ३ सत्त्वगुण किंवा सत्त्वगुणाच्या योगानें आपलेपणा. ४ विज्ञान, कौशल्य, कळसूत्र. ५ स्थिर झाला. (अव्यक्त कूटस्थाशीं ऐक्यत्व पावला). ६ नांवाजला गेला; जीव ह्या नांवाला पोंचला). ७ मुलामा (मृगजळाची झळाळी). ८ मिथ्यास्वप्न भ्रम. (वाडीप्रांतीं स्वप्नास "जळप" असें म्हणतात). ९ पहिली वाचा परा किंवा आद्यशक्ति (पराविद्याहून श्रेष्ठ किंवा पलीकडचा). १० हा नरदेह पतन होण्यापूर्वीं.

तयासी स्वरूपसमाधीं । पहुडणें घडे ॥ ३ ॥ म्हणोनियां तत्त्वाशीं विसावा । ध्यावा उमजोनी स्वयमेवा । मग तेथ या जीवा । दुःख कैंचें ॥ ४ ॥ ऐसें परमामृतनिदान । जयाचिया झालें स्वाधीन । मग तयासी हें बंधन । कोण सांगे ॥ ५ ॥ म्हणोनि हरिजे जयीं देहबुद्धि । तयींच लागे तो समाधी । मग तया सर्व सिद्धी । सहज सांपडती ॥ ६ ॥ सिद्धि कल्पिणें हा अर्थ । घडे तेव्हांचि आघवें व्यर्थ । निर्विकल्पीं सामर्थ्य । ठेविलेंचि असे ॥ ७ ॥ जें परम निर्वाण जाणणें । हेंचि बोलिजे निजखुणें । जेथ मनाचें भ्रमणें । दूर होय ॥ ८ ॥ ऐशिया जीवाचिया बीज । स्थान धरियलें दुजें । सकल कल्पनेचें वोझें । सत्वरजतमीं ठेविलें ॥ ९ ॥ ऐसे हे सत्वरजतम । जयीं पाविजे विश्रांतिधाम । तेथ गुणनाम हे धर्म । हारपोनि जाती ॥ १० ॥ ऐशिया त्रिविध विकारीं । ओळखी घेइजे पुरी । तेथ या जीवाची हारी । हारोनि जाय ॥ ११ ऐक जीवाचिया बीजाचें । अभिधान सांगतों साचें । अर्धनारीनट नाचे । विश्वरंगीं ॥ १२ ॥ ते नारीरूपें पुरुष । जया न लगती जीवदोष । सर्व हारोनियां शेष । उरे तोचि एक ॥ १३ ॥ येथ मेंढा आणि गज । करिती समर्थाचें काज । उभयां आवश्यक निज । एकचि असे ॥ १४ ॥ कीं व्याघ्र आणि गाय । दोघां एकचि माय । पृथ्वी पृथ्वीला खाय । एवढें चोज ॥ १५ ॥ मेंढयाचें काज । करूं न शके तो गज । गजाचेंहि सहज । मेंढयाचेनि न होय ॥ १६ ॥ म्हणोनियां राजयानें । लहान थोर पाळिले समानें । उभयांचेनि निदानें । एकचि तो ॥ १७ ॥ तैसे ब्रह्मादिक सुरवर । कीं औटहात शरीर । दोहींतही तत्त्वविचार ।

---

१ सिद्धींची इच्छा केली कीं सर्व फुकट गेलें हा भाव. २ निर्विकल्प ब्रह्म हें सर्व शक्तीचें आणि सिद्धीचें मूळस्थान असल्यामुळें, तें हातीं आलें म्हणजे सर्व शक्ति किंवा सिद्धि ह्या आपोआप हातीं येतात हा भाव. ३ नामरूप प्राप्त होण्याच्या पूर्वींची विश्वाची बीजभूत अव्याकृत स्थिति, तींत सर्व कार्यकारण शक्तींचा समाहार असतो. जसा वटवृक्षाच्या सूक्ष्म बाजकणांत वटवृक्ष उत्पन्न करण्याची शक्ति असते तसा. ४ अर्धांग स्त्री प्रकृति व अर्धांग पुरुष (शिवशक्ति) एतद्रूपानें नाचणारा सोंगाड्या बहुरूपी. ५ साडेतीन हात देह.

निज निर्मळ एकचि ॥ १८ ॥ म्हणोनि तुम्ही अनादि शिव । विकल्पें होतसां जीव । आपुला आपण उगव । पाहा पां कैसा ॥ १९ ॥ जया उगवा पाहतां । पाहणेंचि निरसे तत्त्वता । समदृष्टीं आनंद तत्त्वता । पावे पैं रोकडा ॥ २० ॥ सकळ घटीं दिसे एक । पूर्ण ज्योति निष्टंक[1] । निज तेज अलौलिक । देखणें घडे ॥ २१ ॥ तेजीं तेज देखोनि । सर्वेचि विसरे निदानीं । परमामृत सेवनीं । संतुष्ट अशिजे ॥ २२ ॥ ऐसें हें बोबडेपण । बोलवी जो आपण । जिव्हाग्रीं बैसिजे निपुण । योगीराज ॥ २३ ॥ एकी एकचि आपण । धरी विनोदाचें कारण । सोहिरादास म्हणे सहजखुण । निरूपिली ज्याहीं ॥ २४ ॥ शके सोळाशें एकाहत्तरें । शुक्लनाम संवत्सरे । मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा सोमवारे । तद्दिनीं ग्रंथ निर्धारें संपला जाण ॥ २५ ॥

इति श्रीअद्वयानंदे सद्सत्स्वरूपयोगोनाम अष्टमप्रकरणं समाप्तं ॥

॥ ग्रंथसमाप्तिर्जाता ॥

---

१ अव्याहत, निश्चयार्थक.

मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा शके १८२८ पराभव नाम संवत्सर, शनवार या दिवशीं हा टीका लेख पूर्ण केला.

ता० १४ मे १९०७ रोजीं महाबळेश्वर मुक्कामीं टीकाशोधन पूर्ण झालें.

२ पूर्णाक्षरी-अक्षयबोध.

१ पूर्णाक्षरी.

प्रकरण १ लें.

(स्वांतःप्रतीतियोग.)

ओंव्या.

ॐ नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरु बाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटियुगधारिणे नमः ॥ १ ॥

---

१ या ग्रंथाचीं पूर्णाक्षरी आणि अक्षयबोध अशीं दोन अंगें आहेत, म्हणून पूर्णाक्षरी ग्रंथास (१) पूर्वानुक्रम देऊन अक्षयबोधास (२) द्वितीयानुक्रमानें जोडलेला आहे. अशा रीतीनें जरी या ग्रंथांची प्रसिद्धि करीत आहों, तरी या उभयविध प्रकरणांचें ऐक्य करून शिरोभागीं त्यास " पूर्णाक्षरी अक्षयबोध " असें एकच संयुक्त नांव दिलेलें आहे त्याचीं कारणें आहेत तीं अशीं:—

सोहिरोबांनीं अक्षयबोध ग्रंथाच्या शेवटीं उपसंहार करून त्यांत स्पष्टपणें काल-निर्णय (व याच ग्रंथांत मात्र) स्थल निर्णयही केलेला आहे. सावंतवाडी शह-रांत हा ग्रंथ लिहिला असें म्हटलें आहे. (अभिधानें स्थल वाडी । ग्रंथ लिहिला आवडी । निजसुखाची वाढी । वाढली पुढें ॥) तसेंच पुढें (इतिश्री अक्षयबोधे । उत्तरार्धे) असें म्हटलें आहे. यावरून या ग्रंथाचा पूर्वार्ध निराळा असलाच पाहिजे असें होतें; परंतु पूर्वार्ध म्हणून उपसंहार केलेला असा भाग मुळींच सांपडत नाहीं. ह्या अक्षयबोध उत्तरार्धाच्या बऱ्याच प्रति सांपडतात. आमचेकडे ह्याच भागाच्या हस्तलिखित चार प्रति आहेत; पण त्या सर्व एका उत्तरार्धाच्याच आहेत. पूर्णा-क्षरी ग्रंथाच्या प्रति तशा बहुत आढळत नाहींत. यावरून अक्षयबोध ग्रंथाचा पूर्वार्ध, त्याच नांवानें (अक्षयबोध या नांवानें) असण्याचा संभव दिसत नाहीं. कदाचित् तो वेगळा कोठें तरी असल्यास सांप्रत तरी त्याचा लाभ आम्हांस घडत नाहीं एवढें खरें. म्हणून सध्यां अनुकूल असलेल्या प्रमाणांवरून त्याविषयीं अनुमान करणें भाग पडत आहे.

श्रीगुरुभ्योनमः ॥ ऐकें शिष्या सावधु । ओळखावे कैसे साधु ।

प्रथमतः पूर्णाक्षरी हाच या ग्रंथाचा पूर्वार्ध आहे, असें अनुमान आम्हीं काढलें आहे त्याचीं कारणें:— सोहिरोबांनीं आपल्या प्रत्येक ग्रंथाच्या आरंभीं (नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये०) हा श्लोक योजिलेला आहे. परंतु अक्षयबोध उत्तरार्धाच्या आरंभीं हा श्लोक योजिलेला आढळत नाहीं, व तो भाग उत्तरार्धच असल्यामुळें तसा नसावयाचाच; परंतु पूर्णाक्षरी ग्रंथाच्या प्रारंभीं मात्र तो श्लोक योजिलेला आहे; पण शेवटीं उपसंहार केलेला नाहीं. या ग्रंथाचीं प्रकरणें नऊ आहेत व अक्षयबोधाचीं आठ आहेत. सोहिरोबांच्या "सिद्धांत संहिता" व "महदनुभवेश्वरी" या दोन्ही ग्रंथांचे अठरा अध्याय आहेत. त्या अनुक्रमानें पाहिलें तर पूर्णाक्षरीचें आणखी एक प्रकरण असावें, व त्याच्या शेवटीं कदाचित 'पूर्वार्ध' म्हणून उल्लेख केलेला असून, अष्टादश प्रकरणात्मक हा ग्रंथ असावा असें परोक्ष अनुमान निघतें. पण अक्षयबोधाच्या प्रारंभीं सांप्रदायानुरूप असणारें नमन नाहीं व पूर्णाक्षरीच्या शेवटीं उपसंहार नाहीं; त्या अर्थीं या उभयविध भागांचीं सत्रा प्रकरणें मिळून हा एकच ग्रंथ असून; पूर्णाक्षरी हाच अक्षयबोधाचा पूर्वार्ध आहे असें प्रत्यक्ष अनुमान निघतें. व पूर्णाक्षरीच्या शेवटीं गुरुवाक्य स्तवन या नवम प्रकरणांत आत्मबोधाचें (अक्षयबोधाचें) पर्यवसान करून सोडिलेलें आहे, तेव्हां पूर्णाक्षरी हाच अक्षयबोधाचा पूर्वार्ध असावा असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

वास्तविक अठरा अठरा अध्यायाचे जे ग्रंथ प्रसिद्ध आहेत, त्यांतील अठराव्या अध्यायांत सतराही अध्यायांतील सार निवडून घेतलेलें असतें. स्वतः सोहिरोबांनीं महदनुभव ग्रंथाच्या अठराव्या अध्यायामध्यें हटलें आहे कीं (सप्तदश प्रसंग । अनुसंधान निःसंग । परि निवटिले चांग एकींएक ॥ २०४ ॥ जैशीं इक्षूचीं पेरें । डोळां भासती विचित्राकारें । परि आंत रसत्व निर्धारें । एकचि कीं ॥ २०५ ॥ तरु उद्यान स्वभावें । तेवीं अध्याय अध्यायातें प्रसवे । तरि एकजात जाणावें । परब्रह्मचि ॥ २०९ ॥ मध्यें विस्तार अनेक । शेवटीं तरी बीज एक । तेंचि रूप मिरवे एकवंक । अष्टादशीं ॥ २१३ ॥) सारांश त्या ग्रंथामध्यें कर्मकांड, उपासनाकांड, ज्ञानकांड, असे विभाग करून तदनुरूप निरनिराळे मार्ग सांगितले आहेत; परंतु या उभयविध ग्रंथाच्या सप्तदश प्रकरणांमध्यें "क्रियारहीत, दुःखसंसर्गानें अलिप्त व परमानंदरूप अशा अक्षर आणि अक्षराच्याही पलीकडे असणाऱ्या केवळ बोधरूप (उत्तमपुरुष) आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचें गुह्यज्ञान आणि विज्ञान हाच काय तो एक विषय प्रतिपादन केलेला आहे. म्हणून तावून सुलाखून शुद्ध केलेल्या सुवर्णाप्रमाणें, या दोन्ही भागांत (९+८= १७) सतराच प्रकरणें निवडलेलीं असावीं असें वाटतें.

त्ये प्रतितीचा हृदयेंसिंधु । मिरवे कैसा ॥ १ ॥ वाढतां उल्हा-

आतां प्रथमतः नऊ प्रकरणात्मक ग्रंथास ' पूर्णाक्षरी असें नांव देण्याचें रहस्य असें असावें कीं:—अष्टदलपद्म (हृत्कमल) त्याहून पर म्हणजे उत्तम असें जें (नवम) त्या हृत्पद्मकमलांतील कर्णिका, त्यांत पूर्णानंदस्वरूप प्रकाशरूप दिव्य परमात्मा स्थित असून क्रीडा करीत असतो. त्या पूर्ण आणि अक्षर ब्रह्माच्या प्रतितीचें स्वरूप या ग्रंथाच्या नऊ प्रकरणांत क्रमाक्रमानें सूचित केलें आहे. अमलानंद योगी शतश्लोकीमध्यें म्हणतात [अष्टाब्जापरपंचवर्णमय त्याहृत्पद्मपीठावरी । पूर्णानंद प्रकाशरूप परमात्मा दिव्य क्रीडा करी । त्याच्या दिव्य प्रभेंतरीं विलसतें हें विश्व कीं तत्वता । लक्षी ईश्वर तो तदात्मकपणें तैं ब्रह्मसायुज्यता ॥ ८५ ॥

या प्रकारचें विज्ञान आणि केवळ शुद्धज्ञान या भागाच्या नऊ प्रकरणांमध्यें दर्शवून त्यास ' पूर्णाक्षरी ' असें नांव दिलें आहे असें वाटतें.

आतां अक्षयबोधामध्यें दशमद्वारस्थित (ब्रह्मरंध्रांतर्गत) पूर्णानंदस्वरूपी सत्यज्ञानानंत प्रत्यग्बोध परमात्म्याचें गुह्य सिद्ध केलें आहे. अमलानंदयोगी शतश्लोकीमध्यें म्हणतात [वाचा पांचहि जेथुनी विकसती तें पूर्णब्रह्म स्वयें । त्याची जे अपरोक्षता अनुभवें ते बोलतों निश्चयें । पिंडीं उत्तम ब्रह्मरंध्र विलसे नीवारअग्रापरी । ठावें वर्म जयासि तो अनुभवी चिद्ब्रह्म बाह्यांतरीं ॥ ५६ ॥ द्वारें जीं विषयात्मकें नवविधा त्याहूनियां उर्ध्व जें । जेथें स्वात्मप्रकाश खूण दशमद्वारीं सभापीठ जें । नेत्रांवीण जगत्प्रकाशक गभस्ती जेविं लक्षेचिना । तैसा ब्रह्मप्रकाश तो अनुभवेना ब्रह्मरंध्राविना ॥ ५७ ॥ एवं जो हृदयाग्र हें श्रुति वदे बालाग्रवत्सूक्ष्म जें । सच्छास्त्रांतरिं ब्रह्मरंध्र दशवें तें द्वार हें बोलिजे । वाचा चारि तनू प्रमाणहि अवस्था तेथुनी उद्भवे । तत्त्वादि स्वर व्यंजनें अजप त्या हृद्बिंदुवीं सांठवे ॥ ५८ ॥] अर्थात्, पूर्वोक्त पूर्णाक्षर ब्रह्म (ॐ) जाणणारास परब्रह्म प्राप्त होतें. सारांश जो अक्षय म्हणजे ज्याला देशतः कालतः व वस्तुतः अंत नाहीं असा आहे, त्या अक्षय आणि अष्टांगबोधरूप आत्म्याचा बोध ह्या अष्टप्रकरणात्मक ग्रंथामध्यें केलेला आहे, म्हणून या ग्रंथास "अक्षयबोध" असें नांव दिलेलें असावें.

१ साधूंना स्वाभाविक जी अंतरप्रतीति (चैतन्यप्रतिबिंबित अंतर्मुख बुद्धिवृत्ति) असते ती प्रतीति येण्यास कारण अहंवृत्ति (विज्ञान) आहे. आचार्यांनीं विवरण नामक ग्रंथांत अहं शब्दाचा अर्थ कूटस्थ असें समजून म्हटलें आहे कीं, बुद्ध्यादिकांपासून विवेचन केलेला जो त्वंपदवाच्य कूटस्थ, त्याला ब्रह्माचीं सत्यत्वादि लक्षणें लागतात, म्हणून कूटस्थच ब्रह्म आहे असें ठरविलें आहे. बुद्ध्यादिकांच्या स्वरूपाचें विवेचन ज्यानें उत्तम केलें तोच तत्त्ववेत्ता आणि तोच मुक्त असा वेदांताचा ठराव आहे. २ त्या अंतर्मुख वृत्तीचा परिणामरूप जो आनंदमय कोश (हृदय अथवा बुद्धिरूप गुहा) त्यांत बिंबभूत असणारा चैतन्यआत्मा ह्याच सिंधु [सागर] होय. प्रजापति आत्मा हा हृदयरूप आहे. ३ " सिंधु "

सांचें अंग । जगचि भासलें तरंग । उठल्या फुटल्या वियोग । नये तोचि साधु ॥ २ ॥ कीं टांकूनि देहाचा वृक्ष । कवळुनी स्वसाक्षीचे पक्ष । उडे जोका अलक्ष । तोचि साधु ॥ ३ ॥ पाहोनि पृथ्वीचा तळवट । तोचि गगनाचा शेवट । चंचळ पवनाचा आट । तोचि साधु ॥ ४ ॥ विरालेपण

म्हणण्याचें कारण असें कीं हृदय हें मनाचें स्थान होय. मन अनेक वृत्तिमान आहे. त्या वृत्ति ह्या लाटा, समुद्रावर भासल्या तो चैतन्यसमुद्र ह्मणजे हृदयांतर्गत पुरुष.

१ " अहंब्रह्मास्मि " स्फूर्तिरूप अंग. सोहिरोबांनीं अन्यत्र (ऐसा असला तरीच साधु ह्मणों आह्मीं त्याला ॥ या पदांत) ह्मटलें आहे कीं:—" सृष्टि कीं अवतार ज्याला तरंगाप्रमाणें । ते ते ठायीं जाईना तो कीं मुळिंचें जळ जाणे । व्यापक ज्याचें मनचि गगना नाहीं येणें जाणें ॥ "सर्व पद जिज्ञासूंनीं मुळांत पहावें. तसेंच श्रीरंगनाथ स्वामी ह्मणतात [चित् उदधि निजरंग । भासे जगदाकार तरंग.] २ व्यष्टि समष्टि स्थूल सूक्ष्म देहात्मक (मायाकल्पित) प्रपंच हाच (अश्वत्थ) वृक्ष. ३ ॐकार हा साक्षी कारण ॐ हें अक्षरब्रह्म होय असें मांडुक्योपनिषदांत प्रथमच सांगितलें आहे. हा ॐ हंस पक्षी होय. त्याचा अकार हा उजवा पंख, उकार हा डावा पंख, व मकार हें पुच्छ किंवा पिसारा, आणि अर्धमात्रा हें शिर होय असें नादबिंदु उपनिषद ह्मणतें. ॥ ॐ ॥ अकारो दक्षिणः पक्ष उकारस्तूत्तरःस्मृतः ॥ मकारस्तस्य पुच्छं वा अर्धमात्रा शिरस्तथा ॥ १ ॥ या पंखाच्या योगानें अलक्ष्य ह्मणजे निर्गुण ब्रह्माकडे ऊर्ध्वगमन करितो, सारांश ॐकाराच्या उपासनेनें स्वस्वरूपाचा अनुभव घेतो हा भावार्थ. ४ कल्पनेमुळें विविध स्थावरजंगमात्मक पदार्थांचें नामरूप व्यक्त होतें. पण सुषुप्तिकालीं कल्पनेचा लय झाला ह्मणजे नामरूपाचा लोप होतो. अर्थात् नामरूप विसरून जातें आणि केवल शून्यस्थिति असते, परंतु त्या शून्य स्थितींत साक्षी हा नसतो, ह्मणून, अत्यंत अभाव नसतो यास्तव विरालेपण=शून्य ह्मणजे " असत् " कांहीं नाहीं हे ' शब्द कानानीं ' ऐकत सुद्धां नाहीं. येथें शून्य वादी बौद्धांचें खंडण केलें. तसेंच असले पण ह्मणजे नामरूपानें प्रकट होणारें जग हें खरें असें डोळ्यांनीं पहात नाहीं ह्मणजे जगाचें असले पण (अस्तित्व) पहात नाहीं. येथें जग हें सत्य आहे असें मानणाऱ्या सांख्याचें खंडण करून कल्पनेनें हें सारें भासतें ह्मणून विवर्तवादाचें मंडण केलें; व आपण कल्पनातीत होतो व स्वस्वरूपाचा अनुभव घेतो. याचविषयीं बावा महाराज ह्मणतात ॥ पाहतां विचारूनि मूळीं एकतें अधिष्ठान । विवर्ता ठाव कैंचा जो सकला याचि निदान ॥ चाल ॥ होतांचि त्रिपुटिग्रास ॥ आपण सकलहि भासे ॥ जेव्हां हें स्फुरण निमालें ॥ २ ॥ निजरूप विस्मरण झालें ॥ ह्मणूनि जग भासा आलें ॥ ३ ॥

नायके कानीं । कीं असलेपण न देखे लोचनीं । कल्पनेचिया मोचनीं । असे तोचि साधु ॥ ५ ॥ नेणें कवणाचाहि त्याग । कीं हा न म्हणोचि भोग । अखंड भोगी राजयोग । तोचि साधु ॥ ६ ॥ बोलोनि[1] असे मौन्यीं [मौनी ?] । निवास करितसे शून्यीं । आलिंगोनि चैतन्यीं । राहे तोचि साधु ॥ ७ ॥ चालतां प्रवृत्तिप्रवाह । अणू न पडे जया संदेह । जाणे परब्रह्म विदेहें[2] । तोचि साधु ॥ ८ ॥ मनाचें[3] मुद्दल मुरे । संशयाचें वीख उतरे । मग अवीटपणें उरे । तोचि साधु ॥ ९ ॥ संकल्प सन्निपात जाये । मुद्दल तोचि तो आहे । ऐसा ज्ञानप्रवाह वाहे । तोचि साधु ॥ १० ॥ न सोडितां मूळिचें एक । विनोदेंचि देखे अनेक । जगबुद्बुदाचें जाहला उदक । तोचि साधु ॥ ११ ॥ दृश्यपटल हरोनि सरे । मग निखिल एकसरांचि उरे । आकाशचि निर्धार धरे । तोचि साधु ॥ १२ ॥ न सोडितां आपुला मूळाधारू[4] । आणि अनेक नवळांचा मोहरू[5] । आपुलिया अंगांचा[6] तरुवरू । तोचि साधु ॥ १३ ॥

---

१ बोलण्याची क्रिया स्थूल सृष्टींत वागिंद्रियानें होते. आणि त्या क्रियेस स्फूर्ति देणारा जीवात्मा हा कूटस्थ ह्मणजे स्वतः निर्विकार असल्यामुळें मौनी=मुकाच आहे. पण त्याच्या शक्तीनेंच बोलण्याचें कार्य होतें. २ स्थूल, सूक्ष्म, कारणादि देहधर्मरहीत. ३ मनाचें मुद्दल=मूळ (साधनद्रव्य) ह्मणजे बुद्धि विज्ञान अंतःकरणाचे भाग दोन. एक अहंवृत्ति आणि दुसरी इदंवृत्ति. अहंवृत्ति हें विज्ञान आणि इदंवृत्ति हें मन. मीपणाचा प्रत्यय आल्यावांचून बाहेरचें जग कदापी समजणार नाहीं, ह्मणून इदंवृत्तीचें बीज अहंवृत्तींत आहे. अर्थात् अहंवृत्ति मुरल्यावर इदंवृत्तीचाही लय झाला हा भाव. ४ या ओवींत " जागृत्स्वप्नसुषुप्तीमध्यें भासणारा जो प्रपंचरूप अश्वत्थवृक्ष तो आपला (जीवाचा) मूळाधारू न सोडितां ह्मणजे त्या ठिकाणींच (ध्रुव, अमृत) स्थिर होऊन. ५ अनेक नामरूपात्मक विश्वाकार रूपानें मोहरलेला किंवा अभिमुख ह्मणजे उलटा विस्तार पावलेला. ६ कल्पित जड प्रकृतीचें अंग तें पुरुषाचें अंग आहे. ह्मणजे मायादि सर्व (प्रपंच=तरुवर, अश्वत्थ.) जग कल्पीत असल्यामुळें अधिष्ठान ब्रह्मचैतन्याच्या सत्तेनेंच मांडिलें आहे [जया प्रियेचें जें अंग । जो प्रियु जियेचें चांग ॥ अमृतानुभव ज्ञानेश्वर.] " आलिया आंगाचा" असा अन्यपाठ आहे; त्याचें रहस्य हेंच कीं प्रकृतीच्या स्वभावामुळें जें जें अंग प्राप्त होईल (पानें, फुलें, फळें, मोहोर इत्यादि अंगें कालमानाप्रमाणे जसजशीं प्राप्त होतील) त्या त्या अंगाचा तरुवरू.

विश्वचित्राचा पट एक । कीं अनेक अलंकारींचें कनक । विविध कुमुदांचा मयूख[1] [मयंक ?] । असे तोचि साधु ॥ १४ ॥ पडतां चित्सूर्याचा उजाळ । [2]उद्बोध उदयो केवळ । ज [ज्या ?] हीं विकासे हृदयकमळ । जयाचें तोचि साधु ॥ १५ ॥ ऐसा आपणापें [3]रंजे । त्रिऽर्थ[4] घेइजे सोऽहं बीजें । सदां स्वयंभ[5] निजे । तोचि साधु ॥ १६ ॥ मग आपणचि एक ऐसा । बोध जयाचा कुंवा[6] [हा ?] सा [गुहासा ?] । तो ज्ञानियांचिया (ज्ञानाचिया ?) कळसा । रूप होय ॥ १७ ॥ कवण जाणे तयाची गती । हे स्वानुभूति जया वोळंगती[9] । सकळ योजिली मति[10] । हाता चढे ॥ १८ ॥ कैसा सुकाळ तयालागीं । आनंद अवतरला आंगीं । जयाची फिटली [11]पांगी । इंद्रियांची ॥ १९ ॥ जडत्व[12]-पणही न लेखी । देहाचिया [13]दुःखें न दुःखी । जग देखोनि सदां सुखी ।

---

१ सूर्यविकासी किंवा चंद्रविकासी कमळें. मयूख=सूर्य व मयंक=चंद्र. २ ज्ञानाची पहांट, ज्ञानस्वरूप जागृति. ३ आपणामध्येंच सुख पावतो; रिझे. ४ नाश, निवृत्ति. (जागृत्स्वप्नसुषुप्त्यादि अवस्थांमध्यें आपणच आपल्यामध्यें सुख पावतो. व त्या सुखाचा (विलय) प्रत्याहार सोऽहंबीजें घेतो, असा भाव.) ५ मूळ शांभवी अथवा उन्मनि अवस्थेंत [निर्विकल्पसमाधींत] सदोदित निजलेला असतो [बृ० अ० २ ब्रा० १ मं० १९ पहा.] ६ कुवसा=आश्रयित केलेला [पूर्ण बोधानें ज्याचा आश्रय केला आहे असा). कुवासा=हिंदुस्थानीमध्यें कुवा ह्मणजे विहीर. पूर्णजलानें (आश्रयित केलेली) भरलेली विहीर, त्या जलाचा सांठा जसा आपणामध्यें सांठवून घेते; तसा ज्यानें आपल्या बुद्धिरूप कुव्यामध्यें बोध सांठविला. तुकोबा ह्मणतात [सांठविला हरी । जिहीं हृदय मंदिरीं ॥ १ ॥ त्याची चुकली येरजार । झाला सफल व्यापार ॥ २ ॥] गुहासा=गुहेच्याच आकारासारखा ह्मणजे अणूंत अणू व मोठ्यांत मोठा असा. गुहा=बुद्धिरूप गुहा. ७ ज्ञानाचा अति उच्च परिणाम ह्मणजे कूटस्थरूप होणें. ८ स्वात्मानुभवकळा, ज्ञानशक्ति (स्वस्वरूपाचा अनुभव देणारी अर्धमात्रा) ९ ज्याचा पूर्णपणें, आश्रय करून राहिली. १० त्याची स्थिरबुद्धि (प्रज्ञा) जी जी इच्छा करील ती ती त्याला सहज प्राप्त होईल. [मुं० उ० मुं० ३ खं० १ मं० १०, खं० २ तैत्तिरीय उ० ब्रह्मानंदवल्ली २ अ० १ हीं पहा.] ११ ओशाळगतपणा, इंद्रियाधीन होऊन राहणें. १२ स्थूलशरीरसंबंधीं जडधर्म. १३ त्या शरिरास दुःख झालें असतां आपण दुःखी होत नाहीं. कारण आपण निर्विकार साक्षी आहें. असा त्याचा अनुभव सिद्ध आहे.

असे तोचि साधु ॥ २० ॥ आपुलिया वेषा न भुले । अंतर जाणूनि आपुलें । देखे जगचि निर्जीव बाहुलें । तोचि साधु ॥ २१ ॥ नित्य निरंजनीं वसत । सर्वकाळ असे शांत [संत?] । स्वानुभववनाचा वसंत । तोचि साधु ॥ २२ ॥ सर्वत्र हा आत्माराम । देखोनि अंतरीं पावला आराम । असे निःसंग निष्काम । तोचि साधु ॥ २३ ॥ मिथ्याचि भाविला आकार । गणणें[1] नाणीच विकार । अखंड असे निराकार । तोचि साधु ॥ २४ ॥ नाना भुलीचे रीतिये[2] । मन हारवीच मावळों जाये । उरली गति भोगिताहे । तोचि साधु. ॥ २५ ॥ इंद्रियें करितीं पाइकी[3] । परि जाणीव[4] न घेचि नाय [इ?] की[5] । उखिविखी[6] विनायकीं[7] । मिळाली जे ॥ २६ ॥ देह–वृक्ष[8]–समत्वाचें अंग । टांकूनि गुणाचा

---

१ राग, द्वेष, सुखदुःखादि विकारांची लेखा=गणना, पर्वा करित नाहीं. २ अविद्या हीच रात्र, वास्तविक जागृतीचा अनुभव बरा म्हणून जो वाटतो, तो केवळ अविद्याच होय. परंतु जागृतींत सर्व बाह्य पदार्थांचें ज्ञान मनाचे योगानें होतें, म्हणून मन हें त्यास प्रकाशित करणारा सूर्य होय. पण तें मन सुषुप्तींत मावळतें म्हणून मनरूपी सूर्याचा अस्त होतो, त्या वेळीं केवळ कूटस्थ साक्षी उरतो, त्याचा अनुभव तुरीयावस्थेंत जो घेतो तोच साधु. ३ नोकरी, शिपायगिरी. ४ स्वरूपज्ञान. ५ पुढारीपणा, कर्तृत्वाचा अभिमान; अज्ञानी माणूस प्रकृतीच्या गुणामुळें घडणाऱ्या कार्यांचा कर्ता आपण असें मानतो, पण तत्त्ववेत्ता ज्ञानी अभिमानाच्या जाळ्यांत सांपडत नाहीं. हेंच श्रीकृष्णानीं अर्जुनास सांगितलें ! प्रकृतेः क्रियमाणानि गुणैःकर्माणि सर्वशः॥ अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमितिमन्यते ॥ तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ॥ गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥ अ० ३ श्लोक २७।२८. ६ घडामोड. ७ ब्रह्मांडाचा मूलाधार आणि पिंडाच्या मूलाधारचक्राच्या ठायीं रहाणारा गणपति म्हणजे ॐस्वरूप ईश्वर; त्याचे ठायीं सर्व प्रकारच्या कर्तृत्वाचा आरोप मात्र होतो; म्हणून साधु आपण स्वतः कर्तृत्वाचा अभिमान बाळगित नाहीं. ८ चंदनवृक्ष आणि देह यांचें साम्य दर्शवून कैवल्यस्थितीचें वर्णन थोडक्यांत सांगतात. चंदनवृक्ष हा इतर वृक्षांप्रमाणेंच शाखा, डहाळ्या, पानें वगैरे यांनीं युक्त आहे, तेव्हां वृक्ष या दृष्टीनें चंदन आणि इतर वृक्ष यांत भेद नाहीं; तथापि त्यांत सुगंध हा एक विशेष आहे, तो वृक्षाचे शाखापल्लवादि गुणांहून भिन्न आहे. म्हणून सर्प हे वृक्षत्वादि गुणांचा त्याग करून त्याहून भिन्न म्हणून निर्गुण अशा केवळ चंदनाचा आश्रय करितात; त्याचप्रमाणें प्रकृतीच्या तीन गुणामुळें बनलेल्या देहांचा संग टाकून त्या गुणाची साम्यावस्था जो आनंदमय कोश त्या आनंदमय कोशांतील निर्गुण जो आनंदस्वरूप आत्मा त्याचा आश्रय करितो हा भाव.

संग । निर्गुण चंदनीं बैसे उरग । तोचि साधु ॥ २७ ॥ कीं जाहलिया प्रकृतीचे [पुरुषाचे?] गुणदोष । भुलों नेदी [नेणता?] देहाचा [पुरुषाचा?] वेष । संकोचन होतां पावे संतोष । तोचि साधु ॥ २८ ॥ कीं अद्वयाब्जिनी विकास परम । निवालिया आमोदाचें प्रेम । तेवीं आलिंगोनि असे सौरंगम । तोचि साधु ॥ २९ ॥ सोहं गुळाचिया अमुका । प्राप्तीचिया परिपाका । तेथ सुखावे पीपीलिका । तोचि साधु ॥ ३० ॥ कीं ब्रह्मोपदेशाचिये प्रौढी । सविवेक आमिषाची उंडी ।

---

१ याप्रमाणें जो प्रकृतीचें स्वरूप जाणतो, तो देहामध्यें राहून जरी देही बनला तरी प्रकृतीच्या गुणामुळें बनलेला जो देह तो एक वेष आहे असें ओळखतो, व त्यामुळें देहाच्या अभिमानास भुलून आपलें ब्रह्मस्वरूप विसरत नाहीं. ज्याप्रमाणें नाटकांत स्त्रीचें (प्रकृतीचें) सोंग घेणारा जो पुरुष आहे तो वरकरणीपणानें त्या स्त्रीवेषाची योग्य बतावणी करूनही, आपण पुरुष आहों हें विसरत नाहीं. अर्थात् तो स्त्री-वेष त्याला भूलूं देत नाहीं. [भ० द्गी० अ० ९ श्लोक ९ व अ० १३ श्लो० २९।३०।३१।३२ पहा.] " जाहालिया पुरुषाचे गुणदोष " असा अन्य पाठ आहे. त्याचें रहस्य असें असावें कीं:—जो पुरुष 'क्षर' रूपानें जाहलासा भासला [भ० द्गी० अ० १५ श्लो० १६ पहा.] त्यालाच काय ते गुणदोष लागू आहेत. पण त्या गुणदोषयुक्त देहरूपी वेषास न भुलतां, वरकरणी अर्ध-नारीनटेश्वराचा वेष घेणाऱ्या बहुरूप्याप्रमाणें बतावणी करून आपला जो खरा पुरुष देह, (अक्षर पुरुषरूप) त्या विषयीं विस्मरण पावत नाहीं. त्या 'क्षर' पुरुषवेषाचा तात्पूर्ता, आश्रय केला तरी त्यांत संकोच न पावतां, [सर्वव्यापी ब्रह्मस्व-रूप असतां देहांत राहून देहाचा अभिमान बाळगणें अर्थात " मी " ह्मणजे स्थूल शरीर असा अभिमान बाळगणें ह्मणजे संकुचित होणें तसा संकोच न पावतां] आपणाला भुलूं देत नाहीं. व ह्या सोंगाची आपण उत्तम बतावणी केली ह्मणून तो (अक्षर पुरुष) आपणामध्येंच संतोष पावतो. २ पराशक्ति (विद्या) हीच कमलिनी. ३ भ्रमर (चैतन्य आत्मा). ४ सोहं ह्मणजे आपलें मूळचें आनंदमय ईशस्वरूप हेंच कोणी एक गूळ. तें अमुकच आहे व अमूक ठिकाणीं आहे असें जाणून. ५ पूर्णावस्थेला ब्रह्मरूपतेला. ६ मुंगी [मुंगी गुळाची गोडी जाणून प्रयत्नानें त्याची प्राप्ति करून घेते. सोहि-रोबांनीं " तसा तूं भज रे आपुल्या मुळाला " या पदांत ह्मटलें आहे कीं,—' न दावितां गोडी, गुंतुनियां चाडी, शोधूनि काढी, जशि मुंगी गुळाला ' तिच्या योगानें ह्मणजे, ' पिपीलिका मार्गानें जाऊन, जो ' सोहं ' गुळाची गोडी घेतो तोच साधु.

कवळी निश्चयाच्या तोंडीं । तोचि साधु ॥ ३१ ॥ कीं आकार मृत्तिका हेरळ । निबिडे न्याहाळिता प्रेम [मा ?]ळ । जो तत्वार्थी पायाळ । असे तोचि साधु ॥ ३२ ॥ न मोडितां आदि (धि ?) कौंकण । दृश्य तें अन्हेरी तृण । अंतींहि निश्चयें आपण । असे तोचि साधु ॥ ३३ ॥ जो भ्रांतिसंहरणीं रुद्र । कीं शांतिसुखसमुद्र । अद्वयकमुदिनी चंद्र । तोचि साधु ॥ ३४ ॥ जो दिव्य उदकींचा व्योम । नगीं लोपतें हेम । झाला निखिल आत्माराम । तोचि साधु ॥ ३५ ॥ दृश्य घटींची मृत्तिका । संसारतमाची दीपिका । कीं सनातन [संतान ?] वनवाटिका । तोचि साधु ॥ ३६ ॥ जो अक्षय भुवनींचा भूप । कवणीं न लाविला [ता ?] दीपं । विवेकवनाचें रूप । असे तोचि साधु ॥ ३७ ॥ जो सर्त्रीवींचें प्राशन । विवेकाचें चुंबन । वैराग्यकर्दळी कर्पूरवन । तोचि साधु ॥ ३८ ॥ जो अलभ्याचा लाभ । विवेकतरूचा कोंभ । समाधिवनितेचा वल्लभं । तोचि साधु ॥ ३९ ॥ जो विकल्पकुंभं विदारीत । मदनमद भयाचा नाथ । अलक्ष केसरी अद्भुत । तोचि साधु ॥ ४० ॥ जो उपेक्षी विषयमांस । मुक्तकळेचा प्रेमरस । शान्ति [संत ?] सरोवरींचा हंस । तोचि साधु ॥ ४१ ॥ जो उन्मनि मादिकेचा [मादिकेचा ?] मृग । कीं विरक्तिमदाचा भृंग । जाहलियेपणाचा आटींव रंगें । तोचि साधु ॥ ४२ ॥ जो अर्धमातृकेचा स्वादु ।

---

१ खडा. २ दाट अंधःकार. ३ पायांकडून जन्मलेला. अशा माणसाच्या डोळयांत अंजन घातलें असतां गुप्त धन दिसतें, दिव्यदृष्टि प्राप्त होते, असें ह्मणतात. त्याच अर्थानें ह्मणतात गुप्तनिधि जें आत्मस्वरूप तें पाहण्यास पायाळासारखा समर्थ. ४ बीजभूत अव्यक्त कण (ॐकार). ५ चंद्रविकासी कमलिनी. ६ तेजोमय आत्मा हेंच उदक (जलाकाश) त्यांत प्रतिबिंबित होणारें व्योम ह्मणजे महदाकाश. ७ स्वयंज्योतिपुरुष. ८ शक्ति, अर्धमात्रा, ज्ञानकळा, अमृतसंजीवनी. ९ नाथ, नवरा. १० (हत्तीचीं) गंडस्थळें ११ उन्मनिरूप मृगीचा (मादी हरिणीचा) नर मृग. १२ नामरूपात्मक चराचररूप अलंकार; हेंच अनेक नगरूपाचें जाहालेंपण, विरूढणें (नगरूप पावणें.) रंगनाथांनीं ह्मटलें आहे कीं, [चिद्विलास जग नग हेमीं, वस्तुत्वें भेदातित रे । अस्तिभातिप्रीयरूप आत्मा, तो नामरूपाविरहित रे ॥] १३ ते सर्व अलंकार आटून (नामरूप नष्ट होऊन, तावून सुलाखून) शुद्ध सत्व

सेविता होय बिंदु । सैंधव मन [मानें ?] विराला सिंधु । तोचि साधु ॥ ॥ ४३ ॥ जो ज्ञानगंगेचें मज्जन । सज्जनमनरंजन । असे अलॅख निरंजन । तोचि साधु ॥ ४४ ॥ निर्विकार निराकार । निराधार निरूपचार । मोडे अवस्थात्रयप्रकार[1] । तोचि साधु ॥ ४५ ॥ षट्चक्रसोपानें[2] ओलांडी । अपान वरौता ओढी । मग ऊर्ध्वीं[3] घेईजे गोडी । तोचि[4] [हि ?] साधु ॥ ४६ ॥ मनपवनाची वारी सरे । ब्रह्मरंध्रीं मन मुरे । मग भोगितसे जें कां उरे । तोचि [हि ?] साधु ॥ ४७ ॥ इडा पिंगला सुषुम्ना । आणी मध्यमें आंत प्राणा । मग भोगी संकेतींच्या खुणा । तोचि [हि ?] साधु ॥ ४८ ॥ इंद्रियां मान नेदी । आशा तृष्णा वैरें शोधी । रिघे ककाराचे पाणंदीं । तोचि [हि ?] साधु ॥ ४९ ॥ अभ्यास वारुवा पाठीं वळघे । पवन [ना ?] हातीं चाबूक घे । मग दशवे द्वारीं रिघे । तोचि [हि ?] साधु ॥ ५० ॥ इंद्रियांचे न करी लळे । तयांआत न खेळे । धारणाद्वारीं [दोरीं ?] झुंपी डोळे । तोचि [हि ?] साधु ॥ ५१ ॥ आतां नलगे तयां कँडसावें । अधिकारी जाणती स्वभावें । कवणा काय

केल्यावर जो साहजिक मूळचा शुद्ध सुवर्ण रंग, किंवा शुद्ध सत्व शुभ्र (रंग) वर्ण. त्याप्रमाणें जो केवळ शुद्धसत्त्व होऊन असतो तोच साधु.

१ जागृती, स्वप्न, सुषुप्ति ह्या तीन अवस्थांचे तीन प्रकार. २ योगशास्त्रोक्त सहा चक्रें (सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका पहा.) हींच सोपानें ह्मणजे पायऱ्या. ३ सहस्रदळचक्रांत. ४ येथपासून " तोहि साधु " असा अन्य पाठ आढळतो. त्याचें रहस्य हेंच असावें कीं:—या पूर्वी राजयोगाच्या सिद्धीचीं लक्षणें सांगितलीं, व आतां पुढें हठयोगाच्या सिद्धीचीं लक्षणें दर्शविलीं आहेत असें वाटतें. ५ याविषयीं (ज्ञानेश्वरी अ० ६ ओं० १८६ ती ३०० पहा.) ६ सुषुम्ना मार्गामध्यें ७ योगाभ्यास हाच वारू (घोडा) ८ ब्रह्मद्वारचक्रामध्यें (ललाटोर्ध्व भाग). ९ धारणा हें योगाचें षष्ठांग होय. त्याच्या द्वारीं=भ्रमध्यभागीं [भ० ज्ञी० अ० ८ श्लो० ९।१०।१२ पहा] किंवा धारणा हाच दोर (रज्जू) त्यानें नेत्र झुंपतो (दृष्टि स्थिर करितो) असा भाव. [पातञ्जल यो० शा० अ० पु० विभूति पादः ३ पृ० ९३ ती १०४ पहा.] १० कसास लावणें.

शिकवावें । नलगे येथ ॥ ५२ ॥ गुळें न बोलवितां मुंगी । पराग नुमे-सतांचि भृंगी । धांवे वासना विषयापांगीं । न पढतां जैशी ॥ ५३ ॥ प्राणियां न प्रार्थितां मन । कीं पक्षिया न बोलावी गगन । आदर न करीच वन । मृगां जैसें ॥ ५४ ॥ कीं चंदन भुजंगा । कीं धन चोरव्यां मागा । न पडे बोलावणें योगा । हटियांसि कीं ॥ ५५ ॥ इंधनें आगी । विरतीसि [विरक्तीसी ?] वीतरागी । न पाचारीच रोगी । औषध जैसें ॥ ५६ ॥ अन्न प्राणियां । कीं उद्योग वाणियां । कीं न बोलाविती का-हाणिया । बेकारियां ॥ ५७ ॥ तेवीं जयाचा अधिकार । तो रिघों पाहे तेंचि घर । येथ उद्देशा होय आकार । विनोदच कीं ॥ ५८ ॥ जो निपजला जया भागा । तो भोगी तेंच कीं गा । येथ सत्ता एक जगा । प्रभुचीच कीं ॥ ५९ ॥ येथें गुणत्रयाची त्रिपुटि । नांदे दिसलिया घटीं । तयाँ अंतातीत दिठी । ते अनाँरिसी कीं ॥ ६० ॥ जो अविनाशभागा आला । तो तयाचि जोगा झाला । येर वायां भ्रमोनि गेला । लटिकियां वरी ॥ ६१ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने सतांतःप्रतीतियोगोनाम प्रथमप्रकरणं समाप्तं ॥ १ ॥

---

१ न समजतां, न उमजतां. २ हठयोग्याला. ३ विषयत्यागबुद्धि ४ वैराग्यशील, ५ बेरोजगारी, निरुद्योगी, आळशी अशाला. ६ त्या त्रिपुटीच्या अंतापलीकडची दृष्टि (आत्मदृष्टि). ७ ती वेगळीच आहे. ८ मिथ्या मृगजळावर.

प्रकरण २ रें.

(अज्ञानलक्षणनिरूपण.)

श्री आद्यरूपायनमः ॥ चळतें काय ह्मणोनि पाहूं । तरि आमुचे आम्ही काहींच नहूं । मुकेचि पडों मुहुर्मुहुः । आजि येथ ॥ १ ॥ न चळतांचि दिसे । तें जाणावें भ्रमाचें पिसें । अवधारिजे अनारिसें । बुझावू तें ॥२॥ आकाश असे आकाशीं । परि मुखीं पडलिया गुंते मासी । ते उपाधि मेदिनीसरिसी* । राहूं आली ॥ ३ ॥ आंत पवना सहजीं सहज हिंडणें । तो गुंतोनि ठेला प्राणपणें । अधउर्ध्वे वाहणें । करितो कीं हें ॥ ४ ॥ रविचंद्राचा प्रकाश । बिंबों आला मनबुद्धीस । पवनाआंत डोळियांस [शा?] । विराजला ॥ ५ ॥ उदकाचा आर्द्रधर्म । तेथ चित्त ऐसा उपक्रम । वागवू लागलें वर्म । आठवाचें ॥ ६ ॥ पृथ्वी जडत्वा विस [सा ?] वली । म्हणोनि अहं ऐशी हे बोली । एवं पंच तत्त्वें भासलीं । प्रतिबिंबीं ॥ ७ ॥ ऐसा भुलीचा तरू मोहरला । तो देखोनि संतोष जाहला । म्हणोनि नाम पावला । अज्ञान ऐसा ॥ ८ ॥ देखोनि देहाची बाहुली । बावुगी पोटाळी सावुली । म्हणोनि सद्गुरुपावुलीं । विसावा ने घे ॥ ९ ॥ ऐसें या अज्ञानाचें रूप । अवधारिजे वोपें । लटिके प्रजेचा भूप । मिरवे कैसा ॥ १० ॥ आपण कवण हा नेणें । लक्षूनि देहाचें ठाणें । विकारांचें गाऱ्हाणें । सोसीत बैसे ॥ ११ ॥ देहावरी फार आदर । कीं विषयीं बहु भर ।

---

१ आपल्या देहामध्यें जें कांहीं चलनवलन पावतें, श्वासोच्छवास करितें, डोळे झांकणें उघडणें इत्यादि क्रिया करितें तें काय, ह्मणून जेव्हां आपण पाहू तेव्हां [मुंडकोपनिषत् मु० २ खं० २ श्लो० १ व २ हे जिज्ञासूंनीं अवश्य पहावे.] २ वारंवार. ३ जडशरीर (अन्नमय स्थूलदेह). ४ समजाऊन देऊं. ५ अध=पिंडांत व ऊर्ध्व=ब्रह्मांडांत, किंवा वर खालीं श्वासोच्छवास. ६ अभिमुख (उलटा विस्तार पावलेला) होऊन विरूढला किंवा मोहरास आला. ७ मुलामा. * पृथ्वीजवळ. वाडीप्रांतीं " सरशीं " ह्मणजे जवळ याअर्थी शब्द वापरतात.

इंद्रियांचें द्वार । न सोडी कदां ॥ १२ ॥ ईश्वरसत्तेचिया नवळा । इंद्रियें वर्तंति आवुलाला । माझींच म्हणे [णवी ?] हवाला । तोचि मूर्ख ॥ १३ ॥ कीं प्रवृत्तिपेणां आपणियां । नाना विषयांचिया खाणियां । तेथ भुलोनि पडे प्राणिया । तोचि मूर्ख ॥१४॥ प्रवृत्तिमार्गे पेठे [पैठे ?] । जाती विषयसेवना चांटें । तेथ वासनारूपें चोरटें । होउनि [येउनि ?] लुटी ॥१५॥ कीं स्थूल देहाचें आमिष । देखोनियां विषयमांस । तेथ रुतोनि असे वायस । अज्ञान तो ॥ १६ ॥ नाना नादलीलेचें अंग । ऐकोनियां सवेग । भुलतां निमे कुरंग अज्ञान तो ॥ १७ ॥ ना त्वचा हेचि मदिणी । स्पर्शविषयाचिये तोषणीं । मदरूपें भोगिजे हाणी । तोचि मूर्ख ॥ १८ ॥ नाना रूपाची दीपकळी । हेतूचिये दिठीं न्याहाळी । पतंगरूपें आपणां जाळी । तोचि मूर्ख ॥ १९ ॥ ना तरि रस आमिषाची उंडी । कवळी जिव्हेचिया तोंडीं । मीन जैसा वाडपडीं । अज्ञान तो ॥ २० ॥ घ्राण हेंचि कल्हार । गंध विषयाचा आमोद फार । तेथ जीव गुंते भ्रमर । अज्ञान तो ॥ २१ ॥ नाना विकारकर्दम । संसारवृक्षींचा विहंगम । विषयफळीं [फळाचा ?] सकाम । तोचि मूर्ख ॥ २२ ॥ जो संकल्पाचा ग्राम । विकल्पतरूची

---

१ जननद्वार (जन्मद्वार, जननेंद्रिय.), इंद्रिययुक्त देह प्रतिजन्मीं ज्या द्वारानें बाहेर येतो, तेंच द्वार पुनः यौवनावस्थेंत भोगण्याचा प्रयत्न करितो, व शेवटीं जीर्ण होऊन आला तसा जातो. किंवा इंद्रियांच्या द्वारें विषयभोग घेण्याची संवय सोडीत नाहीं. इंद्रियांमध्येंच गुंतून रहातो. २ आपआपल्या व्यापारानुसार ३ एकाद्या मनुष्याची कांहींएक वस्तु दुसऱ्या मनुष्याकडे ठेवण्यास दिलेली, ती ठेवणारानें एका त्रयस्थ मनुष्यास द्यावी असा हवाला देऊन, त्या उभयतांची रुजवात केल्यावर ती वस्तु त्या त्रयस्थांची ठरली असें असतां, ज्याचे हातीं सध्यां ती हवाला दिलेली वस्तु आहे, ती तो आपलीच असें ह्मणेल तर तो मूर्खच समजावयाचा. असें ह्मणण्याचा हेतु [भगवद्गीता अ० ३ श्लो० २७ पहा.] ४ प्रवृत्तीच्या ठिकाणीं थोडा वेळ केलेल्या मुक्कामास. [मुक्काम करणें या ऐवजीं 'पेणें' हा शब्द वाईप्रांतीं वापरतात.] ५ लालचीमुळें ६ मृग, हरीण ७ हत्तीण ८ कमळ.

भूमि निर्गमें[1] । अनिरूप्य[2] विषयीं अधम । तोचि मूर्ख ॥ २३ ॥ निष्ठुरतेचा आगर । कीं द्वेषलहरींचा सागर । अलौकिकींचा[3] नागर[4] । अज्ञान तो ॥ २४ ॥ दांभिकपणाचा डोंगर । कीं मोहकल्हारांचे सरोवर । लटिके लुब्धतेचा भ्रमर । अज्ञान तो ॥ २५ ॥ जो भोगजळींचा मीन । कीं विषयमासींचें[5] स्नान । चंचळतेचा पवन । अज्ञान तो ॥ २६ ॥ क्रोधाग्नीची ज्वाळ । कीं शब्ददंशाचा व्याळ । अज्ञानतमींचें काजळ । अविचारी तो ॥ २७ ॥ जो प्रपंचदक्षतेचा कोल्हा । दुजेपण वागवी एकला । विष उमाणोनि[6] मोला । घेतसे जो कां ॥ २८ ॥ लोकापवादाचें देवारणें[7] । विश्वमुखींचें गाऱ्हाणें । निरयाचे[8] पाहुणे । अंधदृष्टि ते ॥ २९ ॥ मोहफळांची लता । कीं भेदतस्करां मार्ग चालता । मिथ्या कीरचि[9] प्रतिपादिता । विचारहीन ॥ ३० ॥ जो स्वहित बुडविती नदी । अविवेकपथींची बिदी[10] । कीं विषय चालती पाणंदी[11] । इंद्रियांची ॥ ३१ ॥ जो कुतर्कीचा काक । अविद्येचा कुंभपाक । इंद्रियां अहंपणाची डांक । लावितसे जो ॥ ३२ ॥ अन्यथाज्ञानाचा गाभा । उदेला कल्पनेचिया नभा । तें भोगीत चकोर उभा । अज्ञान तो ॥ ३३ ॥ नाना वाक्द्वेषें

---

१ व्यक्त होण्याचें स्थान, जन्मभूमि. २ निरूपण करण्यास [वाचेनें वर्णन करण्यास] अशक्य. या साठींच वेदानें जेथें "नेति नेति" ह्मणून मौन स्वीकारलें, असें जें ब्रह्म त्या विषयीं. ३ लौकिकांत अद्भुत गोष्टींचा चमत्कार (सिद्धिप्रभाव) दाखविण्याविषयींचा ४ प्रमुख नागरिक, शेट्या, महाजन ५ कार्तिकादि शुभ मासांत गंगेंत प्रातःस्नान केलें असतां पुण्यप्राप्ति होते, ह्मणून तसें स्नान करितात. त्याप्रमाणें येथें विषय हेच शुभमास असें मानून त्यांत नित्य स्नान करणारा. ह्मणजे सदोदीत विषयभोग भोगणारा, हें तात्पर्य. ६ मोजून, अटकळ करून. ७ डोक्यावरचें जड झालेलें वोझें उतरण्याची उंच जागा. [मजूर लोक रस्त्यांतून ओझीं वाहून नेत असतां तीं जड झाल्यामुळें, विश्रांतीसाठीं रस्त्यांत एकादी उंच जागा पाहून त्यावर ठेवतात, त्या जागेस वाडीप्रांतीं "देवारणें" ह्मणतात. "दवरणें" हा शब्द "ठेवणें" याअर्थीं वाडीप्रांतीं वापरतात. त्यावरून देवारणें हें नांव पडलें असेल तर नकळे ! ८ नरक. ९ पोपट. १० पेठ. आळी. ११ गुरें वगैरे जाण्यास केलेली वाट.

जियेति[1]। विकारउद्यमें उदयेति[2]। तया युक्तिनें वाढों करिती। अज्ञान ते ॥३४॥ जो प्रपंच बोधिता स्वामि। इंद्रियबैलांचा मनोधर्मी। नाना वासनांचा उद्यमी। अविचारी तो ॥ ३५ ॥ मोहकर्दमीं माजिवेंडा[3]। तेथ संतोषोनि असे किडा। चिंतादुर्गाचा सुहोंडा[4]। अज्ञानी तो ॥ ३६ ॥ प्रवृत्तिजननीचिया स्तना। पाझरे लोभदुग्धाचा पान्हा। तहीं बालक पावे समाधाना। अज्ञान तो ॥ ३७ ॥ तापत्रयाचा वणवा। लागला देहवनाचिया गांवा। तरि पक्षी नुमगे जीवा। अज्ञानी तो ॥ ३८ ॥ ऐकोनि हानीचा [हा नीच ?] समाचार। संत सांगती राहावया अमर। तरि वनिताकमळ न सोडी भ्रमर। अज्ञानी तो ॥ ३९ ॥ देखोनि नैश्वरा[5] [र्या ?]चा पक्ष। अक्षै दाविती अलक्ष। परि पक्षि न संडी संसारवृक्ष। अज्ञानी तो ॥ ४० ॥ देखोनि देहाचा सांगात। जो दिक्षा दीपाचा भुलीत। भ्रमण जाळीं[6] पडे कपोत। अज्ञानी तो. ॥ ४१ ॥ लटकिया भ्रांतिच्या आमिषा। मानूनि देहाचा भरंवसा। मृगजळीं सुखावे मासा। अज्ञानी तो. ॥ ४२ ॥ जो कापुसाचा शत्रु। कीं पटाचा पैं मैत्रु। अविद्येचा पुत्रु। शेवटिला जो. ॥ ४३ ॥ जो तत्त्वमातीचा विरोधी। कीं जीवत्व घटाचा आराधी। सत्कर्म न रुचे जया बुद्धि। फळाशेसी तत्पर ॥ ४४ ॥ जो आकाशाचा द्वेष करी। आणि अवकाशा कल्याण वरी। पेटवणा आलें दूरवरी। अग्नि म्हणे प्रज्वळूं ॥ ४५ ॥ ऐकोनि तृप्ततेच्या गोष्टी। तांदूळ थैंाउकीं न धरी दृष्टि। आणि तृप्तासंगें हुटहुटी। तृप्तता बोले ॥ ४६ ॥ पाऊस म्हणे कांसया तरी। बीजावीण पेरणी करी। द्वार न करितां रिघों घरीं। म्हणे जो कां ॥ ४७ ॥ अग्नि म्हणे न आतळूं। आणि सकळ म्हणे पोळूं। कीं चाळणीवीण लागे घोळूं[7]। खरें कुडें. ॥ ४८ ॥ स्त्रीसंगासि उबगे।

---

१ जिवंत राहतात. २ उदय पावतात. ३ मध्य भागाचा आश्रय करून असणारा. ४ बळकट योद्धा, वीरोत्तम. ५ नाशवंताचा. ६ पारध्याचे फांसे. ७ भांडें कुडें.

आणि अपत्यवृद्धि मागे । कर्मावीण हों लागे । कर्म ऐसें. ॥ ४९ ॥ भजनाचा घेइजे त्रास । नैराश्य नावडे जयास । आणि उगाच म्हणे मी दास । ईश्वराचा ॥ ५० ॥ आवडती सेवा न कळती । म्हणे स्वामी माझी कवण गति । नावडते रंक म्हणविती । रायाचे कीं ॥ ५१ ॥ तैसा वैराग्या [ची ?]चा वाटवेधि (वाटवेधि ?) । विवेकाचा स्पर्धि । निजलों म्हणे समाधि । अवचटेंचि ॥ ५२ ॥ जैं समुद्र नाहीं देखिला । आंत नाहीं बुडाला । घेऊनि म्हणे आला । मुक्त कैसें. ॥ ५३ ॥ झाली किल्ली तैसीच राहे । उघडी पेटी झांकली आहे । मिळालें म्हणे रत्न पाहें । लोकांप्रति ॥ ५४ ॥ प्रतिबिंबासि भुलला । उदकासंगें आकळला । तो म्हणे मज गंवसला । गगनिंचा सूर्य ॥ ५५ ॥ घोर निद्रे आकळला । स्वप्नावस्थेसि भुलला । तो म्हणे मज वृत्तांत कळला । जागृतींचा ॥ ५६ ॥ घोरत्वासि भ्याला । टोणवा (का ?) पडताळूं लागला । आणि म्हणतसे मज गमला । दोरचि हा ॥ ५७ ॥ रजताकारें मानिली । प्रेमें गळां बांधिली । मुखें मात्र आपण मानिली । शुक्ति म्हणें ॥ ५८ ॥ उजेड पडलिया स्वभावा । म्हणे कासया व्हावा दिवा । आणि लोकदृष्टि हेळावा । खद्योत म्हणे ॥ ५९ ॥ पाळणा बांधों लागे । गीत शिकों सांगे । आणि म्हणे मूळ लागलें ने गे ! । शेजारणी ॥ ६० ॥ कीं कान वाढवी । किल्ली कमरे खोंवी । म्हणे तुज आण बरवी । नग हे ने ॥ ६१ ॥ तैसें संसारावरी उदासपण । विषयलुब्धाचें जाण ।

---

१ वाटपाड्या, ठग. २ मोतीं. ३ वास्तविक रस्त्यांत दोर पडला होता तो घातक साप आहे अशी कल्पना करून त्या सापाचा दंश करण्याचा जो घोरस्वभाव त्याला भ्याला; [दृग्भ्रम योगें रज्जु न जाणे । वाटे तीव्र भुजंग ॥ रंगनाथ.] आणि त्याला मारण्यासाठीं (टोणवा=टोणका) दांडा जवळ करूं लागला (पडताळणें= स्वीकार करणें, सरसावणें) परंतु वरवर मात्र मोठ्या दिमाखानें म्हणतो कीं मला हा दोरच कीं हो गमला ! ४ तुच्छ मानावा. ५ मूळ नक्षत्रावर उपजलेल्या मुलाचें तोंड आईबापांनीं पाहूं नये या शास्त्रनियमास अनुसरून अशा वेळीं निपजलेल्या मुलाची आई शेजारणीस ह्मणते अगे ! हें (उपजलेलें मूल) ने (घेऊन जा.)

म्हणवी आपण सुजाण । तो हा ऐसा ॥ ६२ ॥ तैसें हें निर्फळ वैराग्य । कीं पथ्याचें आरोग्य । नातरी मृगजळींचें भाग्य । मीना जेवीं ॥ ६३ ॥ ते मांगी म्हणवी साध्वी । आषाढ म्हणवी मीं माध्वी । तो पूर म्हणे मज आघवी । समुद्रसत्ता ॥ ६४ ॥ ते मेंग म्हणे मी सर्प । तो वेष राजाचा दर्प । लाटिके कामिनीचा कंदर्प । उठावला ॥ ६५ ॥ वाट चुकतियाची माया । नसते भुलीची जाया । ताडवृक्षाची छाया । काजा नये ॥ ६६ ॥ तो सैंधव असतां सिंधु होये । दंवाच्या उदकीं पोहे । दर्पण नसतां मुख पाहे आपुलें जो ॥ ६७ ॥ जो जागाचि म्हणे मी निजलों । जो जळींचि म्हणे मीं थडिये आलों । तो उपवासी म्हणे आंचवलों । जेविल्यावीण ॥ ६८ ॥ पटळ म्हणे मी आकाश । तें दंहिंवर म्हणे पाऊस । तो चढींतें म्हणे मी शुभमास । हिंदू [आर्यां ?] माजी ॥ ६९ ॥ तो आगर म्हणवी मी सागर (साखर ?) । तो निंब म्हणवी मी मधूर । तो आगळा स्वर उठवितों शेंदूर । गळींचा जो ॥ ७० ॥ तो उजेड दावितें काजळ । खद्योताचा उजाळ । वेश्येचा प्रेमळ । संग जो कां ॥ ७१ ॥ ऐसा अज्ञानाचा मुकुटमणी । तो परिक्षिजे (पारखिजे ?) इहीं लक्षणीं । विकारप्रजेचा धणी । पाळिता जो ॥ ७२ ॥ जयाच्या घरा तर्क वाढला । भेद अनाथाचा सांभाळ केला । अविवेक पुरोहित संरक्षिला । अति यत्नें ॥ ७३ ॥ ऐसें जयाचें अज्ञान । पूर्ण वाढलें प्रपंचज्ञान । तया विषयांवाचून समाधान । होइजे कैसें ॥ ७४ ॥ तो विषय कर्दमींचा दर्दुर । तो भोगजळींचा जळचर । तो वासनाकमळ भ्रमर । सांडी केवीं ॥ ७५ ॥ कामुक वनिता कामा । कीं जंबुक उंसाचिया ग्रामा । नातरी दांभीक नामा । विटे केवीं ॥ ७६ ॥ भुंकण्या श्वान

१ सर्पानें आपल्या अंगावरील विसर्जन केलेली जीर्ण त्वचा. २ वाटपाड्याची दया. ३ वेषधारी बायको उपयोगी नाहीं. ४ अभ्र, ढग. ५ धुकें. ६ अधिकमास. ७ शेंदूर खाल्ला असतां घसा बंद होतो. तो म्हणतो मी गळा मधूर करीन. ८ बेडूक. ९ जो दांभिक आहे तो वरवर हरिनामस्मरण करण्याविषयीं कसा विटेल ? हा भाव ' मुखमें राम और बगलमें छूरी ' या प्रकारचा दंभ तो दाखविणारच !

स्वभावता । कीं तृषाक्रांत पाणी तत्त्वता । निद्रा डोळियांसि त्यागितां । कैसेनि होय ॥ ७७ ॥ मृगें वनांतर । कीं उरग चंदन अग्रहार । नातरी पक्षी त्यागी अंबर । कैसेनि तो ॥ ७८ ॥ तेवीं जया लागलें गोड । दृश्यीं दिसे ती आवड । अद्भुत भुतांचा मोड । काया न सोडी ॥ ७९ ॥ भूत पंचाक्षरी न हुडके । जारिणी पतीसि शंके । कीं राजमार्ग देखोनि वचके । चोर जैसा ॥ ८० ॥ मिठा आपुलेंपण व्हावें । तरि सिंधुस्नान कां करावें ! । कर्पुरा आहे नांदावें । तरि अग्नि खेंत्रें कासया ! ॥ ८१ ॥ नगा आपुलेंपण व्हावें । तरि मगं घणा कां पाचारावें ? । मनीं आहे द्रव्य सांचावें । तरि कां पुसावें यज्ञासी ? ॥ ८२ ॥ तम योजी आपुलिया उत्सवा । तरी दीपा कां म्हणावें यजमान व्हा ? । स्वप्न नुबगे आपुलिया जीवा । तरि जागृति कां वानिजे ? ॥ ८३ ॥ तैसा अज्ञानाचा नेम । साधूसि धरि लटिकें प्रेम । तुंकोनि (?) टांकिजे हृदयधर्म । ऐशियापरी ॥ ८४ ॥ लटिका भय जया आवडेल । तो काय रज्जू म्हणत्या चांगलें म्हणेल । जितेंद्रिय करंटा भासेल । सकामा जैसा ॥ ८५ ॥ रसलुब्धा निराहारी । कीं आंळसिया [आयासिया] जोडकरी । तैसा आकारिया निराकारी । नावडेचि कीं ॥ ८६ ॥ दारिद्रदशिया जोहारी [जंव्हारि] कीं कोरडें खातया सांबारीं । कीं उत्पन्नभक्षिया [उत्तानभक्षिया ?] सावकारी । नावडे जैशी ॥ ८७ ॥ कीं निष्ठुरासी दयाळ । कीं चिंताकुता प्रेमळ । विषयलुब्धासि वैराग्यशीळ । न रुचे जैसा ॥ ८८ ॥ मलिनासि धुतलें वस्त्र । एकमुंळिया कुळगोत्र । अपवित्रा पवित्र नावडे जैसा

---

१ हीण करून, मलीन करून, २ दया क्षमा शांति इत्यादि हृदयधर्म ३ आळशी किंवा काबाड कष्ट करून श्रमानें पोट भरणाराला. ४ गांठ भांडवल जवळ करून स्वस्थ बसलेला धनीक. ५ मोतें जवाहिर वगैरे विकणारा मारवाडी. ६ वडिलोपार्जित आयत्या उत्पन्नावर निर्वाह करणारा (किंवा उत्तानभक्षी हा शब्द, वाडी प्रांतीं, कफल्लक दरिद्री मनुष्याविषयीं विशेषणार्थ वापरतात. ७ दुसऱ्याचा वाराही लागूं न देतां एकटा राहण्याची इच्छा करणारा, एकलकोंडा, अशा स्वभावाचा आणि विशेषें करून एकुलता एक मुलगा असेल त्यास वाडी प्रांतीं एकमुळा म्हणण्याचा प्रघात फार आहे.

॥ ८९ ॥ चोरी गोड जया लागे । तो दीप लावित्या बरें न मागे । शुद्ध उपदेशा उबगे । अज्ञान तैसा ॥ ९० ॥ आतां किती तयाचें ओखटेपणं[1] । बोलतां वाचा शिणे लहान । अविद्येचें लालन । पुरतें कीं हे ॥९१॥ ऐसा लोकीं जो जो उभारला । तो तो अविद्येचा सरंजाम[2] झाला । तो तियेचिया काजाला । उपेगा येतो ॥९२॥ एक ते विंचू विक्रा [खा?]र । एक ते व्याघ्रचि तामस क्रूर । एक दंशिक सर्प घोर । ऐसे ऐसे ॥९३॥ एक ते विषय हुंगिते सूकर । एक मंत्रज्ञ खणते सौंळुंदर[3] । ज्ञान चांचाइते उंदीर । एक तेचि ॥ ९४ ॥ एक कुकर्म ऐकत्या पौंली[4] । लागोनि राहती प्रपंच गल्ली । तयांची व्हावी घेतली । ओळखी ऐशी ॥ ९५ ॥ एक ते शिकाव कीरें[5] । एक आंधळे डुंडूळ[6] प्रकार । एक ज्ञाना आंगीं [आगिये?] कोळिंदर[7] ।

---

१ दुष्टपणा. २ अविद्येचें एकेक नामरूपात्मक लेणें, साहित्य. ३ साळुंदर म्हणून एक चमत्कारिक जनावर वाडी प्रांतांतील जंगलांत असतें. त्याच्या आंगावर मोठा पिसारा असतो. त्यांत अनेक दाभणाप्रमाणें बारीक टोंकाच्या बाणासारख्या शलाका असतात. जेव्हां त्या जनावराला अन्य प्राण्याची भीति उत्पन्न होते, त्या वेळीं तें आपला पिसारा फुगारून त्यांतून त्या आपल्या आंगावरच्या शलाका मोठ्या जबर वेगानें लांबवर फेंकीत असतें. त्या आंगांत खुपल्या असतां बळकट जनावरही विव्हळ होतें, मग मनुष्याची कथा काय! इतकें झालें तरी त्या जनावराला पकडण्याविषयीं मनुष्य प्रयत्न करीत असतोच. ह्या शलाकांचा पेनाच्या ऐवजीं लिहिण्यास वाडीप्रांतीं उपयोग करितात. हें जनावर त्या पिसाराच्या योगानें भुईंत पोखरून मोठें बीळ पाडीत असतें व त्यांतच राहतें. याची उंची सुमारें दोन फुट व लांबी तीन फूट असते. ४ पाल ह्या प्राण्याचे कान फार तीक्ष्ण असतात. म्ह० "ऐकत्या पाली" असें म्हटलें आहे. याच कारणामुळें, मनुष्याविषयीं अलंकारिक बोलण्याच्या प्रसंगीं "त्याचे कान कसे पालीसारखे आहेत" असें वाडीप्रांतीं म्हणतात, ५ पोपट. ६ घुबडाप्रमाणें (घुबड ह्या पक्षाच्या डोळ्यांस सूर्याचें तेज सहन होत नाहीं म्हणून त्याच्या डोळ्यांची जी चमत्कारिक उघड-झांक असते ती पाहिल्यानें यांतील सत्यता कळून येईल.) ७ कोळिंदर किंवा कोळसुंदे हा भयंकर प्राणी वाडीप्रांतांतील जंगलांत असतो. हा प्राणी झाडावर चढण्यांत मोठा पटाईत आहे. हा बहुतेक कोल्ह्याहून किंचित मोठा असतो. याचें मूत्र फार विषारी (आगियें) आहे व त्याच्या शिश्नेंद्रियांतून ती मूत्रधारा फार लांब चिपनळीप्रमाणें जात असते. हा प्राणी हिंसक आहे. कांहीं

चढते जे कां ॥ ९६ ॥ एक संशय खाजते कुकुडसे[1] । विवेका लागते बरडसे[2] । एक निद्रा पडों नेदिते चांचडसे[3] । विपरीत धर्मी ॥ ९७ ॥ एक सकाम मोकळे पशु[4] । एक ते दुजियां गोंविते पाशु । ऐसा अज्ञानी जीवाचा पाउसु । पडे कीं हा ॥ ९८ ॥ ऐसें अविद्या मायादळ । नसता उदय पावला आळ । तें फांकावया आभाळ । प्रभंजन जैसा ॥ ९९ ॥ नाना भयांचा बागुल[5] । अबलांवरि [बाळांवरी ?] सांवतेल [संवकेल ?][6] । आतां पाहूं ह्मणतां निघेल । केधवां नेणों ॥ १०० ॥ नाना मैंदांची[7]

जनावरें तडाक्यांत आलीं असें पाहून या जनावराचे कळप त्यांस वेढून त्यांसभोंवार आपल्या मुत्रेंद्रियांतून मूत्रधारा सोडितात; मग तीं जनावरें, त्या विलक्षण विषारी मूत्रधारेच्या भपकाऱ्यासरशीं आंधळीं होऊन बावरतात व यांच्या भक्ष्यस्थानीं पडतात. नंतर त्यांच्यांत जिव असेपर्यंत मात्र हा प्राणी त्यांस फाडफाडून खातो. मग लागलाच सोडून जातो. या प्राण्याची कुई फार लांबवर ऐकूं येत असते. याच रहस्यान्वयें यांस " आगियें आणि ज्ञानाआंगीं कोळिंदर चढते जे कां " असें म्हटलें आहे.

१ कोंबडीच्या अंडीं घालण्याच्या जागेंत एक प्रकारचे अति सूक्ष्म कृमी उत्पन्न होत असतात त्यास कुकुडसे असें म्हणतात. हे अणुप्रमाणें असणारे कृमि साहाजिकदृष्टीनें मुळींच उमगत नाहींत, व हे प्राणी मनुष्याच्या आंगावर चढून विशेषेंकरून मुखावर हुळहुळुं लागले म्हणजे सुळसुळाट होऊन खाज उठते. व चैन पडेनासें होतें. २ धान्यादि कणांमध्यें उत्पन्न होणारे कृमी. ३ जमिनींतून साहाजिक उद्भवणारें लाल रंगाचे मुंगीच्या वर्गांतले कृमि. ४ आर्यधर्मीत सांगितल्या प्रमाणें मृताच्या औध्र्वदेहिक संस्काराच्या प्रसंगीं " वृषोत्सर्ग " करून मोकळा सोडलेला वृषभ पशु (वसु बैल). ५ लहान मुलें रडूं लागलीं म्हणजे त्यांनीं भ्यावें आणि रडें बंद करावें यासाठीं त्या मुलांची आईः " अरे हा पहा भयंकर राक्षस किंवा प्राणि आला " म्हणून, खोटेंच सांगत असते. त्यास बागुल किंवा बागुलबुवा असें ह्मणतात. ६ बलहीन अशीं जीं बालकें त्यांच्यावर सांवतेला प्रमाणें हा बागुल संवकेल ह्मणजे त्याचा परिणाम होईल. [कोल्हा, कोंबड्या वगैरे धरण्यासाठीं रोज टपत येऊं लागला; ह्मणजे त्यास " संवकला " असें ह्मणतात.] सांवरीच्या फळांत फक्त बारीक कापूस मात्र असतो; त्यांपासून तेल जसें कधींच निघणार नाहीं. तद्वत मिथ्या अशा भाव जर प्रौढ मनुष्यास हें बागुलाचें भय घातलें आणि जर त्यानें पुसलें कीं, तो कोठें आहे दाखवा बरें ? तर तो [केव्हां निघेल] केव्हां न होसा हे इल कोण जाणे. ह्मणजे तो मुळींच मिथ्या होय असा भाव. फक्त त्या भीतिमुळें मुलाचें रडणें बंद होणें एवढेंच कार्य मात्र होतें. ७ ठगांची.

सेना । केसरी जंव देखेना । ना गरुड भेटतां चंदना । सापचि ते॥१०१॥ विषावरी चंवर उडे । जंव अमृत तोंडीं न पडे । वैद्य भेटेना तंव मुरडे । रोग जैसा ॥ १०२ ॥ तंवचि स्वप्नाची वस्ती । जंव रंग भरेना जागृति । कीं कायेवरी वस्ती । मिरवती जैशा ॥ १०३ ॥ आत्मा हिरा ना देखिला। तंव प्रपंच स्फटिक मिरविला। सर्वांमाजी खद्योता चढला। रंग जैसा॥१०४॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुपन्नज्ञान अज्ञानलक्षणनिरूपणं नाम द्वितीयप्रकरणं समाप्तं ॥ २ ॥

प्रकरण ३ रें.

(एकात्मभक्तियोग).

ॐ नमोजी आद्यायनमः ॥ तृणांकुरा मान जाहला । जंव तो वसंत नाहीं आला । आणि थिल्लरां पूर लोटला । आषाढींचा ॥ १ ॥ येतुलेंहि बोलणें सापाचें । जों दोरपण गमलें ना साचें । आणि अनादित्व आपुलें न वचे । तरि प्रयोजन कीं ? ॥२॥ येतुलेंहि न गोंवीं आपणा । ते हें अद्वैत-भक्तिचीं खुणा । कवणचि प्रतिमेविना। भजे जो कां ॥ ३ ॥ कवण हें नाशावया दारिद्र ? । ते हे चैतन्य भक्तीच नरेंद्र । कीं समर्थ व्हावया समुद्र । सरितां जैसा ॥ ४ ॥ कीं खंडावया ऋणवर्य (वैर ?) पण एक धनचि श्रेष्ठ जाण । कीं तारावया पाषाण । रघुवीर जैसा ॥ ५ ॥ तेवीं दश्यत्व स्वीकारूं नेणें । ययातीत असे थोर म्हणे । तेथें निदिध्यास वागवूं जाणें । भक्तीच कीं हे ॥ ६ ॥ विनोदा न धरी सखेदपण ।

---

१ लहान लहान ओढे, नाले यांना. २ फार प्राचीन काळाचें अज्ञान (मूला-विद्या, मूल अज्ञान. " पंचदशी चित्रदीप श्लो० २३ ते २७ अवश्य पहा.") जोपर्यंत न (वचे) जाईल तेथपर्यंत पूर्वी सांगितलेल्या अनादि लक्षणाचें [बागु-लाचें) प्रयोजन आहे. तें गेल्यावर मग त्याचें प्रयोजन काय? असा भाव. ३. मूर्त=(सगुण) आकारयुक्त प्रतिमेवांचून, दगड, मृत्तिका, धातु इत्यादिकांच्या स्थापित केलेल्या देवादिकांच्या मूर्ति, त्यावांचून.

दुजियाची ना उवगणें । पतिव्रतेचें धैर्य जाण । श्रेष्ठ जैसें ॥ ७ ॥ निर्गुण देवासि भावें । तुज सारिखें म्हणे व्हावें । हें पद जैं मी पावें । तंव देवचि कीं ॥ ८ ॥ ही भक्ति विवेकनृपतीची कन्या । वरूं शके वर चैतन्या । तयावांचूनि सामान्या । दृष्टि न धरी ॥ ९ ॥ वनीं धेनूसि न मिळे तान्हा । तरि पाझरूं शके पान्हा । वोटीचिये वरूनि वचेना । प्रेम जैसें ॥ १० ॥ कीं मोलें जोडिती वनिता । परिव्रत न बैसे तये माथां । ह्मणोनि पवित्र तया पथा । प्रेम न धाडी ॥ ११ ॥ कौ (क्रो ?) डी देऊनि कनक । वोखटें मागती घडिएक । तरी तो सात्विक न होय पाईक । तयाचा कीं ॥ १२ ॥ सूर्य म्हणवी आपणा शशी । परि तो समुद्र न भरे उल्हासीं । कीं कीर्ड स्त्रीकारिलें कसीं । परि सोनें होऊं न शकेचि ॥ १३ ॥ कीं लाखेरिया रंग दुणावो । परि तें पोंवळन मानी उणावो । कीं आपुलिया वेषा भांबावो नये राया ॥ १४ ॥ मरण भयाचा पूर आला । परि दूर्वा हीरें न कांपला । कीं गजघटा न थोकला । केसरी जैसा ॥ १५ ॥ अंधःकारघनाचा पुरु । पडतां नेणें सविता मेरु । कीं न गणी स्वप्नींचा चोरू । जागृतीं जैसा ॥ १६ ॥ तैसा दृश्याचा पैं द्रष्टा । नजरे नाणी भुलीचिया श्रेष्ठा । आणि चैतन्यासि निष्ठा । मोडों

---

१ उपेक्षा २ मोल देऊन एखादि स्त्री (वेश्यादिक) जोडतात (आपलीशी करितात) परंतु पतिव्रताधर्मानें व्रतस्थ राहण्याचा बोजा तिच्या शिरावर राहत नाहीं. म्हणून जो पवित्र पुरुष असेल तो तशा मार्गास (त्या निषिद्ध कर्माकडे) आपलें प्रेम [न धाडी] पाठवीत नाहीं [धाडणें असा शब्द पाठवणें या अर्थी वाडीप्रांतीं वापरतात.) ह्मणजे पवित्र गृहस्थाश्रमी पुरुष अग्निहोत्रादि व्रत चालविण्यासाठीं सशास्त्र विवाहांत वरलेली धर्मपत्नीच पाहिजे, असें जाणून तशा त्या धर्मपत्नीवरच प्रेम ठेवतो असा भाव. ३ एक कोटी सुवर्ण मुद्रा देऊन. ४ कोणाचें कांहीं खोटें (ओखटें) करावें यासाठीं कोटि सुवर्ण मुद्रा देऊन, ' तें अमुकाचें खोटें कर, असें मागतात ह्मणजे सांगतात. ५ पण जो सात्विक आहे तो त्या धनाचा चाकर [पाईक] (गुलाम) होत नाहीं. ६ हिणकट. डांक. ७ खोट्या पोंवळ्यास (बनावटी पोंवळ्यास) ८ महापुरीं झाडें जाती । तेथें लोहाळे वांचती ॥ १ ॥ तुकाराम] दुर्वेची काडी.

भेदी ॥ १७ ॥ ते हे भक्ति महानिधि । भेटों करी समाधि । कीं आत्मा वारिधि । गंगा जैसी ॥ १८ ॥ कीं हे भक्तिरत्नाची कळी । प्रकाश पडों शके निराळीं । गगनाचिया देउळीं । देवी जैसी ॥ १९ ॥ अनेक कुमुदां नेणें । चंद्रचि अर्जु (चूं ?) जाणे । कमळिणीकपाट रविविणें । नुघडे जैसें ॥ २० ॥ नवलाचा मोहरू दिसेना । परि तरुवांचूनि कांहीं तो असेना । अनेक नगीं सोन्याविना । भिन्न कांहीं नसेचि कीं ॥ २१ ॥ ऐसा भक्ति ओलावो मुळाथिला । आण भजनतरूही विस्तारला । फळीं विहंगम सुखावला । आत्माराम ॥ २२ ॥ ऐसा भक्तिभाव आराम । तया दुजा ना आत्माराम । मग जाणावा श्रम । म्हणेल जरी ॥ २३ ॥ हें एक बोलणें मोठें । भोगिलियावीण न सुटे । आंगीं संदेह तयाचिया भेटे । येईच ना ॥ २४ ॥ दहिंवराचा पूर पडो । परी चातकीं प्रेम नेणें विघडों । मग काय एक तया घडो । पर्जन्यासी ॥ २५ ॥ कीं विघ्नांचा गिरिवर पडो । परी पवित्रा नेणें विघडो । मग काय एक तिये घडो । दादुल्यासी ॥ २६ ॥ तेवीं बुद्धिकुमारीचा निर्धारू । जई भ्रतार केला ईश्वरू । आतां दारिद्र्याचा विचारू । तेथ कैंचा ॥ २७ ॥ विषय नाहीं तें दारिद्र्य ना ? । ते भूल म्हणोनि तया भुलवीना । मग नांदवी अक्षयभुवना । भक्तराज ॥ २८ ॥ कीं जें निद्रा देवीचें आराधन । तरी प्राप्ति पाविजे विषयस्वप्न । आणि घडे जागृतीचें ध्यान । तरी तें रूपचि होय ॥ २९ ॥ कीं अंवसेचें ध्यान कीजे । तरि अंधःकार मागोनि घेइजे । तेचि शरदा भाविजे । तरि सुरस प्रभा ॥ ३० ॥ कीं गारुडियाचें ध्यान लाही । तरी भुलीवांचूनि आणिक नाहीं । मागणें भ्रमाचिये मोहीं । विषय तैसे ॥ ३१ ॥ कीं मृगजळाचिये कन्येला । सूर्य न धाडीच की महाला । तेवीं विषय

१ समुद्र. २ महदाकाशांत. ३ फुलांचा भर. ४ मूळ आधारानें राहिला. ५ धुक्याचा. ६ नवरा कुरूप, दरिद्री कसाही असो, व प्रपंचांत येणाऱ्या केवढ्याही विघ्नांचा पर्वत मस्तकीं पडो, परंतु पवित्र पत्नी जी असेल ती आपल्या नवऱ्यावरील प्रेम विघडूं देत नाहीं हा भाव. ७ शरदृतूंतील सोज्वळ चंद्रिका (चांदणें प्राप्त होणारा शरत्काल).

मागल्या भक्ताला । न भेटे देव ॥ ३२ ॥ ऐकोनि बाळंतिण स्वप्नींची । जरि सुवीण धावेल जागृतींची । तरिच विषय मागल्या भक्तांची । आवडी देवा ॥ ३३ ॥ भावनेसरिसा पावला विषय । तो म्हणे देवें धरिली माझी सोय । तरि तो स्वप्नींचाचि अभिप्राय । येतुल्या बोलें ॥ ३४ ॥ कीं सागर नाबडोनि जळा । धरी रिंगणीसी गळां । तरि फेनचि कीं आगळा । वाढला तया ॥ ३५ ॥ तेंवीं एक व्हावें हें टाकुनी । मागे विषयभावना विकोनि । वीषची कीं तुकोनी । घेतलें जयें ॥ ३६ ॥ जयाची भावना चिंतामणिची । तो काय प्रीति धरील कांचवटीचि । ह्मणोनि धुरेचों भक्त विषयांची । सेचि[3] न करी ॥ ३७ ॥ देणें घेणे भ्रमाचें । येर तें असे निजांचें । अखंड आनंदाचें । प्रेम ऐसें ॥ ३८ ॥ ऐसें भक्तिमहिमान जडलें । दृश्य मनींचें पैं उडालें । ह्मणोनि निवडों पुढारलें । ज्ञान तें ह्मणों ॥ ३९ ॥

इति श्रीपूर्णाक्षयामृतब्रज्ञान एकात्मभक्तियोगो नाम तृतीयप्रकरणं समाप्तं ॥ ३ ॥

प्रकरण ४ थें.

(ज्ञानयोग.)

ॐ आत्मरूपायनमः ॥ तया ज्ञानाचा परिकरें । व्हावा आतां गोचर । ह्मणोनि पुढें विस्तार । तोचि वेऊं ॥ १ ॥ समुद्र पोटीं न ठेवी काडी । कीं कुमरी ठेवी ना वऱ्हाडी । तेवीं अज्ञान न वचे तोंडी । तें हें ज्ञान ॥ २ ॥ घृत जिरलिया अंगमेळें । वरी उदक आपेंचि विटकळे । तेंवीं अज्ञान जयाचिया खोळे । भरेचिना ॥ ३ ॥ ब्रह्मचारियाची कुमारी । जरी

---

१ रिठे. २ भक्तशिरोमणि, अग्रभागचा. ३ आठवणच करीत नाहीं, किंवा तसें चिंतनच करीत नाहीं. ४ स्वस्वरूप आत्म्याविषयींचें ५ सुंदर प्रकार. ६ ज्ञानाच्या तोंडास (ज्ञानासन्निध बरोबरी करण्यास). ७ सुटे होणें. ८ शिरवींत, आवरणांत.

सकामें करील नारी । तरि अज्ञान ज्ञाना घरीं । रिघों शके ॥ ४ ॥ चंपकाचें गृहार । जरी पुसत धांवेल भ्रमर । तरी अज्ञान ज्ञानाचें घर । रिघों शके ॥ ५ ॥ जंबुकाचिये कुऱ्हाडीं । जरी सिंहाची तुटेल मांडी । तरी ज्ञानाघरीं परवडी । अज्ञानाची ॥ ६ ॥ कीं धूमाचें पैं जाळ । आकळूं शके अनळ । तरी ज्ञानाघरीं गोंधळ । अज्ञान घाली ॥ ७ ॥ पडतां पवनाचें वागुर । जरी आकाशाचें गंवसेल पोर । तरी अज्ञान ज्ञानाचें घर । रिघों शके ॥ ८ ॥ सूर्याचिया गेहीं । अंधःकार राहे समूहीं । तरी अज्ञानाचिये डोहीं । ज्ञान बुडे ॥ ९ ॥ सागरीं ठेविला ठेवा । लवणें चोरूनि आणावा । मग ज्ञानाघरीं रिघावा । अज्ञानाचा ॥ १० ॥ आधि अनलाची खेवँ । कर्पूर घेऊनि येई जंव । तरी मग ज्ञानीं होय तंव । अज्ञान तैसें ॥ ११ ॥ नवनीत अग्नि कढवील । हें ढाँळ [ल ?] जारि [जऱ्हीं कां लाविल ?] काळवील । मग ज्ञानीं म्हणवेल । अज्ञान तैसें ॥ १२ ॥ कांसया उपमेचे मांदोडे । जारि दृश्यें [श्या ?] आपणा न पडे । तरी ज्ञान ऐसें निवाडें । म्हणों येणें ॥ १३ ॥ कीं

---

१ सकाम पुरुष [विवाहित पत्नीची इच्छा करणारा]. २ सोनचांपयाच्या फुलाजवळ भ्रमर बिल्कूल येत नाहीं. हा अनुभव कोंकणांत सार्वत्रिक आहे. कारण तेथें माडाचीं झाडें फार आहेत, त्या झाडांस हा भुंगा कणिकेंत पोंखरून त्यांचा नाश करितो यासाठीं त्या ठिकाणीं या सोनचांपयाचीं फुलें नेऊन ठेवतात. मग भ्रमर तेथें येईनासा होऊन त्याचें रक्षण होतें, इतकेंच नव्हे तर ज्या बागेंत या वृक्षाचें झाड फुललें असेल, त्या बागांच्या क्षेत्रांत हा भ्रमर मुळींच येत नसतो. याच उद्देशानें तुलसीदासांनीं एका दोह्यांत म्हटलें आहे कीं-[चंफा तेरेमे तीन गून है । रंग रूप और बास, इतना तो अवगून है । सुन भ्रमर न आवे पास ।] ३ प्रसार, फैलाव ४ जाळें. ५ मिठानें. ६ आलिंगन ७ अग्नीला नवनीत कढवील किंवा संतप्त अग्निमध्यें ज्या ज्वाळा (ढाळ=ज्वाळांचे झळाळ) निघतात, ते कालवून त्यांचा, लोणी आपल्याप्रमाणें (आपल्या स्वरूपाप्रमाणें किंवा स्वभावाप्रमाणें) गोळा करूं शकेल तर ज्ञानाच्या ठिकाणीं अज्ञानाचा संभव होईल ! हा भाव ८ समुदाय, जुंबाडें. ९ जर ज्ञानस्वरूप जागृतीमध्यें अज्ञान मुळींच आपल्या दृष्टीस च पडत नाहीं; किंवा (दृश्या=नामरूपात्मक अज्ञानजनित दृश्य चराचराला आणि आपणाला म्हणजे ज्ञानस्वरूप द्रष्टा जो साक्षी त्याला (पडत नाहीं) जुळत नाहीं, तरी (येणें=या अज्ञानाच्या दृष्टांतानें) दार्ष्टांतिक अज्ञानाच्या काल्पनीक तुलनेनें त्या ज्ञानाचा निवाडा करतां येतो; एवढ्याकरितांच तें उपमेला घ्यावयाचें.

दृश्य नोहे आपणा[2]जोगें । म्हणोनि प्रतीति आंग न रिघे । हें[3] शाश्वता-चिये संगें न निघे । मागांचि उरे ॥ १४ ॥ जंव अहंता डांक उठखे । तंव मोडती ययाचे *डोके । मग पवनाचिया झोंकें । असे तंव ॥ १५ ॥ आंतुला सौरम्य[6] वेंचे । कमळपण काय तयाचें । तेवीं अहंकाराविना प्रवृत्तीचें । मान न चढे ॥ १६ ॥ आंतली दोरी जाय । मग ते माळ जैसी होय । प्रवृत्तीचे पाय । न घेती तैसे ॥ १७ ॥ आंतुलें वीष निःशेष जाये । तरी त्या सापा कवण भिये । यथाविधींचा[7] संदेह बाधे । न पडे तैसा ॥ १८ ॥ तेवीं ज्ञानाचे आथिलेपणीं । धृतीं बैसावें निर्गुणीं । आणि तयाचि रूपें[10] सगुणीं । देखिलें व्हावें. ॥ १९ ॥ मातीचें गमलें साचपण । तरि घटा कांसया द्यावें दूषण । तंतूचि झाला आपण । तरि पटा कां बोल ॥ २० ॥ सोनें न संडी आपुला कस । मग कां ध्यावा नगाचा त्रास । कां वीट परि तो फाल्गुन मास । विनोदाचा ॥ २१ ॥ समुद्र पाठीशिं प्रबळ । तरी त्या तरंगा काय ह्मणावें दुर्बल । कैसेंहि झालें तरी बाळ । समर्थाचें ॥ २२ ॥ तेवीं अन्वयाचेनि स्वभावें । नामरूपावरी न घुं[11]वें । व्यक्त अव्यक्ताचेनि नावें । भलेंचि व्हावें ॥ २३ ॥ भूतीं भाविजे ब्रह्मभाव । परि घेऊं नये तयाचा स्वभाव । सुखिया होणें नवलाव । आपुला ह्मणुनि ॥ २४ ॥ सोनें शिवाई[12] [शिवरायीं] निघेल ।

---

* =तंगड्या. हा शब्द वाडीप्रांतीं प्रचारांत आहे.

---

१ जगत्प्रपंचासह जें मूल अज्ञान २ आपली बरोबरी करण्यास योग्य आपण) ह्मणजे आनंदमय, ज्ञानस्वरूप, द्रष्टा त्याच्याशीं तुलना करण्यास] योग्य नव्हे, असा भाव. ३ पूर्वोक्त अज्ञान (दृश्य विश्व) ४ नित्य स्वयंप्रकाश साक्षि ज्ञानाच्या ५ पाय ६ सुवास, मकरंद (वेंचे=नाहींसा होतो.) ७ बाह्यत्कारें वेदविध्युक्त (वेदाज्ञेबरहुकूम) आचरलीं जाणारीं कर्में त्यांचा संदेह राहत नाहीं असा भाव. आहें या अर्थी. [मी ज्ञानस्वरूप साक्षी आहें; अशा साक्षिज्ञानाच्या (सोहंस्वरू-पाच्या) आहेपणानें.] ९ प्रज्ञाबुद्धीच्या योगानें. किंवा प्रज्ञाबुद्धीनें. १० त्याच रूपानें ह्मणजे प्राज्ञरूपानें, "सगुणीं=[विज्ञानमय जीवदशेंत] देखिलें व्हावें. [पहाणें पहावें.] ११ गुरगुणें, तिरस्कार करणें. १२ शिव छत्रपतीच्या वेळच्या तांब्याच्या पैशास, शिवाई किंवा शिवरायी पैसा असें ह्मणत. त्या पैशामध्यें किमयेच्या साधनानें सोनें निघेल हें खरें, पण तें त्या किमयाकाराच्या करामतीचें मोल होय.

तें करामतीसि मोल । तेवीं विकाराचा ओल । विनोदासी ॥ २५ ॥ आंतुलें उठे आंत मेळे । परि तो समुद्र ठायिंचा न ढळे । तयाचि परी संसारमाळे । न झुंपे जो ॥ २६ ॥ उद्भिज्ज ह्मणे आपुलें होय । परि ते पृथ्वी कोठें नवजाय । तेवीं प्रतीति नेघे पाय । अन्यथाज्ञानीं ॥ २७ ॥ आतां बहुवशीं काय आहे । ज्ञान ह्मणणें तें हें । झालें तरि न साहे । विश्वासि येथ ॥ २८ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने ज्ञानयोगोनाम चतुर्थप्रकरणं समाप्तं ॥४॥

प्रकरण ५ वें.

वैराग्ययोग.

ॐनमोजी आद्यायनमः ॥ नांवाचीच झाली दारू[1] । आणि उदकाचा बैसल्या शिवरू[2] । तयेचें आयुष्य निबरु[3] । ह्मणावें तें ॥ १ ॥ आणिक एक बोलणें अवलीळीं । चंदन नामाथिला परिमळा । आणि भेट देईल अनिळा । तरि अधिकची होय ॥ २ ॥ गोडी ठायिंचीच क्षीरा । आणि आंत पडलिया शर्करा । गोडियेचा गाभारा । बहुवसचि ॥ ३ ॥ कीं तारूं चालतें बंदरा । तोंचि सामील झालिया वारा । पातें न लगतां घरा । पावूं शके ॥ ४ ॥ आधींच आवडी घरीं येती । वरि शेजारीं मिळाला सांगाती । मग झाडेंचि कीं साजती । तया मार्गी ॥ ५ ॥ आधींचि नावडती नारी । वरि उपदेशा मिळाला ब्रह्मचारी । मग त्यागाचिया घरीं । उत्साह होय ॥ ६ ॥ मनीं वोखटें सवतीचें । वरि संमत जोडलें

---

१ वनस्पति कोटि. २ हें ज्ञान जर एकवेळ पूर्ण झालें, तर तें मग विश्वाला सहन करीत नाहीं. विश्वाचें ग्रहणच करीत नाहीं. ह्मणजे त्या विश्वास शून्य रूपानें पाहतें असा भाव. ३ बंदुकीच्या बाराची दारू. ४ पाण्याचा शिंतोडा; सावंतवाडी प्रांती हा शब्द चालतो. ५ निरर्थक, व्यर्थ. ६ सहजभावाचें. ७ नावाजला गेला. ८ क्षण न लागतां. ९ विरुद्ध, द्वेष, वाईट होण्याची इच्छा.

अतारार्चे । मग कल्हाराचि कीं हांवेंचें । विकासलें ॥ ७ ॥ पहिलाचि आंगींचा निर्दोष । वरि गंगेचा पडला पाऊस । कीं प्रीतीचा पाहुणा आमीश । वरि अमृतार्चें ॥ ८ ॥ आर्धींच धनुर्धर धुरेचा । वरि पाटा [पाट] जोडला रुक्मीचा [रुमीचा]? । मग कवण पैं तयाचा । धरि ॥ ९ ॥ मारिता आणि अमर । जिंकिता आणि शोर । कीं अंतर जाणता चोर । साहवेना ॥ १० ॥ पाऊस आणि अग्नीचा । विनोदी आणि विवाहीचा । वरि जामात करी प्रीतिचा । अंगिकार ॥ ११ ॥ ते चुकवूं न शके कोण । प्रज्ञावंताचे बाण । कीं सागरेशीं लवण । झुंजेल कायी ? ॥१२॥ तेवीं ज्ञान वैराग्य होतां एक । साहों न शकति विषयलोक ।

---

१ प्रमुख, अग्रभागचा. २ आणि त्यावर अमृतत्वाचा [अमरत्वाचा] पदाधिकार (अक्षयपाटा) पाट=पट [पूर्वींचे राजे कायमचीं इनामें वगैरे करून देतांना "ताम्रपट" करून देत असत. तसा येथें सोन्याचा म्हणजे अमरपणाचा पट अर्थात् मरणदुःख परिहार करणारा, चिरंजीवपणाचा पाटा जोडल्यावर, मग त्याचा हात कोण धरणारा आहे ? ३ अगोदर (ज्ञानाचा) पाऊस त्यावर आणखी जर का तो अग्नीचा (ज्ञानाग्नीचा) असला, तर तो विशेषच म्हणावयाचा. घन पर्जन्यामुळें बीजांकुर उद्भवतो, पण अग्निच्या वर्षावानें कर्मबीजें दग्धच होऊन जाणार; यामुळें त्याचें महत्त्व विशेष. याला पुढील उदाहरण देतात; कीः—" एकादा तरुण, सुंदर, विद्वान पुरुष असून तो विनोदी आनंदी, हास्यमुख असा असेल, तर तशावर सर्वांचें साहजिक प्रेम जडतें, मग त्याला जांवई केला असेल त्याचेवर तर विशेषच प्रेम जडलें पाहिजे. त्यावर तो जांवई तरी कसा ? तर " विवाहित पत्नीपासून झालेल्या आपल्या आवडत्या मुलीचें ज्यानें पाणि ग्रहण केलें आहे असा; अविवाहित म्हणजे एकाद्या वेश्येपासून अथवा राखेपासून झालेल्या मुलीचा अंगिकार करणारा जर तो असला, तर तसा प्रेमपात्र होणार नाहीं. इतकेंही असून आणखी त्यानें (जांवयानें) आपल्या बायकोच्या माहेरच्या मनुष्यांवर म्हणजे सासू सासरा वगैरे यांजवर प्रीति ठेवण्या विषयींचा अंगिकार केला असेल तर तो परमप्रीय होईलच. या ओवींतील रहस्य सोहिरोबाच्या " तुह्मी भोगा पररमणी " या पदांतील कन्या सुतद्वय पोरें झाली जामातें धारे पदरीं या चरणाशीं जुळतें आहे. त्याचें जिज्ञासूंनी स्वतः मनन करावें. ४ स्थिर बुद्धीचा, प्रज्ञा आहे ज्याचे स्वाधीन असा स्थितप्रज्ञ पुरुष. [भ० गी० अ० २ श्लो० ५५ ते ६१ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका पहा.] या प्रकारचा जो धनुर्धर [मुंडक उ० मुं० २ खं० २ मुं० ३।४ पहा] योद्धा; त्याचें. ५ मृत्युलोक आणि माहेंद्रादि स्वर्गलोक.

प्रारब्धींचे लटीक । आपुलिया ॥ १३ ॥ सत्य-[सत्ता ?] वंताचिया घरा । मिथ्यत्वाचा न चाले विकरा । तेवीं वैराग्य केसरा मोहरा । तेथ दृश्य मतंगेज कायसा ॥ १४ ॥ दृश्यें[3] आळविल्या नायके । कर्मभेद रोहिल्या न वचके । परमार्थासी न वंचके । वैराग्य कीं हें ॥ १५ ॥ विकारभेदाचा लाग । रिघों नेघे जयाचें अंग । कीं अग्नीचा कोट चांग । वैराग्य कीं हें ॥ १६ ॥ निर्विषय यात्रा करी । एकटा आणि जव्हेरी । राहों न शके घरीं । कवणाचेही ॥ १७ ॥ विश्वासू आणि गहन । दुष्ट न करी कवणाचे कान । कीं उद्यमी न काढी दुकान । चोरां गावीं ॥ १८ ॥ कोप धरितयाचिया आदरा । पाय ठेवूं न शके पायरा । तेवीं न थोर विषयांचिया घरा । वैराग्य तें हें ॥ १९ ॥ नारी मांदोंडा तापसी । देखोनि आलिंगी विवसी । तेवीं विमुख इंद्रियआमिषीं वैराग्य कीं हें ॥ २० ॥ मुलीचा ह्मणवी आपण सिद्ध । परी प्रबुद्ध

---

१ अग्रेसर, पुढारी. २ नामरूपात्मक दृश्य विश्व हाच माजलेला हत्ती [भवगज] ३ दृश्यानें वैराग्याला जरी आळा घातला तरी तें त्या दृश्याच्या ऋुमानीत नाहीं. व तसेंच कर्मभेद हाच क्रूर बळकट रोहिला सरदार त्यालाही भीत नाहीं. परंतु परमार्थाला मात्र (न वंचकें=न ठकविलेपणानें) न फसविणारें असें हें वैराग्य आहे. जव्हारी ह्मणजे ४ जवाहीर मोतें वगैरे विकणारा मारवाडी जर एकटा प्रवासांत असेल, तर तो कोणा परक्याचे घरीं वस्तीस राहत नाहीं. कारण आपल्याजवळ असलेला विषय कोणी लुटून घेईल ही त्याला भीति असते. परंतु तोच निर्विषयी झाल्यावर (भीतिरहीत होऊन) दूरवरपर्यंत सुखानें यात्रा करीत असतो. ५ परम विश्वासू आणि (गहन=) खोल विचाराचा मनुष्य. ६ पूर्वोक्त विश्वासू आणि गहन अशा मनुष्यापाशीं जर कांहीं गुह्य सांगितलें असेल, तर तें तो अन्य कोणच्याही मनुष्याच्या कानांत सांगून त्याचे कान दुष्ट करीत नाहीं, ह्मणजे चहाडी सांगून दूषित करीत नाहीं. ७ समुदाय. ८ भूत, विघ्नदेवता, भय, त्रास. (नारींचा समुदाय पाहून ' तापसी ' विवशी आलिंगितो ह्मणजे त्यामुळें विघ्नदेवतांला आलिंगन देतो, ह्मणजे त्यांपासून विवश होतो. अर्थात् त्या स्त्रीसमूहरूप विघ्नांला फार भितो, व त्यामुळें तें विघ्न निरसन करण्याविषयीं विघ्नदेवतेचें आराधन करितो असा भाव. ९ ज्याची बुद्धि स्थिर झाली आहे असा. (अति बुद्धिमान) ज्ञानी.

नेघेचि प्रसाद । तेवीं जया नावडे दृश्याचा विनोद । वैराग्य तें हें ॥ २१ ॥ वणवियां वनीं न जाय पक्षी । कीं आटल्या जळीं न राहे मच्छी [कीं मत्स्य न राहे अंतरीक्षीं ?] । तेवीं वृत्ति न धांवे दृश्यापेक्षीं । वैराग्य तें हें ॥ २२ ॥ गारुडाची मोहोर न चढे मोला । कीं स्वप्नींचिये कन्ये न धाडी महाला । तेवीं दृश्य देखोनि राजा हांसिन्नला । वैराग्य तें हें ॥ २३ ॥ हें विषयवेश्येचें लालन । मृगजळें सासि [चि ?] न्नलें वन । जामीन न घेचि पवन । वैराग्य कीं हें ॥ २४ ॥ ययापरि दृश्य बावो । मायामयाचा स्वभावो । धुरे बैसला रावो । निश्चयाचा ॥ २५ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने वैराग्ययोगोनाम पंचमप्रकरणं समाप्तं ॥५॥

प्रकरण ६ वें.

(विवेकनिरूपण)

ॐनमोऽचिंत्याय ॥ तो विवेक मतीचा सगर्भ । सात्विक सजळाचें नभ । कीं परिमळ केतकाचा कोंभ । चंदनाचा ॥ १ ॥ विवेक राजपीठीं बैसला । मग ज्ञानमंत्री मिरवला । गहूं कणिकेशिं सिद्ध झाला । सुघँ [ग]

---

१ आकाशामध्यें. २ दृश्याची अपेक्षा करणारी जी सकाम बुद्धि तिच्या ठायीं वृत्ति धांव घेत नाहीं असा भाव. ३ सोयरिक जुळविण्याच्या संबंधानें मध्यस्ती करणारा. हा शब्द सावंतवाडीप्रांतीं चालतो. ४ पूर्ण वैराग्यशील प्राज्ञ राजा. ५ भरास आलेलें, पिकून तयार झालेलें. ६ निरनिराळ्या प्रकारच्या अनेक चेष्टांला कारणरूप (भ० ६० अ० १८ श्लोक १४ पहा.) जे प्राण आणि अपान इत्यादिकांचे व्यापाररूप ' पवन ' (प्राणवायु) त्यालाही जामीन घेत नाहीं. ह्मणजे सर्वांत मुख्य जो प्राण तो आत्म्यापासून उत्पन्न होतो. पुरुषावर जशी छाया पसरावी तसा हा प्राण आत्म्यावर पसरला आहे. अर्थात् वैराग्य हें आत्मरूपाप्रत नेणारें असल्यामुळें छायारूप प्राणलाही तुच्छ मानितें असा भाव [प्रश्नोपनिषत् प्र० ३ मं० ३ ते १२ पहा.) ७ सुगृहिणीस=उत्तम पक्वान्नें बनविण्यांत निष्णात अशा स्त्रियेस.

रणी जैसा ॥ १ ॥ सोनें भरोनि राहिलें कसा । मग सोनास चढला खिवसा । कीं संसारासि भरंवसा । धनाचा जेवी ॥ ३ ॥ शिरीं जाहला प्रणवराव । मग लेखका चढली हांव । कीं नांदता देखोनि गांव । लोक येती ॥ ४ ॥ तो नागसर नादा मुके । मग भुजंग कांसया थोके । कीं कांटोळेंवीण तुके । कैसें ह्मणों ॥ ५ ॥ तो विवाही देखिला धनिक । मग हांवीं भरे संपादक । तेवीं उचित् झालिया सद्विवेक । ज्ञान धांवे ॥ ६ ॥ हा ज्ञानमाळियाचें उदक । प्रेमपरिमळाचें बिंक । वैराग्यवनाचा विवेक । वसंत कीं हा ॥ ७ ॥ ज्ञानपवित्रेचा पति । सौभाग्याघरची संपत्ति । कीं भजनतरंगआपांपाति । समर्थ कीं हा ॥ ८ ॥ विरक्त तरुवरांचा गिरिवर । कीं शांतिकल्हारां दिनकर । औदास्य चकोरां सुधाकर । शारदेचा कीं ॥ ९ ॥ हा योगीविहंगमां तरुवर । कीं निष्काम कमळां सरोवर । प्राप्ति सौभाग्याचा वर विवेक कीं ॥ १० ॥ पवित्रपणाचा रावो । सकळ कळांचा विसावो । कीं अनुभव नांदता गांवो । विवेक पैं हा ॥ ११ ॥ हा मूळ कळेचें ऐश्वर्य । कीं सकळ सौर्याचा सौर्य । अपरमीत वीर्य । विवेक पैं हा ॥ १२ ॥ निश्चयाचें जीवन । हा आपुलें अहेवपण । हा आपुलें परिमाण । प्रतितीचें पैं ॥ १३ ॥ हा आपुली निश्चयकलिका । हा आपुली ज्ञानदीपिका । सुफळें आला पिका । विवेक पैं हा ॥ १४ ॥ नियंतभुवनिंचा भूप । कीं अनुभव उमाणिचें

---

१ ॐकार राजा (वेदादि संहिता लिहितांना प्रथम ॐ हें सर्वमय असणारें अक्षर लिहीत असतात.) २ तोलमाप करण्याचा कांटा म्हणजे तराजू, त्यावांचून. ३ तोललें जातें असें कसें म्हणतां येईल? ४ बळ, तेज. ५ सागर. ६ पर्वतश्रेष्ठ. ७ परमहंस योग्याचा (हंसपक्ष्यांचा) आधारद्रुम. ८ सुर म्हणजे देव. तत्संबंधीं जे लोक (ब्रह्मादि लोक) त्यांना प्रकाशित करणारें जें द्वादश आदित्यात्मक तेज (सौर्य) त्याचेंही अधिष्ठान (श्वेताश्वतर उ० अ० ६ मं० १४ व भ० द्गी० अ० १३ श्लो० १७ हीं पहा.) ९ चिद्रूप वीर्य (रेत) बृ० उ०अ० १ ब्रा० ४ मं० ६ व भ० द्गी०अ० १४ मं० ४ हीं पहा.] १० मूळ "अहंब्रह्मास्मि" स्फुरणरूप जी स्फूर्ति तिचें. ११ सौभाग्य. १२ पृथ्व्यादि सर्व वस्तूंचें नियमन करणाऱ्या अनिर्वचनीय शक्तिरूप भुवनांचा भूप म्हणजे सर्व शक्तिमान (चैतन्य आत्मा) ईश्वर. १३ मोजण्याचें, अटकळ करण्याचें.

माप । दृष्टि न धरी पुण्य पाप । विवेक पैं हा ॥ १५ ॥ हा आपुली सहज मुद्रा । हा उल्हास हृदयसमुद्रा । घेऊं पाहे समाधिनिद्रा । विवेक पैं हा ॥ १६ ॥ हा संसारा वेगळा । स्वसुखें सेवूं सगळा । विपरीत दृष्टीसि पांगळा । पाय नेघे ॥ १७ ॥ हा इंद्रिय गुसंचा रा[1]खणा । मिरवूं नेणें थोरपणा । सर्वज्ञता देखणा । विवेक पैं हा ॥ १८ ॥ संसारतक्रीं नवनीत गोळी । कीं अन्वयदृष्टिची सायी गाळी । अविनाश जळींची [2]मासोळी । विवेक पैं हा ॥ १९ ॥ निश्चयदेउळींचा देवो । सद्भावाचा रावो । चैतन्याचा खेंवो[3] । विवेक पैं हा ॥ २० ॥ हा ज्ञानगंगातीर्थवासी । अविनाशमहीचा संन्यासी । अखंडिताचा उदासी । विवेक पैं हा ॥ २१ ॥ हा समाधींत निजों पाहे । हा विरोनि जियेला[4] होये । हा होवोनियां न होये । काहींच कीं ॥ २२ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने विवेकनिरूपणं नाम
षष्ठप्रकरणं समाप्तं ॥ ६ ॥

प्रकरण ७ वें.

(पूर्णबोधनिरूपण)

ॐ नमोऽव्यक्तरूपाय ॥ आतां विवेकाचें काय काज । कीं बुझों[5] राहिलें गुर्ज[6] । निजें[7] घेतलिया नीर्ज । भली आतां ॥ १ ॥ चारी

---

१ विवेक गुराखी. २ आकाशादि नित्य व अविनाशी वस्तुरूप जलांत असणारा मत्स्य आत्मा. (श्वे०उ०अ०६मंत्र १५ अवश्य पहा.) ३ आलिंगन. ४ जिवंत होतो. ५ समजावयाचें, जाणावयाचें. ६ गुह्य, गूढ, गुप्त. ७ स्वस्वरूप (सच्चिदानंद आत्म्यानें. ८ स्वतःची मूळची योगनिद्रा, उन्मनि अवस्था (निर्विकल्प स्थिति).

प्रहरें लोटले स्वभावें । मग रवीनें कांसया रहावें । कीं परिसत्याचीण बोळावें । राहिलें जैसें ॥ २ ॥ रिपु ना तो झुंजार । मग सहजेंचि राहिली तरवार । येता नाहीं तरि द्वार । झांकिलें जैसें ॥ ३ ॥ ना तो ऐकावया प्रबुद्धु । तरि बोलों न बैसे साधु । ना तो देखावया विरोधु । तरि निमाला कोप ॥ ४ ॥ नातें मोजावया भलतें । तरी मापें पडावेंचि पालथें । कां मग राहावें तीथें । दोषियांविणें ॥ ५ ॥ व्यापारा ना अगत्य । तरी द्वीपांतरा काय निमित्य । मग राहिलें जैसें पारिपत्य । रयतेविणें ॥ ६ ॥ करभार ना कूळ । तरि मुद्रिकेचें मूळ । मग सदरे बैसे तरि व्याकूळ । राजा म्हणों ॥ ७ ॥ मर्ज गमे निजेवीण । तया नाहीं दूषण । दधि ना तरी रवियें आवंतण । न सरे जैसें ॥ ८ ॥ ना तोखितां अलंकारें । तरि त्या सुवर्णी लपोनि राहिलें बरें । सुमन ना तरी भ्रमरें । निमावें कीं ॥ ९ ॥ नोहे स्वप्न स्वभावें जाण । तरि जागृतीसि कांसया धीटपण । सापचि तों नोळखे कवण । तरि कां वळावें दोरा ॥ १० ॥ जंव तें बावनें गाजे । तंव कस मुख दावूं लाजे । तेवीं वस्तुदर्शनीं विवेकराजें । निजावें झालें ॥ ११ ॥ कीं वि

---

१ यांतील रहस्य [भ०द्गी०अ०८ श्लो० १७।१८।१९ व त्यांवरील ज्ञानेश्वरीची टीका] जिज्ञासूंनीं पहावें. २ स्थिरबुद्धि, अति बुद्धिमान, ज्ञाता. ३ प्रजाजनांवांचून. ४ सोहिरेबा म्हणतात, मला असें वाटतें कीं पूर्वी सांगितलेलीं करभार देणारीं कुळेंच नाहींत तर राजानें आपल्या सदरेस एकाकी व्याकूळ होऊन बसणें भाग आहे, पण त्या कुळांना दूषण देणें योग्य नव्हे. कारण निजेवीण म्हणजे अहंवृत्तीवांचून [तयां] त्या कुळांना (इंद्रियांना) दूषण कसें देतां येईल? कारण सर्व इंद्रियांचा राजा मन त्याचाच मुळीं अभाव [म्ह० अहंवृत्तीं नाहीं तर अर्थात इदंवृत्ति (मन) हीं नाहीं) तेथें कुळ आणि करभार कुठला? असा भाव. जसें दहींच जर नाहीं तर तें घुसळून आंतून लोणी काढण्यासाठीं "रवीला" (ताक घुसळण्याची रवी) आमंत्रण करणें योग्य नव्हे. ५ अलंकाररूपानें जर प्रशंसेला आलें नाहीं (प्रशंसा करणे, वाखाणणें या अर्थी "तोखणें" हा शब्द वाडी प्रांतीं वापरतात.) तर त्या सुवर्णानें लपून राहिलेलें बरें! ६ जेव्हां सोनें बावन्न कशी या नांवानें गाजलें जातें, तेव्हां त्याचा कस तोंड दाखविण्यास लाजतो; कारण ज्या लगडीवर बावन्न कशी म्हणून शिक्का आहे तिचा कस पाहण्याचें कारणच नाहीं. ७ सद्वस्तूचें दर्शन झाल्यावर, विवेकराजानें स्वस्थ निजावें असें झालें. हा भाव.

वेक बीजा[1] सेवुनी सरे । वरि अक्षय अम्मल आंगीं उरे । बोध ऐसा निर्धारें । म्हणों येतो ॥ १२ ॥ कीं सेवुनी सरलें पीयूषें[2] । परि अमरत्वा आलें आयुषें[3] । बोध ऐसा निःशेष । म्हणों ये तो ॥ १३ ॥ कीं विवेक नवनीत कढोनि गेलें । वरि बोध घृत निपजतें झालें । कीं कुटितां लालपण आलें । हिंगुळका जैसें ॥ १४ ॥ विवेक गुलांबीसी[4] जो गेला । वरी बोध अत्तेरा[5] [अंतरा?] जन्म झाला । कीं फूल नासोनि फळा आला । परिणाम जैसा ॥ १५ ॥ साखर आटोनि सरली । परि हालवियाआंगें रूपा आली । कीं माध्यान्ही जैशी मिरवली । सूर्यकळा ॥ १६ ॥ चंदन झरोनि सरे । वारि शीतळता आंगीं उरे । उदा[6] येई रूप खरें । धूमें जैसें. ॥ १७ ॥ सुमना रूप सौरभ्य । आणि लाभा रूप अलभ्य । शब्दा रूप सभ्य । जयापरी ॥ १८ ॥ लज्जे रूप वसन । कीं संन्यासिया रूप आसनें[7] । कीं विषयां रूप व्यसन । जयापरी. १९ ॥ पवित्रे रूप सुगुण । कीं वेश्येसि रूप सुरेखपण । वेदाध्ययनें ब्राह्मण । रूपासि चढे ॥ २० ॥ वीरासि रूप धीर । कीं धीरा रूप तलवार । तलवारी रूप प्रखर । पाणी जैसें ॥ २१ ॥ घरासि रूप सति[8] । कीं सती रूप संतति । संतती रूप संपत्ति । जयापरी ॥ २२ ॥ वैद्यासि रूप औषधि जाण । औषधा रूप गुण । गुणारूप सतेजपण । शरीराचें पैं ॥ २३ ॥ वृक्षासि रूप वन । कीं वनासि रूप उद्यान । उद्याना रूप आपण । वसंत जैसा ॥ २४ ॥ कीं बीजा रूप अंकुर । अंकुरा रूप विस्तार । विस्तारा रूप सार । फळचि जैसें ॥ २५ ॥ कीं रतीसि रूप अनंगें[9] । अनंगासि रूप संगें[10] । जयापरी ॥ २६ ॥ कमळा अनुरागें[11] । कीं अनुरागा परागें[12] । परागा भ्रमर सांग । रूप

---

१ भांग, घोटा. २ अमृत. ३ चिरंजीवित्व. ४ विवेकाख्य गुलाबकळीचें रूप जो पावला. ५ गुलाबी अत्तर, हीना. ६ धूप वगैरे ७ योगासन [आसन हें योगांतील तृतीयांग होय. पातञ्जल यो० शा० चा अभिप्राय पु. साधनपादः २पृ० ४५ पहा.] ८ पतिव्रता, साध्वी स्त्री. ९ स्त्रीविषयक काम. १० स्त्रीसंग. ११ प्रीति, प्रेम. १२ पुष्परज (मकरंद).

जैसें ॥ २७ ॥ बोला रूप कर्ण । कर्णा रूप अंतःकरण । अंतःकरणा रूप सुवर्ण । अंबर जैसें ॥ २८ ॥ स्पर्शा रूप पवन । कीं पवना रूप त्वचा जाण । त्वचेतें आपण । मानस जैसें ॥ २९ ॥ कीं रूपा रूप दहन । दहना रूप लोचन । लोचना कारण । बुद्धि जैसी ॥ ३० ॥ रसा रूप उदक । कीं उदका जिव्हेचें बिक । कीं बिका आगाळिक । चित्त जैसें ॥ ३१ ॥ गंधासि रूप पृथ्वी । पृथ्वी घ्राणाचिये संभवीं । कीं घ्राणारूपा वैभवीं । अहंकार जैसा ॥ ३२ ॥ शारदे रूप शरत्काल । शरत्काला पूर्व वेळ । पूर्व वेळे रूप बाळ-। चंद्रमा जैसा ॥ ३३ ॥ ज्ञानासि रूप वीतराग । वीतरागा रूप निः [अ ?] संग । निः [अ ?] संगा रूप अभंग । साधु जैसा ॥ ३४ ॥ सहजावस्थे जाहलें बरें । बरवेपणा स्मरण नुरे । नुरलेपणा उरे । साधु जैसा ॥ ३५ ॥ तरुणीसि रूप सुकुमार । सुकुमारी रूप सुंदर । कीं सुंदरीस शृंगार । शोभे जैसा ॥ ३६ ॥ तेवीं भक्तीसि ज्ञानाचें भाग्य ज्ञानासि रूप वैराग्य । वैराग्यासि भाग्य । विवेकाचें ॥ ३७ ॥ विवेका विश्रांति बोध । आणि बोधज्ञां अंतरीं समाध । समाधिमाजी अगाध । वस्तुरूप ॥ ३८ ॥ जें घडलें ना केलें । आलें ना गेलें । झालें ना मेलें । देहासंगें ॥ ३९ ॥ नाहीं ना आहे । कीं पाहतां न पाहे । खावोनि न खाये । सर्वत्र हें ॥ ४० ॥ उदो नाहीं अस्त । अखंडित स्वस्थ । दृश्य पावे उदय अस्त । तयाचेनि ॥ ४१ ॥ विकाशलि-[स्याचाचि ?] याचा विमोद । परि तो चंद्र नोहे कुमुद । तेवीं देहांतराचा संबंध । आत्मयाचा ॥ ४२ ॥ अंगुलिनें [लें ?] चि उचलिती पावुलें । परि तो सूत्रधार नोहे कीं बाहुलें । तेवीं देहाचें आसेवलें । चैतन्या नाहीं ॥ ४३ ॥

---

१ सुंदर नीळवर्ण. २ आकाश. ३ अग्नि. ४ बळ, तेज. ५ शरदृतूंतील चंद्रिकेला (स्वच्छ चांदण्याला) ६ विरक्ति. ७ बोध झाले जे आहेत त्यांना. अंतरीं=शुद्धांतःकरणामध्यें. ८ प्रेक्षक जनांस मूळ बाळण्याविषयींचें जें सूत्रधाराचें हस्तकौशल्य, त्यानेंच कळसूत्री बाहुल्यांचीं पावलें उचलतात, यांत संशय नाहीं. पण तो सूत्रधारी स्वतः बाहुलें होत नसतो. ९ हा देह मी आहे असें मानून त्यासंबंधानें आशाबद्ध होणें.

भयाचेंचि उठे पाप । परि तो दोर नोहे कीं साप । तेवीं जडाचा आरोप । वस्तूसि नाहीं ॥ ४४ ॥ भुलीचि भासती भलती भलती[1] । परि तें स्वप्न नोळखे जागृति[2] । सूर्या कवण ती खंति । मृगजळाची ॥ ४५ ॥ उभासा भासला कवणु । परि तो भूत नोहे कीं स्थाणु । तया परी अप्रमाणु जीवजात हें ॥ ४६ ॥ ययापरी बोध अनुपम । परमधामाचें धाम । आंगा[3]थिलें प्रेम । सुरतीविणें ॥ ४७ ॥ प्रतितीनें प्रतिती आटली । लापणिका[4]ही खुंटली । कीं अद्वितीय प्रकटली । निजज्ञानकळा ॥ ४८ ॥ अहंपणाचा दुष्काळ । कीं परमसुखाचा सुकाळ । तल्लिनता केवळ । होऊनि ठेली ॥ ४९ ॥ कळा प्रकटली देवाची । वरी गंगा जोडली अमृताची । खेंवें[5] घेतली अमूर्ताची । बाहूविणें ॥ ५० ॥ आजि भक्तिभावाचा आनंदु । वरी पाहुणेर घेतसे चित्तसिंधु । मूळ पाठविला शब्दु[6] ध्वनिमात्रें[7] ॥ ५१ ॥ आजी कल्पतरु जोडला । कीं चिंतामणि हाता चढला । दधि [दुग्ध ?] डेरा भरोनि ठेला । कामधेनू [चाया ?] चा ॥ ५२ ॥ आजी सकळ सिद्धींचा रावो । जईं अवचित भेटला देवो । शून्यीं घेतला खेंवो । एकांतींचा ॥ ५३ ॥ आजीं परममृताचा घोंट । घेतां उतटलें[8] प्रतितीचें पोट । तृप्तिमाळीं शेंसपाट[9] । लाविला ज्याहीं ॥ ५४ ॥ आजी सकळ सुखाची सीमा । ध्वज लागला निजधामा । कीं अनुभव रमारमण आत्मा । ओळला आजी ॥ ५५ ॥ जो समाधि[10]व्योमीं सुधाकर[11] । उदेलिया प्रतीति फुटे अंकुर । आणि बोध हा चकोर । संतुष्ट

---

१ स्वप्नावस्थेंत भासणारी भूल भलत्याच प्रकारानें भासते. काय भासतें आणि काय न भासतें याचा नेमच नसतो. २ पण ते स्वप्नांतले पदार्थ जागृति मुळींच ओळखत नाहीं, ह्मणजे जागृतींत ते मुळींच दृष्टीस पडत नाहींत असा भाव. ३ उत्पन्न झालें, जडलें. ४ वैखरी वाचेची बडबड (लापटिका असा शब्द वाडी प्रांतीं चालतो.) ५ आलिंगन दिलें, मिठी घातली. ६ ॐ हा शब्द. ७ नादरूप. ८ भरून गेलें, तटतटलें. ९ शूद्र लोकांतील पुनर्विवाहास किंवा कोंकणांत भावणी देवाबरोबर लग्न लावतात त्यास शेंसपाट ह्मणतात. १० समाधिस्वरूप आकाशांत. ११ चंद्र.

जाहला ॥ ५६ ॥ आजि पूर्णकाम फळा आला । कीं अनुभव परब्रह्म झाला । कीं विझलेपणें विझाला । बोध कीं हा ॥ ५७ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने पूर्णबोधनिरूपणं नाम सप्तमप्रकरणं समाप्तम् ॥ ७ ॥

प्रकरण ८ वें.

(सहजसमाधियोग)

ॐ नमः श्रीनिर्गुणाय ॥ आतां आटलें काय आटावें । आणि फाटलें काय फाटावें । तुटलें काय तुटावें । नलगे जैसें ॥ १ ॥ एकटिया काय भेटावें । आणि सडिका[1] काय कुटावें । मोकळें काय सुटावें । नलगे जैसें ॥ २ ॥ कांसयानें बुडवावा समुद्र । कीं कैसेनि तोषवावा नरेंद्र । कैसें पाडावें छिद्र । आकाशासी ॥ ३ ॥ कांसयानें शृंगारावें सोनें । काय तृप्त करावें बोनें[2] । मोला प्रार्थावें धनें । काय आजी ॥ ४ ॥ निद्रेसि कोठें विश्राति । दीपा कांसया आरति । कुबेरासि कांसया संपत्ति । नूतन द्यावी ? ॥ ५ ॥ गंगेनें कवण तीर्थी न्हावें । चांदण्यानें कोठें उजळावें । हें महातेज ढवळावें । कवणिया तेजें ? ॥ ६ ॥ काय खोल कीजे आकाश । कैसियानें भिजवावा पाऊस । काय लुटिजे ओस । नगर पैं जैसें ॥ ७ ॥ मेलियासि काय मारिजे । जळलियासि काय जितें कीजे । सारीनें[3] काय जिंकिजे । पाशयातें ॥ ८ ॥ ह्मणूनि वस्तूचि वस्तु [वस्तू चिद्वस्तु ?] समर्थपणें । तेथ लघु श्रेष्ठ ह्मणावें कोणें । जड[4] चळे जडपणें । इच्छावशें[5] ॥ ९ ॥ लोह चाळो तरि चाळो कीं । परि तो काय तया अवलोकी । काय ते उखीविखी[6] । भ्रामका[7] तया ॥ १० ॥ समुद्र उल्हासो । कीं कुमुदें

---

१ सडलेले, चोख केलेले तांदूळ वगैरे. २ षड्रस पक्वान्न. ३ फाशांनी (जुवा) खेळावयाचा सारिपाट. ४ स्थूल शरीर. ५ इच्छाशक्तीच्या प्रेरणेनें. ६ खटपट, वादविवाद. ७ त्या लोहचुंबकाला.

विकासो । परि चंद्र तोषों । पडेचिना ॥ ११ ॥ लोक चालो । कीं कल्हार फुलो । परि रवि तो खुलों । नेणेचि कीं ॥ १२ ॥ कीं लोक पैं मिळो । कीं साप हा गिळों । परि दोरातें कळों । आलेंचि ना ॥ १३ ॥ स्वप्नीं भाग्य अभाग्य आलें । निद्रिस्था हर्ष-विषादें नेलें । तरि जागृतीचें काय गेलें । ह्मणतसें [मियां ?] ॥ १४ ॥ लक्ष पर्ण आला झडला । तरि अलक्ष तरु काय रोडला । त्यासी काय अडदेर आला । जडाचा पैं ॥ १५ ॥ पर [रि ?] माणू ? उंचलो । जीवजंत बोलों । परि धरा ते हालों । नेणेंचि कीं ॥ १६ ॥ लहरी गाजो । कीं गलबती निजों । परि चिंता नेदी वाजों । समुद्र जैसा ॥ ॥ १७ ॥ वनें विकासती । भ्रमर रुंजति । कोकील कूजती । परि वसंत तो उगा ॥ १८ ॥ तैसा चित्सिंधु समर्थ । जाणीव लवण तया आंत । विरालिया मग होत जात । तें आपुलेंचि ॥ १९ ॥ एक सत्ता जाहली सहज । आतां कैचें त्या चमत्काराचें चोज । म्हणोनि झालिया पुरुषाचें काज । सिद्धि नोहे. ॥ २० ॥ भुलतया काय भुलविजे । आणि भित्या काय भेंदराइजे । लज्जिता काय लाजविजे । श्रीमंतानें ॥ ॥ २१ ॥ वेड्या घालिजे धोतरा । कीं सकामा देइजे माजूम आहारा । मोडग्याँ लाविजे तुरा । जयापरी ॥ २२ ॥ मेष शोधितया (?) देणें मांस । कीं स्पर्धिया पाजिजे पीयूष । तेवीं सिद्धींचा रस । लोकां

---

१ अव्यक्त कूटस्थ वृक्ष. २ प्रतिबंध, अडथळा, अटक ३ सकल चराचर जें जड (क्षर) त्याचा. ४ घराच्या छपराच्या खिंडींतून घरांत पडणाऱ्या सूर्य-किरणांच्या लांबचे लांब ओळींत जे सूक्ष्म परमाणु दिसतात ते किंवा त्याहूनही अतिसूक्ष्म परमाणु असंख्यात उचलोत. ५ पृथ्वीवरील सर्व जीवजंतु आपापल्या वाणीनें शब्द गर्जना करोत. ६ परंतु त्यामुळें पृथ्वी कधींही (हालों नेणें) हालेल काय ? ७ समुद्रावरून चालणाऱ्या गलबतावरचा मुख्य दर्यावर्दी (तांडेल) गलबत चालत असतां बेपर्वाईनें स्वस्थ झोंपी गेलेला असो. ८ घाबरेंघुबरें करणें [भिदरावणें किंवा बेदरावणें हा शब्द बाकी प्रांतीं चालतो.] ९ धोतऱ्याचें विष. १० मोडगा किंवा मोरटा अथवा मोरशेंडा ह्या वनस्पतीस साहजिक आंगचेच तुरे असतात, त्याला आणखी नूतन तुरा तो काय लावायाचा आहे ?

यया ॥ २४ ॥ आधींचि दृश्याची आस । वरी सिद्धीचा घडे उपदेश । मग तत्काल अज्ञाना नाश । कैसेनि होय ॥ २५ ॥ असो तो ऐशियापरी साधु अनोखळखी [1] भुलीघरीं । विवेक श्रवणाचे द्वारीं । नाइकेचि हें ॥ २६ ॥ आणि महदादिक [2] भेटेना । परी प्रतिती जयाची पालटेना । आला वसंत परी आटेना । समुद्र जैसा ॥ २७ ॥ बैसो बळाची [3] कांबी । परी फुटों न शके [4] लांबी । उकलूं न शके [5] ठेंबी । पृथ्वी जैशी ॥ २८ ॥ दिसो रंगाचिसारिखा । परि विटों न कळे तया स्फटिका । ऐशिये प्रतितीं निका । [6] बोधस्थ जो ॥ २९ ॥ दिसतें तें नासतें । अविनाश संचलें असतें । हें दिसणें नासोनि वसतें । रूपचि कीं हें ॥ ३० ॥ आतां शृंगार बोलों तयाचा । तरी जेथ मन नाहीं [7] वाचा । ठाव बुडाला विवेकाचा । आनंदजळीं ॥ ३१ ॥ आजी अमरत्वा पूर आला । बोध अविनाशीं आटला । उदयो खेंवो भेटला । आपणा पैं ॥ ३२ ॥ आजी सूर्यावीण दिवस । चांदण्यावीण विकास । मेघावीण पाऊस । पडे कीं हा ॥ ३३ ॥ आजी पवित्र गंगेचें मज्जन । कीं अमरां अमृतभोजन । तृप्तासि तृप्तीपान । होऊनि ठेलें ॥ ३४ ॥ आजी चित्सुवर्णा सुवास । चिद्रत्नासी रस कीं परमामृताचा पाऊस । पडे कीं हा ॥ ३५ ॥ आजी

---

१ साधु भुलीच्या घरीं (अविद्यारूप भुलीचें घर) अनोळखी असतो. ह्मणजे भुलीचें घर त्यानें कधीं पाहिलेलेंच नसतें. २ भूल घालण्याच्या इच्छेनें "महामाया" [महत्तत्त्व] कां भेटेना? [भ० ही० अ० ७ श्लोक १४ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका पहा.] भेटेन=भेटेना काय? ३ बलवान मनुष्यानें जोरानें मारली आहे अशी कांब. (काठी, दांडा,) अशा कांबीचा धक्का बसो, परंतु ४ लांबी ह्मणजे अतिशय लवचिक पदार्थ, जो आघातासरसा प्रसृत होऊन पुनः जशाचा तसा होतो, असा किंवा शेतांतून धान्य कापून नेल्यावर मागाहून एक प्रकारचें लवचीक तृण उगवतें तें कितीही झोडलें म्हणून फुटेल काय? ५ मोठा दगड वगैरे भुईंतून उपटून काढावयाचा असला, ह्मणजे जंगली लांकडाचा वांसा खालीं घालून तो दगड उलटतात. त्या वांशास "ठांब" असें वाईप्रांतीं ह्मणतात. ६ आत्मबोधाच्या ठायीं स्थिर झालेला. ७ जें वाचा आणि मन यांस अगम्य असल्यामुळें तीं त्यापासून निवृत्त होतात. (यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसासह ॥ तैति० उ० व० २ अनु० ९).

चित्कनक अंकूरलें । आणि अलंकाररूपा आलें । मुक्त प्रतीतिनें केलें । आपुलेंचि ॥ ३६ ॥ आजी साधन यशासि आलें । कीं प्रतापा पुण्य जोडलें । कीं कैवल्यभुवन ठेलें । पिकोनियां ॥ ३७ ॥ आजी निद्रेचियां जळीं । नाद करितसे आंगोळी । कीं निरंजन दीपाची कळी । उदया आली ॥ ३८ ॥ आजि × × × × × पोशिलें । निरालंब गगन हरुषलें । सुखसंतोषें संतोषलें । चिन्मयची ॥ ३९ ॥ नोवरा चिंतामणि निर्भरू । यजमान कल्पतरू । कीं सौरसा सादरू । कामधेनु ॥ ४० ॥ आजी आत्मवसंताचा पूर्ण वर । वरी आनंदवनश्रीचा शृंगार । आंत गुंजारव करितसे भ्रमर । विवेक पैं हा ॥ ४१ ॥ प्रतीतिकुमारीचें अभिनव । वरिला वर चिरंजीव । कीं पदरा गांठी अनुभव ध्रुव । बांधोनि ठेला ॥ ४२ ॥ तो भक्तजनां कल्पवृक्ष । योगियां अलक्ष । तो भेटला अंतरसाक्ष । परब्रह्म ॥ ४३ ॥ जो सकलभूतहृद्गत । अजरामर अनादिसिद्ध । तो निष्कामकमळीं आमोद । होउनि ठेला ॥ ४४ ॥ जो योगभांडारवैभव । अभावितांचा अभिनवें । अलेख निरंजन देव । दयार्णव ॥ ४५ ॥ जो पुरुषार्थ पूर्ण काम । प्रीतिरसाचा पूर्ण विश्राम । जो हृदयभुवनींचा आराम । विराजला ॥ ४६ ॥ विरक्तांचा एकांत । निःसंगांचा सांगात । तो पूर्णप्रसादें अवधूत । वोळला आजी ॥ ४७ ॥ आजी पुरतें झालें पारणें । आजी प्रतीति मिळालें देवारणें । निदानाचिया निर्वाणें । मिनलों अजीं ४८ ॥ तो प्रबुद्ध वनवसंत । एकपणाचा एकांत । तो कृपाळ झाला भगवंत । भक्तांवरी ॥ ४९ ॥ जो भक्तगुणग्राहक । जो भजनपोटाचा पाइक । तयावरी जन-

---

१ सुषुप्तीसंबंधीं आनंदमय कोश (उन्मनिरूप जल यांत.) २ नादयुक्त प्रणवस्वरूप (अंगुष्ठमात्र) हृदयस्थ पुरुष [कठोपनिषत् अ० २ व० ६ मं० १७ पहा.] ३ अन्य आश्रयरहीत असें महदाकाश. ४ ज्याविषयीं कोणतीही भावना करितां येत नाहीं. (श्वे. उ. अ. ३ मं. २० पहा) अशा अव्यक्त कुटस्थाचा. ५ अपूर्व, अलौकिक. ६ अलक्ष, निर्लेप, मायारहीत एकांत स्थानीं वास करणारा स्वतःसिद्ध देव. ७ प्रसन्न झाला. ८ आत्मप्रतीति हेंच देवारणें=विश्रांतिस्थान, आधारस्थल.

नायक तुष्टला ऐसा ॥ ५० ॥ कैशी कृपा उपजली । दृष्टीची उतरली दृश्य मुली । वारिली हृदयाआंतुली । चिंताचि कीं ते ॥ ५१ ॥ बाप कृपेचा वेधु । कैशी लागोनि गेली समाधु । आववाच कीं चिर्त्सिधु । उल्हासला ॥ ५२ ॥ आतां काय वानणें तया । जेथ काया ना पैं माया । बोला नये बोलावया । वाचेमाजी ॥ ५३ ॥ ऐसें हें सुख अव्यय । परात्पर अप्रमेय । उदया आलें निरामय । आजि येथ ॥ ५४ ॥ देव साधूंचा बाप । साधु दवाच रूप । एक झाला दीपीं दीप । जयापरी ॥ ५५ ॥ आतां राहिला उल्हास । ग्रंथगोडीचा पूर्णरस । ऐसेंचि हो म्हणे सोहिरादास । श्रोतयांप्रति ॥ ५६ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने सहजसमाधियोगो नाम अष्टमप्रकरणं समाप्तम् ॥ ८ ॥

प्रकरण ९ वें.

गरुवाक्यप्रसादस्तवन.

ॐ नमः श्रीगुणात्मने ॥ एकनिष्ठेचिया नरेंद्रा । बोल बोलाचिया चंद्रा । देखत खेंवो समुद्रा । उल्हास होय ॥ १ ॥ तें हें चैतन्याचें रूप । तो बोलाचि तयाचा दीप । तें आंगचि जयाचें माप । उमाणितें ॥ २ ॥ अमृताहूनि विकती । अमोला सारिखे निघती । अरूपासारिखे तुकंती । बोलाचि कीं हे ॥ ३ ॥ अग्नीच जयाचा अंगार । वरि आंगाचि जयाचा शृंगार । तो धणीच होय बेगार । अर्था यया ॥ ४ ॥ ते वाटचि जयाचें जाणें । आणि आंगचि जयाचें न्हाण । तो सेविताचि होय भाणें । बोला-

१ निरुपाधि, व्याधिरहीत (परब्रह्म). २ आलिंगनाविषयीं प्रेमस्फुरण. ३ मोजण्याचें. ४ बरोबरीनें तोलले जातात, समतूल्य होतात. ५ मजूर, चाकर. ६ अन्न वाढलेलें ताट (अन्न वाढलेल्या ताटास, वाडी प्रांतीं कुळंबी लोक 'भाणें' असे ह्मणतात.)

चित्कनक अंकूरलें । आणि अलंकाररूपा आलें । मुक्त प्रतीतिनें केलें । आपुलेंचि ॥ ३६ ॥ आजी साधन यशासि आलें । कीं प्रतापा पुण्य जोडलें । कीं कैवल्यभुवन ठेलें । पिकोनियां ॥ ३७ ॥ आजी निद्रेचियां जळीं । नाद करितसे आंगोळी । कीं निरंजन दीपाची कळी । उदया आली ॥ ३८ ॥ आजि × × × × × पोशिलें । निरालंब गगन हरुषलें । सुखसंतोषें संतोषलें । चिन्मयची ॥ ३९ ॥ नोवरा चिंतामणि निर्भरू । यजमान कल्पतरू । कीं सौरसा सादरू । कामधेनु ॥ ४० ॥ आजी आत्मवसंताचा पूर्ण वर । वरी आनंदवनश्रीचा शृंगार । आंत गुंजारव करितसे भ्रमर । विवेक पैं हा ॥ ४१ ॥ प्रतीतिकुमारीचें अभिनव । वरिला वर चिरंजीव । कीं पदरा गांठी अनुभव ध्रुव । बांधोनि ठेला ॥ ४२ ॥ तो भक्तजनां कल्पवृक्ष । योगियां अलक्ष । तो भेटला अंतरसाक्ष । परब्रह्म ॥ ४३ ॥ जो सकलभूतहृद्गत । अजरामर अनादिसिद्ध । तो निष्कामकमळीं आमोद । होउनि ठेला ॥ ४४ ॥ जो योगभांडारवैभव । अभावितांचा अभिनव । अलेख निरंजन देव । दयार्णव ॥ ४५ ॥ जो पुरुषार्थ पूर्ण काम । प्रीतिरसाचा पूर्ण विश्राम । जो हृदयभुवनींचा आराम । विराजला ॥ ४६ ॥ विरक्तांचा एकांत । निःसंगांचा सांगात । तो पूर्णप्रसादें अवधूत । वोळला आजी ॥ ४७ ॥ आजी पुरतें झालें पारणें । आजी प्रतीति मिळालें देवारणें । निदानाचिया निर्वाणें । मिनलों अर्जी ४८ ॥ तो प्रबुद्ध वनवसंत । एकपणाचा एकांत । तो कृपाळ झाला भगवंत । भक्तांवरी ॥ ४९ ॥ जो भक्तगुणग्राहक । जो भजनपोटाचा पाइक । तयावरी जन-

---

१ सुषुप्तीसंबंधीं आनंदमय कोश (उन्मनिरूप जल यांत.) २ नादयुक्त प्रणवस्वरूप (अंगुष्ठमात्र) हृदयस्थ पुरुष [कठोपनिषत् अ० २ व० ६ मं० १७ पहा.] ३ अन्य आश्रयरहीत असें महदाकाश. ४ ज्याविषयीं कोणतीही भावना करितां येत नाहीं. (श्वे. उ. अ. ३ मं. २० पहा) अशा अव्यक्त कूटस्थाचा. ५ अपूर्व, अलौकिक. ६ अलक्ष, निर्लेप, मायारहीत एकांत स्थानीं वास करणारा स्वतःसिद्ध देव. ७ प्रसन्न झाला. ८ आत्मप्रतीति हेंच देवारणें=विश्रांतिस्थान, आधारस्थल.

नायक तुष्टला ऐसा ॥ ५० ॥ कैशी कृपा उपजली । दृष्टीची उतरली दृश्य भुली । वारिली हृदयाआंतुली । चिंताचि कीं ते ॥ ५१ ॥ बाप कृपेचा वेधु । कैशी लागोनि गेली समाधु । आघवाच कीं चित्सिंधु । उल्हासला ॥ ५२ ॥ आतां काय वानणें तया । जेथ काया ना पैं माया । बोला नये बोलावया । वाचेमाजी ॥ ५३ ॥ ऐसें हें सुख अव्यय । परात्पर अप्रमेय । उदया आलें निरामय । आजि येथ ॥ ५४ ॥ देव साधूंचा बाप । साधु देवाच रूप । एक झाला दीपीं दीप । जयापरी ॥ ५५ ॥ आतां राहिला उल्हास । ग्रंथगोडीचा पूर्णरस । ऐसेंचि हो म्हणे सोहिरादास । श्रोतयांप्रति ॥ ५६ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने सहजसमाधियोगो नाम अष्टमप्रकरणं समाप्तम् ॥ ८ ॥

प्रकरण ९ वें.

गुरुवाक्यप्रसादस्तवन.

ॐ नमः श्रीगुणात्मने ॥ एकनिष्ठेचिया नरेंद्रा । बोल बोलाचिया चंद्रा । देखत खेंवो समुद्रा । उल्हास होय ॥ १ ॥ तें हें चैतन्याचें रूप । तो बोलाचि तयाचा दीप । तें आंगचि जयाचें माप । उमाणितें ॥ २ ॥ अमृताहूनि विकती । अमोला सारिखे निघती । अरूपासारिखे तुकती । बोलचि कीं हे ॥ ३ ॥ अग्नीच जयाचा अंगार । वरि आंगचि जयाचा शृंगार । तो धणीच होय बेगार । अर्था यया ॥ ४ ॥ ते वाटचि जयाचें जाणें । आणि आंगचि जयाचें न्हाण । तो सेविताचि होय भाणें । बोला-

---

१ निरुपाधि, प्याधिरहीत (परब्रह्म). २ आलिंगनाविषयीं प्रेमस्फुरण. ३ मोजण्याचें. ४ बराबरीनें तोलले जातात, समतूल्य होतात. ५ मजूर, चाकर. ६ अन्न वाढलेलें ताट (अन्न वाढलेल्या ताटास, वाडी प्रांतीं कुळंबी लोक 'भाणें' असे म्हणतात.)

यया ॥ ५ ॥ जो रूपाचा दिवटा । कीं सुखाचा वसवटों । आवडे तरी मराठा । बोल ऐसा ॥ ६ ॥ जया बोलाचिया लोभें । श्रवणेंचि आंगा अम्मल झोंबे । ते कांबची घरा ओंबे । आत्म्याचिया ॥ ७ ॥ घरचि घराचा धणी । ते हे बोल चिरेखणी [बोलचि रेखणी ?] । कीं अक्षरचि हे लेखणी । बोलाची या ॥ ८ ॥ जो कर्मी गाळिला । अ [वि ?] कर्मीं आळिला । तरी बोलचि माळिला । सज्जनीं तो ॥ ९ ॥ चित्कळेचें रत्न । वरी रूपाचि जयाचा यत्न । तरी बोलचि कीं जतन । करावा तो ॥ १० ॥ अर्थचि जयाचा मार्ग । वरी अंग जैयाचें खग [खड्ग ?] । तरी बोलचि कीं स्वर्ग । सुखावा तो ॥ ११ ॥ मोक्षाचा पैं आगर । कीं प्रतितीचा सागर । तो बोलचि कीं नागर । सद्गुरूचा ॥ १२ ॥ सज्जनाची पेंठ । अनुभवाची मोट । कीं गुह्याची पेट । बोल ऐसा ॥ १३ ॥ जो मनातें मोडी । आणि भेदातें तोडी । तरी बोलाहुनि जोडी । कवण ती पैं ॥ १४ ॥ इंद्रियातें भोगवी । शांतीची पैं राणिवी । तरी बोलचि कीं इये गांवीं । पवित्र तो ॥ १५ ॥ धृतिसारंगां मधु । कीं कर्णचकोरां पूर्ण इंदु । की चेतन [ना ?] मीनां सिंधु । बोल ऐसा ॥ १६ ॥ आत्मरसाचें फळ । कीं विवेकतरूचें

---

१ आश्रय. २ घराचे छपराचे नळयांस खालीं आधारभूत असणारा लांकडाची कांब (रीप) अशा रिपांस वाडी प्रांतीं कांब असें ह्मणतात. इच्याऐवजीं बांबूंचाही फार उपयोग करितात. ३ ही कांब आधारभूत दांड्यावर (वाशांवर) दोरीनें बांधून घ्यावी लागते. त्या बंधनकृतीस “ ओंवणें ” असें वाडीप्रांतीं ह्मणतात. ती कांबच “ या आत्म्याच्या घरास ” आपण होऊनच ओंवून घेते. असा भाव. ४ याबद्दल भ० गी० अ० ४ श्लो० १६-१७-१८ पहा. ५ पवित्र सुषुम्नामार्गं ६ खग=पक्षी, राजहंस (सोऽहंहंसः) व खड्ग=तरवार रणांत [हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जीत्वा वा भोक्ष्यसे महीम् । भ० गी० अ० २ श्लो० ३७] याप्रमाणें तरवार गाजवून सिद्धि मिळविण्याविषयीं वीरपुरुषास साह्यभूत जें खड्ग तेंच ज्या बोलाचें अंग [अनासक्ति हें जें बळकट शस्त्र. “ भ० गी० अ० १५ श्लो० ३ पहा.”] आहे. असा भाव. ७ नागरीक, प्रभु, महाजन. ८ धृति=निजधैर्य. निजधैर्यस्वरूप जे धीर पुरुष हेच भ्रमर त्यांना. ९ पूर्णचंद्र. १० चेतनरूप जीवमीनांला.

मूळ । चित्कनकाचें चोखाळ[१]—। पणचि कीं हें ॥ १७ ॥ विवेकाचें साहित्य । आणि भ्रांतीचें पारिपत्य । तरि बोलचि कीं अगत्य । घेउं आम्हीं ॥ १८ ॥ अमृताहुनि भिजों । आणि समाधिमाजी निजों । तरी बोलचि कीं पुजों । आयताचि तो ॥ १९ ॥ ज्ञानरत्नीचें भांडार । वैराग्य वैरागैर[२] । स्वयंबोधाचा गिरिवॅर[३] । बोल ऐसा ॥ २० ॥ जो समाधिवर देता । चैतन्याचा हात धरिता । तरी बोलचि कीं साजता । आजि येथ ॥ २१ ॥ जे मौना [मौन्या ?] चें ओतींव । अकथ्याचें कथींव । चैतन्याचें भरींव । बोल ऐसे ॥ २२ ॥ प्रेमाचे अंकूर । पवित्रपणा येपूर । अन्याया भेदिते शर । तिखट ऐसे ॥ २३ ॥ सॉळीचि[४] जया गोडपणा । कमॉविलासे[५] [कोमाईलासे[६] ?] लॅाणा[७] । तैसा बोलचि ये परिर्माणा[८] । आजि येथ ॥ २४ ॥ पकतेचा पेरू । तो बोलचि तयाचा आदरू । त्यागाविणें सारू । तो अवघाचि हा ॥ २५ ॥ आंगाचि जयाची कुमारी । तो आपणचि नोवॅरा[९] नोवरी । एवढी बोलाची थोरी । येथींचिया ॥ २६ ॥ कोंवळिकेचा पॉडू[१०] । एकलिॅयाचा[११] निवाडू । भला जाहला गोडू । बोल ऐसा ॥ २७ ॥ मुद्रेचें रूप । योगाचें द्वीप । अव्यक्ताचा बाप बोल ऐसा ॥ २८ ॥ पुरुषार्थाचा पूर्ण । अव्यक्ताचा वर्ण । तो बोलचि होय अंतःकरण । आजि येथ ॥ २९ ॥ सहजाचें विधान । आत्मयाचा प्रधान । विराजतो निधान । बोल ऐसा ॥ ३० ॥ जया बोलाचिया संगें । मनचि पाठीं लागे । एवढें सामर्थ्य आघवें । जयाचे

---

१ चोख बावन्नकशी सोनें. [चोखाळपणाचि कीं हें.] बावन्नकशी चोख सोन्याचा स्वभाव. २ रत्नाकर, रत्नाची खाण. ३ पर्वतश्रेष्ठ. ४ जे बोल गोडपणाविषयीं केवळ 'साळीच' [साळी नांवाचें भात वाईप्रांतीं पिकतें. त्याचे तांदळांचें अन्न फार गोड असतें.] ५ कमावला गेलेला [उत्तम प्रकारें लागवड करून तयार केलेला] ६ कोमल, सुकुमार, मृदु असा ७ स्वतःच्या मालमत्तेंत लावणी केलेला [निर्वाणभूमींतला] ८ पूर्णावस्थेस, ब्रह्मरूपतेस. ९ पुरुष, प्रकृति. १० कोंवळिकेच्या संबंधानें पूर्ण असा. ११ एकाक्षर ब्रह्म ॐकार [एकमेवाद्वितीयम् × × छां० उ० ६।२।१] याचा निवाडा करणारा.

आंगीं ॥ ३१ ॥ जो संगातें सोडिता । आणि मोहातें तोडिता । तरी बोलचि कीं जोडिता । आमुचा आजी ॥ ३२ ॥ जागृतीचें तारुण्य । आणि निद्रेचें वृद्धपण । तरी बोलचि कीं भूषण । संतांचे हे ॥ ३३ ॥ विवेक जयाचे कान । किं विरक्ति जयाचे नयन । वैराग्य जयाचे चरण । चालते जे ॥ ३४ ॥ निर्गुण जयाची त्वचा । आणि निरा[1]ळ जयाची वाचा । अक्रीयत्व हस्ताचा । बडिवार पैं ॥ ३५ ॥ सत्रां[2]वी जयाची रसना । गगनें[3] जिराल मनां । अपरमीत आलें राना । पोटाचिया ॥ ३६ ॥ मनोगत तयाचा निष्काम । तो बोलचि होय आत्माराम । शाईदी[4] तया आरां[5]म । आपुला जो ॥ ३७ ॥ सामर्थ्य बोलाचिया रसाचें । कानां[6]मुखीं जाय कीं न वचे । आधींच समाधानाचें । दोंद पैं दिसे ॥ ३८ ॥ पां[7]गीवीण जया राया । सामर्थ्य जोडलें बोलावया । मग मायाउ[8]द्यमी तया पा[9]ड पुसे ॥ ३९ ॥ अनुकां[10]राचा अंकुर । अविकाराचा फां[11]गुर । तो बोलचि होय ॐकार । आजि येथ ॥ ४० ॥ मिथ्यापणेंचि देखिली । ते दिठी[12]चें [13]व्यापकीं संचली । आतां मोहिनी[14] म्हणे भुली । वाट कैंची? ॥ ४१ ॥ उदासपणाचा पोशिंदों[15] । कीं अमोल वेतना [16]आंदा । परमामृताचा रांधा । बोल ऐसा ॥ ४२ ॥ ऐसा

---

१ अन्य आश्रयरहीत महाशून्य. २ शक्ति, ज्ञानकळा. ३ महदाकाश. ४ साक्षी [साक्षीस 'शाय (इ?) दी' असा शब्द वाडीप्रांतीं वापरतात.] ५ स्वस्वरूपआनंद. ६ कानावर शब्द गेला कीं [कानामुखीं (कर्णरंध्रांत) जाय कीं] त्यांतला रस कानच आटोपून बसतात. (मुखीं न वचे) रस चाखणें हा जिव्हेचा स्वभाव, पण कान तिला तो मिळूं देतच नाहींत असा भाव. ७ ओशाळगतपणाविरहीत (इंद्रियांच्या पांगीशिवाय) इंद्रियपारतंत्र्याविरहीत. ८ व्यापार करविणारी (इंद्रियव्यापार करविणारी मायाशक्ति). ९ योग्यता, अधिकार (त्या बोलाची योग्यता पुसे असा भाव). १० अनुकरणाचा [सद्गुरुच्या बोलाप्रमाणें अनुसरण्याविषयींचा] त्याप्रमाणें वागण्याविषयींचा, अंकुर=कोंभ. ११ पल्लव गुच्छ. १२ दृष्टी. (ज्ञानदृष्टीच). १३ व्यापक चैतन्यआत्म्याच्या ठायीं. १४ मोह घालणारी जी अविद्या, अज्ञानदृष्टि ती ह्मणते कीं, आतां माझ्या भूल घालण्याच्या क्रियेला (क्रियाशक्तीला) वाट कुठली ? १५ पोषणकर्ता, अन्नदाता. १६ अमोल वेतनाचा संचय करणारा (जमा करणारा.)

बोल निघे नायक । वरी ज्ञान जयाचा पाइक । येणें संबोधि[1] (खि?) लें मायिक । विकृत जें ॥ ४३ ॥ ऐसे मुक्ताफळांचे मळे । कीं अमृताचीं आलीं फळें । ऐशीं अक्षरें रसाळें । सद्गुरूचीं ॥४४॥ चित्र आणि सुश्लोक । पंचानन आणि पाखं । तैसें बोलणें चोख । सद्गुरूचें ॥ ४५ ॥ मुके आणि बोलते । अंध आणि देखते । अरूप आणि सांहिसहिते [साहित्य ते । बोल ऐसे ॥ ४६ ॥ अलभ्य आणि लाभते । वंध्य आणि गाभते । आकुंचित आणि लांबते । बोल ऐसे ॥ ४७ ॥ कामधेनु साचार । कल्पतरूचा आचार । चिंतामणीचा पाहुणेर । बोल ऐसे ॥ ४८ ॥ परिमळ आणि नाद । कीं अमृत आणि प्रसाद । कुबेर आणि सिद्ध । बोल ऐसे ॥ ४९ ॥ सैंधव भेटों नेणें । समुद्रचि खेंव देऊं [वों ?] ह्मणे । तेवीं बोलें व्यापिलें दुजेंनाविणें । आपुलें अंग ॥ ५० ॥ भलतिये भ्रांतिचीं सोंगें । होऊं [वों ?] त कीं प्रसंगें । परि मुक्त होतील गंगें । लीलेंचि पैं या ॥ ५१ ॥ गगनचि उजळों लागे । अभ्र काय कृतकृत्यता मागे ? । तेवीं बोलाचिया आंगें । जीव कैंचे ॥ ५२ ॥ जळा नागरंपणाचे डोहळे । तरि तो तरंग कैसेनि हेळे । तेवीं भेटतया सोहळे । बोल हा दे ॥ ५३ ॥ गगन मुद्दल देऊं नेणें । घटा उद्योग कर ह्मणें । तेवीं अन्वयें शोभणें

---

१ तृप्त केलं, समजाविलें. संबोखिलें=बोधानें संतृप्त केलें. २ सुंदर. ३ सिंव्हाप्रमाणें (सिंहाप्रमाणें असून आणखी उडण्याजोगे पक्ष असले तर मग विशेषच ह्मणावयाचें. किंवा पाख=निर्मळ, स्वच्छ, शुद्ध. (" पाख " हा शब्द शुद्धपणाच्या बोधार्थ वाडीप्रांतीं वापरतात. ४ श्रुति स्मृति इत्यादि बोल बोलणारे आणि " नेति नेति " ह्मणून अबोल (मौन) धारण करणारे. ५ साहाही शास्त्रांनीं युक्त असणारे; साहित्य=अलंकारादि शास्त्रांनींही युक्त असणारे. ६ ऐक्यत्वानें (दुसऱ्यावांचून). ७ नगरसंबंधीं. (शहर व्हावें, कोरडी जमीन व्हावें असे डोहळे जलास झाले तर). ८ तरंग कसा उचंबळेल, उठेल ? ९ महदाकाश. १० अन्वय ह्मणजे ' अमूक गोष्ट असली तर अमूक असलीच पाहिजे असा जो नियम त्यास अन्वय ह्मणतात.

बोलें यया ॥ ५४ ॥ सुवर्ण ह्मणें मीपण असो । वारि मोहा ! तुज कवणही पुसों । तेवीं बोल ह्मणें हृदयीं बसों । वैरि[2] होऊं तें सुखें ॥ ५५ ॥ दोरत्व आपुलें न ढळो । वैरी[3] वैद्य केतुलाही मिळो । आणि भासाचें फूल माळो । साप हा सुखें ॥ ५६ ॥ जागृतीची धात्रिकां[4] । देखों न शके कलंका । तरि पडेल येथ फिकां[5] । येउं हें स्वप्न ॥ ५७ ॥ ऐशी बोलाची नवाई[6] । प्रेमासि निवती पाय उँवायीं[7] । तरी गुह्य तें कायी ? । उरों दे ? हा ! ॥ ५८ ॥ फोडोनि बोलाचें पोट । उरति [ते ?] या निघेना वाट । ऐसें केलें आपुल्या दाट । सामर्थ्यें येणें [जेणें ?] ॥ ५९ ॥ जेतुली वस्तूची पाइकी[8] । त्या आधींच बोलाची चौकी । असली पडिन्नली बाकी । बोल [ला ?] पदरीं [पत्रीं ?] ॥ ६० ॥ लाघव[9] बोलाचिया गोमटें[10] । रितीं देखों न शकति [ता ?] थाटें[11] । प्रतिती घालितो वांटे [प्रतितीचे घालितो वाटे ?] चैतन्याचे ॥ ६१ ॥ अमरां पाजितें पीयू [ष ?] ख । तें हें जाण महावाक्य[12] । येथें पारुषतें[13] ऐक्य । ह्मणणें पैं जें ॥ ६२ ॥ जेतुली वस्तूची[14] धांव । तो बोलाचाचि गांव । आद्यावसानिया राव । बोलचि पैं हा ॥ ६३ ॥ शून्य आणि सत्तेचे । निःसंग आणि गमतीचे । अक्रीय आणि प्रतितीचे । बोल ऐसे ॥ ६४ ॥ नवल सूर्य उदय [यि ?] ते । अद्वयाब्जिनी

---

१ सुवर्णाच्या डागिन्याविषयीं होणाऱ्या हे ! मोहा ! तूं अमूक डागिना आहेस काय ? ह्मणून तुला कोणीही पुसो. पण मी सुवर्ण आहें असें मीपण माझ्याठायीं नित्य असो ह्मणजे झालें. असा भाव. २ अलंकारभेदपरत्वें वरवर होणारें सुवर्णाचें रूपांतर बापडें सुखेंकरून होऊं द्या ! ३ आपलें रज्जुत्व (दोरपणा) न ढळो, वर—त्या दोरावर सर्प अशी कल्पना करून त्याचा दंश झाला म्हणून, वैद्य केवढाही समर्थ मिळवो. आणि हा साप आहे असा जो भास झाला तें भासरूपी फूल मस्तकांत सुखानें माळो. (फूल हातीं सांपडलें कीं, बायका मस्तकांत माळीत असतात. त्यावर हें रूपक केलें आहे). ४ माता, उपमाता, पृथ्वी, आधारभूमि. ५ निस्तेजपणाला. ६ अपूर्व चमत्कार. ७ निजसुखेंकरून. ८ शिपायागिरी. ९ लघु, कोमल बोलांच्या. १० चांगुलपणानें, मधुरतेनें. ११ पात्र समुदाय. १२ 'तत्त्वमसि' हें महावाक्य. १३ स्थिर होणारें. १४ सद्वस्तूची, आत्मवस्तूची.

खुलविते । सिद्धसाधकां डु [डो ?] लविते । द्रव्यावीण पैं ॥ ६५ ॥ निगम गोडीची पैं गोडी । भूल भुलविते गारुडी । शीण शिणविते काबाडी । मानसाचे ॥ ६६ ॥ आलेखाचे आलापी । पुण्य जोडते प्रतापी । अनित्याचे अनुतापी । बोल पैं ऐसे ॥ ६७ ॥ व्यापक आणि सोंवळे । जुनाट आणि कोंवळे । कीं तळहातींचे आंवळे । बोल पैं ऐसे ॥ ६८ ॥ ब्रह्मविद्येचे गृहस्थ । तत्त्व दाविते नेमस्त । कीं अद्वय अंमलाचे मस्त । शब्द पैं ऐसे ॥ ६९ ॥ आवर्तन देते सुवास । आदर करिते रस । कीं प्रकाश पाडिते पाऊस । बोल ऐसे ॥ ७० ॥ जामाता कल्याण मागते नित्य । ["कल्याण मागते" जामात ?] कीं राज्य राखते अमात्य । सुख प्रकटिते निमि [त्त ?] त्य । बोल ऐसे ॥ ७१ ॥ प्रीतीचे पांगिले । विरक्ति मागिले [मागितलें ?] । आनंदाचे दादुले । बोल ऐसे ॥ ७२ ॥ शाश्वताचे ऊर्जित । निवांताचे अर्जित । प्रमाणाचे प्रेमार्जित । बोल ऐसे ॥ ७३ ॥ सुमनरथाचे सारथी । भारतकथेचे भारती । पुरुषार्थाचे आर्ती । बोल ऐसे ॥ ७४ ॥ सिद्धफळाचे पुराणिक । स्मरों नेदिते आणिक । चित् झळाळाचे माणिक । बोल ऐसे ॥ ७५ ॥ प्रमेय आमोदींचे षट्पद । लवलवाचे मोद । कीं सिद्ध कलामृता बुद्बुद । बोल ऐसे ॥ ७६ ॥ पूर्णेंदु वाढितें काज । कलानिधीचा माज । कीं चैतन्य नांदतें राज्य । बोल ऐसे ॥ ७७ ॥ अर्थाचे गाढे । बोल धांवती वस्तूपुढें । निरालंबाचे मांडे । दुसरे कीं हे ॥ ७८ ॥ प्राज्ञतेचें पोट । कीं संज्ञेचा देंठ । दर्शनाचा शेवट । बोलचि पैं हा ॥ ७९ ॥ सकलार्थाचा मेळावा । ऐसा झाला

---

१ अनेक प्रकारच्या तालसुरावर ताना व आलाप घेणारे. २ आमंत्रण. ३ ओशाळगत असणारे. ४ आनंदमयाचे भोक्ते पुरुष. ५ वृद्धिकर्ते, उत्कर्ष-कर्ते. ६ भ्रमर. ७ लहान झाड रोंपा. या अर्थी हा शब्द सावंतवाडीप्रांतीं फार वापरतात.

बोल बरवा । तैं पाडें किल्ला तो चोंवों । विधिचौं कीं ॥ ८० ॥ मांदोडीचें उंचपण । एकुलाचि भोगी जाण । तेवीं बोल वस्तु हे आंण ; वाहिली आजी ॥ ८१ ॥ बोलाचिसारिखी बोली । ह्मणतया हे विद्या चुकली । आणि गोडी घेतयाची माउली । धन्य आजी ॥ ८२ आर्द्रता चीरंजीव । तरि तें जळ कैसनि पावे वै [वि ?] धव । तेवीं बोलेंचि आणिलें वैभव । ओढोनियां ॥ ८३ ॥ श्वेतता हेळूनि घे । तरी तें दूध कैसनि गोडी दे । तेवीं वस्तु मान नेघे । बोलावीण ॥ ८४ ॥ बोल सद्गुरुचा घेंडा । तरि जामात जैसा बापुडा । तो बोध न पवे कँवडा । एक देतां ॥ ८५ ॥ काष्ठपण चंदन धरी । तरि उटी केवीं आंगावरी । तेवीं सवती आणितां सरी । न लभे सुख ॥ ८६ ॥ रसनेवीण कैंची रुची । आंगावीण गति हेमाची । तेवीं बोलावीण चतन्याची । भेटी कैंची ॥ ८७ ॥ आनंदाचा कुंभ । आरंभाचा स्तंभ । तरी बोलाहूनि लाभ । कवण तो पैं ॥ ८८ ॥ लेवुनि बोलाचा शृंगार । अनुभव झाला सुंदर । भला जाहला आदर । आनंदासी ॥ ८९ ॥ ऐसा सद्गुरूचा महिमा । कीं पदरींच [धरिलें ?] बांधिलें प्रेमा । मुमुक्षु विहंगम विद्रुमां । सुकाळ केला ॥ ९० ॥ कैशी वाचा बोळली । कीं गंगाचि दुसरी प्रसवली । पूर्णते आली सावुली । आजि येथ ॥ ९१ ॥ कीं कैशी झाली वागेश्वरी । सद्गुण सुंदर सुकुमारी । देखत खेंवो [ऊं ?] इच्छा वरी । तृप्तासही ॥ ९२ ॥ हें बोल नोहे माप । पावलेपणाची जांप । तें अक्षरचि होय रूप । आपुलें कीं हें ॥ ९३ ॥ जो अखंडानंद गहन । सज्जनजनमनमोहन । तो देख लीलालालन । बोलरूपें ॥ ९४ ॥

---

१ ओसाड, रिता पडलेला. २ निस्तेज, सोपट झालेला. ३ ब्रह्मदेवाचा किंवा विधिनिषेध (कर्माचा.) ४ सभामंडपांतलें उंचपण ह्मणजे श्रेष्ठत्व. ५ शपथ. ६ नवऱ्याबरोबर सासुरवाडीस राहणारा त्याचा सोबती. ७ एक कवडी. ८ वृक्षाश्रयरहीत असलेल्या मुमुक्षु विहंगमांना वृक्षांचा सुकाळ केला, असा भाव. ९ शारदा, ब्रह्मकुमरी सरस्वति. १० प्रत्युत्तर.

जो व्यापक गुप्त गारोडी । मुनिजनवृंदांचा वरा [न्हाः ?] डी । तो गिंवसूनि[1] घेतली गोडी । बोलें येणें ॥ ९५ ॥ आतां किती वानावा धन्य । हा बोल नोहे चैतन्य । साकारचि शून्य । जयानें केला ॥ ९६ ॥ ह्मणोनि सज्जनीं परिसावें । ज अगोचर बोलेंचि फावे । सोहिरादास ह्मणे भोगावें । हेंचि पैं आतां ॥ ९७ ॥

इति श्रीपूर्णाक्षर्यामुत्पन्नज्ञाने गुरुवाक्यप्रसादस्तवनं नाम नवमप्रकरणं समाप्तम् ॥ ९ ॥

---

१ शोध करून, आकर्षण करून.

(२) अक्षयबोध.

प्रकरण १ लें.

(स्वस्वरूपसमाधिराजयोग)

ॐ नमोजी आद्यरूप विख्याता । सहज सिद्धसंकेता । निजानंद देहातीता । व्यापका तूं ॥ १ ॥ कायाकमळीं मकरंदा । सकल सुखानंदकंदा । निजात्मवृत्तिप्रबोधा । रूपातीता ॥ २ ॥ निजज्ञानिया उदधि । संकल्पातीत सन्निधि । अलक्षालयीं समाधि निवांतका तूं ॥ ३ ॥ वर्णव्यक्तिरहिता । योगसिद्धिअतीता । अपरांपरा अगणीता । विश्वरूपा ॥ ४ ॥ ऐक्यरूपीं अनेका । रावरूपीं रंका । रंकपणें आवांका । निजराजपदाचा धरिसी ॥ ५ ॥ ब्रह्मादिकांसि कानड्या । समदृष्टीसि उघड्या । एकीं एक निजनिवाड्या । आत्मरूपा ॥ ६ ॥ सिद्ध योगियांच्या जीवना । व्यक्त अव्यक्ति अभावना । कलाकुशलत्वीं नाना– । प्रकारिका तूं ॥ ७ ॥ विकारीं अविकारिका । बोध स्वभावें निष्टंका । भोगियांतें अमुका । परमामृता ॥ ८ ॥ योगनिधी अपरप्रेमा । अर्धनारीनटेश्वरनामा [नटनामा ?] । आतां स्वस्वरूपसारउगमा । बोलवीं मातें ॥ ९ ॥ सहजस्वभावें दीनेशें । शिष्य भाविला शबलांशें । आपणापें गुरुवेषें । बोलता जाहला ॥ १० ॥ या शबलांश शिष्याप्रति । शुद्धांश श्रीगुरु

---

१ गूढ (गुप्त) असणाऱ्या. २ अव्याहतसिद्धांतरूपा. ३ अर्धांग पुरुष व अर्धांग स्त्री याप्रमाणें असणाऱ्या, शिवशक्तिरूपा. (ज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतानुभवाचें प्र० १ ओं० १।२ पहा. ४ मायामिश्रित त्वंपदवाच्य जीवरूप अशानें.

निरूपिति । स्वयंभ प्रभा बोधमूर्ति । स्वसुखभोग ॥ ११ ॥ निजबोधाचें लक्षण । लक्षणीं दावी विलक्षण । सहजसमाधीचि खुण । साक्षिरूप जें ॥ १२ ॥ समाधिसहजींचा पुरुष । न धरी विषाद हरुष । आपें आपणीं खूष । सर्वदा सुखी ॥ १३ ॥ निजसुखप्राप्तीनें जो फुंजत[1] । सोहं शब्दें असे रंजत[2] । अनाहत[3] वाद्य वाजत । तया छंदीं ॥ १४ ॥ मेरूशिखरीं[4] बैसोनी । सूर्यप्रकाशासि देखोनी । चंद्रावरौता गंवसोनि[5] । बैसतसे जो ॥ १५ ॥ तया चंद्रासि समरोंधुनि[6] । उदधीजळ[7] शोषु [खु?] नि । वडवार्नल[8] हुताशनीं । आक्रम[9] करी जो ॥ १६ ॥ तया हुताशनमंडळीं । संततता करिजे भाळीं । आपसयांचि पाविजे रांउळीं[10] । मयंकाचिया[11] ॥ १७ ॥ सर्वे मयंकासी । निज सामर्थ्यें ग्रासी । तेथूनि पिंडपदा[12] निरासी । सहजेंचि होय ॥ १८ ॥ पिंडीं अवभास होय सहजें । चैतन्यांचि देखिजे समतेजें । मग इंद्रियें आपुलीं काजें । विसरतीच गा ॥ १९ ॥ इंद्रियां नाहीं इंद्रियपण । वेधलिया निजींची खुण । अवघाचि देखे आपण । समदृष्टि ॥ २० ॥ मग गोमती[13] ते कायसी ? । कवण देखे निज उल्हाशीं [सीं ?] । ऐक्यपणें होती पिसीं[15] । अनेकालागीं ॥ २१ ॥ सर्वेचि तो [ते ?] मूलबंधें[16] । कुंडलिनी भक्ष आमोद

---

१ फुगतो. २ रिझतो, सुख पावतो. ३ योगसाधनानें योग्यास आपल्या हृदयकमळामध्यें (योगशास्त्रोक्त अनाहतचक्रामध्यें) दहा प्रकारचा नाद ऐकूं येतो; त्यास अनाहतध्वनि असें म्हणतात. ४ प्रणवाच्या (ॐकाराच्या) शिखरावर. ५ प्राप्त होऊन, आरोहण करून, आच्छादन करून. ६ एक रस होऊन, एकत्र मिळून जाऊन. ७ सागराचें जल (चित्-उदधि.) ८ सागराच्या पोटांत असणाऱ्या अग्नीस "वडवानल" असें नांव आहे. त्या अग्नीच्या ठायीं. ९ आकर्षण करितो, प्रवेश करितो. १० देऊळ, राजमंदीर. ११ चंद्राच्या. १२ त्वंपदकार्य, स्थूल देह [शरीरास मी मी म्हणणारा जीव]. १३ इंद्रियबुद्धि; (गो=इंद्रियें+मति=बुद्धि. अहंबुद्धि, विज्ञान मति.) ते कायसी ?=म्हणजे, मग तिची पर्वा काय ? १४ आत्मानंदाच्या उल्हासामध्यें तिला कोण देखे=राहतो विचारितो असा भाव. १५ वेडीं (ऐक्यपणें इंद्रियें (ज्ञानेंद्रियें) वेडीं होतात; असा भाव. १६ ह्या बंधत्रयांबद्दल वगैरे माहिती श्रीहिरोबानाथकृत सि० सं० उत्तरार्ध पृ० २० सोबत चक्रकारिका जोडली आहे त्यांत आहे ती पहावी.

[प्रभेद ?] । सांडूनि धरी तें पद । वोढियाणाचें ॥ २२ ॥ मूलबंधासहित कुंडलिणी । वोढियाणा गिंवसी निर्वाणीं । पावावया उपलवणी । जालंधरातें ॥ २३ ॥ जालंधर देखे विशुद्धासी । षट्चक्र मांडणी सावेशीं । त्यामाजी आकर्षी । विशुद्ध चक्रीं चतुर्थ ॥ २४ ॥ सर्वे चहुं चक्रांचा अव्हांटा । लिंगतनासि आकळी निकटा । पुढां देखे प्रकाश दिवटा । ठाकलेपणें ॥ २५ ॥ तया प्रकाशाचि ये गावीं । जालंधर पावे लवलाहीं । तेथ देखे गोंवी । निजरूपाची ॥ २६ ॥ तया निजरूपालागीं । दृष्टिपातीं होती उगी । मग अदृश्य भूमिमार्गीं । लय लागे ॥ २७ ॥ सर्वे अदृश्य भूमिके पावतां । कल्पनानाश सतता । स्वस्वरूप देखे तत्त्वता । आपसयांचि ॥ २८ ॥ निजरूप देखतां सर्वे । पूर्व चुकला पावला शिवे । तेथ होय सहज स्वभावें । आपुला आपण ॥ २९ ॥ निर्गुण भूमिचा रावो । मिथ्या धरिला सगुण गांवो । आपुला आपण उगवो । विसरलाचि जो ॥ ३० ॥ विसरलाचि ह्मणो तरि । न बोलवे निर्धारी । निजात्मदृष्टि अंतरीं । प्रकाशतोही ॥ ३१ ॥ ऐसें हें प्रभूचें [प्रवृत्तीचें ? प्रभूतीचें] नवल । जाणत्याप्रति सखोल । नेणत्या पाडी भूल । चराचरीं ॥ ३२ ॥ जाणीव नेणिवेचें रूप । आपणाचि झाला संक्षेप । उभयपदीं निक्षेपं । नाहींचि कदां ॥ ३३ ॥ उभय पदातें शेखीं । जीव शिव हे ही नोळखी । निजसमाधिशेजे सुखी । पहुडणें जया ॥ ३४ ॥

---

१ आवेशानें युक्त होऊन. २ आखाडा, प्रतिबंध. ३ सूक्ष्म देहास. [वेदांतमताप्रमाणें=पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पंचप्राण, मन आणि बुद्धि हीं सत्रा मिळून लिंगदेह होतो. अन्य मताप्रमाणें पंचवीस तत्त्वें, मिळून लिंगदेह होतो. तीं तत्त्वें अशीं:—१ पुरुष, १ प्रकृति, १ महत्तत्त्व. १ अहंकार, ५ महाभूतें, ५ ज्ञानेंद्रियें, ५ कर्मेंद्रियें, ५ पंचविषय, मन मिळून पंचवीस.] ४ आग्रह धरणारा, पक्षपाती. ५ ठेव ठेवण्याची जागा. ६ शेवटीं.

जो सकैळ मतीचा गोंसावी । नाथिलाचि घराचार भावी । पाहतां जो अनुभवीं । पाहण्यातीत ॥ ३५ ॥ गृहधर्म करी आघवा । परि संसार नसे [ये ?] जयासि ठावा । सदोदीत विसावा । स्वस्वरूपिं जया ॥ ३६ ॥ स्त्री पुत्र कलत्र आघवें । असोनि जयासी नसावें । अकर्म कर्म ओळखावें । हें जाणें जयाचाचि तो ॥ ३७ ॥ कर्मीं अकर्म करितां । अकर्मीं सत्कर्म ये हाता । हें घडे तो जाणे निरुता । प्रबोध गा ॥ ३८ ॥ जीव शब्दींचें अकर्म । शिव स्वरूपिं होय नैष्कर्म । हें एक मुळिंचें वर्म । बंधे तोचि जाणे ॥ ३९ ॥ जेतुली बोलिजे प्रवृत्ति । तेतुली जयासी निवृत्ति । भासे ऐशी हे मति । कवण एक असे गा! ॥ ४० ॥ ऐक शिष्या शबल मति । शुद्धांश प्रबोध सततीं । आत्मप्रभा स्वयंज्योति । स्वसंवेद्य जे [जी ?] ॥ ४१ ॥ ऐशिया निजबोधाची दशा । निज दृष्टिसी परम प्रकाशा । देखे जो विशेषा । अधिकारभेदें ॥ ४२ ॥ अहो परब्रह्म परिपूर्ण । सगुणचि दिसे निर्गुण । निर्गुण पारखितां [परिक्षितां ?] हर जाण । नेणीव जाणीव ॥ ४३ ॥ जें निष्कलंक निर्द्वंद्व । कायाकमळीं आमोद । आमो [दा ?] दींहि सेविजे स्वाद । स्वादांतीं पैं ॥ ४४ ॥ स्वाद भेद बोलता-अर्थ । भोगावीण होय व्यर्थ । अर्थातीत असे अर्थ । जहींचा तहीं ॥ ४५ ॥ तया निज अर्थालागीं ।

---

१ सर्व जगाच्या वासना ज्या कारणावर अवलंबून असतात, अशा त्या कारणरूप बुद्धीचा. २ गोस्वामी, धनी [गो=इंद्रियें+स्वामी=प्रवर्तक सर्वांतर्यामी आत्मा] बुद्धीच्या ठायीं राहून, बुद्धीला अदृश्य, बुद्धि हेंच ज्याचें शरीर असें असून तो बुद्धीचें नियमन करितो, ह्मणून त्यास गोसावी असें ह्मटलें. ३ मिथ्याच, खोटा, नटाप्रमाणें वरवर. ४ विश्वप्रपंच. ५ पाहण्यापलीकडचा जो द्रष्टा एतद्रूप असणारा. ६ याविषयीं भगवद्गीता अ० ४ श्लो० १८ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका पहा. ७ अंगुष्ठमात्र हृदयस्थ पुरुष आत्म्याची धूमरहीत ज्योति [क० उ० अ० २ व० ४ मं० १२, १३ पहा.] ८ आपणास आपणच जाणारी. ९ भेदरहीत (सुख दुःख, किंवा शीत उष्ण अशा भेदद्वयांविरहीत. १० तत्त्व-मसि महावाक्याचा लक्ष्यार्थ जें निरुपाधिक क्रियारहीत परब्रह्म त्याला.

चलेन अर्थाची नसे [नलगे ?] सलगी । एकीं एक समआंगीं । असणें जया ॥ ४६ ॥ सम आंगें सर्व देखणें । इंद्रियें ओळखावीं इये खुणें । तरीच एक पावणें । पूर्व उगम ॥ ४७ ॥ पूर्व उगमाचें कायसें नवल । न धरिलिया हेतुं वो [बो ?] ल । स्वयेंचि असे मागील । स्वस्वरूप तें ॥ ४८ ॥ तया स्वस्वरूपाचा पार । नकळे दृश्य दृष्टीं [द्रष्टा ?] निरंतर । अव्यक्तालयीं परिकर । सहजानंद ॥ ४९ ॥ तया सहजानंदाचा महिमा । सांगतां तया अनुपमा । व्यक्तीसि [व्यक्तचि ?] उपजे प्रेमा । अव्यक्तसुखीं ॥ ५० ॥ अव्यक्तसुख निर्मळ । जया पिंडब्रह्मांडाचा नसे मळ । उभयपदीं केवळ । ब्रह्मचि उरे ॥ ५१ ॥ तया उरलिया सुखाशीं । कर्म धर्म लय पावे आपैसीं । एकचि निज निवाड उल्हासीं । क्रीडतसे जो ॥ ५२ ॥ ऐशिया महासुखाची गोडी । लागतां हरती विषयकोडी । इंद्रियवृत्तीची चाडि । हारपोनि जाय ॥ ५३ ॥ इंद्रियें असतांचि बापुडीं । होउनि पडती स्वरूप खोडीं [कोडी ?] । बांधोनि [बांधों न ?] पडती सांकडी । तया स्वरुपाघरीं ॥ ५४ ॥ तया स्वरूप-सुखीं रमतां । निजसुख लाभे [घे ?] तत्वता । द्वैतपणाची चिंता । हारपोनि जाय ॥ ५५ ॥ तया आत्मस्वरुपाशेजारीं । कोणीएक नसे

---

१ चलन, वलन, प्रसरण, निरोधन, आकुंचन इत्यादि सर्व क्रिया चालविणाऱ्या प्राणवायुरूप क्रियाकर्तृत्वरूप वाच्यार्थाची, किंवा पांच ज्ञानेंद्रियें आणि पांच कर्मेंद्रियें व त्यांच्या देणें, घेणें, चालणें, विसर्जन करणें आणि आनंद ह्या पांच क्रिया इत्यादि कर्तृत्वरूप वाच्यार्थाची. २ स्वर्गादि फलभोगाविषयींचा हेतुरूप ओलेपणा (ओल= ओलावा) किंवा केवळ कर्मसमूहाचे अनुष्ठान चालवीत असणारे बोल. वैखरीवाचेनें उच्चारले जाणारे शब्द. ३ अव्यक्त ह्मणजे जो अमूक एक प्रकारचा असा निवडून दाखवितां न येणारा कूटस्थ त्याचें आलय=घर (स्थान) ह्मणजे ॐ हें सर्वमय अक्षर [क० उ० अ० १ व० २ मं० १५ पहा.] ४ सुंदर. ५ व्यक्ति जो जीव त्यास किंवा व्यक्त जें जीवरूप त्यानेंच. ६ पिंड=शरिरास मी मी ह्मणणारा त्वंपदवाच्य जीव (कार्य) ब्रह्मांड=तत्पद कारण विराटदेह. ७ त्वंपद व तत्पद या उभयपदामध्यें (असिपदांत).

निर्धारीं । ऐशिये दृष्टीं भीतरीं । परिभ्रम [परिग्रह?] जाय ॥ ५६ ॥
निजबोध प्राप्ति आवंतिली । गुह्य देखीं[3] [गुह्यें देखिजे ?] जे उमटली ।
तेथ आत्मतत्त्वाची बोली । योग्य होय ॥ ५७ ॥ जेथें स [म?] ज्योति
चैतन्य केवळा । अंतलि [ळा ?] ळीं भासे लीळा । हे[6] उमटे जेथ जि-
व्हाळा । योग्य [ग ?] ऐसें ह्मणों ये ॥ ५८ ॥ जया चैतन्य अनुभवालागीं ।
द्विविध[7]पणें नराहे सलगी । एकीं एक पूर्णांगीं । ओळखणे [वळखणें ?]
जया ॥ ५९ ॥ तया निज स्वरूपाची ओळखी । घेतां पूर्ण दृष्टीं नोळखी ।
आपुला आपण याचि [हि ?] हरिखीं[9] । कोणासि मग ओळखणें ॥ ६० ॥
ऐशिया स्वरूप निवांतकीं[10] [निर्वातका] । दृश्य भास निरसे निका ।
अनेक रूपीं एका । देखणें घडे ॥ ६१ ॥ घडलिया सहजींचें सुख ।
कांहींच न राहे भवदुःख । शांति रूपें पूर्ण हरिख । होय जेथें ॥ ६२ ॥
ऐशिया स्वरूप प्राप्तिलागीं । उपायें[11] सांगती वीरअंगीं[12] [वीरंगी] । साधन
मार्ग वीतरागी[13] । सांगिजेति[14] ऐक ॥ ६३ ॥ भक्ति वैराग्य ज्ञान । विवेक
बोध प्राप्तिचिंतन । पूर्णानुभवें [वीं] साधन । कारकें जीं हीं ॥ ६४ ॥
ऐसें हें आचरण । करोनि पावावें निर्गुण । सहज निजींची खुण । जाणो-
नियां ॥ ६५ ॥ सांगितलीं भाविकें । विवेकादिक निकें । जाणोनियां
कौतुकें । पूर्ण ज्ञान आंतुडावें[15] ॥ ६६ ॥ जया स्वरूपाची [पुरुषाचा]

---

१ परिभ्रमण, जन्मरणरूप संसार परिग्रह=संचित, संग्रह, संग, आसक्ति हीं [जाय] जातात, लय पावतात हा भाव. २ स्वीकृत केली. ३ जी दिव्य दृष्टीच्या योगानें [देखी=पाहण्यानें] प्रकट झाली. ४ सद्रुपज्योति किंवा मीच जो सर्वव्यापी त्या सहज आत्म्याचा ज्योति. ५ सहजीं सहज. ६ आत्मज्योति, प्रज्ञाबुद्धि. ७ जीव आणि ईश किंवा जड आणि चैतन्य अशा द्विविधपणानें. ८ परस्पर संघटन, सहवास. ९ आनंदामध्यें. १० निश्चल स्वरूपाला किंवा प्राणधर्मचेष्टां विरहीत; अशा स्वरूपाला. ११ उपसाहित्य, अन्य उपाय. १२ योगांग निष्णात धनुर्धर; अथवा शूर+अंग=शूर बाणरूप अंगाचें धारण करणारे १३ वैराग्यशील. १४ पूर्वोक्त प्रकारच्या जनांनीं सांगतलेलीं. १५ प्राप्त करून घ्यावें.

महिमा । जन्म मृत्यू [त्या ?] चिया वोस ये ग्रामा । परम उल्हास सप्रेम । भोगणें घडे ॥ ६७ ॥ भोगणें तें भोगिल्या सत्य । अभोग्य संग सुटे अनित्य । परब्रह्म आंतुंडे [आंतुडिजे] अं [मित्य ?] मर्त्य । विमलत्वें ॥ ६८ ॥ ऐशिया निजप्राप्तीचा उपावो । शिष्यासि उपदेशी गुरुरावो । पूर्व विसरला उगावो । पावावया जो ॥ ६९ ॥ तें पुढील निरूपण । पूर्णानुभवाचें कारण । सोहिरादास म्हणे श्रवण । करावें श्रोतीं ॥ ७० ॥

इति श्रीअक्षयबोधेस्वस्वरूप समाधिराजयोगो नाम प्रथमप्रकरणं समाप्तं ॥ १ ॥

प्रकरण २ रें.

(स्वस्वरूप अद्वैत भक्तियोग)

श्री आद्य स्वरूपाय नमः । आतां भक्तीचा प्रसंग । गुरु बोलती यथासांग । जेणें पाविजे अव्यंगें [निर्वांग] । आत्म विषयींचें ॥ १ ॥ जये भक्तिचेनि महिमें । निजसुख पाविजे अनुपमें । म्हणोनि जाणावी उत्तमें । मुमुक्षीं हे ॥ २ ॥ भक्तिभाव बहुतां रीतिं । जे कल्पनेनें भाविती । कवण एक आराधिति । विषय सुखाकारणें ॥ ३ ॥ विषय विषयां भिन्नपण । एक भोगिती [मागती ?] निर्वाण । पावोनियां सहज खुण । सुखें असों ॥ ४ ॥ ऐसें एक कल्पिती । निजसुखीं रमती ।

---

१ प्राप्त होते. २ अमर किंवा ज्याला मिती नाहीं असें अपरंपार. ३ मूळचें (पूर्वीचें) जे मूळाज्ञान, त्याच्या योगानें जो आपल्या स्वस्वरूपाचा अनुभव विसरला होता तो प्राप्त होण्यासाठीं. ४ सांगोपांग परिपूर्ण. ५ मोक्षाची इच्छा करणाऱ्यांनीं. ६ अद्वैत भक्ति.

चुकविती पुनरावृत्ति । जन्ममरणाची ॥ ५ ॥ एक दृश्य दृष्टीचेनि योगें । ऐश्वर्य नाशवंत मागे । पुनर्जन्माचेनि योगें । अवगेतसे जो ॥ ६ ॥ सगुणचि रूपासि येउनी । निर्गुण पारखिजे [परीक्षिजे ?] निदोनी । तरीच देहभावें भंजनीं । दृष्टी चढे ॥ ७ ॥ देहभाव निरशाचें [निरासाचें ?] । महिमान सांगतों साचें । तेणेंचि एक निजाचें । पाविजे गृह ॥ ८ ॥ भक्ति भावाचिये वेळे [विवळें ?] । मानस व्हावेंचि कोंवळें । परब्रह्म केवळें । अनुभवावें ॥ ९ ॥ पडतां भक्तीचिया गैळें [गळालें ?] । व्हावें अहंकारा वेगळे । निजतत्त्व निराळें । दृष्टीं दिसे ॥ १० ॥ अहो निज दृष्टी निराळें । ब्रह्मावीण न न्याहाळे । ऐसें आनंदाचे सोहळे । भो [यो ?] गियांलागीं ॥ ११ ॥ तया भोगियांचे अभिधान । निजचाली नव्हे अनुमान । स्वरूपाहुनी दुजें ध्यान । नाहींच जया ॥ १२ ॥ भक्तींचें प्रेम गोड । पुरतें निवृत्तींचें कोड । आत्मसुखाची चाड । लागते जिहीं ॥ १३ ॥ भक्ति भावाचिया कोंदलेंपणें । आपें आपणासी देखणें । स्वरूपामृत निर्वाणें । प्राशन घडे ॥ १४ ॥ घडे ह्मणतां तें नघडे । नघडे ह्मणतां जिहीं घडे । ऐशिया सुखाचे पवाडे । बोलों न येती ॥ १५ ॥ भक्ति प्रेमें आंथिलेनें । सकळ नगीं देखिजे सोने । निजात्म दृष्टि चिंतनें । तेंचि घडे ॥ १६ ॥ सकळ दिसती ईश्वर तनु । जे देखतां न होती नूतनु [तनु ?] । स्वस्वरूप दिव्यमानु [भानु ? । प्रकाशित जें. ॥ १७ ॥ ऐशिया स्वरूप सम तेजें । सुखनिर्द्रेत जो फुंजे । आत्मस्वरूपाचेनि तेजें । सकळहि देखे ॥ १८ ॥ सर्वभूतीं असावी कळ [क ?] वळ । दुजें श्रमल्या आपणाचि केवळ ।

---

१ जाणतो. २ कारणाच्या ठायीं, शेवटीं ३ स्थूळ देहास मी मी म्हणणारा जो जीवभाव त्याच्या. ४ भक्तीच्या गळीं पडलें असतां किंवा गळालें=भक्तीची मधुर रसधारा सेवन केल्यानें. ५ लालुच, इच्छा. ६ व्यापकतेनें, पूर्णपणें भरून राहिल्यानें. ७ शेवटीं (कारणाच्या ठायीं.) मोक्षप्राप्ति झाल्याच्या योगानें स्वरूपामृत प्राशन घडतें असा भाव. ८ संपन्न झाल्यानें, पूर्ण झाल्यामुळें ९ प्रमत्त होतो (व्यापक होतो).

जये वृतिलागीं अळुमाळ । नसावीच तीव्रता ॥ १९ ॥ जये भूतदयेलागीं । वृताचिया पुतळेसि आगी । पावतां होय उगी । गति जैशी ॥ ॥ २० ॥ कीं उदधीचिया जळा । मयंक देखतां ये उसाळा । पूर्ण भरीं अवलीळा । नाहींच कदां ॥ २१ ॥ तेवीं परभूतें[3] देखतां दृष्टी । जया उपजे कृपादृष्टि । ते न होतीच कष्टी । कदां काळीं ॥ २२ ॥ जरीं द्यावया नसतीं विषय । तरी अंतःकरणीं प्रेम अप्रमेय । तरी तयांलागीं पाविजे निरय । हें कदांचिं नेहे ॥ २३ ॥ आपुलिया जांगां देवो । भावोनि करिजे भक्तिभावो । तेणेंचि एक पूर्णानुभवो । आंतुडेलगा ॥ २४ ॥ यया आपुलिया ठायींच देवाचें । स्थान सांगतों पूर्वीचें । जेणें हरेल जीवाचें जीवपण ॥ २५ ॥ सांडावया जीवाची भ्रांति । करिजे शिवाची भक्ति । तरी एतद्विषयींची युक्ति । सांगिजेल पैं ॥ २६ ॥ जे हे भक्ति करावया अंतरीं । निलय सांगतों निरंतरीं । जेणें निजसुखाची शाहारी । आपसयांची लागे ॥ २७ ॥ आधारकमलांतुनी[6] । वृत्ति लक्षिजे निदानीं । षट्दळावरी बैसोनी । ध्यान करिजे ॥ २८ ॥ तया ध्यानालागीं मूर्ति । अष्टदळीं पुजिजे निगुति । विष्णु दैवतचि निरुति । लक्षिजे प्रीतीं । ॥ २९ ॥ अष्टधा[7] प्रकृतिचेनि समांगें [संभोगें ?] । अर्चनीं[9] भाविजे युं[10] [यो ?] गें । तया लागीं लगवेगें[11] । आराधन कीजे ॥ ३० ॥ तया दैवतालागीं । नवविधा भक्ति करिजे संगीं[12] । आपणापें आसनालागीं । योजिजे काय ॥ ३१ ॥ हेंचि सांगिजे तुजप्रती । जेणें फिटे संशय

---

१ यत्किंचित्, थोडी. २ चंद्र. ३ अन्य प्राणि, (भूतमात्र) ४ प्राप्त होईल. ५ वेधकता (तन्मयता) ६ याबद्दल माहिती सोहिरोबांच्या, सि० सं० उ० अ. १० पृ. २६ तों २६ व पृ. २० सोबतची चक्रकारिका पहा. ७ भूमि, उदक, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार अशी आठ प्रकारें विभागलेली जी प्रकृति [भ० गी० अ० ७ श्लो० ४ पहा] ८ समांग= म्हणजे श्रेष्ठ प्रकृति जीवरूपा परा तिच्या योगानें. ९ नवविधाभक्ति पैकीं पांचवी भक्ति अर्चन; तिच्या ठायीं. १० परा अपरारूप प्रकृति युग्म (जोडीनें) अर्चनाच्या ठायीं (योगेंकरून) भावना करावी असा भाव. [सि सं. उ. अ० ११ पृ० ४३ येथें टीप आहे ती पहा.] ११ सत्वर, संवेगातिशयेंकरून. १२ सगानें.

भ्रांति । जेणें होय वैराग्य प्राप्ति । रोकडीच कीं ॥ ३२ ॥ तहीं पंचीकृत भूतांचे अंश । नवोपचारें अर्पावे विशेष । पृथ्वीभास निःशेष । तयालागीं ॥ ३३ ॥ सूक्ष्म मूर्ति [तें ?] भाविजे देव । स्थूल भासें भक्ति अभिनव । करावयाची वाटीव । अवधारिजे ॥ ३४ ॥ जोंप्रतें करिजे श्रवण । वैखरियें कीर्तन । अहंकारें करिजे ध्यान । तयालागीं ॥ ३५ ॥ गंधविषयें अर्चन । अपान गुद निरासें पादसेवन । क्रियाशक्तिचेनि दास्य भजन । करावें गा ॥ ३६ ॥ स्थूल भोगेंशीं वंदन । प्राण धनंजयेंशीं सख्यभावन । अकारें त्रिकूटेंशीं आत्मनिवेदन । अर्पावें तहीं ॥ ३७ ॥ अथर्वण वेदीं स्तवन । पिपीलिके निर्वाण । खेंचरिये लोटांगण । पहावें तेथ ॥ ३८ ॥ ऐसा हा भक्तिचा गोंधळ । घालिजे आपणांजवळ । तरीच पाविजे केवळ । निजतत्त्वतें ॥ ३९॥ इये भक्तिचेनि मेळें । देखिजे वैराग्याचे सोहाळे । देहभावासि कांटाळे । आपसयांचि जो ॥ ४० ॥ ऐसा वैराग्य कडाडां । पावे सर्वोचि रोकडा । आत्मस्वरूप निजनिवाडा । पाहावया जो ॥ ४१ ॥ जया वैराग्यालागीं । कांहींच नुपजे इंद्रियसल्गी । विषयवृत्तीची धगी । बाधेचिना ॥४२॥ तें सुख परमप्रेम । गुरुवदतील वैराग्यधर्म । सोहिरादास ह्मणे अनुपम । ऐकिजे श्रोतीं ॥ ४३ ॥

इति श्रीअक्षयबोधे स्वस्वरूप अद्वैतभक्तियोगोनाम द्वितीयप्रकरणं समाप्तं ॥ २ ॥

---

१ पंचीकरणकृतीनें बनविलेल्या स्थूल भूतांचे [पंचदशी तत्त्वविवेक श्लो० २४ ते २९ पहा.] २ नव उपचार=पुढच्या ओवींत सांगितलेल्या नव प्रकारच्या उपचारें करून. ३ पुरुषार्थ पराक्रम. ४ ऐकिजे [ऐक]. ५ स्थूलदेहाच्या जागृदवस्थेच्या योगानें. ६ धनंजय नामक प्राणवायूशीं. ७ अकार ही प्रणवाची प्रथम मात्रा [जागरित स्थान वैश्वानर हा अकार आहे. जसा अकार ॐकाराची प्रथम मात्रा आहे तसा वैश्वानर हा आत्म्याचा प्रथमपाद आहे [मांडुक्योपनिषत् पहा.] ८ ब्रह्मांडांतील विराट (स्थूल) देहास (साडेतीन हात शरिरास) त्रिकूट अशी संज्ञा आहे, त्याशीं. ९ योगशास्त्रोक्त पिपीलिका मार्गानें [सि० सं० उ. अ. १० पृ० ३।४ पहा] १० कडक वैराग्याचा प्रभाव. [ब्रह्मादि स्थावरांतेषु वैराग्यं विषयेष्वनु । यथैव काकविष्टायां वैराग्यं तद्धि निर्मलं ॥ ४ ॥ अपरोक्षानुभूति, आचार्य.]

प्रकरण ३ रें.

(स्वस्वरूपवैराग्ययोग.)

श्रीगुरुभ्योनमः ॥ आतां वैराग्याचें लक्षण । जिहीं पाविजे निर्वाण । सहज समाधीची खुण । आतुडे[1] ऐक्य जे [जें ?] ॥ १ ॥ वैराग्य तरी बहुतां परी । ऐक पां निजनिर्धारीं । दृष्टी भेदालियावीण अंतरीं । नव्हेचि तें वैराग्य ॥ २ ॥ अंतरदृष्टीवीण । वायांचि वैरागी [ग्यीं ?] होति निपुण । तरी तें मूढपणाचें लक्षण । सांगतों ऐक ॥ ३ ॥ एक त्यागिती अन्न । एक सेविती महावन । एक लटिकेंचि करिती ध्यान । डोळे झांकुनी ॥ ४ ॥ एक न शिवती वस्त्रीं । एक टांकिती स्त्री । परि त्यांते धरत्री । सोडीच ना ॥ ५ ॥ एक न घेती धन । बाह्यवृत्तीचें धरिती बंधन । परि अंतरकबंधविच्छेदन । ना कळेचि जयां ॥ ६ ॥ एक बोलती तीव्रप्रकारें । विषय भोगातें निर्धारें । एक मंजुळ बोलोनि उत्तरें । दाविती वैराग्य तें ॥ ७ ॥ एक उदासीच बोलती । एक मग्नभावें मिरवती । परि तया नव्हिजे प्राप्ति । निजसुखाची ॥ ८ ॥ एक नग्न फेरे करिती । एक जटा मोकाळिया सोडिती । परि निजवर्म न कळतां करिती । व्यापार ते गा ॥ ९ ॥ एक राख लाविती वायां । एक दंडिती काया । परि आत्मकळा शिष्य राया । न गमेचि कदां ॥ १० ॥ परि कां हें ह्मणसी उगें । तरि हीं ईश्वरीं [री ?] च सोंगें । परब्रह्म असे संगें । सोंगातीत ॥ ११ ॥ तरि हेंही करावें । परि आत्मस्वरूप जाणावें । जाणोनियां नेणावें । जहींच्यातहीं ॥ १२ ॥ आत्मकळा जाणीतलिया । आणि कवणहि वेषें विरूढलिया । शोभा पावे वहिलीया । निजतत्त्वीं ॥ १३ ॥ निजतत्त्वीं

---

[1] प्राप्त होतें. (ऐक्य=जीवशिवाचें ऐक्यत्व प्राप्त होतें हा भाव) यथार्थ दीपीका (वामन पंडीत) अ० १६ ओं० २१४ ते २१९ पहा.

[त्व ?] पावलियाची खुण । ते अनोरिसी आहे जाण । जये वृत्तीसि कडेविकेडीपण । नाहींच कदां ॥ १४ ॥ तयालागीं सकळैक हें । आपणावीण कांहींच नोहे । निजदृष्टि लवलाहें । वळखणें जया ॥ १५ ॥ तया पुरुषाचें लक्षण । स्फटिकाशिळेपरी जाण । उपाधिपणें जो जो गुण । तो तो दिसे तयालागीं ॥ १६ ॥ परी ते दोष तयालागीं । न लगतीच पां विरंगीं । अढळ रंगाचिया संगीं । अखंड असणें जयासी ॥ १७ ॥ तैसा आत्मबोधी । शांत [ति ?] क्रोधाची नसे आवंधि । क्रोध शांति हे द्विविधबुद्धि । न परिक्षिजे जो ॥ १८ ॥ तो क्रोधी ह्मणतां क्रोधी नव्हे । शांत दिसतां शांत नव्हे । ययापरी आहे । अतर्क्यपणीं जो ॥ १९ ॥ तो तयाचें मत । दुजिया न गमे सत्य । परमामृत अमर्त्य (अमित्य) । सेवितसे जो ॥ २० ॥ ऐशियापरि कवण [ण्या ?] हि वैर्णीं । असेल जो निजनिर्वाणीं । तोचि एक वाखाणीं । तत्त्ववेत्ता ॥ २१ ॥ वर्णीं असतां [तो ?] एका । आणि कर्मीं प्रवर्ते अनेकां । तो मानूं नये निष्टंका । मुमुक्षू [क्षा ?] परी [प्रति ?] ॥ २२ ॥ आपणा नोळखतां आचरण । तें अवघें उदरपोषण । तयालागिं जाण । व्यापार तेचि ॥२३॥ स्वधर्म सोडूनि दुजें करणें । हें तयालागीं नागवणें । संसारें [चि ?] शीं

---

२ वेगळीच २ चित्रविचित्रपणा (मायाकल्पित नामरूपात्मक जगद्रूप अवस्था चतुष्टयादि विचित्रपण). ३ विपरीत रंगानें आच्छादित असलेले (शुद्धसत्व गुणांखेरीज इतर लाल, काळा वगैरे रंगांनीं युक्त असलेले). ४ प्रतिष्ठा. ५ ब्राह्मणादि चार वर्णांपैकीं कोणच्याही वर्णांतला असो (सोहिरोबाकृत महद्नुभवेश्वरी अ. १ पृ. ५ येथें (टीप ११ आहे ती) पहा) ६ सांप्रत, साधारणतः ब्राह्मणादि वर्णांचे जे निरनिराळे वर्णाश्रमधर्म तदनुसार वागणें हाच स्वधर्म समजला जातो. परंतु संतांचें मत तसें दिसत नाहीं त्यांच्यामतें वर्णाश्रमधर्म वेगवेगळे असूं शकतील परंतु स्वधर्म सर्वांचा एकच असला पाहिजे. म्हणून भगवंतांनीही गीता अ. ३ येथें सांगितलें आहे कीं [श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥] हा स्वधर्म म्हणजे काय या विषयीं सोहिरोबांनीं "सिद्धांतसंहिता उत्तरार्ध" अ० १८ पृष्ट २६४ श्लो. ७५।७६ व त्यांवरील टीका यांत स्पष्ट खुलासा केला आहे. आणखी भ. द्वी. अ. १५ श्लो.

विटंबणें । संसारांत ॥ २४ ॥ स्ववर्ण सांडूनि दुजावर्णे । धरणें तें हें अश्लाघ्यपण । न पवेचि ते निजखुण । आत्मतत्वाची ॥ २५ ॥ अरे ! आत्मस्वरूप नोळखतां । आणि कर्मालागीं प्रवर्ततां । माता पिता न कळतां । पोर जैसा ॥ २६ ॥ तो पोरपणें विरूढे । बुद्धिबळ धरितो गाढें । परि पोर हें अभिधान [गोढें ?] निवाडें । न वेचेचि कीं ॥ २७ ॥ तैसा वेदश्रुति पढिन्नला । आणि आत्मत्वालागीं दुरावला । तयालागीं असे वहिला । दृष्टांत तो गा ॥ २८ ॥ तो सकळांतें गणी । बुद्धितर्क वाढवी दुणी । परि आपणातें नेणी । तो काय करावा ? ॥ २९ ॥ जो न्याय तर्क मेळवी । दुजियातें शिकवी । परी आपणाचि दुजा इये गावीं । न जाईच तो ॥ ३० ॥ निर्गुण भूमिकेचा एक । मी सगुण देशीं झालों अनेक । हें निजदिठींशि कौतुक न देखेच तो ॥ ३१ ॥ मुखें बोले अध्यात्म गोष्टि । परि अनुभवीं न पविजे दृष्टि । तयाची जे शब्दवृष्टि । आश्लेषा मेघासारिखी ॥ ३२ ॥ षट्रसपंक्तीं जो जेविला ।

१४।१५ व कठ उ. अ. २ व. ६ मं. १७ आणि श्वेताश्वतर उ० अ० ३ मं० १३ व बृ० उ० अ० २ ब्रा० ४ थें मं० ६ हीं जिज्ञासूंनीं अवश्य पहावीं.

१ आईबाप कोण हें न कळतां असणारा अर्भक बाल. असा लौकीक अर्थ परंतु रहस्यार्थान्वयें आई= त्रिपदा (वेदमाता) व पिता=प्रणव (ॐकार हिं होत. यांना न जाणतां कर्म करणारा. २ वचणें म्हणजे जाणें, गमन करणें हा शब्द व्रच्=जाणें या धातुपासून निघालेला आहे. हा गोंवें प्रांतीं सर्वत्र चालतो. ३ निर्गुण भूमि=स्फूर्ति (अहं ब्रह्मास्मि स्फूर्ति) आदिमाया. त्या भूमीचा एकच=निर्गुण ॐकार स्वरूप केवळ एकटाच. ४ सगुण देश=(गुणाः प्रकृति संभवाः । भ० द्गी० म्ह० १४ श्लो० ५) प्रकृति महामाया (भ० द्गी० अ० ७ श्लो० १४ पहा] या देशांत अनेक=या मायेंत प्रतिबिंबित झालेला जीव. जो; देव मनुष्य, पशु, पक्षी, या भेदेंकरून नाना प्रकारचा झाला आहे तो. ५ ज्ञान दृष्टि [दिव्य दृष्टीच्या] च्या योगानें. ६ वर्षाऋतूंत कोंकणांत आश्लेषा नक्षत्राचा जो पाऊस पडत असतो त्या वेळीं एका प्रकारचा वारा उत्पन्न होतो त्यामुळें पाऊस थोडा पण सळसळाट फार होत असतो. व या नक्षत्राचा पाऊस विषारी आहे असें मानितात. म्हणून त्याचा तादृश कांहीं उपयोग होत नसतो किंबहुना तो मुळींच नसावा अशी जन इच्छा करितात. ७ सहा प्रकारच्या रसांनीं युक्त अशा पक्वतेस आलेल्या अन्नांनीं.

आणि दुजियानें तयासी देखिला । तो तत्समान झाला । हें न घडेचि कदां ॥ ३३ ॥ भोजन षड्रस जेविल्या वीण । उद्गार दे तयाची तुळण । शब्दीं बोलतां साक्षेप खुण । तृप्ततेवीण केविं होय ॥ ३४ ॥ तैसें निज-ज्ञान साक्षेपें । मुखें बोलतां नव्हे सोपें । परात्पर श्रीगुरुकृपेंवीण तें गा ॥ ३५ ॥ श्रीगुरुचें महिमान । सांगतों तुज निदान । सकल कल्पनेचें निरसन्न । असावें केलें जयानें ॥ ३६ ॥ सकळ कल्पने वेगळा । तोचि गुरुत्वा जिव्हाळा । तयाचिया अनुग्रहें अवलीळा । नाहींच कदां ॥ ३७ ॥ तयाचेनि कृपावरदें । वैराग्य होय नुसदें । निजसुखस्वानंदें । असावया कारण जें ॥ ३८ ॥ तरि ऐक शिष्या सुमति । अंतरवैराग्यव्युत्पत्ति [वित्पत्ति ?]। जया वैराग्या विषमें मति । नाहींच काहीं ॥ ३९ ॥ प्रथम भक्ति आराधिला । पूर्य [र्यी ?] ष्टकावरील वहिला । तो विष्णु संचरला । वैराग्यवृत्ति ॥ ४० ॥ पूर्यष्टकीं अधिपति । विष्णु अभिमानी सततीं । वैराग्य [ग्यें ?] प्रदिप्ती । कडकडणें जया ॥ ४१ ॥ तयाचे जे बोलिजति अंश । सूक्ष्मभूतें अशेष । ते त्यागिती निःशेष । अनुभवयोगें ॥ ४२ ॥ प्रथम त्यागिजे सत्त्वगुण । ज्ञानशक्तीशीं शुद्धसत्त्वगुण । टांकूनि ध्यावें

---

१ याच अर्थान तुकोबांनीं ह्मटलें आहे [वेदांचा तो अर्थ आह्मांसीच ठाव । इतरांनीं वाहावा भार माथां ॥ १ ॥ खादल्याची गोडी देखिल्यासि नाहीं । भार घन वाही मजुरीचे ॥ २ ॥] २ ढेंकर. ३ विपरीत लीला (सिद्धिसामर्थ्यादि चमत्कार) ४ केवळ. ५ विपरीत भावना, विपरीत बुद्धि. ६ पहिल्या भक्तीनें ह्मणजे श्रवणभक्तीनें ७ राष्ट्रांत आठ प्रकारचीं (पुरें=नगरें ज्या देहांत ह्मणजे हिरण्यगर्भ लिंगदेहांत वसलीं आहेत, अशा त्या देहाला पूर्यष्टक अशी संज्ञा आहे [आणिक एक कौतुक । हा लिंगदेह जाण पूर्यष्टक । एकाग्र होउनी ऐक । निरूपिजेल ॥ ७ ॥ अविद्या काम्य कर्म । हें पुरत्रय ऐसें वर्म । अंतःकरणपंचक नाम । चतुःपुराचें ॥ ८ ॥ ज्ञानेंद्रियपंचक । तें पांचवें पुर सम्यक । षष्ठ पूर ओळख । कर्मेंद्रियपंचक ॥ ९ ॥ प्राणपूर सातवें । विषयपंचक तें आठवें । हें पूर्यष्टक जाणावें । महानुभावीं ॥ १० ॥ आद्यकवी श्रीमुकुंदराजकृत विवेकसिंधु पू० प्र० ५].

निर्गुण । पूर्ण रसीं ॥ ४३ ॥ मग त्यागिजे प्रविविक्त[1] भोग । हृदयेंशीं कंठस्थान असि [से ?] ग । स्वप्नावस्था निःसेखे[2] [निःशेग, निःसंग ?] । सांडिजे तयीं ॥ ४४ ॥ चित्त घेऊं नये सवें । प्राणाचें काज न व्हावें नवें । जिंकोनि इंद्रियां सांडावें । हेळूनियां ॥ ४५ ॥ रस विषयाचे टांकिजे काज । शिस्नेंद्रिया करिजे निस्तेज । तरीच पाविजे सहज । समाधिसुखातें ॥ ४६ ॥ मध्यमा वाचा टांकिजे । सामवेद तेथेंचि मर्दिजे । ज्ञानगंगें सहजें । करावें स्नान ॥ ४७ ॥ भूचर[3]मुद्रें पाहावी खुण । मीनमार्गें पाविजे निर्गुण । ययापरिचें लक्षण । सांगितलें तुज ॥ ४८ ॥ उकार श्रीह[4]रिचें त्यागणें । देवदत्तातें [देवतांते ?] टां [ठा ?] कणें । ययापरिचें भोगणें । वैराग्य तें ॥ ४९ ॥ सांडावें सगुण घर । सर्वत्र फिरणें निर्गुणीं निरंतर । स्त्रियेशीं न धरिजे स्नेहाचार । जीवाचिये ॥५०॥ स्त्री त्यागणें जीवाची । आस करणें शिवाची । तरिच एक मुळिंची । ओळखी घेइजे ॥ ५१ ॥ ऐशियापरिचें वैराग्य । होय आत्मत्वालागीं योग्य । तरीच होइजे भोग्य । पहिलिया सुखासी ॥ ५२ ॥ यासि [ही ?] बोलिजे वैराग्य निर्मळ । जें प्रेमानंदें रसकल्लोळ । येणेंचि पाविजे केवळ । परमतत्त्व तें ॥ ५३ ॥ वैराग्य संपलें याहीपरी । पुढें ज्ञान बोलिजे निर्धारीं । तें परिसावें चतुरीं । सोहिरा म्हणे ॥ ५४ ॥

इति श्रीअक्षयबोधे स्वस्वरूपवैराग्ययोगोनाम
तृतीयप्रकरणं समाप्तं ॥ ३ ॥

---

१ याविषयीं सोहिरोबाच्या सि०सं०पूर्वार्ध अ०७पृ०१६०टीप १ येथें कोष्टकांत सर्व खुलासा आहे तो पहावा. २ संपूर्ण किंवा अत्यत. ८ झिडकारून तुच्छमानून. ३ याविषयीं सर्व खुलासा " सिद्धांतसंहिता पूर्वार्ध व उत्तरार्ध " यांत दिलेला आहे तो जिज्ञासूंनीं पहावा. ४ प्रणवाची द्वितीयमात्रा " उ " आणि ' श्रीहाट ' यांचें (खाल्हमध्यें जी ज्ञानशक्ति राहण्याची जागा त्या स्थानास श्रीहाट म्हणतात.)

प्रकरण ४ थें.

(स्वस्वरूपज्ञानयोग)

श्री आद्याय नमः ॥ आतां ज्ञानाचा परिकर[1] । गुरु बोलती उत्तर । ते ऐकावी[2] निरंतर । निजात्म दृष्टि ॥ १ ॥ ज्ञानें ज्ञान परिक्षावें । अज्ञानें अज्ञान ओळखावें । ययापरि असे बरवें । निजज्ञान तें ॥ २ ॥ ज्ञानी म्हणवितां अज्ञान होतो । आणि अज्ञान म्हणवितां ज्ञानीच तो । ययापरि जहींचा तहीं तो । जाणोनियां विसरिजे ॥ ३ ॥ निजदृष्टीचें लक्षण । लक्षणीं घ्यावें परीक्षण । तरीच एक आत्मखुण । ओळखणें घडे ॥ ४ ॥ ओळखिलिया निज ज्ञानदृष्टि । लटिकीच दिसे सर्व सृष्टि । ययांतीं परमामृतवृष्टि । सेवणें घडे ॥ ५ ॥ ज्ञानदृष्टि उगवल्या । मागीळ स्वस्वरूप देखिल्या । समाधिसुखासि वांकुल्या[3] । दावितसे जो ॥ ६ ॥ समाधिसुखीं विरूढलेने । निजीं निजतसे समाधानें । मग तया भवबंधनें । न बांधिजति ॥ ७ ॥ भवबंधनाची गोष्टि । केविं बाधे पूर्णदृष्टि । आपणचि जाहलिया भूतसृष्टि । बंधन बाधे कवणासी ॥ ८ ॥ ज्ञान जाहलियाचें कारण कार्यासी पडिजे विसरण । तेंचि उत्तम एक जाण । ज्ञान ओळखावें ॥ ९ ॥ आपण होऊनियां ज्ञानी । दुजा न दिसेचि अज्ञानी । स्वस्वरूप अनुसंधानीं नित्य असणें जया ॥ १० ॥ नकळेचि हें आपण अनुभवी । निजीं निजप्राप्ति जोडावी । यया संशयाचिया गांवीं । नसेचि तो पैं ॥ ११ ॥ ज्ञान जाहलें जयासी । निजसुखें [खुणें ?] जो उल्हासी । द्वैतपणाची विवशी । नाहींच जया ॥ १२ ॥ सर्व देखतां समाधान । आपणचि एक चैतन्य । एतद्विषयींचें न्यून । नाहींच कदां ॥ १३ ॥ न्यूनीं न्यूनपणासि

---

१ विवेक, यत्न, सुंदर प्रकार. २ ते=ती. निरंतर असणारी निजात्मदृष्टि=ज्ञानदृष्टि, गुरु निवेदन करितील ती ऐकावी असा भाव. ३ वेडावणें, समाधिसुखालाही तुच्छ मानितो हा भाव.

देखतां । अन्यूनीं अन्यूनपणासि ओळखितां । उभय दृष्टीसि ऐक्यता । आहेचि जेथ ॥ १४ ॥ तया असलियाचें काय वेर्णे । उभयदृष्टि मिनल्याविणें । प्रवृत्तिनिवृत्तीचें तुळणें । कोण करी ॥ १५ ॥ कोणासि ये ज्ञानउ[१]गावा । समदृष्टीसि आघवा । एकिएक निजसुख ठेवा । पाहिलियाविणें ॥ १६ ॥ पावावयाची कसवटी । ते असे श्रीगुरुकृपेपोटीं [वाटीं ?] । जीचेनि निजांशें[३] विषयपरिपाठीं । न लगे दृष्टि ॥ १७ ॥ मुख्य ज्ञानियाचें लक्षण । निज देहीं करावें भ्रमण । दृष्टि फिरवोनि घ्यावी खुण । आपणियांची ॥ १८ ॥ आपणापेंशीं करितां गोष्टि । शबलें शुद्ध पावे उपरम-[में ?] दृष्टि । साधुत्वाचिया पदश्रेष्ठि । बैसणें घडे ॥ १९ ॥ जया साधुत्वालागीं । कंचुकपणाची न राहे सलगी । निज निवाड लागवेगीं । घेऊनि असे स्वस्थ जो ॥ २० ॥ स्वस्थीं [स्वार्थी ?] स्वस्थपणचि घ्यावें । अस्वस्थीं अस्वस्थचि आववें । हें जयाचें तयानेंचि पहावें । निजात्मबोधें ॥ २१ ॥ बोधशयनींचिया बाजे । आणि बोधांतीं जो पैं निजे । तोचि एक सहजें । पाहूं येई ॥ २२ ॥ पाहतां पाहणेंची गोडी । नुरेचि ते अपूर्ण आवडी । प्रेमोल्हासें लागली गोडी । स्वस्वरूप घ [प ?] रवडि इंद्रियां ॥ २३ ॥ मग इंद्रियां इंद्रियपण कायसें ? । कवण देखे पूर्ण कलशें । आपें आपण आपैसें । जाहलिया मग

---

१ ज्ञानाचा उदय. २ ज्या ज्ञानाच्या योगानें. ३ आपलाच सनातन अंश जो जीव [ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । भ० गीता अ० १५ श्लो० ७] त्याचें ज मृत्युस्वर्गादि लोकींचे विषयभोग किंवा शब्दादि विषय, त्यांच्या परिपाठीं=प्रचारांत, प्रसारांत, व्यापारांत. ४ योगाभ्यासानें चित्ताचा निरोध होऊन त्याचा उपरम (उपरम=मनांमधील रजतमादि दोष जाऊन तें शांत होणें, विराम पावणें) होऊन आत्म्याकडे (हृदयस्थ अंगुष्ठमात्र पुरुषाकडे) त्याची (योग्याची) दृष्टि परते ते, आणि तो योगी आपल्यामध्येंच आपण सुख पावतो. [पंचदशी, ब्रह्मानंदे योगानन्द श्लो० १०१ ते १०८ पहा.] ५ शबल=मायेमध्यें मिसळलेलें (गढूळ झालेलें) ब्रह्म शुद्ध=केवळ शुद्ध सत्त्व. हें ज्ञान आणि योग, यांहीं करून समजलें जातें. ६ आवरणाची (कवच धारण करणें, गुरफाटणें).

॥ २४ ॥ पूर्ण प्रबोधाचिये वाटीं । अक्षरस बोनें सांठी । तया सुखासी [चे ?] शेवटीं । उपमाचि नाहीं ॥ २५ ॥ उपमरहीत जी वस्तु । पाहतां सूर्य होय अस्तु । नुरेचि जेथ प्रहस्तु[1] । प्रपंचसहित ॥ २६ ॥ प्रपंचासि नाहीं प्रपंचपण । परमार्थी पाहतां निर्वाण । एकींच होइजे एकपण । जये ठायीं ॥ २७ ॥ ठायीं ठाव पावलियाचें । नवल सांगतों साचें । तहींचि एक निजसुखाचें । सांपडे गेह ॥ २८ ॥ तहीं ज्ञानाधिकार पातलिया । निर्जी पाहे निज विसाविया । पूर्णानुभवाचिया आयां[2] । कारण जे ॥ २९ ॥ त्याकारणीं बैसे निजवृत्ति । चंद्रसूर्यासि देखिजे निगुति[3] । तयेशिं[4] करिजे उपरमाति[5] । आत्मबोधें ॥३०॥ तया चंद्राचिये घरीं । आवंतन [आयतन ?][6] घावें समिरीं[7] । तेथ सत्रावीचे नीरीं[8] । शांत होईजे ॥ ३१ ॥ सत्रावीचें नीर । स्पर्शमात्र अंतर । पारि प्राशनाचें उत्तर । न बोलावें ॥ ३२ ॥ संजीवनिंचा पडतां पदर । गोल्हाटीं बैसे निरंतर । तेथ आघवें अंतर । निर्वाळिजे ॥ ३३ ॥ अंतरदृष्टिं निर्वाळितां । मेरूशिखरेशीं[9] तत्त्वता । पिंड[10] तेथूनि अवलोकितां । आघवाचि दिसे ॥ ३४ ॥ पिंडींचें शोधन करितां । सकळ सरिता[11] धांडोळितां । उदानासि[12] पारखितां [परिक्षिता ?] ।

---

१ विराट स्थूल देहाच्या हस्तासंबंधीं, इंद्र. [सूत्रात्मा] त्या सहित प्रपंच उरत नाहीं असा भाव. ऐतरेय उ० " ऐतरेय अरण्यकांतील अध्याय चवथा, खंड ३ रें. मं० १२, १३, १४ पहा.] २ प्रातीस. ३ चांगल्या प्रकारें. " निगुत " "निगूत करून" ह्मणजे उत्तम प्रकारें या अर्थी कुणबी वगैरे लोकांत हा शब्द वाडीप्रांतीं वापरतात. ४ त्या आत्मवृत्तीशीं. ५ शांत बुद्धि [स्थिर बुद्धि] विषयनिवृत्ति. ६ स्थान, आश्रम. ७ प्राणवायूनें ८ ज्ञानशक्तीच्या [अर्ध मात्रा किंवा अमृत सरोवराच्या] जलमध्यें. ९ मेरू=प्रणव (ॐकार अथवा त्रिकुटगिरी) त्याचें शिखर ह्मणजे अर्धमात्रेवरील [ँ] बिंदु स्वरूप. शिखरावरून पाहिलें असतां. १० त्वंपद, कार्य जीव ११ देहामधील एकशें एक मुख्य नाड्या (प्रश्नोपनिषत् प्र० ३ मं० ६ पहा). १२ प्रश्नोपनिषत् प्र० ३ मं० ७ पहा.

बुद्धियोगें ॥ ३५ ॥ तेथ कंठस्थानीं स्थिरपणें । बुद्धिचक्षूतें लावणें । उभयदृष्टि एकवटणें । जहींच्यातहीं ॥ ३६ ॥ तेथ चक्षु परिपाकें हिंडतां । कूर्म तयातें आधिष्ठिता । सुषुप्तीतें जागविता । जागलेपणें ॥ ३७ ॥ सुषुप्तीचा डहुळतां घोर । निर्जी निज देखे निरंतर । तेथ जाणीव दशा तत्पर । तेथचि राहे ॥ ३८ ॥ तेथ पादेंद्रियासी चढवणें । वृत्ति ऊर्ध्वी आकळणें । रूपविषयीं पारखण [परिक्षिणें ?] । आपणियांतें ॥ ३९ ॥ तेथ पश्यंती वाचा सहजें । गिंवसितसे समतेजें । यजुर्वेद बुझें । जहींच्या तहीं ॥ ४० ॥ तेथ भूचरी मुद्रेचें लक्षण । विहंगमें पावावें निर्वाण । जीव शिवपणाची खुण । ओळखिजे तेथ ॥ ४१ ॥ ययापरि ज्ञान निर्धारावें । पुढें विवेकदृष्टि पे [प्रे ?] रावें । मग सहज तें पावावें । कैवल्य पद । तें विवेकनिरूपण । गुरु बोलती आपण । सोहिरादास म्हणे श्रवण । करावें श्रोतीं ॥ ४२ ॥

इति श्रीअक्षयबोधे स्वस्वरूपज्ञानयोगो नाम
चतुर्थप्रकरणं समाप्तं ॥ ४ ॥

---

१ विवेककूर्म (सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका व पृ० ३३ श्लो० ५ व त्यावरील टीका पहा.] २ घुसळला असतां ३ घोर=(घोरणें) घोर अंधःकार ४ आच्छादन करिते, सांपडते. ५ समजला जातो ६ विहंगममार्गानें [सि० सं० पूर्वार्ध अ० ९ पृ० १९९ तीं २०३ श्लो० २१ तें २९ व त्यांवरील टीका पहा.]

प्रकरण ५ वें.

(सद्विवेकयोग)

श्री आत्मरूपाय नमः ॥ आतां विवेकाचें प्रकरण । पूर्णप्रबोधाची खुण । परात्पररूपें निपुण । सांगतों ऐक ॥ १ ॥ विवेक विवेक बहुतांपरी । एक करिती अन्यथा विचार । तैसें न करितां अंतरीं । निर्वाळिजे[१] विवेकें ॥ २ ॥ ज्या विवर्केकरूनि । वृत्ति पा[हो ?]-विजे समाधानीं । सहजपद निदानीं । स्थीर अशिजे ॥ ३ ॥ शबलशुद्धाचिये संधि । परिक्षिजे अविद्या[२] माया आधीं । तेथोंचि पाहिजे त्रिशुद्धि[३] । निजसुख तें ॥ ४ ॥ मूलप्रकृति ते निजरूप । जे तूर्याहि होय साक्षेप । तेथ निजप्रकाश लावण्यदीप । प्रकाशित असे ॥ ५ ॥ शुद्धमायेचें प्रतिबिंब । तेंचि अविद्याडबें[४] । तेथ निजरूपाचा कोंभ [ब ?] । न दिसेचि गा ॥ ६ ॥ अविद्या मायेचेनि योगें । चैतन्य विरूढलें त्रिगुणासंगें । तेणोंचि होउनि उगें । आपआपणां विसरलें ॥ ७ ॥ निजउगमाची पडली विसर । दृष्टीं दिसला संसार । अनेक दुःखाची कातर । भासली तया ॥ ८ ॥ सुखदुःखासि होइजे पात्र । पिंडस्थान[५] तें निजक्षेत्र । धरोनि न कळे जयासि सूत्र । अंब[त ?] [६]रींचें ॥ ९ ॥ झाला पिंडीचा रहिवासी । पडली अविद्या विवसी । ह्मणोनि न कळे तत्त्वमसि[७]

---

१ निवाडा करावा, निर्मळ करावें (निर्दोष करावें) २ रजस्तम मिश्रित काम्यकर्मादिकेंकरून दूषित अशी माया. ३ निश्चयें करून, त्रिवार खरें. (गुरुप्रतीति, आत्मप्रतीति आणि शास्त्रप्रतीति.) ४ गढूळ चिखलानें युक्त अशा पाण्यानें भरलेलें अविद्यारूप डबकें ५ त्वंपद कार्य [स्थूल शरीर] ६ आकाशांतलें (हृदयाकाशामधील अर्थात् ब्रह्मांडामधील.) ७ " तत्त्वमसि " हें सामवेदापैकीं छांदोग्य श्रुतींतील महावाक्य आहे. याचा अर्थ " सार्थ पंचदशी, महावाक्य विवेकाख्य प्रकरणांत केलेला आहे तो जिज्ञासूंनीं पहावा.

महावाक्य ॥ १० ॥ पापपुण्यासि म्याला । सत् असतें [संत असंतें ?] ओजि[चि ?]ला । पराधीन झाला । घरवासिया ॥ ११ ॥ अविद्या मायेसगें तयासी । आपलें झालीं विशेषीं । तयांसंगें अन्यथा उल्हासीं । क्रीडूं लागला ॥ १२ ॥ तयां आपल्यांसंगें क्रीडतां । कल्पनेनें वरिला तत्त्वता । जयालागीं स्वस्थता । नाहींच कदां ॥ १३ ॥ कीटक पींपिलिका आदिकरुनि । संसारीं पावे नाना योनी । तयीं मनुष्य देह धरुनी । देव भावी ॥ १४ ॥ नरदेहीं आला तरी । जीवशिवाहि निर्धारी । कामुकपणाचिये सरी । बांधलाचि तो ॥ १५ ॥ फल इच्छूनि कर्म करी । आपण जीव हें निर्धारी । ऐशिये मति जीवहारी । केविं होय ॥ १६ ॥ महत्कर्म आचरला । तरि तो जीवदशें थोरावला । म्हणोनि आत्माचि जाहला । म्हणों ये काय ? ॥ १७ ॥ आपुलिया मतिनें बहु पुण्य । करी तरी कर्म निर्माण । होय पुनरपि ठाणें । भोगावया जन्माचें ॥ १८ ॥ ह्मणोनि आत्मत्वालागीं । तो न योजिजे महाभागीं । निराकाराचिये आंगीं । पावलियाविण ॥ १९ ॥ सगुणदृष्टिं देव भाविला । तो तयाचि सारखा जाहला । जरि बहुत तुष्टला । तरि देईजे [जो ?] नाशवंत ॥ २० ॥ ह्मणोनि ययालागिं सांगतों । जरि सगुणचि भाविला तो । तरि निष्काम-बुद्धि आराधितो । आपणचि निर्गुण ॥ २१ ॥ तयालागीं करितां विनंति । आत्मप्रभावें पावे मुक्ति । मग सगुणपीठिका देहप्रतीति । प्राप्त होय तें निर्गुण ॥२२॥ ऐशियापरि चैतन्यनाथीं । जीवपणाची घेतली बुंथी । आत्म उगमीं सुख आंथि हें कळेचिना ॥ २३ ॥ म्हणोनियां नकळेपण । घेऊनि भाविलें सगुण । म्हणोनि तयातें निर्गुण । दुरावलें ॥२४॥ याउपरी सांगतों ऐक । जंववरि न वचे जीवाचा कलंक । तंववरि स्वस्वरूप निष्टंक ।

---

१ परमार्थ, सत्य (अव्यक्त कूटस्थ) ब्रह्म (स्वयकर्तृब्रह्म) तैत्तरीय उ० व० २ अ० ७ पहा. " असत्=नामरूप प्राप्त होण्यापूर्वीचा विश्वाची अवस्था ह्मणजे अर्थात् ब्रह्माची अविकृत अवस्था या अवस्थेस अव्याकृत म्हणतात [संत=शांत, स्थिर. आणि असत=चंचळ.] २ स्थापित केला, पूजिला. ३ जीवभावाचें हरण करणारा ह्मणजे ब्रह्मज्ञानी. ४ स्थान, ठाणें. ५ महान् तत्त्ववेत्या साधुजनांनीं. ६ खोळ, आच्छादन ७ आहे ८ जात नाहीं ९ निश्चयात्मक, खचीत, अमूकच असे,

नगमेचि कदां ॥ २५ ॥ देहाचाचि न गमे अंत । अविद्या करवी तें करित । इच्छाभूत होत । याचकापरी ॥ २६ ॥ भवभ्रमें व्याकूळ होत । दुजिया सोडवण करीं ह्मणत । ऐशियापरी आक्रंदत । सर्व भावें ॥ २७ ॥ हातिंच [1]नि [दा?] धान सोडूनि देत । संसार केरीं लपवित । तें शोधावया आणित । परदीप ॥ २८ ॥ परदीपाचेनि संघटें । जहीं रत्नमणि निवटे । ऐशिया साधनाचिये आटंघाटें [आडकांठें?] । पडिलाचि तो ॥ २९ ॥ परदीपें उजळिजे परेवरी । तेंव्हांचि आत्मसुख निर्धारीं । यया उपायनाचिये सरी । बांधिलाचि तो ॥ ३० ॥ ययापरि अविद्या संबंधें । पडला भेदीं द्विविधें । निजात्मदृष्टिबोधें । दूर केला ॥ ३१ ॥ देहाचीं या स्वसूत्रें । न गमतीच तया स्वतंत्रें । देहसोंग विचित्रें । भुललाचि तो ॥ ३२ ॥ अविद्येसंगें रमत । कल्पना आपलें निपजवित । मग तयां स्वाधीन होत । स्वच्छंदें पैं ॥ ३३ ॥ मूलप्रकृतीसि ईश्वरें । अवलोकिलें निर्धारें । तयीं उपज त्रिविध प्रकारें । त्रिगुणांतें ॥ ३४ ॥ तयां त्रिगुणांची नावें । रज तम सत्त्व स्वभावें । तयां समावेश होय सावांवें । महामायेंत ॥ ३५ ॥ तया त्रिविध अहंकारांशीं । त्रय–[तृतीय?] शक्ति निज मानसीं । निपजलियांची उल्हासी । सांगतों तुज ॥ ३६ ॥ एकेक अहंकार शक्तिसवें । प्रसवला

---

१ कारणरूप (ठेव) निजधन २ संबंधातिशयेंकरून ३ आडमार्गानें, आडकळ्याच्या वाटेनें गेल्यामुळें ४ संसारकेरांत लपलेलें निजधन शोधण्यासाठीं अन्य दीपाचें साह्य घेतो; परंतु तो दिवा दुसऱ्या ज्योतीनें प्रदिप्त व्हावा, तेंव्हांच त्याचा प्रकाश पडून वास्तविक उपयोग होणार ! अर्थात् तो दीप [अंतरांतला ज्ञानदीप] ज्योतिरूप पहिली वाचा जी परा तिच्या संयोगानें जेव्हां उजळला जाईल, (प्रज्वलित होईल) तेंव्हांच आत्मसुखाचा निर्धार होईल, एरवीं होणार नाहीं. तर तसें न झाल्यामुळें, पूर्वोक्त उपायांच्या खटपटीनें तो जीव बंधनच पावतो. असा भाव. ५ बरोबरीनें, साहचर्यानें. ६ त्रयशक्ति=क्रिया शक्ति, इच्छा शक्ति आणि द्रव्यशक्ति; ह्या होत. आणि तृतीय शक्ति असें ह्मटलें तर केवळ द्रव्य शक्ति [सि० स० पू० पृ० १६० पहा]

पंच महाभूतें अभिनवें । तयांचें प्रकरण सांगावें । तें सांगतों तुज ॥ ३७ ॥ निर्गुणीं झाला ओंकार । तेथ ओंकाराचा विस्तार । तेथ शून्याचा विचार । निपजला ॥ ३८ ॥ महाशून्यापासुनी । गगन निपजलें निदानीं । वायु तया गगनांतुनि । निपजला पैं ॥ ३९ ॥ वायुपासाव तेज । तेजीं आप सहज । आपेंहुनी पृथ्वी अ [न्न?] निजे । उद्भवली ॥ ४० ॥ यांपासोनि पंचभूतें । विभाग आले त्रिगुणां–[णि?] तें । पिंडीं आले क्रियमाणातें । सांगतों ऐक ॥ ४१ ॥ तामस अहंकार प्रसवला । द्रव्यशक्तीसि वि [अव?] लोकिलें । सर्वे विभाग झाले नभाला । पंचविषय ॥ ४२ ॥ रूपविषयाचेनियोगें । रस भाविला आंगें । प्रतिरसांसि समभागें । आवंतिला तो ॥ ४३ ॥ रसीं निपजला गंधगुण । तो पृथ्वीसि नेमिला जाण । रसासि आपीं निपजणें । रूप नांदे तेजीं ॥ ४४ ॥ स्पर्श उठे पवनीं । शब्द गगनीं । ऐशी हे भूतभावनी । आरंभिली ॥ ४५ ॥ ययापरि पंच विषय जाण । पंचभूतांचे उठिले गुण । तैसेंच पां जाण प्रकरण । सत्त्वगुणाचें ॥ ४६ ॥ सत्त्वगुण ज्ञानशक्तिसमवेत । पंच महाभूतें प्रसवत । अंतःकरणपंचक देखत । तयेवेळे ॥ ४७ ॥ अंतःकरण निर्विकल्प । मन संकल्प विकल्प । बुद्धि निश्चयो साक्षेप । चित्त चेतव्यता ॥ ४८ ॥ अहंकाराचा अहंभाव । देहाचेंचि मानी थोर वैभव । जीवभावाचें गर्व । न सोडीच तो ॥ ४९ ॥ अंतःकरणगगनीं । मन पवनीं । बुद्धि वसे वन्हीं । उदकीं चित्त ॥ ५० ॥ अहंकार मेदिनी । दृढ धरी भावुनी । पंचतत्त्वें निदानीं । येणें नामें ॥ ५१ ॥ राजस अहंकारासंभवें । क्रियाशक्तिचेनि नावें । प्रसवलीं जयासवें । महाभूतें ॥५२॥

---

१ निज [आत्मरूप] नव्हे अशी अर्थात् जड; किंवा अन्नज=जीपासून अन्न उद्भवतें अशी. २ पूर्वोक्त ॐकारापासून ३ स्थूलदेहाच्या आधारानें घडणारें जें कर्म, त्याप्रत ४ द्रव्यशक्तीला प्रथमतः ज्यानें अवलोकन केलें. असा. ५ भूतभावनाक्रिया (भूतभावन व्यापार)=सकल चराचर पंचमहाभूतादि सृष्टि उत्पन्न करून वाढविणारा ह्मणून त्या परमात्म्याला भूतभावन असें नांव आहे. याप्रमाणें त्या परमात्म्याची जी क्रिया ती. ६ अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार.

त्यांचें सांगतों अभिधान। श्रोत्र त्वचा चक्षु जाण। जिव्हेंद्रिय आणि घ्राण। हीं ज्ञानेंद्रियें ॥ ५३ ॥ आतां प्राणपंचकाचा। अभिप्राय सांगतों साचा। तरी ऐक पां निजाचा। भाव लक्षनि ॥ ५४ ॥ व्यान समान उदान। प्राण आणखी अपान। ऐसें हें जाण। प्राणपंचक ॥ ५५ ॥ आतां कर्मेंद्रियांचा। विचार सांगतों सदांचा। वाचा पाणी पाद साचा। पायु[1] उपस्थ[2] पांचवें ॥ ५६ ॥ ऐसे हे पंचवीस गुण। विश्व तैजसु प्राज्ञ आपण। यांहीं हिरण्यगर्भाचें वर्तन। लिंगदेह ह्मणोनियां ॥ ५७ ॥ लिंगदेहाचा विवर्त्तक। त्रय मात्रा[3] होती एक। ऐसें हें कौतुक। तेथील पैं जाणावें ॥५८॥ अकारेंशीं जागृतिपण। उकारीं स्वप्न जाण। मकारीं सुषुप्ति हे खुण। जाणावी गा ॥ ५९ ॥ जागृति नव्हिजे स्वप्नावीण। स्वप्न न पवे जागृति-खुण। स्वप्नाचें होय निर्दळण। सुषुप्तिठायीं ॥ ६० ॥ स्थूल न चले सूक्ष्माविण। सूक्ष्म बापुडें स्थूलाविण। या दोहींवीण कारण। चालेचि ना ॥ ६१ ॥ जागृति ते नाभी। स्वप्नाची ते हृदय गाभी। सुषुप्ति होय स्वयंभी। कंठमंडळीं ॥ ६२ ॥ कंठीं सुषुप्तीचें निदान। हृदयीं भोगी आनंदघन। हृदयींचें उद्भवन। कंठस्थानीं स्वप्नाचें ॥ ६३ ॥ अकार मिळे उकारीं। उकार खेळे मकारीं। ह्मणोनि त्रिविध प्रकारीं। अवस्था खेळती एकमेकीं ॥ ६४ ॥ययाप्रकारें लिंगशरिरीं। चैतन्य गुंतलें वासनेकरीं। म्हणोनि स्वस्वरुपाची विसरी। पडली तया ॥ ६५ ॥ यया सांगितलिया पूर्वानुक्रमीं। ओळखी नसे नित्य सुगमीं। म्हणोनि तया पुनर्जन्मीं। घडती फेरे ॥ ६६ ॥ जयालागीं सद्गुरुकृपेचा। अनु-ग्रह असेल साचा। तरीच लिंगतनूचा। ओळखिजे परिकर ॥ ६७ ॥ तये श्रीगुरुकृपेचिये गांठी। आहे अर्धमात्रा पेटी। ती उघडिलिया दिसे गोमटी। आत्मज्योति ॥ ६८ ॥ तये अर्धमात्रेचियायोगें। वासने ओळखिजे उगें। मग तयालागिं इंद्रियभोगें। नलगतीच दोष ॥ ६९ ॥

---

१ गुदेंद्रिय. २ जनेंद्रिय. ३ अ, उ, म. ह्या प्रणवाच्या तीन मात्रा.

जैसा सर्प हातीं घेतला । भयभास वायां झाला । मग तयासी पाळिला । कां ? न व्हावा ? ॥ ७० ॥ तैशी इंद्रियवृत्ति ओळखिली । ती चिंदुदकीं[1] लहरीसी गमली । परि ते स्वरुपाकार झाली । तेथ इंद्रियां पुसे कोण पां ? ॥ ७१ ॥ ह्मणोनि ते अर्धनारी वहिली । चतुर्थ[2] चरणांतें पावली । तेथूनियां नवली । प्रणवबिजाची देखें ॥ ७२ ॥ ती नारीरूपें नर । भावी निर्गुणाचा विचार । तियेलागीं पामर । विषयबाधा ती केवीं ? ॥ ७३ ॥ जैसा सोनार एकदां । हीणासि करी चोख बिरु [र ?] दा । तैशी अविद्येची आपदा । तुर्या करी निरसन ॥ ७४ ॥ सुवर्णकाराचिया उपमेतें । द्यावयालागीं ते उणिते । वचनें बोलों न ये सतेंतें । ह्मणोनियांच ॥ ७५ ॥ तो नाशवंत अग्नीतुनीं । नाशवंत हेम निवटी विमळुनि । तुर्या ते निजतेजाहुनी । जीवदशा करी सोज्वळ ॥ ७६ ॥ ऐशी अपर (अप्रतिम ?) प्रेम सुंदर नारी । आहे निजदृष्टिं निरंतरीं । तियेतें पावावयाचिये उतरि (तरि ?) । सांगतील पैं गुरुदेवो ॥ ७७ ॥ तें पुढील निरूपण । पूर्ण विवेकाचें परीक्षण । सोहिरादास ह्मणे श्रवण । करावें श्रोतीं ॥ ७८ ॥

इति श्रीअक्षयबोधे सद्विवेकयोगोनाम पञ्चम-
प्रकरणं समाप्तं ॥ ५ ॥

---

१ चैतन्यरूप सागराच्या जलामध्यें. २ प्रणवाचा चौथा चरण जो अव्यवहार्य, अपंचोपशम, शिव व अद्वैत असा आहे तो. [मांडुक्योपनिषत् पहा.]

प्रकरण ६ वें.

(स्वस्वरूपविवेक)

ॐ नमः श्रीआद्यायनमः ॥ आतां अर्धमात्रेची खुण । गुरु सांगती आपण । जियें होय ओळखणें जाण । आत्मत्त्वाचें ॥ १ ॥ तेथ तूर्यादशा बोलती । जी सूक्ष्म भूतांतें जाणती । ऐक्य मिळणीची मति । कळते पैं जियेतें ॥ २ ॥ सूक्ष्म भूतांची मांडणी । एकमेकीं खेळणी । सर्वदां दिसे तुळणी । पिंडाची पैं जियेतें ॥ ३ ॥ तिये तूर्य दशेची कसवटी । पिंडातें मागें लोटी । पुढें निर्गणातें निवटी । आपसयांचि ॥ ४ ॥ ती आपुलिया स्वरुपीं निर्गुण । आहे ऐशी पूर्ण खुण । जाणते पैं निर्वाण । प्राप्त दशा ॥ ५ ॥ ती निद्रेसि जाणे । सर्वदां जियेतें जागणें । त्रिविधावस्थांचें व्याकुळपण । न बाधेचि तियेतें ॥ ६ ॥ तूर्यावस्थेचें निदान । तेंचि जाणा पूर्ण चैतन्य । तयालागीं नाहीं न्यून । कदाकाळीं ॥ ७ ॥ ऐसें तें स्थान अपूर्व । जेणें पाविजे उगमपूर्व । सवें दिसतें सर्व । आपणाचि पैं ॥ ८ ॥ तये तूर्यदशेचें स्थान । तें जाण मूर्ध्निचें[१] अनुसंधान । तेथ होय अवलोकन । पिंडब्रह्मांडाचें ॥ ९ ॥ पिंडीं जैशी अनाव्रडी । धरिते ब्रह्मांडीं निर्गुण गोडी । निजरूपाची चाडी । न मोडेचि कदां ॥ १० ॥ तये तूर्य दशेची गोष्टि । उपलेंवणी[२] होइजे दृष्टि । पंचभूतांची सम [मे?] ष्टि । दिसे तियेतें ॥ ११ ॥ तया पंचभूतांचीं जनितें । तत्त्वें भिनलीं लिंगदेहातें । त्रिविध अहंकाराचेनि मतें [निमितें?] । एकमेकीं खेळती ॥ १२ ॥ आतां तयाचें प्रकरण । सूक्ष्म भूतांचें जाण । सांगतों तुज निर्वाण । ओळखोनियां ॥ १३ ॥ मनोरूपें पवनासी । बुद्ध्याकारें तेजासी । चित्तांशें उदकासी । गगन मिळतें

१ ब्रह्मरंध्राचे स्थानीं. २ विस्तार पावणारी (पिंडब्रह्मांड अवलोकन करणारी).

जाहलें ॥ १४ ॥ अहंकारें धरणीसि । नभ मिळे आपैसि। अधिष्ठूनि अंतः-करणासि । राहतें जाहलें ॥ १५ ॥ शब्दांशें नभासी । रूपविषयीं वन्हीसि । रसांशें जळासी । पवन मिळे ॥ १६ ॥ गंधविषयीं मेदिनी । आधिष्ठिली पवनीं । आपण होऊनि समानीं । राहिला तो ॥ १७ ॥ श्रोत्रांशें नभासी । त्वचांशें पवनासी । जिव्हेंद्रियें आपासी । तेज मिळे ॥ १८ ॥ घ्राणेंद्रियें पृथ्वीतें । तेज मिळे निरुतें । आपणापें सततें । चक्षु घेऊनि राहिले ॥ १९ ॥ व्यानांशें अंबरीं । समानांशें पवनीं निर्धारीं । उदानांशें अग्निवरी । उदक मिळे ॥ २० ॥ अपानें पृथ्वीसि । उदक मिळे आपैसीं । आपणापें स्थिरतेसी । प्राणरूपें राहिलें ॥ २१ ॥ वाचांशें नभासी पाणींद्रियें वायूसि । पादांशें तेजासी । पृथ्वी मिळाली ॥ २२ ॥ शिस्नेंद्रियें जळासी । पृथ्वी मिळे उल्हासीं । आपणापें गुदासी । घेऊनि बैसे ॥२३॥ ऐशिया पंचभूतांचिया खाणी । उमटती अंबरीं निर्गुणीं । ह्मणोनि जाहलिया उपलवणी । साक्षि येइजे जयाची ॥ २४ ॥ निरंजनीं निरंजन होऊनि राहे । तो कैसेनि दृश्य द्रष्टेपण साहे । हें जाणे तो न मोहे । रसज्ञ जो कां गुरुभक्त ॥ २५ ॥ ऐशिया साक्षीचा उपावो । तुज सांगतों अनुभवगांवो । तेथ निजसुखाचा ठावो । आकळे पैं तुजप्रति ॥ २६ ॥ तरि ऐक पां आतां । निजविवेक तत्त्वता । पावावयाची सिद्धता । सांगतों तुज ॥ २७ ॥ सवें द्विदल कमळांतुनी । वृत्ति लक्षिजे मूर्ध्नि । तैं आत्मस्वरूप अनुसंधानीं । पाविजे दृष्टी ॥ २८ ॥ आधीं कवळिजे मन । मग स्पर्शविषयासि तुळोन । समानासि वळखून । आणिजे भृकुटीं ॥ २९ ॥ पाणी त्वचेसि आवरण । कर्कश श्रवणाचें प्रमाण । धरोनियां निर्गुण । ओळखिजे पैं ॥ ३० ॥ औटपीठ म्हणती । अर्धचंद्र असे सततीं । परा वाचा बोलिजेती । तेथ पैं गा ॥ ३१ ॥ ऋग्वेदही बोलिजे तेथ । जो सकळ शास्त्रांचा मथितार्थ । तो प्रकटे

---

१ योगशास्त्रोक्त नेत्रस्थानचें दोन पांकळ्यांचें अग्निचक्र.

गुह्यार्थ । आत्मविषयींचा ॥ ३२ ॥ तेथ अनाहत नाद गाजे । तो होय श्रवण सहजें । मग प्रकाश कीजे निजतेजें । आपसयांची ॥ ३३ ॥ तेथ देह महाकारण । शुद्धसत्त्वगुण । सर्वेश्वर अभिमानी जाण । तेथील पैं गा ॥ ३४ ॥ तेथ अर्धचंद्रामृत । स्पर्शे जाण सतत । क्षुधे तृषेनें संतप्त । न होइजे कदा ॥ ३५ ॥ अनाहतध्वनिमाझारी । मन बैसे निर्धारीं । मग इंद्रियवृत्तिची हारी । न बाधोचि तया ॥ ३६ ॥ मन होय तेथ स्थिर । आत्मानुभव गमे निरंतर । अष्टांगबोधसंचार । होइजे पैं गा ॥ ३७ ॥ त्या बोधाचेनि महिमानें । सूक्ष्म भूतांची तुटती बंधनें । समाधिशेजे समाधानें । पहुडत असे जो ॥ ३८ ॥ येथ अविद्येसि ओळखिलें । निजसुख मोहरें देखिलें । तें पुढें सांगितलें । निजबोधें ॥ ३९ ॥ तें निजबोधाचें लक्षण । गुरु बोलती निरूपण । ऐकतां पावती निजखुण । श्रोते म्हणत सोहिरा ॥ ४० ॥

इति श्रीअक्षयबोधे स्वस्वरूपविवेकानिरूपणं नाम षष्ठप्रकरणं समाप्तम् ॥ ६ ॥

---

१ अनाहत नांवाचा शरीरांत (हृदयस्थानीं) आपोआप होणारा ध्वनि.
२ यमनियमादि योगाच्या आठही अंगाचा बोध. किंवा बृहदारण्यक उ० अ० ३ ब्रा० ९ मं० २६ पहा.

प्रकरण ७ वें.

:o:

(स्वस्वरूपबोधलक्षण)

श्री आद्यरूपायनमः ॥ आतां निजबोधाचें लक्षण । लक्षणीं दावी विलक्षण । स्वस्वरूप निर्गुण । अनुभविजे ॥ १ ॥ निजदेहीं बोध उठी । ऊर्ध्वमूळीं[1] चढे दिठी[2] । आत्मज्योतीसि पडे मिठी । सहजेंचि त ॥ २ ॥ काष्ठीं जैसा अग्नि । तैशी देहीं उपजे निमग्नि[3] । प्रकृतिपुरुषाचिये लग्नीं । उत्साह दिसिजे ॥ ३ ॥ निर्गुणींचिया वरा । सगुणी माळ घाली सुंदरा । मूळप्रतिसी उबारा । निजतत्त्वीं उठिजे ॥ ४ ॥ जीवरूपाचें साहित्य[4] । शिवाहीं अर्पिजे नित्य । तया सुखासि मिति[5] । नाहींच कदा ॥ ५ ॥ त्या साहित्याचें नवल । सांगतों तुज सकल । अविद्या कल्पनेचे बोल । अर्पिजे तेथ ॥ ६ ॥ देहीं उठे जो कां अनुभव । देखिजे चैतन्य स्वयमेव । मग संशयाचें नांव । नसेचि कांहीं ॥ ७ ॥ अवघाचि दिसे स्वयंप्रकाश । प्रकाशीं दृश्यदृष्टि निरास[6] । तेथ पाहण्याची आस । बोलोंचि नये ॥ ८ ॥ आपणचि आघवा जाहला । तेथ कोणें देखे कोणाला[7] । म्हणोनी देखणेंचा वहिला । ठावचि नाहीं ॥ ९ ॥ देखणें तें कवण्यारितीं । चर्मचक्षूंची[8] न-

---

१ प्रपंचरूप अश्वत्थ वृक्षाचें मूळ (पुराणपुरुष) जें वर आहे तेथें. [भ०गी०अ० १५श्लोक १ पहा.] २ दृष्टि. ३ देहाच्या आंत असलेला अग्नि [ज्ञानाग्नि] वैश्वानर [बृ०उ०अ०५ब्रा०९ पहा]. त्याच्याशीं निमग्नता [तन्मयता] उत्पन्न होते. असा भाव. ४ याविषयीं सोहिरोबांनीं ' महदनुभव '–ग्रंथाचा अ० ३ ओ० १०० ते २०० ' येथें विवरण केलें आहे, तें जिज्ञासूंनीं पहावें. ५ मिती, पारावार. ६ जागृतींतील नामरूपात्मक दृश्य पदार्थ, प्रत्यक्ष पाहणारी दृष्टि [स्थूल दृष्टि] तिचा लयच होतो. असा भाव. ७ जेथें द्वैतभाव असतो, तेथें एक दुसऱ्याला पाहतो; परंतु ज्यास हें सर्व आत्मरूप भासतें, त्यानें दुसऱ्याला कसें पहावें [बृहदारण्यक. उ० अ० दुसरा ब्रा० चवथें मं० १३ पहा. किंवा " सि० सं० पू० पृष्ट ३१४ टीप ७ पहा.] ८ स्थूलदेहाच्या आधारानें जागृदावस्थेंत पाहणाऱ्या (चर्मचक्षूंच्या) डोळ्यांचा व्यापार.

चले गति । ज्ञानदिठी सततीं । अनुभाविजे तत्त्वें ॥ १० ॥ तत्त्वीं तत्त्व मिळवावें । ओळखणेंचि ओळखावें । परब्रह्म अनुभवावें । अंतरदृष्टीं ॥ ११ ॥ अंतरदृष्टीचेनि सामावें । काय होय तें कवण जाणे(?) । ह्मणोनि मोगेंचि जाणावें । तें परमसुख ॥ १२ ॥ सुखीं जाहलिया समाधान । जोडे आत्माराम निधान । मग तयाहुनी अँवधान । दुजें नाहीं ॥ १३ ॥ दुजें ह्मणतां दुजें होय । एकचि ह्मणतां सौख्य अप्रमेय । ऐशी बरवी सोय । धरावी ज्याहीं ॥ १४ ॥ येथ नलगे आयास । केलिया हेतुचा निरास । आत्मा भेटे स्वयंप्रकाश । जेथील तेथ ॥ १५ ॥ ऐशिया प्राप्तिच्या समयीं । गति होते ठायिंच्या ठायीं । ह्मणोनि तुज लवलाहीं । सांगतों ऐक ॥ १६ ॥ तये वेळे सूक्ष्म भूतांच । अंश लय पावती साचे । तरि ऐक निरासाचे । शब्द आतां ॥ १७ ॥ प्रथम गंध मिळे रसीं । रस रूपीं समरसी । रूपा स्पर्श ग्रासी । स्पर्श शब्दीं मिळे ॥१८॥ शब्द घेऊनियां नभीं । दृश्यशक्तीचेनि वल्लभीं । कारण सुषुप्तीचिया लोभीं । विटलाचि तो ॥१९॥ टांकिलाची आनंदभोग । हृदयस्थान असं [से ?]ग । सांडूनि धरिलें निःसंग । निर्गुण ज्यांहीं ॥२०॥ आतां पृथक पृथक गोष्टि । सांगों नये अवघी । सम (मे ?) ष्टि । आतां स्वयंबोधवृष्टि । पंचमपदीं सांगतों

---

१ अंगुष्ठमात्र पुरुष (अंतरात्मा)नेहमीं जनांच्या हृदयांत स्थित आहे. [कठ उ० अ० २ व० ६ मं० १७ व श्वे० उ० अ० ३ मं. १३ पहा]. त्याला तत्व असें ह्मणतात. २ " सद्रूप तत्वांची गांठोडी शरीर । पाहतां तेथिंचा विचार । तत्वें तत्व सांडितां सार । आत्माचि उरे " ॥ १८ ॥ [दासबोध. रामदास.] ३ लक्ष. ४ निजबोधाच्या योगानें (जेणेंकरून). ५ स्थूलदेहाचा स्थूल भोग आणि सूक्ष्मदेहाचा प्रविविक्त भोग हे दोन्ही जड अर्थात् अशा प्रकारचा जड संग टांकून, कारणदेहामधील जो (असंग=जड संगरहीत) आनंदभोग (निराभास) तो सुद्धां किंवा असंग=निरूपम. ६ सर्व विश्वांतील शरीरांचा आभमानी ईश्वर तो राम होय. ७ गायत्रीच्या पंचम पादामधील. (देवस्येति पंचमपदेन द्योतनात्मकाखंडचिदेकरसमुच्यते ॥ इति (शंकराचार्यविरचित गायत्रीमंत्र भाष्य). अमलानंदयोगी शतश्लोकीमध्यें ह्मणतात ॥ जो उत्कृष्ट त्रिबिंदुयुक्त विकसी या पंच वाचांप्रती । सिद्धांतीं निगमीं अणूतर महा बिंदू तया बोलती । गायत्रीपद पंचमांतरगतीं गुह्यार्थ बीजान्वयें । शंभु स्थापितसे तया अनुभवी तो पूर्णब्रह्म स्वयें ॥१८॥).

॥ २१ ॥ अहंकार मिळे चित्तीं । चित्त मुरे बुद्धि सततीं । बुद्धि मनीं होय रति [उपरति ?] । तयेवेळीं ॥२२॥ मन मिळिजे अंतःकरणीं । अंतःकरण रिघिजे निर्गुणीं । जाणीवपणाची विसरणी । पडिजे जेथ ॥ २३ ॥ घ्राणेंद्रिय मिळे जिव्हेतें । जिव्हा देखे चक्षूतें । चक्षु पाहती त्वचेतें । त्वचा मिळिजे श्रोत्रीं ॥ २४ ॥ अपान धरी प्राण । प्राण रिघे उदान । उदानासि ग्रासिजे समान । सहजगति ॥ २५ ॥ व्यान धरिजे निर्गुण । पंचम पदींचें निर्वाण । पावोनियां सहज खुण । असतो सुखें ॥ २६ ॥ गुद सांडी मलोत्सर्ग । शिश्न सांडी मैथुनसंग । पाद सोडिती गंतव्यांग[1] । जहींच्या तहीं ॥ २७ ॥ पाणी[2] टांकिती स्पर्शपण । वाचा सांडी वाचाळ-पण । एकीएक निर्गुण । ओळखिलें ज्याहीं ॥ २८ ॥ ऐशियापरि सूक्ष्म भूतें । ग्रासिती एकमेकां सततें । स्वानुभवें देहातीतें । जाणावीं तीं ॥ २९ ॥ यया भूतांचे अभिमानी । अभिमान टांकुनी निदानीं । पावती हे अभिधानी । सांगतों ऐक ॥ ३० ॥ विश्वं[3] मिळे तैजसीं । तैजस प्राज्ञीं समरसीं । प्राज्ञ ईश्वरासी । शरण जाय ॥ ३१ ॥ ईश्वर भेटे सदाशिवा । पुसे निर्गुणाचिया ठावा । निराकारीं विसावा । होय जयातें ॥ ३२ ॥ स्थूलभोग मिळे प्रविविक्तीं । प्रविविक्ता आनंदीं भुक्ति । आनंद स्वानंद-भास विरक्ति । मुरे पैं गा ॥ ३३ ॥ नाभी सोडूनि हृदय धरी । हृदय कंठातें निर्धारी । कंठवृत्ति मूर्ध्निभीतरि । बैसे पैं गा ॥ ३४ ॥ मूर्ध्नीची जाणीव दशा । पावे सहस्रदळीं नाशा । आपें आपण प्रकाशा । देखतसे जी ॥ ३५ ॥ ज्या वृत्ति[4] स्वप्न भाविजे । स्वप्न सुषुप्तींत बुझे । सुषुप्ति तूर्यत वसिजे । देखणेंपणीं ॥ ३६ ॥ तूर्या उन्मनींत मुरे । उन्मनि निराकारीं निर्धारें ।ययापरि अनुभव सोपारें । अनुभवियांलागीं ॥ ३७ ॥ वैखरी निमे मध्यमे । मध्यमा पश्यंतीमाजी निमे । पश्यंती परेचिया उगमें ।

---

१ गमन करणें, जाणेंयेण इत्यादि क्रिया. २ हात. ३ याबद्दल सि० सं० पूर्वार्ध ८० १६० टीप १ पहा. ४ सोहिरोबांचा सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्र-कारिका पहा.

स्थिर अशिजे ॥३८॥ परा सूक्ष्मीं बुझे वाचांसें । जेथ वाचां [च्यां?] श नि-रशे । निजसुखाचेनि उल्हासें । स्फुंजत[1] असे जो ॥ ३९ ॥ अथर्वण मिळे सामवेदीं । सामवेद मिळे यजुर्वेदीं । यजुर्वेद ऋग्वेदीं । विरोनि जाय ॥ ४० ॥ ऋग्वेदही सिद्धांतीं । विरोनि जाय सततीं । म्हणोनि एकींएक ज्योति । अवघीचि हे ॥ ४१ ॥ त्रिकूट[2] सांडुनी श्रीहाट धरी । श्रीहाटींचा गोल्हाटाभीतरी । गोल्हाट औटपीठातें वरी । निःसंशय ॥ ४२ ॥ धनंजय[3] देवदत्ता । देवदत्त कूर्मीं रत होय तत्त्वता । कूर्म पावे शांतता । कर्कशा [कृकला?] मध्यें ॥ ४३ ॥ कर्कश [कृकल?] नागातें पोटाळी । सर्वे पावे ऐक्यनवाळी । मग तया अनुभवाची तुळी । नसे आन ॥ ४४ ॥ पिपीलिका[4] पावे मीना[5] गिळूं । मीन पावे विहंगमा[6] आ-कळूं । विहंगम मारुताचा[7] मेळू । एक होय ॥ ४५ ॥ मारूत मिळे सूक्ष्मासी । सूक्ष्म पंचभूतांतें गिंवसी । आतां ऐक तरी ते कैसी । सांगतों गोलि ॥ ४६ ॥ पृथ्वी विरे आपीं । आप विरे तेजदीपीं । तेज पवनांचिये दडपीं[8] । हारपोनि जाय ॥ ४७ ॥ ऐशिया बोधाचिया समयीं । तत्त्वें विरती ठायिंच्या ठायीं । मग तेथें अपायी । नाहींच कांहीं ॥ ४८ ॥ पवना[9] भक्षी व्योमें[10] । मग जीवपणाचें नसे काम । सकळ कल्पनेचें काम । हारपोनि जाय ॥ ४९ ॥ ऐसें बोधाचें सौख्य । लाभे जयातें मुख्य । त सेवूनि परम पियुंख[11] नित्य । तृप्त असती ॥ ५० ॥ ऐशिया

---

१ फुगतो, गर्व करितो (सुखातिशयानें व्याप्त होतो हा भाव.) २ सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका पहा. ३ धनंजय, कूर्म, कृकल, देवदत्त, आणि नाग हे पांच उपप्राण होत ४ पिपीलिका [मुंगी] मार्ग ५ मीन [=मत्स्य] मार्गाला ६ विहंगम (=पक्षी, राजहंस) मार्गास ७ कपि [=वानर] मार्गाचा (या पांचही मार्गांविषयीं सोहिरोबांनीं सि० सं० पूर्वार्ध अ० ९ पृ० १९९ व सि० सं० उ० अ० १० पृ० १ तीं २६ येथें स्पष्टीकरण केलेलें आहे. तें जिज्ञासूंनीं पहावें.) ८ आच्छादन करितो. ९ प्राणवायूस. १० आकाश. ११ परमामृत.

तृप्ततेनें । मुक्त पावती समाधानें । तयां मुक्तांचा लक्षणें । सांगिजेतील पैं ॥ ९१ ॥ तें अनुसंधान पुढें । श्रोतीं पहावें निज निवाडें । सोहिरा म्हणे श्रवणकोडें । पुरतील पैं श्रोतयांचीं ॥ ९२ ॥

इति श्रीअक्षयबोधे स्वस्वरूपबोधलक्षणं नाम
सप्तमप्रकरण समाप्तम् ॥ ७ ॥

प्रकरण ८ वें.

(मुक्तलक्षणानिरूपण.)

श्री आद्यरूपायनमः । मुक्त म्हणणें तें कैसें । जें जीवनकळेत प्राशुनि असे । तेथ न पाहेचि विंवसे । जीवपणाचे ॥ १ ॥ भ्रमरगुंफेमाजि बैसणें । निजवृत्तीसि नोळखणें । तेथ मुक्त ऐसें म्हणणें । नाम तया ॥ २ ॥ प्रणवबीज तये वेळे । नुरतीच तयाचे सोहळे । म्हणोनि निराळें । परब्रह्म तें ॥ ३ ॥ अंकार मिळे उकारीं । उकार मिळे मकारीं । मकार अर्धमात्रा निर्धारी । ऐक्यपणें ॥ ४ ॥ अर्धमात्रा शून्यामाजी । सहजसमाधि निर्जी । ह्मणोनि तये मौजीं । मुक्त डुल्लती ॥ ५ ॥ तयां मुक्तांलागीं । शब्द कर्मे न चलती सलगी । एकीएक पूर्णांगीं । असणें

---

१ कृत्येला, राक्षसीला. २ मस्तकाचे आंत असणाऱ्या मेंदूमधील (मध्य बिंदूच्या स्थानास) जाग्यास भ्रमरगुंफा अशी संज्ञा आहे. ३ ज्ञानवृत्तीलाही न ओळखणें ह्मणजे ब्रह्माच ज्ञान आणि अज्ञान हीं दोन्ही टांकून केवळ अद्वैत चैतन्य होणें. ४ ॐ कार रूप ज अव्यक्त बीज. ५ योगाभ्यासामध्यें ॐ काराच्या तीन मात्रा (अ उ म) एक शब्द समजन योजिल्या असतां कैवल्यस्थितीचा अनुभव येतो. हा ॐ कार परब्रह्मांचा व्यंजक हाय. [प्रश्नोपनिषत् प्र० ५ वा, मं० १ ते ७ जिज्ञासंनीं पहावें.

जयां ॥ ६ ॥ तयांचे निज दृष्टिसी । मेदिनी दिसे आकाशीं । आकाश दिसे अवकाशीं । उपरमोनियां ॥ ७ ॥ तेज दिसे वायु । वायूचि भासे जळाचा प्रीयु । जळ दिसे अग्निचा समयु । पाहतां ज्यासी ॥ ८ ॥ चर[१] दिसे अचर[२] । अचरें दिसती चर । ऐशिये दृष्टीं निरंतर । देखणें दिसे ॥ ९ ॥ स्थावर दिसती जंगम । जंगमीं स्थावराचें नाम । उभयांचा एक उगम । दिसे जयातें ॥ १० ॥ प्रवृत्ति दिसे निवृत्ति । निवृत्ति प्रवृत्तीचि मति । आहे एकमेकीं सततीं । ठायिंच्याठायीं ॥ ११ ॥ वनचरें दिसती घरबारें । घरबारें दिसती वनचरें । ऐशीं जयांचीं अंतरें । ऐक्यासि येती ॥ १२ ॥ देव दिसती धोंडे । धोंड्यांत चैतन्य उघडें । ऐसा जयाचिया निज निवाडें । आत्मारामचि ॥ १३ ॥ नर दिसती वानर । वानर दिसती नर । ऐसा जो विपरीत विचार । मुक्तांचा पैं ॥ १४ ॥ वृद्ध दिसे बाळ । आणि बाळ तारुण्य केवळ । जळ तें दिसे स्थळ । जया सहजेंचि पैं ॥ १५ ॥ वृद्धीं दिसे तारुण्य । तरुणीं (तारुण्यीं ?) दिसे वृद्धपण । ऐशी हे एकीएक खुण । घडे तोचि जाणें ॥ १६ ॥ तारुण्य सांडुनी वृद्धपण भोगी । इंद्रिय नसतां मैथुनालागीं । ऐसें जयाचिया ज्ञान अनंगीं (अभंगीं ?) । डुल्लत असे ॥१७॥ तरुण स्त्रीचो अनावडी । वृद्धेसि धरी काम गोडी । ऐशी ते विपरीत प्रौढी । मुक्तांची पैं ॥ १८ ॥ योगी दिसे संसारी । संसारींच योगी निर्धारी । ऐशी कवण एक बा परि । तयाची पैं ॥ १९ ॥ ओस दिसे नगर । नगर दिसे ओसप्रकार । ऐशी जयाची दृष्टी निरंतर । नांदत असे ॥ २० ॥ राव तो दिसे रंक । आणि रंक निजऐश्वर्य[६]मयंक । ऐसें जयाचे [निष्टंक][७] । देखणें त ॥ २१ ॥ उत्तम बोलतां वाचाळपण । वाचाळीं दिसे उत्तम गुण । ऐशी तयांची साक्षेप खुण । लाधे तोचि जाणे

१ जंगम अथवा चालणारे (प्राणी). २ स्थिर (पर्वतादिक). ३ घरांत राहणारीं मनुष्यादिक. ४ अपरा विद्या. ५ पराविद्येशीं [उन्मनिशीं]. ६ चन्द्र. ७ खचीत, निश्चयात्मक.

॥२२॥ ऐसें हें बोलणें । विपरीत ह्मणों नये शहाणें । समदृष्टीचें भोगणें । ऐसेंचि हे ॥ २३ ॥ सर्व देखे चैतन्यरूप । एकींएक ज्ञानदीप । उजळे तेथ विक्षेप । नाहींच कांहीं ॥ २४ ॥ येथूनि संपलें निरूपण । पूर्व उगमाची खुण । सहजसमाधि आपण । पहुडलाचि तो ॥ २५ ॥ अज्ञानाचिये वाचे करवीं । बोलविलें पूर्णज्ञान अनुभवीं । एकीं एक सोहिरा नावीं । लेखन केलें ॥ २६ ॥ अभिधानें स्थल वाडी[1] । ग्रंथ लिहिला आवडी । निजसुखाची वाढी । वाढली पुढें ॥ २७ ॥ शके सोळाशें एकाहात्तरें । शुक्ल नाम संवत्सरे । कार्तीक वद्य षष्ठी स्थिरवारे । तद्दिनीं ग्रंथ निर्धारें संपला जाणा ॥ २८ ॥

इति श्रीअक्षयबोधे उत्तरार्धे स्वस्वरूपएकाकारेमुक्तलक्षणानिरूपणं नाम अष्टमप्रकरणं समाप्तम् ॥ ८ ॥

---

१ सावंतवाडी. [सावंतवाडी शहरांत हा ग्रंथ सोहिरोबांनीं लिहिला असावा.]

सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध वगैरे यांचे शुद्धिपत्र.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
		श्री अद्वयानंद.		
		प्रथम प्रकरण.		
१	०	(टीप १) नामरूपाशी	नामरूपाची	१
१	०	(टीप १) अवज्ञा होईल	अवज्ञा होत जाईल	१
१	०	(टीप १) मग देह	मग त्याचा देह	१
३	२	सामावे	(अन्यपाठः-) सामाहे	२
२४	२	जाणिलें	जाणिजे	४
३६	२	विकडा	विघडा	५
३७	२	स्वरूपी	स्वस्वरूपीं	५
५१	३	नुसतें जे	निःस्तेजें	६
७२	२	गत गतीच	गतो गतीच	८
		द्वितीय प्रकरण.		
१	३	उपजाविजे	उपलविजे	१०
१००	१	आनंद अवतर	(अ.पा.) अनादर अवसरे	१०
६	१	स्थूलं जाडे	स्थूलें जोडे	१०
२९	०	(टीप १०) स्थूल देहा	स्थूलदेहावधीपर्यंतचे	१२
६२	४	ययाचे पै	ययांचा पैं	१५
६६	२	देक्षा	दीक्षा	१५
६६	३	मुमुक्षु अपेक्षा	मुमुक्षा	१५
६६	४	पुरवीत पैं गा	जाणावें पैं गा	१५
०	०	(टीप २) सत्र	सूत्र	१५
७०	२	स्वभावे देह	स्वभावें देव	१६
७१	२	परिणाम	(अन्यपाठः-); परिश्रम	१६
७४	२	तेंचि पहावे	हेंचि पहावें	१६

सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध वगैरे यांचे शुद्धिपत्र.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
		तृतीय प्रकरण.		
५	४	पा ऐक	पां ऐक	१७
२०	३	अभिमान	अभिधान	१८
३९	३	गोठी	गांठी	२०
७९	०	(टीप २) त्रियेच्या अंडबिंदूत	त्रियेच्या कर्णिकेतील रेतबिंदूंत.	२३
		चतुर्थ प्रकरण.		
७	४	कदापीही	कदापी गा !	२४
१०	३	ययांतीं	तयांतीं	२५
१६	१	चोज	चोजें (अन्य पाठ:); तोजें	२५
४७	०	(टीप ७) भते	भूतें	२८
५६	०	(टीप ६) बुडां बुडी	बुडीं	२९
		पंचम प्रकरण.		
२७	२	नावत आणी	नांवत आणी	३२
२७	३	सवाचित्त	सावचितु	३२
०	०	(टीप ४) अद्वैत चैतन्य मय	अद्वैत चैतन्यमय	३२
६५	४	तयांत	तयातें	३६
०	०	(टीप ३) फेकन	फेंकून	३६
७२	१	तत्त्वातत्त्व	तत्वांतत्त्व	३७
		सप्तम प्रकरण.		
१२	१	गासावी	गोंसावी	
१९	२	पूर्णज्ञान	(अन्य पाठ:) पूर्वज्ञान	४२
०	०	(पृ.४३वरील टी.८)मनेंद्रिय निवे	मनेंद्रिय निधे	४४

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
४७	४	नसोचि तेथ	(अन्य पाठः) नयेचि तेथ	४५
७१	१	दावा वोप	दावी वोप	४८

अष्टम प्रकरण.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
२५	२	सोमवारे	(अन्य पाठः) सोमवासरे	५०.

---

२ पूर्णाक्षरी.

प्रकरण पहिलें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
१	०	(टीप १) अक्षयवाघ	अक्षयबोध	५१
१	०	(टीप १ करणें	प्रकरणें	५२
१	०	(टीप चालू ब्रह्मरंध्र विना श्लो५७	ब्रह्मरंध्राविना	५२
५	१	(टीप४)साक्षी हा नसतो ह्मणून.	साक्षी असतो ह्मणून आत्म्याचा अत्यंत अभाव नसतो.	५४
५१	०	(टीप ९) भ्रमध्यभागी	भ्रूमध्यभागीं	६०

प्रकरण २ रें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
२९	१	(टीप ७) देवारणें	देवारणें	६४
४३	१	कपुसाचा	कापुसाचा	६५
५८	१	रजतवरें	रजताकारें	६६

प्रकरण ३ रें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
७	३	उबगणें	उबगण	७२
९	२	वरूं शके	वरूं शके	७२

सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध वगैरे यांचे शुद्धिपत्र.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
१४	२	पोंवळन	पोंवळें न	७२
१६	४	जागृ ीं	जागृतीं	७२
२१	१	मोहरू दिसेना	मोहरू दिसे नाना	७३
३३	२	धावेल	धांवेल	७४
		प्रकरण ४ थें.		
३	२	विटकळ	विटकळे	७४
४	४	रिवो	रिघों	७५
२३	२	घुावे	घुरावें	७६
२३	२	(टीप ११) गुरगुणें	गुरगुरणें	७६
२५	१	(टीप १२) विमयेच्या	किमयेच्या	७६
२६	१	आंतुलें उठ	आंतुलें उठे	७७
२६	४	जुप जो	जुंपे जो	७७
२८	२	कांठ	कांठें	७७
		प्रकरण ५ वें.		
९	४	धरी	हात धरी	७८
१४	३	केसरा	केसरी	७९
१६	१	विवार	बिकार	७९
२०	३	इंद्रिय आमिषी	इंद्रिय आमिषीं ।	७९
		प्रकरण ६ वें.		
१०	४	विवेक कीं	विवेक कीं हा	८१
		प्रकरण ७ वें.		
९	१	(टीप ५) प्रशसेला	प्रशंसेला	८३

सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध वगैरे यांचे शुद्धिपत्र.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
२६	११२	अनंगासि रूपसंग	अनंगासी रूपरंग । रंगासी रूपसंग	८४
३७	३	वैराग्यासि भाग्य	वैराग्यासी भोग्य	८५

प्रकरण ८ वें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
१२	१	लाक चालो	लोक चाळो	८८
५२	३	आघवाच	आघवाचि	९१
५५	२	दवाच	देवाचें	९१

प्रकरण ९ वें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
५	२	न्हाण	न्हाणें	९१
३६	२	जिराल	जिरालें	९४
४६	१	(टीप ४) श्रति	श्रुति	९५
७४	२	भारत कथेचे	भारतकथेचे	९७
८४	३	नेधै	नेधे	९८
८७	३	चतन्याची	चैतन्याची	९८
९७	२	ज अगोचर	जें अगोचर	९९

---

२ अक्षयबोध.

प्रकरण १ लें.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
२५	२	लिंग तनसि	लिंगतनुसी	१०२
३९	१	शद्वोचें	शद्वोचें	१०३
४६	२	(टीप १) क्रया	क्रिया	१०४

सोहिरोबानाथकृत किरकोळ ग्रंथ अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध वगैरे यांचे शुद्धिपत्र.

ओंवी	चरण	अशुद्ध व अपूर्ण	शुद्ध व पूर्ण.	पृष्ठ.
५९	२	(टीप ७) द्विविधपणान	द्विविधपणानें	१०५
६३	२	(टीप १२) बाधरूप अंगाचें	बोधरूप अंगाचें	,,
,,	४	(टीप १४) पूर्वाक्ति	पूर्वोक्त	,,
		प्रकरण ३ रें.		
११	३	ऐस	ऐसें	१०७
६	३	अंतर क बंध विच्छेदेन	अंतर कर्मबंधविच्छेदन	११०
२४	१	(टीप ६) वागण	वागणें	१११
		प्रकरण ७ वें.		
२	४	सहजोंचि त	सहजोंचि तैं [तें]	१२८
३६	३	तूर्येत	तूर्येंत	१३०